**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथील बंगल्यात फ्रेंडशिप डे च्या निमित्ताने विनापरवाना आयोजित मद्य पार्टीवर पोलीसांनी छापा टाकून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केलेली अटक**

**(१) * १०३१५ डॉ.निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.धनंजय मुंडे , श्री.संजय केळकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.राजन तेली , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थेऊर (ता.हवेली, जि.पुणे) येथील बंगल्यात फ्रेंडशिप डे च्या निमित्ताने विनापरवाना आयोजित मद्य पार्टीवर पोलीसांनी छापा टाकून सिंबॉयसिस महाविद्यालयातील ४०० विद्यार्थ्यांना दिनांक २ ऑगस्ट, २०१० रोजी वा त्या सुमारास अटक केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशा प्रकारच्या राज्यात होणाऱ्या रेव्ह पार्टींना कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) व (३) दि.०१/०८/२०१० रोजी पोलीसांना मिळालेल्या बातमीवरुन रात्री ००.४५ वाजता पंचासमक्ष मौजे थेऊर हद्दीतील सिंधु बंगल्यावर छापा टाकण्यात आला असता सदर बंगल्यात विना परवाना पार्टीचे आयोजन करुन मद्यधुंद अवस्थेत डि.जे. साऊंड सिस्टम लावून नाच गाणे करणारे २५४ मुले व २३५ मुली आढळून आल्या. सदर ठिकाणी १७३०३/- रुपयांच्या विविध प्रकारच्या देशी विदेशी दारुच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच सदर मुलांपैकी ८७ मुलांनी मद्यार्काचे सेवन केल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाल्याने ते व डि.जे. चालक असे एकूण ८८ जणांविरुध्द लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.१५४/१०, मुंबई पोलीस कायदा कलम ६५ ख, ड, ई, ६६(१) ब, मुंबई पोलीस कायदा कलम ११०, ११२, ११७, ३३ (एन) (डब्लू) १३३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहराच्या जवळ असलेल्या अष्टविनायकामधील श्री चिंतामणी या प्रसिध्द मंदिराच्या जवळच असलेल्या थेऊर येथील फार्म हाऊसवर ही घटना घडल्यानंतर पुणे शहरामध्ये कित्येक महिने त्या संपूर्ण विद्या क्षेत्रामध्ये, शिक्षण क्षेत्रामध्ये सातत्याने



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10315.... डॉ.नीलम गोऱ्हे

या प्रश्नाबाबत चर्चा चालली होती. यासंबंधी तेथील ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री.प्रताप दिघावकर यांनी ताबडतोब कारवाई करण्यास सुरुवात केलेली आहे. लेखी उत्तरावरुन या प्रश्नासंबंधी 2-3 मुद्दे शिल्लक राहतात. या पार्टीची एसएमएसद्वारे ज्या मुलांनी सूचना दिली होती त्यात नवीन आलेल्या मुली आहेत. कारण 8-10 दिवसापूर्वीच कॉलेज सुरु झाले होते. त्या एसएमएसमध्ये मीनी स्कर्ट घालून यावा असा ड्रेस कोड कळविला होता. या पार्टीचे संयोजन करणारे विद्यार्थी आहेत. नंतर ती शिक्षण संस्था नामानिराळी राहिली आहे. विद्यार्थ्यांनी ती पार्टी आयोजित केली होती असे संस्थेचे म्हणणे आहे. शिक्षण संस्थेच्या परवानगीशिवाय पार्टी होऊ शकत नाही, संस्थेची थोडीशी अनौपचारिक परवानगी असते. या मुलांनी ड्रेस कोड कळविला होता. तसेच दारु विकत आणली होती. यातील जे सूत्रधार विद्यार्थी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करणार आहे काय, यामध्ये 3 प्रकारचे विद्यार्थी व विद्यार्थीनी दिसत आहेत. जे नवीनच होते म्हणून गेले होते. तेथे गेल्यानंतर ते धक्का बसलेल्या परिस्थितीत होते. मुलांनी आत्महत्या पर्यंत जाऊ नये हे पाहण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पोलिसांनी या संयोजकांवर कोणती कारवाई केली ? त्यांच्यावर चार्जशीट दाखल केली आहे का, त्यांच्याविरुध्द कोणती कलमे लावली आहेत, कारण जी कलमे लावली आहेत ती किरकोळ स्वरुपाची आहेत. याबाबत सहानुभूतीची भूमिका घेतली असल्याचे दिसते. यामध्ये जे म्होरके आहेत त्यांच्याविरुध्द शासन कठोर कारवाई करणार आहे काय, त्याचप्रमाणे या मुलांकडे गाडया होत्या त्यापैकी 1 गाडी गुजरात राज्यातील आरटीओ पासिंगची होती. गुजरात राज्य प्रदेश सरचिटणीस आणि ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी सदस्य असे त्या गाडीवर लिहिलेले होते आणि त्या गाडीचा क्रमांक जीजे-3बीए-3940 असा होता. ती गाडी कोणाची आहे, यापुढे रेव्ह पार्टींना अटकाव करण्यासाठी शासन कशा स्वरुपाची भूमिका घेणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, फ्रेण्डशीप डे च्या दिवशी सिंधु बंगल्यावर आष्टेकर नावाचा विद्यार्थी होता त्याच्या वडिलांच्या फार्म हाऊसवर विद्यार्थ्यांनी ही पार्टी आयोजित केलेली होती. आतापर्यंत याप्रकरणाचा पोलिसांनी तपास केलेला आहे त्यामध्ये या पार्टीशी संस्थेचा प्रत्यक्ष,

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र.10315.... श्री.आर.आर.पाटील....

अप्रत्यक्ष सहयोग आढळून आलेला नाही. पोलिसांनी धाड टाकली त्यावेळी 254 मुले व 235 मुली आढळून आल्या. त्यापैकी 87 मुलांनी मद्य प्राशन केल्याचे वैद्यकीय व पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. या पुढील काळामध्ये अशा घटना घडू नये म्हणून संस्था चालकांना उच्च शिक्षण विभागामार्फत सक्त सूचना देण्यात येतील, सुचविण्यात येईल. शेवटी पोलीस सगळया ठिकाणी जाऊ शकत नाही, परंतु पोलिसांना कळल्यानंतर स्वत:हून रेड टाकली आहे आणि कायद्याप्रमाणे सर्व कारवाई केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 11:05

ता.प्र.क्र.10315.. श्री. आर.आर.पाटील....

ज्या गाडीसंदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला त्यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. या सर्व गाडया कुणाच्या होत्या यासंबंधीचा तपास पोलिसांनी केलेला नाही. त्या ठिकाणी जी गाडी होती ती कुणी आणली होती याची माहिती माझ्याकडे नाही. याबाबत पोलिसांना चौकशी करण्यास सांगण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंडगांव ते सिरसोली (जि.अकोला) या रस्त्यावरील पोहरा नाल्यावर पुल बांधण्याबाबत**

**(२) * ९०३१ श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंडगाव ते सिरसोली (जि.अकोला) या रस्त्यावरील पोहरा नाल्यावर पुल नसल्यामुळे पावसाळ्यात ४-६ महिने वाहतुक बंद असते. त्यामुळे नागरिकांना व शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीकडे वारंवार तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पुल बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री रणजित कांबळे,श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) मुंडगांव ते सिरसोली (जि.अकोला) या रस्त्यावरील पोहरा नाल्यावर बसका सेतू (flush causeway) अस्तित्वात आहे. पावसाळ्यात पूर आल्यास येथील वाहतूक बंद पडते. या ठिकाणी पूल बांधण्याबाबत मा.वि.प.स. यांनी शासनास विनंती केली आहे.

(२) प्रश्नाधीन पूल जिल्हास्तरीय रस्त्यावर असल्यामुळे सदर पुलाच्या बांधकामाचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला असून जिल्हा नियोजन समितीने मान्यता व निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : मुंडगाव ते सिरसोली या रस्त्यासाठी 2004मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने 90 लाख रु.ची मदत केल्यामुळे हा रस्ता सुव्यवस्थित झालेला आहे. परंतु त्या रस्त्यावरील नाला अतिशय धोकादायक आहे. पावसाळयामध्ये सातपुडा पर्वतावरुन पाण्याचा जोरदार प्रवाह येतो त्यामुळे 4-6 तास वाहतूक बंद पडते. त्यामुळे त्या रस्तावरुन राज्य परिवहन महामंडळाला बस सुरु करता आलेली नाही. म्हणून या रस्त्यावरील छोटासा पूल बांधण्यासाठी सन 2011-2012च्या बजेटमध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : हा ग्रामीण मार्ग आहे. इतर जिल्हा आणि ग्रामीण मार्गाच्या नियोजनासाठी डीपीडीसीमध्ये निर्णय घेण्यात येतो. या पुलाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांना आणि जिल्हाधिका-यांना देखील पत्र दिले होते. जे आवश्यक रस्ते बांधकाम विभाग प्रस्तावित करते त्या यादीमध्ये सन 2010-2011मध्ये हा रस्ता डीपीडीसी मधून घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे.सन्माननीय सदस्य हे डीपीडीसीचे सदस्य आहेत. इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग

..3..



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 11:05

कोणते घ्यावेत यासंबंधी डीपीडीसीमध्ये निर्णय घेतला जातो आणि तरतूदही केली जाते. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी येणा-या वर्षामध्ये या रस्त्यावरील पूल डीपीडीसी मधून मंजूर करुन घ्यावा अशी त्यांना विनंती आहे.

श्री. रामनाथ मोते : या रस्त्यावरील पुलाच्या कामासाठी लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा जिल्हा नियोजन समितीकडे तक्रारी केलेल्या आहेत. हा गावस्तरावरचा रस्ता असल्यामुळे जिल्हा नियोजन समितीने हा पूल करणे आवश्यक आहे असे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे. जिल्हयाचे सन्माननीय पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असतात. त्यामुळे हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या संदर्भात डीपीडीसीला शासनातर्फे निर्देश किंवा सूचना दिल्या जातील काय ?

श्री. रणजित कांबळे : अकोला जिल्हयाचे पालकमंत्री श्री. राजेंद्र दर्डा हे आहेत. हे काम प्राधान्याने घ्यावे यासंबंधी मी त्यांना निश्चितच पत्र लिहीन.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या आर्थर रोड कारागृहाचा निधी कसाबच्या सुरक्षेसाठी वापरला जात असल्याबाबत**

**(३) * ९३१४ श्री.किरण पावसकर , श्री.रामदास कदम , डॉ.दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या आर्थर रोड कारागृहाच्या नियोजित इमारतीच्या बांधकामासाठी मंजूर केलेला अडीच कोटी रुपयांचा निधी मुंबई बॉम्बस्फोट कटातील आरोपी अजमल कसाबच्या सुरक्षेसाठी गृह विभागाने खर्च केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैद्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कारागृहाच्या संरक्षक भिंतीपासून १८२ मीटर क्षेत्रात नवीन बांधकामास परवानगी देण्यात येवू नये असे असताना गृह खात्याच्या माजी मंत्र्यांनी मे.डी.बी.रिएलीटी या प्रख्यात विकासकाच्या कंपनीस ७० मजल्यांच्या इमारतीस परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कारागृह सुरक्षेस कोणताही धोका पोहोचणार नाही यासाठी काही अटी व शर्तीच्या अधिन राहून डी.बी. रिएलीटी विकासकास परवानगी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. किरण पावसकर : कारागृहातील कैद्यांच्या सुरक्षिततेसाठी दुमजली इमारत बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अडीच कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यातील 75टक्के रक्कम केन्द्र शासनाने दिलेली आहे. मंजूर केलेला निधी खर्च करण्याची मुदत 31 मार्च 2010 पर्यन्त आहे. हे पैसे बांधकामासाठी देण्यात आले होते. ते बांधकामासाठी न वापरता अजमल कसाबच्या सुरक्षिततेसाठी वापरण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत आर्थररोड कारागृहाच्या बाहेरच्या परिसरामध्ये 7 मजली इमारत बांधण्याच्याबाबतीत शासनाने सुरक्षिततेच्या कारणास्तव आक्षेप घेतला होता. या संदर्भात अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून काही अटी घालण्यात आल्या. कैद्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कारागृहाच्या संरक्षक भिंतीपासून 182 मीटर क्षेत्रात नवीन बांधकामास परवानगी देण्यात येवू नये अशी अट आहे. त्यामुळे झोपडवट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधावयाच्या 7 मजली इमारतीस परवानगी नाकारण्यात आली. मग मे.डी.बी.रियालिटी या विकासकाच्या कंपनीस 70 मजल्यांची इमारत बांधण्यास कशी काय परवानगी देण्यात आली ? या 70 मजली इमारतीमुळे कारागृहातील कैद्यांच्या

जीवितास धोका निर्माण होणार नाही काय ? अडीच कोटी कसाबच्या सुरक्षेसाठी वापरले. या कसाबचे एवढे चोचले सरकार का पुरवित आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 11:10

ता.प्र.क्र.9314............

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 2.56 कोटी रुपये हे नवीन बरॅक निर्माण करण्यासाठी बांधकाम विभागाने जेल विभागासाठी मंजूर केले. दरम्यान 26.11 ची घटना घडली आणि कसाबसारख्या आंतरराष्ट्रीय अतिरेक्याला सुरक्षित ठेवणे हे देशाच्या कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आणि आपल्या सिस्टीमची आवश्यकता होती. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय एजन्सीना या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी हा आरोपी जिवंत राहणे निश्चितच आवश्यक होते. त्याची चौकशी केवळ देश स्तरावरील एजन्सी नव्हे तर आंतरराष्ट्रीय एजन्सी सुध्दा करीत होत्या. कसाबला पकडल्यामुळे पाकिस्तानचे पितळ उघडे पडू शकले. आजपर्यंत अनेक अतिरेकी कृत्यांमध्ये सहभागी असताना सुध्दा आपल्या देशाला काश्मीरमधील किंवा देशातील अन्य घटनांबाबत त्यांच्यावर आरोप करुन थांबावे लागत होते. प्रत्यक्ष पाकिस्तानला उघडे पाडण्याचे काम या कसाबच्या जिवंत राहण्यामुळे आणि जिवंत पकडण्यामुळे होऊ शकले. ज्यावेळी हा आरोपी सापडला त्यावेळी तातडीने बजेट मंजूर करुन सी.एफ.घेणे शक्य नव्हते. म्हणून जेल विभागाला 1.28 कोटी रुपये बरॅक बांधण्यासाठी खर्च करण्यात आले. ही रक्कम खर्च केली असली तरी तातडीने पुढे आलेल्या बजेटमध्ये पुन्हा जेल विभागाला 5.26 कोटी रुपये मंजूर केले आणि त्यातून 1.28 कोटी रुपये बरॅक बांधण्यासाठी घेतले होते ते मुख्य कामासाठी वळते करण्यात आले. त्यामुळे केंद्र सरकारने किंवा राज्य सरकारने मंजूर केलेला निधी तात्पुरता त्या कामासाठी वापरला असला तरी तातडीने तो परत करण्यात आला. त्या बरॅकचे काम सुरु झालेले होते. त्यामुळे त्यात फार काही कसाबचे लाड केले असा भाग नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डी.बी.रिॲल्टी या विकासकाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. मागील काळात खालच्या सदनामध्ये या संदर्भात चर्चा झाली होती. माननीय अध्यक्षांनी राज्य शासनाला निदेश सुध्दा दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम त्यावेळी विधानसभा सदस्य या नात्याने सभागृहात उपस्थित होते. केस अशी होती, जेलभोवती राज्य सरकारच्या कायद्याप्रमाणे 182 मीटर क्षेत्रात जेलपेक्षा ऊंच इमारत बांधू नये अशी तरतूद आहे. केंद्र शासनाच्या मॉडेल ॲक्टप्रमाणे 150 मीटर ऊंच इमारत बांधू नये अशी तरतूद आहे. एसआरए योजना मंजूर करताना प्राधिकरणाचे सीईओ आणि महानगरपालिका यांनी जेलच्या संदर्भात असलेले सगळे कायदे दुर्लक्षित ठेवून तेथील काही झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यास

..2..

परवानगी दिली. योजना मंजूर झाल्या. त्याठिकाणी झोपड्यांमध्ये जे लोक रहात होते त्यांना संक्रमण शिबीरामध्ये हलविण्यात आले. तेथील पूर्वीची घरे पाडण्यात आली आणि इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले. 2007 मध्ये बांधकाम सुरु झाल्याचे लक्षात आले त्यावेळी जेलच्या ॲथॉरिटीने मुंबई महानगरपालिकेला कळविले की, मुंबई पोलीस मॅन्युअलमध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे तुम्ही बांधकाम करु शकत नाही. काही काळ बांधकाम बंद राहिले. त्या सदनामध्ये मी स्वत: दिलेल्या आश्वासनाप्रमाणे 13 वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती गठित करण्यात आली होती. त्यात ज्यांच्या झोपड्या पाडण्यात आल्या त्यांच्याबाबतीत काय व्यवस्था करता येईल आणि जेल कशी सुरक्षित ठेवता येईल याबाबत त्यांनी शिफारस करावयाची होती. सचिव दर्जाचे 13 वरिष्ठ अधिकारी या समितीमध्ये होते. एका इमारतीला डेड वॉल करुन जेलशी संपर्क येणार नाही अशी अट घालून तत्कालीन अधिकाऱ्यांनी आणि आमच्या सहकाऱ्यांनी मिळून त्यांना परवानगी दिली. परंतु आणखी अटी व शर्ती घालून परवानगी देण्यात आली होती. ज्यामुळे जेलच्या सुरक्षेला कोणताही धोका पोहोचणार नाही अशा अटीवर परवानगी दिली होती. काही लोक विस्थापित झाले होते. 13 वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित केली. त्या समितीने शासनाला अहवाल सादर केला. त्यांनी काही महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. कारागृहाच्या तटबंदीपासून 150 मीटर अंतरापर्यंत कोणतेही बांधकाम अनुज्ञेय करु नये. ब वर्ग कारागृह असेल तर 150 ते 200 मीटर अंतरावर 14 मीटरपेक्षा अधिक ऊंच इमारत असू नये. प्रत्येक जेलची कॅटॅगरी असते. 200 ते 300 मीटरपर्यंत किती उंचीची इमारत असावी अशा प्रकारच्या शिफारशी केलेल्या आहेत.

नंतर डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9314........... श्री. आर.आर.पाटील....

या सगळ्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. मध्यंतरी उच्च न्यायालयात एक पीआयएल दाखल झाली होती त्यावेळी सुध्दा कोर्टाने असा निर्णय दिलेला आहे की ज्या इमारती बांधून पूर्ण झाल्या आणि ज्या अर्धवट किंवा प्रगतीत आहेत त्यांच्या परवानगीच्या बाबतीत शासनाने किंवा जेल ऑथॉरिटीने पुनर्विचार करणे योग्य नाही. एका बाजूने बेघर लोक आहेत तर दुसऱ्या बाजूला मुंबई महापालिका आणि एसआरएने स्कीम मंजूर केली आहे. एकंदरित या 13 अधिकाऱ्यांच्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून त्याच्या आधारे जेलच्या सुरक्षिततेला कुठलीही बाधा येणार नाही तसेच अशा प्रकारच्या इमारतींच्या बाबतीत काय करावे, यासंबंधीचा निर्णय शासन घेईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहात अतिशय विवेचनपूर्ण सांगितले की, कशा प्रकारे ही परवानगी दिली आहे. या ठिकाणी 70 मजल्यांची इमारत बांधण्यात आली असून अशा इमारतींमध्ये स्लममधील लोक कसे राहू शकतील, हा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच येथे खोदकाम करताना त्यादरम्यान मानवी हाडांचा सांगाडा सापडला याविषयी माननीय गृह मंत्री सभागृहात खुलासा करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ज्या दिवशी हा सांगाडा सापडला त्यावेळेस थोडे मलाही आश्चर्य वाटले होते की एखाद्या कैद्याला कोणीतरी मारले की काय ? पण साठ फुटाच्या अंतरावर असा जुना सांगाडा सापडला म्हणून त्याची पाहणी केली असता तसेच त्याबाबत अधिक माहिती देखील घेतली. त्यानुसार 1924 मध्ये जेव्हा जेलची निर्मिती झाली त्यावेळेस ही जागा शहराच्या बाहेरची होती व पूर्वी तेथे स्मशान भूमी असल्याची माहिती समोर आली. तसेच हा संपूर्ण सांगाडा सापडलेला नाही तर फक्त कवटीचा काही भागच सापडला असून नेमका हा भाग कसा व कधीचा असू शकतो याची तपासणी करण्यासाठी हा भाग फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात आला. तपासणीत जेल निर्माण होण्यापूर्वीचा हा सांगाडा असेल तर प्रश्नच येत नाही पण त्यानंतरचा असेल तर मात्र आणखी खोलात जाऊन या प्रकरणाची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री. विजय सावंत : महोदय, विकास आराखड्यामध्ये कुठलीही अशी अट घातली नव्हती परंतु त्यात शासनाला केव्हाही सुधारणा करता येते. आदर्श सोसायटीच्या बाबतीत सुध्दा असाच प्रश्न निर्माण झाला होता, उंचीची अडचण आली होती. तशीच अडचण जेलच्या सुरक्षिततेबाबत

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9314........... श्री. विजय सावंत....

निर्माण झालेली आहे. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सिक्युरिटीच्या दृष्टीने मुंबईतील आणखी अशा प्रकारचे स्पॉट आयडेंटिफाय करुन त्यानुसार योग्य ती खबरदारी घेणार काय?

श्री. आर.आर.पाटील : होय. सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेला सुध्दा सूचना केलेल्या आहेत. तसेच या अनुषंगाने जो कायदा आहे त्यात जेलच्या संदर्भात कोणत्या तरतुदी आहेत काय हे देखील पाहण्यात येईल. तसेच भविष्यात अशा इमारतींना परवानगी देऊ नये असे मुंबई महापालिका तसेच एसआरएच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाही जेल ऑथॉरिटीकडून कळविण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 13 अधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाबाबत बोलताना सांगितले की, 182 मीटरपर्यंत उंचीचा शासनाचा नियम आहे. तसेच संरक्षण भिंतीपासून एवढ्या अंतरावर बांधकाम करता येणार नाही, असेही ते म्हणाले. परंतु 150 मीटरपर्यंतच बांधकाम करण्याची समितीची शिफारस असूनशासनाचा 182 मीटरचा नियम असताना तो 150 पर्यंत करण्याचा अधिकार या समितीला आहे काय ? तसेच या इमारतीच्या 7 मजल्यांना शासनाने स्थगिती दिलेली आहे, ती स्थगिती शासन उठविणार आहे काय ? त्याचप्रमाणे शासन 70 मजल्यांच्या इमारतीला बांधकामाची परवानगी देते मग 7 मजल्यांना स्थगिती देण्याचे कारण काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, या समितीच्या शिफारशी शासनाकडे प्राप्त झाल्या असून जेलच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कुठलीही तडजोड न करता जे काही करणे शक्य आहे त्या सर्व गोष्टी केल्या जातील. तसेच समितीने केलेल्या सर्व शिफारशींचा अभ्यास करुन योग्य असतील तर त्या स्वीकारल्या जातील. उच्च न्यायालयाने जे निर्देश दिलेले आहेत ते देखील शासनाला पाळणे बंधनकारक असून त्या अनुषंगाने कार्यवाही केली जाईल.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यातील बॉम्ब स्फोट सारख्या दहशतवादी कारवायांमध्ये दहशतवाद्यांकडून मोबाइल सिम कार्डचा वापर होत असल्याबाबत**

**(४) * ९५३८ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्रीमती अलका देसाई , श्री.संजय दत्त , श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , डॉ.दिपक सावंत , डॉ.निलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बॉम्ब स्फोट सारख्या दहशतवादी कारवायांमध्ये दहशतवाद्यांकडून मोबाइल सिम कार्डचा वापर केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी दिल्ली येथील जामा मशिदी बाहेर झालेल्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीसांनी केलेल्या तपासात तब्बल ६०% प्रिपेड सिमकार्ड बनावट कागदपत्रांच्या आधारे तयार केल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बोगस सिमकार्डचा वापर रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) व (२) होय.

(३) अपर पोलीस महासंचालक व पोलीस उपायुक्त दहशतवाद विरोधी पथक यांनी दि.११.११.१० रोजी सर्व मोबाईल सर्व्हीस प्रोव्हायडर्सची बैठक घेऊन त्यांना सूचना दिल्या व त्यांना दुरसंचार विभागाच्या (Department of Telecommunication) नियमांचे काटेकोरपणे पालन करुन ग्राहकाला सिमकार्ड देण्याबाबत सूचीत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या ठिकाणी मी जे प्रश्न विचारलेले आहेत त्यातील पहिल्या दोन प्रश्नांना "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. मुंबई किंवा इतर शहरामध्ये दहशतवाद्यांनी हल्ले केलेले आहेत ही बाब आपल्याला नाकारता येणार नाही. वाराणसी येथे सुध्दा काही दिवसापूर्वीच बॉम्बस्फोट झालेला आहे. जवळपास ६० टक्के सिमकार्ड खोटे कागदपत्र देऊन घेतलेले आहेत. त्यामुळे अशा प्रकारचे बोगस सीमकार्ड रद्द झाले आहेत काय ? बोगस सिमकार्डच्या संदर्भात केवळ एक बैठक घेऊन हा प्रश्न संपणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मुंबई आणि मुंबईच्या परिसरात अशा प्रकारचे प्रिपेड सीमकार्ड विकले गेले आहेत. बाहेरुन सीमकार्ड आणून ग्राहक ते सीमकार्ड मुंबईत वापरू शकतो. सगळ्यांची चौकशी करणे शक्य नव्हते परंतु त्यातील काही ठराविक लोकांची तपासणी करण्यात आली होती त्यावेळेस मोठया प्रमाणात खोटे पत्ते देऊन, खोटी माहिती देऊन अशा पध्दतीने सीमकार्ड घे्ऊन त्याचा वापर केल्याचे आढळून आले आहे. प्रायोगिक तत्त्वावर जेव्हा

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:९५३८....**

श्री. आर.आर.पाटील....

तपासणी झाली तेव्हा त्यामध्ये ६०२३ लोकांनी खोटे पत्ते देऊन, खोटी माहिती देऊन सीमकार्ड वापरत असल्याची माहिती उघड झालेली आहे. संबंधित टेलीकॉम कंपनीच्या अधिका-यांबरोबर एटीएसच्या अधिका-यांनी बैठक घेतली असून ज्यांचे पत्ते खोटे असतील त्यांना सीमकार्ड देऊ नये अशा सूचना टेलीकॉम कंपनीला देण्यात आलेल्या आहेत. ज्यावेळेस आपण अशा प्रकारच्या कारवाया सुरु केल्या, तेव्हा आपल्या पोलिसांनी परस्पर अशा प्रकारच्या कारवाया करु नये असे टेलीकॉमच्या सेक्रेटरींनी आपल्याला कळवलेले आहे. अशा घटनांसाठी केंद्रशासनाने टेलीकॉम इनफोर्समेंट रिसोर्सेस मॉनिटरींग सेल निर्माण केलेला आहे. यासंदर्भात राज्य सरकारच्या तक्रारी असतील तर त्या तक्रारीची नोंद सेलकडे द्यावी व त्याची चौकशी टेलीकॉम इनफोर्समेंट रिसोर्सेस मॉनिटरींग सेल स्वत: करेल अशा प्रकारच्या सूचना केंद्रशासनाने दिलेल्या आहेत. खोटे पत्ते देणे हा इंडियन पिनल कोड प्रमाणे गुन्हा होता. म्हणून ज्यांनी ज्यांनी खोटे पत्ते देऊन सीमकार्ड मिळवले असेल त्यांच्या संदर्भात मुंबई आणि मुंबईच्या परिसरात एक व्यापक मोहीम हाती घेण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ज्यांनी खोटे कागदपत्र देऊन सीमकार्ड घेतलेले आहे अशा किती लोकांवर आपण आतापर्यंत कारवाई केलेली आहे व किती लोकांनी खोटी माहिती देऊन सीमकार्ड घेतलेले आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आता पर्यंतच्या तपासात 6023 लोकांनी खोटे पत्ते देऊन सीमकार्ड घेतल्याचे आढळून आलेले आहे. यासंदर्भात आतापर्यंत 48 गुन्हे नोंद झाले असून त्यामध्ये 7 इसमांना अटक करण्यात आलेली आहे. उर्वरित लोकांवर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. परंतु मध्यंतरीच्या काळात केंद्रशासनाने राज्य सरकारला कळविले आहे की, यासंदर्भात संबंधित मॉनेटरींग सेलकडे तक्रारी कराव्यात, जेणें करुन ज्या कंपनीचे सीमकार्ड आहेत त्यांच्या मार्फत मोहिम आखली तर चांगल्या प्रकारचा रिझल्ट निघू शकेल. केंद्रशासनाच्या अशा प्रकारच्या सूचना आल्यामुळे आपण यासंदर्भातील कारवाया थांबवल्या होत्या परंतु आता आपण असा निर्णय घेतला आहे की, केंद्रशासनाने याबाबतीत जी एजन्सी निर्माण केलेली आहे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:९५३८....**

श्री. आर.आर.पाटील ....

त्यांच्याकडे ज्या कंपन्यांनी बोगस सीमकार्ड उपलब्ध करुन दिलेले आहेत त्यांची या सेलकडे तक्रार केलीच जाईल परंतु ज्या व्यक्तीने खोटे कागदपत्र देऊन सीमकार्ड घेतलेले आहे अशांविरुध्द राज्यामध्ये एक व्यापक मोहिम घेतली जाईल व गुन्हे दाखल केले जातील. हा विषय मोठा असल्यामुळे या कामाला आताच सुरुवात केली जाईल, या कामावर गांभीर्याने लक्ष दिले जाईल व साधारणत: सहा महिन्यात ही कारवाई पूर्ण केली जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गंभीर प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आहे. बोगस सीमकार्डच्या संबंधात केंद्रशासनाने सेल निर्माण केला असला तरी संबंधित बोगस सीमकार्ड धारकांवर आपल्याला आयपीसीच्या अंतर्गत कारवाई करता येईल तसेच ज्या टेलिफोन कंपन्यांनी बोगस सीमकार्ड पुरवलेली आहेत अशा ऑपरेटर्संना आयपीसीच्या अंतर्गत शासन केले जाणार आहे काय ? संबंधित ऑपरेटर्संना आपण प्रोसिक्यूट करणार आहोत काय ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9538....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संगनमताने गुन्हा केला म्हणून छोटे डिलर्स शोधून काढू शकतो. परंतु ज्या सर्व्हीस प्रोव्हाडर्स कंपन्या आहेत त्यांच्यावर आपणास कारवाई करता येत नाही. त्यामुळे अशा प्रकरणावर निर्बंध घालणे अशक्य आहे. या कंपन्यांवर निर्बंध ठेवण्याचे अधिकार राज्य सरकारला असले पाहिजे अशी मागणी केंद्र सरकारकडे करणार आहोत. ज्या डिलर्सनी असत्य पत्ते देऊन सिम कार्डस घेतलेली आहेत त्यांच्यावर संगनमताने गुन्हा केल्याच्या केसेसची नोंद करुन एक व्यापक कारवाई केली जाईल. तसेच या संदर्भात मुंबई शहरात गतिमान मोहीम हातात घेण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, याठिकाणी माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या परवानगी शिवाय राज्य सरकारला हा प्रश्न निकाली काढता येणार नाही. परंतु या प्रकरणाला सुरुवात होऊन तीन महिने झालेले आहेत. या तीन महिन्यांत राज्य सरकारने केंद्र सरकारकडे अशा कंपन्यांवर निर्बंध घालण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्य सरकारने केंद्र सरकारशी दोन महिन्यांपूर्वी संपर्क साधला होता. केंद्र सरकारने लेखी कळविले आहे की, इन्फोर्समेंट रिसोर्स मॉनेटरींग सेल निर्माण केला आहे. त्या सेलकडे तक्रारी द्याव्यात. सदरहू सेल योग्य ती कारवाई करेल असे सांगण्यात आले. ही बाब केंद्र सरकारच्या अखत्यारितील असल्यामुळे राज्य सरकारवर मर्यादा आल्या आहेत. केंद्र सरकारच्या संबंधित सेलने कारवाई करण्याबात सूचना दिलेल्या आहेत. तसेच राज्य सरकारच्या कायद्या अंतर्गत आय.पी.सी.च्या कलमांचे उल्लंघन केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सध्या एक युनिनॉर कंपनी सर्व्हीस प्रोव्हाईड करीत आहे. त्या कंपनीचे अनेक एसएमएस मुंबई आणि इतर शहरामध्ये येत आहेत. देशभरातही येत आहेत. ही कंपनी पाकिस्तानातील आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती घेण्यात येईल.

--------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्यात विधानसभा निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहनाच्या देयकाबाबत**

**(5) * 9602 श्री.केशवराव मानकर , श्री.नितीन गडकरी , श्री.विनोद तावडे , श्रीमती शोभा फडणवीस** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्यात विधानसभा निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहनांसाठी तब्बल 1 कोटी 62 लाख रुपयांची बिले मंजूरीसाठी शासनाकडे आली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अवघ्या बारा दिवसाच्या काळात बंदोबस्तासाठी लावलेल्या वाहनभाड्याची सदर रक्कम ही राज्यातील इतर विधानसभा निवडणूकीत झालेल्या खर्चाच्या तुलनेत कितीतरी पटीने जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने सदर देयके मंजूर करण्यापूर्वी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (1) गडचिरोली जिल्ह्यातील सन 2009 मधील विधानसभा निवडणूक कालावधीतील अधिग्रहीत वाहनांचे भाडे अदा करण्यासाठी येणाऱ्या रु.1.75 कोटीच्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

(2) व (3) गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्ह्यातील अतिसंवेदनाशील भागात शासकीय वाहने वापरणे धोक्याचे ठरत असल्याने, व्युहरचनात्मक दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात खाजगी वाहनांचा व राज्य परिवहन महामंडळांच्या बसेसचा वापर विधानसभा निवडणूक कालावधीत करण्यात आला. त्यामुळे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिकचा खर्च आलेला असून शासनाने या खर्चास तपासणी अंती मंजूरी दिली आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यमध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणूक खर्चाच्या संबंधातील हा प्रश्न आहे. निवडणुकीच्या 12 दिवसांच्या कालावधीत वाहनांवर 1 कोटी 75 लाख इतका खर्च झालेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करुन देखील लाहोटी येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात 17 पोलीस मृत्युमुखी पडले. वाहनांवरील खर्चाची मर्यादा 60 हजार रुपयांपर्यंत असताना जिल्हा पोलीस अधीक्षकांनी वाहन खर्चावर 1 कोटी 75 लाख इतका

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9602.......
श्री.केशवराव मानकर.......

खर्च केलेला आहे. या खर्चासाठी त्यांनी पूर्व परवानगी घेतली होती काय ? जी वाहने भाड्याने घेतली त्यामध्ये टाटा सुमो, क्वालीस इत्यादी अे.सी.गाड्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या. तेव्हा एकूण किती गाड्या भाड्याने घेण्यात आल्या होत्या ? प्रत्येक वाहनाचे भाडे किती होते ?इतर जिल्ह्यांच्या तुलनेत गडचिरोली जिल्ह्यात जास्त खर्च झालेला आहे. चंद्रपूर आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागात विधानसभा निवडणुकीच्या काळात किती खर्च झाला ? उत्तरात शेवटी नमूद केलेल आहे की, "... खर्चास तपासणी अंती मंजुरी दिली आहे." माझा प्रश्न आहे की, तपासामध्ये काय काय आढळून आले ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकावा अशाप्रकारची परिपत्रके वाटली हाती.सार्वत्रिक निवडणुकीला त्यांचा विरोध होता. सन 2009 मध्ये त्याठिकाणी 52 पोलीस शहीद झाले होते. या पार्श्वभूमीवर तेथे निवडणुका होणार होत्या. तेव्हा त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व उपाययोजना करणे गरजेचे होते. यासाठी निवडणुकीसाठी वाहने वापरण्यात आली. किती वाहने लागतील हे पोलीस विभागाने ठरविले. त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी वाहने पुरविली. एकूण 588 वाहने भाड्याने घेण्यात आली. कारण काही बटालियन्सना खालच्या गावापर्यंत न्यावयाचे होते. गडचिरोली जिल्हयांत शांततेच्या वातावरणात निवडणुका पार पडल्यामुळे गडचिरोली जिल्हाधिकारी यांचा राष्ट्रीय स्तरावर निवडणूक आयोगाने सत्कार केला. शिवाय बिहार राज्यातील नक्षलग्रस्त भागात आपले पोलीस डेप्युटेशनवर गेले होते. एका बाजूला यंत्रणेचा राष्ट्रीय स्तरावर गौरव होत असताना दुसऱ्या बाजूला असा प्रश्न उपस्थित होणे गैर वाटते. हा प्रश्न उपस्थित झाला नसता तर आम्हाला अधिक बरे वाटले असते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.गायकवाड..

ता.प्र.क्र. 9602 श्री.आर्,आर.पाटील..

सभापती महोदय, जो खर्च झालेला आहे त्यापैकी 53 लाख रुपये एस.टी.महामंडळाकडे भरण्यात आले होते.शासनाच्या धोरणाप्रमाणे वाहनांचे भाडे ठरविण्यात आले आहे. त्याप्रमाणे काळया पिवळी टॅक्सीजसाठी 12 तासाकारिता 600 रुपये आणि 24 तासाकरिता 1 हजार रुपये, जीप असेल तर 12 तासाकरिता 600 रुपये आणि 24 तासाकरिता 900 रुपये, त्याचबरोबर 6 चाकांचा ट्रक असेल तर 12 तासासाठी 3 हजार रुपये आणि 24 तासाकरिता 4 हजार रुपये असे वाहनांचे भाडे ठरविण्यात आले असून हे भाडे देखील जास्त नाही. निवडणुकीच्या कामासाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळ आणावे लागते त्याचबरोबर मतपेटयासुध्दा सुरक्षित नेण्यासाठी सगळया उपाययोजना कराव्या लागल्या.ज्या रस्त्याने ही वाहने जाणार आहे त्या रस्त्यावर स्फोट करु नयेत म्हणून हा सगळा भाग अगोदरच आपल्याला ताब्यात घ्यावा लागतो व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून डॉमिनेटीग पोझिशन आपल्याला घ्यावी लागते त्यामुळे वाहनांचा अतिरिक्त वापर करण्याशिवास दुसरा कोणतीही पर्याय राहत नाही. एकूण 1 कोटी 75 लाख रुपयापैकी 53 लाख रुपये एस.टी.महामंडळाकडे भरण्यात आले होते. राज्यातील वेगवेगळया भागातून ही वाहने मागविण्यात आली होती. त्याचबरोबर वाहनाचे भाडे कमी मिळाले किंवा मिळालेच नाही किंवा जास्त रकमेच्या व्हावचरवर सही घेतली आणि प्रत्यक्षात कमी भाडे दिले होते अशा एकाही वाहनधारकाची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही अशा परिस्थितीमध्ये जो काही खर्च झालेला आहे त्याचे मला समर्थनच करावे लागणार आहे. विभागाने हा खर्च तपासून घेतला आहे व परिवहन विभागाने भाडयाचे दर ठरविले होते तसेच जिल्हाधिका-यांनी ही वाहने रिक्वीझिट केली होती. ही सगळी वाहने कार्यरत होती आणि प्रशासनाने योग्य पध्दतीचा खर्च केलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस :सभापती महोदय, अत्यंत धोकादायक परिस्थिती असतांनासुध्दा या जिल्हयामध्ये चांगल्याप्रकारे निवडणुका पार पाडल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे परंतु हे अभिनंदन करीत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, नक्षलवादी भागामध्ये कोणत्याही ठिकाणी स्फोट होऊन गाडीचे नुकसान होईल म्हणून कोणीही वाहने देण्यास तयार होत नाहीत. अशा परिस्थतीमध्ये ज्यांनी भाडयाने वाहने दिली त्याचे भाडे वर्षभर न देणे ही बाब बरोबर नाही अमुक इतकी वाहने लावण्यात आली होती आणि अमुक इतका खर्च झालेला आहे हे जर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9602 श्रीमती फडणवीस..

आपल्याला माहीत होते तर पुन्हा तपासणी का करण्यात येत आहे जर या वाहनाचे भाडे तातडीने दिले गेले असते तर शासन अधिक अभिनंदनास पात्र ठरले असते.तेव्हा किती दिवसात हे पैसे देण्यात येणार आहेत आणि भविष्यात हे पैसे देण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : पैसे देण्यास विलंब झाला आहे हे मी कबूल करतो परंतु आता वाहनांच्या भाडयाचे पैसे देण्यात आलेले आहेत. मार्च एप्रिल महिन्यातच हे पैसे देण्यात आलेले आहेत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील महत्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामात झालेला भ्रष्टाचार**

**(६) * १०२९२ श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.मोहन जोशी , श्री.राजन तेली , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरात, ठाणे, पुणे तसेच राज्यातील महत्वाच्या रस्त्यांची पावसाळ्यात दुरवस्था झाल्याचे माहे जुलै, २०१० मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपये खर्च करुनही रस्त्यांची दुरवस्था होत असून सदरहू रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर रस्त्यांच्या कंत्राट कंपनीवर तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरहू रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ** : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून मानकांपेक्षा कमी निधी प्राप्त होत आहे. तथापि, प्राप्त निधीतून रस्त्यांची दुरुस्ती करुन रस्त्यांचे पृष्ठभाग (धावपट्टी) वाहतुकीस योग्य स्थितीत ठेवण्याचे प्रयत्न असतात.

रस्त्यांच्या दुरुस्तींच्या कामांमध्ये विशिष्ट प्रकरणी भ्रष्टाचाराची बाब निदर्शनास आल्यास त्या प्रकरणी चौकशी करण्यात येते. प्राप्त चौकशी अहवालावर नियमानुसार उचित कारवाई करण्यात येते.

(४) व (५) रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्याचे काम दिनांक ३०.११.२०१० पर्यंत पुर्ण करण्यात यावेत. या प्रमाणे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले होते. तथापि, लांबलेल्या पावसामुळे काही भागात खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून रस्ते वाहतुक योग्य स्थितीत ठेवण्यात येत आहे. निधी उपलब्धतेनुसार डांबरी नुतनीकरण व मजबुतीकरण करण्याचे नियोजन आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील महत्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला आहे काय असा मी पहिला प्रश्न विचारला होता व या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे शासनाने कबूल केलेले आहे.जर भ्रष्टाचार झाला असेल तर मुंबई शहर,मुंबई उपनगर, ठाणे या राज्यातील महत्वाच्या रस्त्याच्या बाबतीत किती तक्रारी नोंदविण्यात आल्या होत्या त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, भ्रष्टाचारावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने आपल्या विभागाची एक दक्षता समिती नियुक्त केली होती हे खरे आहे काय ?



VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 11.30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१०२९२..

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा विचारला होता की, मुंबई उपनगरात, ठाणे, पुणे तसेच राज्यातील महत्वाच्या रस्त्यांची पावसाळयात दुरवस्था झाल्याचे माहे जुलै २०१० मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले हे खरे आहे काय त्या प्रश्नाला अंशत: खरे आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, खराब रस्त्याच्या बाबतीत नेहमीच ओरड केली जात असते या बाबतीत माझे असे निरीक्षण आहे की, ज्यावेळी रस्ता तयार केला जातो त्यावेळी जे लेईगचे काम केले जाते त्यावेळी फायनल सील कोट दिला जात नाही आणि जर दिला असेल तर व्यवस्थितपणे दिला जात नाही. त्याचबरोबर अनेक वेळा ट्रेंचेस घेतले जातात व ते भरल्यानंतर त्यावरही सील कोट दिला जात नाही त्यामुळे हे रस्ते खराब होत असतात तेव्हा असे होऊ नये म्हणून शासन अधिक दक्षता घेणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10292...

श्री. प्रकाश बिनसाळे...

दुसरा प्रश्न असा की, महामार्गावर ज्या पध्दतीने स्पीड ब्रेकर लावले जातात ते कोणत्या आकाराचे असले पाहिजेत याचे काहिही बंधन पाळले जात नाही. त्यांच्यासाठी काही स्टॅंडर्डाइज कोड आहे की नाही? हे सर्व स्पीड ब्रेकर गाडीच्या खाली लावले जात असतात. त्याकरिता तातडीने कारवाई करुन नियमानुसार स्पीड ब्रेकर लावण्यात येणार आहेत काय?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मुंबई उपनगरात, ठाणे, पुणे तसेच राज्यातील महत्वाच्या रस्त्यांची पावसाळयात दुरवस्था झाली हे खरे आहे काय? असा प्रश्न विचारण्यात आला आहे.त्याला उत्तर देतांना "अंशत: खरे आहे" असे म्हटले आहे. प्रश्न असा आहे की, हा रस्ता केव्हां पूर्ण झाला? त्या रस्ताचे काम बरोबर झालेले नाही कां? त्या रस्त्याला सीलकोट दिला होता की नाही? अशाप्रकारे एखाद्या रस्त्याच्या बाबतीत प्रश्न विचारले असते तर याठिकाणी उत्तर देणे शक्य झाले असते. परंतु संपूर्ण राज्याशी संबंधित प्रश्न विचारल्यामुळे राज्यभरातील रस्ते मोठया प्रमाणात खराब झाले आहेत हे बरोबर आहे. या रस्त्यांच्या कामामध्ये 100 टक्के गडबड होत नाही असे मी म्हणत नाही. त्या रस्त्यांना सीलकोट दिल्यानंतर सुध्दा दर तीन वर्षानंतर प्रत्येक रस्त्यांची डागडुजी केली पाहिजे. त्या रस्त्याच्या मानांकनानुसार रिसर्फेसिंग केले पाहिजे. राज्यामध्ये 2 लाख 50 हजार कि.मी. चे रस्ते आहेत. व त्यांची दुरुस्ती दर तीन वर्षानंतर केली पाहिजे असा नियम आहे. परंतु निधीची कमतरता असल्यामुळे दर तीन वर्षानंतर दुरुस्तीसाठी नंबर लागणाऱ्या रस्त्याचा नंबर 10-11 वर्षानंतर लागतो. या रस्त्यांची काय अवस्था होते याची आपल्याला कल्पना आहे. राज्यामध्ये आजकाल प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो. पावसाच्या प्रमाणामध्ये सरासरीपेक्षा 150 टक्के वाढ झाली आहे. ज्यावेळी प्रचंड पाऊस पडतो, पूर येतो त्यावेळी पहिला फटका रस्त्यांना बसतो. त्याचप्रमाणे रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली आहे, त्यांचे वजन वाढले आहे. त्यामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता असलेला निधी कमी कमी होत चालला आहे. यामध्ये उदाहरणार्थ सन 2006-07 मध्ये 4545 कोटींची मागणी होती प्रत्यक्षात 1518 कोटी मिळाले.म्हणजे 33 टक्के रक्कम मिळाली. सन 2007-08 मध्ये 31 टक्के रक्कम मिळाली, सन 2008-09 मध्ये 24 टक्के रक्कम मिळाली, सन 2009-10 मध्ये 27 टक्के रक्कम मिळाली, आणि सन 2010-2011 मध्ये 31 टक्के रक्कम मिळाली. अशाप्रकारे सातत्याने एक तृतियांशपेक्षा कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

ता.प्र.क्र. 10292...

श्री. छगन भुजबळ....

रक्कम मिळत आहे. त्यामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम तीन वर्षांनी करण्याऐवजी त्यांचा कालावधी वाढत जात आहे. स्पीड ब्रेकर बसविण्याचे काम हे आयआरसीच्या निकषानुसार केले जाते. मुंबई उपनगरामधील दोन रस्ते् हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत. त्यामध्ये पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग हे दोन रस्ते आहेत हे मला मान्य आहे. त्यामुळे या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**सभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा अतिशय व्यापक प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नाची किती जरी उत्तरे दिली तरी त्यांना मर्यादा राहणार नाही. याकरिता सन्माननीय मंत्री श्री. भुजबळ साहेब यांनी या अधिवेशनामध्ये या विषयाच्या संदर्भात एखादी बैठक बोलवावी. आणि त्या बैठकीमध्ये या संदर्भात चर्चा करावी असे मला वाटते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे मुठवली खुर्द (ता.रोहा, जि.रायगड) येथे संपत्तीच्या लालसेपोटी सहा वर्षाच्या मुलाची केलेली हत्या**

**(७) * ९६८१ श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेश शेंडगे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले :**

सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुठवली खुर्द (ता.रोहा, जि.रायगड) येथे संपत्तीच्या लालसेपोटी सहा वर्षाच्या मुलाची हत्या करण्यात आल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) व (३) होय. सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रोहा पोलीस ठाणे कॉ.गु.र.नं.१०७/२०१०, भा.दं.वि.स.क्र.३०२, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील मयत यास फिर्यादी यांनी दत्तक घेतले होते. फिर्यादी यांची सर्व संपत्ती मिळावी या उद्देशाने आरोपींनी कट करुन मयत यास ठार मारुन प्रेत लपवून ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, संपत्तीच्या लालसेपोटी दत्तक पुत्राची हत्या त्यांच्याकडे रहावयास आलेल्या एका तरुणाने त्याच्या प्रेयसीच्या मदतीने केली. ही संभ्रमावस्थेमध्ये टाकणारी घटना आहे. ही हत्या झाल्यानंतर दोन आरोपींना अटक करण्यात आले आहे. म्हणजेच फिर्यादी यांची सर्व संपत्ती आपल्याला मिळावी याकरिता ही हत्या झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याचे याठिकाणी म्हटले आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9681.... श्री. रमेश शेंडगे...

या दोघांच्या नातेवाईकांची चौकशी केली आहे काय ? कारण ही संपत्ती मिळविण्यासाठी ज्या दोघांनी त्याची हत्त्या घडविली त्यामध्ये त्यांच्या नातेवाईकांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. म्हणून त्या दोघांच्या नातेवाईकांची चौकशी केली आहे काय ? चौकशी केली नसेल तर शासन ती करणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या घटनेमध्येएकूण 11 साक्षीदार तपासण्यात आले. श्री. होनाजी ठाकूर हे 60 वर्षाचेआहेत आणि ते आणि त्यांची पत्नी त्या ठिकाणी राहात आहेत. त्यांनी पाच वर्षापूर्वी एक वर्षाचे मूल दत्तक घेतले होते. त्याचे वय 6 वर्षे होते. यामध्ये दत्तकपत्र वगैरे काही नाही पण ते त्याला मुलासारखे सांभाळत होते. श्री. सोनवणे नावाचा एक 19 वर्षाचा मुलगाही त्यांच्याकडे राहात होता. मुठवली येथे त्यांची एक एकर जमीन आहे. त्यांचे झालेले वय पाहता त्यांच्यानंतर ही जमीन आपल्याला मिळावी असे श्री. सोनवणे याला वाटत होते. त्याला असे वाटत होते की, लहान मुलाला जमीन दिली जाईल. त्या लहान मुलाला मारले तर आपल्याला जमीन मिळेल या भावनेने श्री. राजू सोनवणे आणि प्रेयसी श्रीमती ज्योत्स्ना जंगम या दोघांनी मिळून त्या लहान मुलाला मारले. त्याचे सगळे पुरावे मिळालेले आहेत. चार्जशीट दाखल केले आहे. या घटनेमध्ये कलम 302 खाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रोहा तालुक्यामध्ये लोकांकडे बरीच संपत्ती वाढत आहे त्यामुळे यापुढे असे अपघात होऊ नये यासाठी राज्य शासन काळजी घेईल काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, अलिबागमध्ये किती संपत्ती वाढलेली आहे आणि रोह्यामध्ये किती वाढावयास लागली आहे हे आम्ही बघू.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST

**बीड जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारील कोषागार कार्यालयासमोरील नवीन तीन गाळ्यांचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(८) * ९२६० प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारील कोषागार कार्यालयासमोरील नवीन तीन गाळ्यांचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून त्या समोरील शेडला नुसता नविन रंग देऊन संबंधित गुत्तेदार व अभियंता यांनी संगनमताने बिल उचलल्याचे माहे ऑक्टोबर, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या उपप्रश्नाला 'नाही आणि 'प्रश्न उद्‌भवत नाही' असे उत्तर दिले आहे. गाळ्याचे बांधकाम तरी झाले आहे की नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, गाळ्याचे बांधकाम झालेले आहे आणि उर्वरित जे काही काम आहे ते दोन महिन्यामध्ये पूर्ण होणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न बीड जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारील कोषागार कार्यालयासमोरील नवीन तीन गाळ्यांच्या बांधकामासंबंधीचा आहे. त्या ठिकाणी नवीन गाळे बांधलेले नसून जुन्याच गाळ्यांना रंग दिलेला आहे. हे भ्रष्टाचाराचे प्रकरण आहे आणि ते झ ाकण्याचा प्रश्न शासनाने करु नये. या प्रकरणाची पूर्ण चौकशी करुन शासन दोषींवर कारवाई करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माझ्याकडे फोटाग्राफ्स आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये सांगितले की, त्या ठिकाणी पत्र्याचे शेड होते तेथील वरचे पत्रे काढून गाळ्यातील

ता. प्र. क्र. 9260 .... श्री. छगन भुजबळ ...

सामान वगैरे चोरीला जाते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, मजबूत बांधकाम करा. त्याचे फोटोग्राफ्स माझ्याकडे आहेत. त्यावर स्लॅब टाकून त्या गॅरेजचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्या गॅरेजचे जे बांधकाम आहे त्याच्या समोर एक सायकलचा जुना स्टँड आहे आणि गाडी लावताना अडथळा होऊ नये म्हणून जुना स्टँड काढला आणि बाजूला उभा केला. तो स्टँड पत्र्यांचा आणि अँगलवरचा आहे आणि त्याला रंग लावलेला आहे. त्यामुळे कदाचित सन्माननीय सदस्यांना असे वाटत असेल की फक्त रंग लावलेला आहे. परंतु गॅरेंजच्या समोर जो स्टँड मध्ये येत होता त्याला रंग लावलेला आहे. गॅरेजचे बांधकाम पूर्णपणे झालेले आहे. त्याचे फोटो माझ्याकडे आहेत.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील अर्बन को.ऑप.बँक बुडीत निघाल्याने तिचा परवाना रद्द केल्याबाबत**

**(९) * ९२८१ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील इचलकरंजी अर्बन को.ऑप.बँकेचा परवाना मा.न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (१) रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ८/२/२०१० च्या आदेशान्वये बँकेचा परवाना रद्द केलेला आहे.

(२) व (३) दिनांक ०४ मार्च, २०१० अन्वये बँकेवर त्रिसदस्यीय अवसायक मंडळाची नेमणूक केलेली आहे. ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी डी.आय.सी.जी.सी. कडे विमा क्लेम सादर करण्यात येत आहेत.

श्री. संजय केळकर :सभापती महोदय, राज्यामध्ये 450 च्या वर सहकारी बँका बुडीत गेलेल्या आहेत. या ठिकाणी इचलकरंजी अर्बन बँकेच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. ही 80 वर्षे जुनी बँक आहे आणि 6800 ठेवीदार आहेत. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर ठेवीदार आहेत. या बँकेमध्ये कर्ज वसुली वेळोवेळी झाली नाही. रिझर्व्ह बँकेने मुदत वाढवून देऊन सुध्दा वसुली झाली नाही. ज्यांना कर्ज दिले त्यांची नावे वाचली तर त्यामध्ये राज्यातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मोठमोठ्या पुढाऱ्यांची नावे आहेत. त्यांच्या कुटुंबियांना ही सगळी कर्जे दिलेली आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 11:45

ता.प्र.क्र.9281..... श्री.संजय केळकर.....

30-30, 35-35 कोटी रुपये 8-8, 10-10 लोकांच्या नावावर आहेत, या लोकांना बँकेने मुदतवाढ दिली नव्हती. परंतु नंतर मुदतवाढ देऊन सुध्दा ते ती रक्कम परत देऊ शकले नाहीत. त्यानंतर या बँकेचा परवाना रद्द झाला. आज हजारो ठेवीदार देशोधडीला लागले आहेत. जागोजागी ठेवीदार फिरत आहेत, परंतु त्यांच्या ठेवी परत मिळत नाहीत. म्हणून शासनाने या ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अनेक बँकांमध्ये हा प्रश्न आहे. काल पेण अर्बन बँकेचा प्रश्न नियम 289 अन्वये आम्ही उपस्थित केला होता. या ठेवी लोकांना परत मिळण्यासाठी शासनाची काही जबाबदारी आहे की नाही, शासन काही ठोस पावले उचलणार आहे काय ? इचजकरंजी आणि राज्यातील अनेक बँकांमध्ये असे गैरव्यवहार होत असल्यामुळे शासन सहकार कायद्यात सुधारणा करणार आहे काय, या बँकेच्या संचालक मंडळाला अटक सुध्दा झालेली नाही. अटक झ ााली तर 2-4 दिवसामध्ये ते बाहेर येतात. परंतु ठेवीदार मात्र गावोगावी फिरत राहतात. शासन सहकार कायद्यात काही सुधारणा करणार आहे का ? ठेवीदारांना 1 लाख रुपयापर्यंत विमा संरक्षण मिळते. हा केंद्र सरकारचा 35-40 वर्षापूर्वीचा कायदा आहे. यात सुधारणा करण्यासाठी शासनाने केंद्र सरकारला शिफारस केली आहे का, केली नसेल तर करणार आहे काय आणि केली असेल तर त्यात 5-10 लाख रुपयापर्यंत विमा संरक्षण मिळण्याचे सुचविले आहे का ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, इचलकरंजी अर्बन को.ऑप.बँकेचा हा प्रश्न आहे. ठेवीदारांच्या 1 लाख रुपयापर्यंतच्या ठेवी परत मिळाव्यात यासाठी डी.आय.सी.जी.सी.कडे क्लेम दाखल करण्याचे काम चालू आहे. हे काम डिसेंबरअखेर पूर्ण होईल. ठेवीदारांच्या 1 लाखापर्यंतच्या ठेवींऐवजी 5 लाखापर्यंतच्या ठेवीला विमा संरक्षण मिळण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने शिफारस केलेली आहे. यासंबंधी कडक कायदा करणे गरजेचे आहे असे सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले. त्यांच्या मताशी मी सुध्दा सहमत आहे. याबाबत निश्चित कडक कायदा केला जाईल.

..2

ता.प्र.क्र.9281.....

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, यह प्रश्न बहुत ही गंभीर है. लेकिन मंत्री महोदय ने इसका बहुत ही साधारण उत्तर दिया है. मैं कहना चाहूंगा कि महाराष्ट्र में सहकार विभाग करप्शन का अड्डा बन गया है.

श्री दिवाकर रावते : करप्शन का अड्डा कौन सी जगह पर है ?

श्री सय्यद जमा : कृपया आप मुझे बोलने दीजिए. प्रश्न पूछने के लिए मैं थोड़ी सी भूमिका बना रहा हूं. मैं कहना चाहूंगा कि महाराष्ट्र का जो को-ऑपरेटिव एक्ट है, उसके अंतर्गत बैंक चलाने की परमीशन मिलती है तथा भारत सरकार का जो बैंक रेग्युलेशन एक्ट है, उसके अंतर्गत बैंक चलाने का लाइसेंस इश्यु किया जाता है. मंत्री जी ने अभी बताया कि हमारे यहां पर बैंक रेग्युलेशन एक्ट के अंतर्गत डिपॉजिट इंश्योरेंस गारंटी स्कीम है. उसके अंदर ऐसा प्रोवीजन है कि यदि बैंक लिक्विडेट हो जाता है तो जमा करने वाले व्यक्ति को एक लाख रुपए तक की रकम वापस मिल जाती है. मेरा कहना है कि बैंक यदि लिक्विडेट हुआ तो जिन डिपॉजिटर्स की रकम एक लाख रुपए से अधिक होती है, वे लोग पूरी तरह से बर्बाद हो जाते हैं.

मैं यहां पर बताना चाहूंगा कि कई बैंक डायरेक्टर्स और अधिकारियों की मिलीभगत से किए गए घपलों की वजह से अनेक लोगों ने करोड़ो रुपए का लोन बैंक का वापस नहीं किया. मैंने नागपुर के महिला सहाकरी बैंक, समता सहकारी बैंक और परमात्मा सेवक बैंक के मेटर को डील किया है, इसलिए इस बारे में मुझे भी थोड़ी जानकारी है. सन् 2005 में सरकार के सहकार विभाग ने बैंक पर एडमिनिस्ट्रेटर बैठाया और सन् 2010 में वह बैंक लिक्विडेट हो गया. मेरा कहना है कि एक लाख रुपए तक की रकम वापस करने की बात कहकर सरकार ने कोई एहसान नहीं किया है. इस तरह का प्रोवीजन तो भारत सरकार के बैंकिंग एक्ट में ही है.

मेरे दो प्रश्न यहां पर हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या महाराष्ट्र सरकार महाराष्ट्र को-ऑपरेटिव एक्ट में कोई ड्रास्टिक संशोधन करने वाली है ? मैं एक बात यह बताना चाहूंगा कि सरकार ने पिछले साल इस सदन में एक आश्वासन दिया था और उसके अनुसार सरकार ने मुख्य सचिव श्री जे. पी. डांगे की अध्यक्षता में एक हाई पावर कमेटी बनायी थी. उसका नोटिफिकेशन 4 जनवरी 2010 को निकाला गया था. उस कमेटी को एक महीने की मुदत

. . 3



NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 11:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दी गयी थी. उस कमेटी के टर्म ऑफ रेफरेंस में यह बात भी थी कि एक लाख रुपए से अधिक पैसा जमा करने वाले डिपॉजिटर्स के बारे में क्या निर्णय लिया जाना चाहिए तथा वहां के बैंक कर्मचारियों की सहायता  किस प्रकार की जानी चाहिए. इसलिए मेरा एक प्रश्न यह भी है कि क्या आप डांगे समिति की सिफारिशों को मान्य करेंगे या नहीं करेंगे ?

यानंतर श्री.शिगम

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ 11:50

ता.प्र.क्र. 9281

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले की, राज्याचे मुख्य सचिव श्री. जे.पी.डांगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. इन्शुरन्स कव्हरच्या बाबतीत किंवा जे डिपॉझिटर्स आहेत त्यांच्याबाबतीत 5 लाखा पर्यन्तची शिफारस त्या समितीने केलेली आहे. त्याप्रमाणे केन्द्र शासनाकडे, संबंधित कार्पोरेशनकडे पाठपुरावा चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की अशा प्रकारच्या सहकारी संस्था मग त्या सहकारी बँका असोत किंवा सहकारी पत संस्था असतो, त्या संस्थामध्ये गैरकारभार करणा-यांना सहकार कायद्यान्वये कडक शिक्षा व्हावी, त्यांची जामिनावर सुटका होऊ नये अशी त्या कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा विचार चालू आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : इचलकरंजीमधील माजी मंत्र्यांच्या जवळच्या नातेवाईकाला 35 कोटी रु. आणि राष्ट्रीय पक्षाच्या प्रदेशाध्यक्षाच्या जवळच्या नातेवाईकाला 5 कोटी रुपये कर्ज दिलेले आहे अशी बातमी वर्तमानपत्रातून छापून आलेली आहे हे खरे आहे काय ? गेल्या दोन वर्षामध्ये कोल्हापूर जिल्हयातील 9 सहकारी बँका बुडीत गेल्या. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर देखील प्रशासक नेमावा लागला. 9 सहकारी बँका बुडीत गेलेल्या आहेत. ही संख्या फार मोठी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बँका एकामागोमाग एक बुडीत का जात आहेत याची माहिती शासन घेणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : या बँकेचे सन 2008-2009 आणि 2009-2010 या दोन वर्षाचे लेखापरीक्षण अद्याप झालेले नाही. ते शासकी लेखा परीक्षकाच्या माध्यमातून करण्याचे काम चालू आहे. डिसेंबर अखेरपर्यन्त लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने माहिती घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : शिक्षा करण्याच्या संदर्भात सहकार कायद्यामध्ये सर्व तरतुदी आहेत. त्या तरतुदी नुसार कारवाई करता येते. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील लिडबँकेच्या माध्यमातून सर्व सहकारी बँकांच्या संदर्भात महिन्यातून एक मिटींग घेतली जाते आणि त्यामध्ये सर्व बँकांच्या कामाचा आढावा घेतला जातो. तेव्हा लिड बँकेच्या माध्यमातून किती बैठका घेण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्या ,त्या बैठकीमध्ये अर्बन को.ऑप.बँकेच्या संदर्भात कोणती चर्चा झाली, या बँकेचे डिपॉझिट किती होते, 006 पासून 2007 पर्यन्त ऑडिटरने या बँकेला "अे" वर्ग दिला होता हे खरे आहे काय, रिझर्व्ह बँकेच्या ऑडिटरने देखील या बँकेला "अ" वर्ग दिला होता हे खरे आहे काय, सल्यास याबाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : या बँकेमध्ये 87.77 कोटी डिपॉझिट होते. 1 लाखपर्यन्तच्या ठेवींची रक्कम 64 कोटी रु. आहे आणि 1 लाखाच्यावरील ठेवीची रक्कम 23 कोटी रु. आहे. ज्या लेखा परीक्षकांनी बँकेचे लेखा परीक्षण केलेले आहे त्याबाबतीत.......

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KGS/ ST/ KTG/ 11:55

ता.प्र.क्र.9281.... श्री.प्रकाश सोळंके......

निश्चितपणाने शासकीय लेखापरीक्षकांकडून दोन वर्षाचे लेखापरीक्षण करण्याचे काम चालू आहे. त्यामध्ये जी माहिती पुढे येईल त्या आधारे संचालकांवर आणि तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई करुच. परंतु ज्या लेखापरीक्षकांनी या बँकेचे लेखापरीक्षण केले आहे त्या संदर्भात सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न जरी कोल्हापूर जिल्हयाशी संबंधित असला तरी राज्यातील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या अर्बन बँका किंवा पतसंस्था या डबघाईस आलेल्या आहेत. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळे मोठया प्रमाणात खाती एनपीएमध्ये जात आहेत. खाती एनपीएमध्ये गेल्यामुळे बँका डबघाईस आलेल्या आहेत. सहकार कायद्याचा विचार करता सहकारमंत्र्यांना विनंती आहे की, या बँकांमध्ये करोडो रुपयांच्या ठेवी ठेवणारे जे ठेवीदार आहेत त्यांचा विचार झाला पाहिजे. साखर कारखान्यांच्या कर्जाला सरकार हमी देते. त्याच पध्दतीने ठेवीदारांच्या ठेवींबाबत 1 लाख रुपयांपर्यंत विम्याचे संरक्षण दिले जाते. ज्यांनी ठेवी ठेवल्या आहेत त्यांना संरक्षण देण्यासाठी सहकार कायद्यामध्ये सरकार सुधारणा करणार आहे का? त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी वाचतील. अन्यथा बँका क्षमतेपेक्षा 10-10 पट कर्ज वितरित करतात. ते कर्ज वसूल होत नाही आणि पुढे ते थकित म्हणून गणले जाते. एका माजी मंत्र्याने आपल्या पदाचा उपयोग करुन आपल्या प्रॉपर्टीपेक्षा कैक पटीने कर्ज घेण्यासाठी पदाचा दुरुपयोग केला होता आणि तेही कर्ज थकित होते. अशा हजारो बँकांमधील ठेवी संकटात सापडल्या आहेत. बँकांचे एनपीए वाढले आहे. थकित कर्जांचे प्रमाण वाढले आहे. ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी सहकार विभागामार्फत सहकार कायद्यात तरतूद केली जाईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रश्नाच्या बाहेरचा प्रश्न विचारला असला तरी तो महत्वाचा आहे. बँक किंवा पतसंस्था असेल, सहकार विभाग त्यांच्या नोंदणीचे काम करतो. रिझर्व्ह बॅंकेकडून परवानगी घेऊन सहकारी बँका कार्यरत होतात. या विषयाची व्याप्ती प्रचंड मोठी आहे. सहकारी बँका आणि पतसंस्थांमधून जवळजवळ 1 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी ठेवल्या गेल्या आहेत. कोणत्याही संस्थेची फक्त नोंदणी केली किंवा त्यांच्यावर नियंत्रण केले म्हणून शासनाने ठेवींबाबत हमी दिली पाहिजे ही भूमिका योग्य आहे असे मला वाटत नाही. निश्चितपणे शासनाला अशी हमी देता येणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9281....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आज सहकारी बँका बुडित निघाल्या आहेत. रिझर्व्ह बँकेचे निरनिराळे नियम यासाठी कारणीभूत आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही. जे ठेवीदार आहेत त्यापैकी अनेक जण निवृत्त अधिकारी, सरकारी कर्मचारी असून त्यांनी 1 ते 10 लाख रुपयांची ठेवी सहकारी बँकांमध्ये ठेवल्या आहेत. त्यांनी रक्कमेची मागणी केल्यानंतर तीन महिन्याच्या आत त्यांना रक्कम परत केली पाहिजे असा नियम आहे. परंतु तीन-तीन वर्षे उलटून गेली तरी त्यांना रक्कम परत दिली जात नाही. विमा कंपनी त्यांना नाचवत राहते. 1 लाखापर्यंतच्या ठेवीला विम्याची हमी दिलेली आहे. ही मर्यादा 5 लाखापर्यंत केली जाणार आहे. परंतु 5 ऐवजी 10 लाखापर्यंतच्या रक्कमेला विम्याची हमी देण्यात यावी आणि तीन महिन्यात रक्कम देण्याबाबतची तरतूद केली जाईल काय? नियमांचे पालन केले जाईल काय?

नंतर एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9281........

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, एखादी संस्था ज्यावेळेस अवसायनात निघते तेव्हाच इन्शुरन्स कव्हरेज लागू होते. त्यामुळे रिझर्व बँकेने परवाने रद्द करणे ही कारवाई सुध्दा अवसायनात काढणे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत क्लेम दाखल होत नाहीत व यात बराच वेळ जातो. सद्यस्थितीत सुध्दा अवसायनात प्रथम संस्थेला काढावे लागते आणि त्यानंतरच हे क्लेम दाखल करावे लागतात.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, अवसायनात निघाली असताना सुध्दा बँकेवाले अधिकारी कागदपत्रे लवकर पुढे पाठवित नाहीत, त्याला विलंब करीत असतात. हे सर्व टाळण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

------

**औचित्याच्या मुद्यांबाबत**

**सभापती** : आज शुक्रवारचा दिवस असल्यामुळे आपण औचित्याचे मुद्दे सभागृहात मांडण्याची परवानगी देतो. त्यानुसार एकंदरित 23 औचित्याचे मुद्दे माझ्याकडे सदस्यांकडून प्राप्त झालेले आहेत. तत्पूर्वी कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचा कार्यक्रम उरकून नंतर हे मुद्दे घेण्यात येतील.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : ताराकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने बुधवार, दि.1 डिसेंबर 2010, गुरुवार दि. 2 डिसेंबर, 2010 व शुक्रवार दि. 3 डिसेंबर, 2010 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-----------

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : अतारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी, विसावी, एकवीसावी, बावीसावी व तेविसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (वन राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. चा सन 2008-09 चा छत्तीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सन 2006-07 व 2007-08 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे सन 2006-07 व 2007-08 चे अनुक्रमे पस्तीसावे व छत्तीसावे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचे सन 2002-03, 2003-04, 2004-05 व 2005-06 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन 2007-08 चा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2008-2009 चा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2007-2008 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2008-2009 चा अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने,नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचे सन 2008-2009 व 2009-2010 चे अनुक्रमे चोवीसावा व पंचवीसावा वार्षिक अहवाल(लेखापरीक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

डॉ. नितीन राऊत (जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2009-2010 चा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत**

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला" गेल्या 37 वर्षात 10 कोटी रुपये व गेल्या 7 वर्षात एकही कोटी रुपये या महामंडळाला मिळालेले नाही. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे" अध्यक्ष आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना शेंडी लावण्याचे काम राज्यशासन कोठपर्यंत करणार आहे याची माहिती आम्हाला हवी आहे.

**सभापती** :. मी सन्माननीय कॅबिनेट मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे व सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले या दोघांनाही आपल्या दालनात बोलावून चर्चा करावी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला जास्तीत जास्त तरतूद करुन मदत करावी.

-----

...3..

श्री.मधुकरराव चव्हाण (पशुसंवर्धन मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांचा सन 2006-2007 चा अठ्ठाविसावा वार्षिक अहवाल," सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.मधुकरराव चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने,"महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे सन 2007-2008 व 200)-2009 चे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीच्या मुद्याबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर विचार मांडत आहे. ज्यावेळेस अधिवेशन सुरु असते व माननीय मंत्रीमहोदय धोरणात्मक निर्णय घेतात त्यावेळी त्यांसदर्भातील घोषणा सभागृहातच झाली पाहिजे. माझ्याकडे जी माहिती आहे त्यावरुन काल माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी मुळा-प्रवरा ही वीज कंपनी ताब्यात घेतली जाईल हा जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयाची घोषणा या सभागृहातच व्हावयास पाहिजे. त्यांनी पुढे असे सांगितले आहे की, मुळा-प्रवरा कडे 2200 कोटी रुपयांची थकबाकी असल्यामुळे आम्ही ही कंपनी सरकारच्या ताब्यात घेणार आहोत. खरे म्हणजे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी औचित्याचा भंग केलेला आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

शासनाची धोरणात्मक भूमिका असेल तर त्यांनी ती या सभागृहात जाहीर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ही बाब वर्तमानपत्राच्या माध्यमातून जाहीर केली असल्यामुळे आमचा औचित्याचा भंग झालेला आहे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. तेव्हा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी याठिकाणी सरकारची भूमिका मांडावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना या संदर्भात कल्पना देण्यात यावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत चर्चेच्या अनुषंगाने सदरहू वक्तव्य केलेले आहे. तरी सुध्दा आपण सांगितल्याप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना या सभागृहात देखील तशी घोषणा करण्यास सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनांबाबत**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक 1 आणि 3 सोमवारी घेण्याबाबत संबंधित विभागाच्या माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्याकडे लेखी विनंती केलेली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 2 ही सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांची आहे. तेव्हा आजच्या कामकाजपत्रिकेतील तिन्ही लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी घेण्यात येतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दिनांक 1 डिसेंबर 2010 रोजी अधिवेशन सुरु झाले. सुरुवातीच्या दोन दिवसात लक्षवेधी सूचना चर्चेल्या आल्या नाहीत. दिनांक 3 डिसेंबर, 2010 रोजीच्या कामकाजपत्रिकेत पहिल्या क्रमांकावर माझी लक्षवेधी सूचना होती. सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी विनंती केली होती. तेव्हा ही लक्षवेधी केव्हा चर्चेसाठी येईल याबाबत आम्हाला अवगत करावे.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यातील सोमवार किंवा मंगळवार या दिवशी चर्चेस यावी असा माझा पूर्ण प्रयत्न राहील.

मी या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या अधिवेशनात या ना त्या कारणांमुळे लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आल्या नाहीत. आजच्या कामकाजपत्रिकेतील तिन्ही लक्षवेधी सूचना आपण सोमवारी घेण्याचे ठरविले आहे. तेव्हा लक्षवेधी सूचनांसाठी एक-दोन तास विशेष बैठक घेऊन त्या कालावधीत किमान 5-6 लक्षवेधी सूचनांवर आपल्याला चर्चा करता येईल. यापूर्वी आपण विशेष बैठकीमध्ये अर्धा-तास चर्चेच्या सूचना घेतलेल्या आहेत. तेव्हा या सभागृहात पुकारलेल्या आणि लॅप्स झालेल्या लक्षवेधी सूचनांव्यतिरिक्त अन्य लक्षवेधी सूचनांवर विशेष बैठकीमध्ये चर्चा करता येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सभागृहातील गोंधळामुळे मी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली नाही. तेव्हा माझी लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी मी आपल्याकडे पत्राद्वारे विनंती केलेली आहे.

**सभापती** : मी या संदर्भातील माहिती तपासून घेतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्य शासनाने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या शिक्षकांना राज्य व राष्ट्रीय पुरस्कार देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून दरवर्षी शिक्षक दिनाच्या दिवशी या मान्यवरांचा गौरव केला जातो.

राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना त्यांच्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन दोन वेतनवाढी देण्याची घोषणा केली आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या नवीन वेतन संरचनेनुसार राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या दोन वेतनवाढी बंद केल्या असून आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांवर अन्याय केला आहे. वारंवार विनंती करुनही शासनाने त्याची दखल घेतलेली नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 12.15

श्री.रामनाथ मोते...

या औचित्याच्या माध्यमातून शासनास विनंती आहे की, राज्य / राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देय असलेल्या दोन वेतनवाढी देण्याची कार्यवाही करुन या गुणवंत शिक्षकांची मानहानी व अवहेलना थांबवावी .

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, यासंबंधीची नोंद घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या नंतर सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हे सभागृह सर्वोच्च आहे. त्याचबरोबर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील आपले स्थान देखील अत्यंत उच्च आहे.माननीय सभापती आणि माननीय अध्यक्ष या दोघांनाही एकत्रितपणे एखाद्या कार्यक्रमासाठी बोलाविण्यात आले असेल तर या सर्वोच्च सभागृहाच्या माननीय सभापतींचा मान पहिला आहे.आपण जेव्हा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्याच्या शपथविधीच्या कार्यक्रमासाठी गेला होता त्यावेळी आपल्याला राजशिष्टाचार विभागाने जी वागणूक दिली त्यामुळे केवळ आपलाच नव्हे तर या सभागृहाचा सुध्दा अपमान झाला आहे. या कार्यक्रमासाठी आपल्याला लोअर गेटचा पास देण्यात आला होता त्याचबरोबर आपली गाडी अडविण्यात आली होती त्यामुळे आपणास जवळजवळ अर्धा किलोमीटर चालत जावे लागले ही बाब अत्यंत खेदजनक आहे. आपण चालत असतांना या राज्याचे बांधकाम मंत्री श्री छगन भुजबळ साहेबांनी आपल्याला गाडीत घेतले होते व त्यानंतर आपण कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचला होता. आपला केवळ एवढाच अपमान झालेला नाही तर त्या कार्यक्रमाच्या ठिकाणी आपले आसन देखील राखून ठेवण्यात आलेले नव्हते त्यामुळे आपण बराच वेळ उभे राहिला होता. त्यावेळी काही जण आपणास धक्काबुक्कीसुध्दा करीत होते. त्या कार्यक्रमासाठी आपल्याकरता आसन राखीव ठेवण्यात आलेले नसतांना राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री अशोकरावजी चव्हाण यांनी दुस-या रांगेतील त्यांचे आसन आपल्याला बसण्यासाठी दिले होते.सभापती महोदय, आपल्यापेक्षा सनदी अधिका-यांची बसण्याची व्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे केली होती आणि त्यावेळी कोणतेही सनदी अधिकारी आपल्याला उठून सन्मानाने जागा देत नव्हते तसेच आपल्याकडे बघतही नव्हते. त्या ठिकाणी शपथ घेणारे माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री या व्यतिरिक्त इतर जे पाहुणे होते त्यांच्या गाडीच्या पार्कींगची व्यवस्था नव्हती. दुसरी बाब अशी आहे की बाकीच्या पाहुण्यापेक्षा, आमदारा पेक्षा,माजी मंत्र्यापेक्षा पोलीस आणि पोलिसांच्या गाडया जास्त होत्या ही सर्व व्यवस्था अत्यंत चुकीची आहे. आपल्याला जर अशा प्रकारची वागणूक मिळत असेल तर आमच्यासारख्या आमदारांची काय स्थिती असेल ?



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 12.15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या प्रकाराची शासनाने त्याचप्रमाणे सभागृहानेसुध्दा गंभीर दखल घेतली पाहिजे असे मला वाटते.या दृष्टीने तीव्र नापसंतीचा ठराव मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मांडतो आणि त्याला सर्व सन्माननीय सदस्यांनी पाठिंबा द्यावा अशी विनंती करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र पाटील यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे एक महत्वाचा विषय सभागृहासमोर उपस्थित केलेला आहे या विषयाचे गांभीर्य सर्व सन्माननीय सदस्यांनीच लक्षात घेतले पाहिजे असे नाही तर सरकारने आणि संबंधित अधिका-यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे म्हणून हा ठराव पारित करीत असतांना या ठरावापुरतेच मर्यादित न राहता जे कोणी प्रोटोकॉल ऑफिसर होते ...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

त्याठिकाणी सर्व व्यवस्था पहाणारे जे कुणी राजशिष्टाचार अधिकारी होते, त्यांना याबाबतीत जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे. राज्य शासनाने याची गंभीरपणे दखल घेऊन हे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाईचा अहवाल या सभागृहाच्या पटलावर ठेवला पाहिजे.

(दोन्ही बाजूकडील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

**सभापती** : या विषयासंदर्भात सर्वच माननीय सदस्यांना बोलण्याकरिता मी परवानगी दिलेली नाही. माझी आपणास विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी याठिकाणी घडलेल्या प्रकारासंदर्भात जी माहिती सादर केली आहे ती माझ्या बाबतीत किंवा अन्य कुणाच्याही बाबतीत घडली असली तरी त्याबाबतीत या सभागृहामध्ये केवळ दोन-तीन वाक्येच बोलणे गरजेचे आहे. सभागृहामध्ये सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील साहेब, सन्माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे साहेब उपस्थित आहेत. आपण याठिकाणी हा ठराव मांडण्याची विनंती केली असली तरी माझे याबाबतीत असे मत आहे की, हा ठराव सभागृहामध्ये पारित न करता जे करणे शक्य आहे ते केले पाहिजे. त्या दिवशी सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय उप मुख्यमंत्री यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला मी अन्य अति महत्वाच्या व्यक्तींप्रमाणे गेलो होतो. कार्यक्रमाच्या ठिकाणी वाहनाने जाण्यासाठी राजभवनच्या खालच्या रस्त्याने जाण्याची आम्हाला सूचना करण्यात आली होती. खरे म्हणजे मी आत्तापर्यंत शपथविधीच्या कार्यक्रमाला दहा ते वीस वेळा राजभवनावर गेलो असेन. यावेळी रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहने थांबविण्यात आली असल्यामुळे पुढे एक फर्लांग अंतरापर्यंत माझे वाहन जाणे शक्य नव्हते. परंतु त्याचबरोबर सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय उप मुख्यमंत्री यांच्या शपथविधी कार्यक्रमाला 100 टक्के जाणे आवश्यक असल्यामुळे मी किमान पाऊण-एक कि.मी. पर्यंत पायी चालत गेलो. दरम्यानच्या काळात सन्माननीय मंत्री श्री. भुजबळ साहेबांच्या वाहन चालकाने मला पाहिले. सन्माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, त्याठिकाणी पोलीस विभागाच्या चार ते पाच जीप उभ्या होत्या. मी पूर्वी कधीतरी आपल्या विभागाचा गृह राज्यमंत्री होतो. त्यामुळे माझ्या मनाला असे वाटले की, 25 वर्षापूर्वी मी ज्या विभागाचा राज्यमंत्री होतो त्या विभागाची वाहने रस्त्यावर उभी असतांना त्यापैकी कुणीही सहजपणे विचारले असते की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

**सभापती** ...

"साहेब तुमची गाडी जात नसेल तर आम्ही तुम्हाला घेऊन जातो" परंतु तसे काही माझ्या बाबतीत झाले नाही. त्याबद्दल माझ्या मनामध्ये कुरकुर नाही आणि माझी कुणाबद्दलही कुरकुर नसते. मी या शपथविधी कार्यक्रमाला वेळेवर पोहोचलो नसतो तर माझ्या न येण्याची अनेक कारणे निघाली असती. त्यामुळे मी त्याठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यानंतर सन्माननीय मंत्री महोदय श्री. भुजबळ साहेबांच्या वाहन चालकाने आपल्या जीपमधून राजभवनच्या पहिल्या टोकापर्यंत मला पोहोचविले. त्यानंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी जात असतांना किमान अर्धा मिनिट अनेक अडथळयांना मला तोंड द्यावे लागले. सुदैवाने शपथविधीचा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी दोन-तीनच मिनिटे अगोदर मी तेथे जाऊन पोहोचलो. त्याठिकाणी माझ्यासाठी ठेवलेले आसन कुणीही अडविलेले नव्हते. सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या पत्नीची खुर्ची बाजूला रिकामी होती. त्यावेळी सन्माननीय उद्योग मंत्री श्री. राणे साहेब माझ्याजवळ होते, ते मला "साहेब, तुम्ही माझ्याजवळ बसा" असे म्हणाले. व मी तेथे बसलो. त्यानंतर या प्रश्नाच्या अनुषंगाने राजशिष्टाचार विभागाचे अधिकारी मला येऊन भेटले. पोलीस आयुक्त व अन्य अधिकारी येऊन भेटले. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील व अन्य सन्माननीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना सभागृहात मांडल्या आहेत. माझी स्वत:ची याबाबतीत इच्छा आहे की, शिवाजीराव देशमुख या व्यक्तीसाठी कोणत्या पध्दतीची वागणूक द्यावी हा एक भाग आहे, आणि या सर्वोच्च सभागृहाचे सभापती या नात्याने कोणती वागणूक द्यावी हा दुसरा भाग आहे. म्हणून माझी अशी इच्छा आणि विनंती आहे की, या सर्वोच्च सभागृहाचे पीठासीन अधिकारी म्हणून जे कुणीही असतील त्यांचा अत्यंत चांगल्या पध्दतीने राज शिष्टाचार संभाळणे गरजेचे आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

या ठिकाणी दोन ज्येष्ठ मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. या अनुषंगाने पुन्हा असा प्रकार होईल असे मला वाटत नाही. त्या दिवशी असा प्रकार झाला की, मी त्या ठिकाणी गेल्यानंतर श्री. नारायण राणे साहेब जवळच होते. त्यांनी लगेच मला त्या ठिकाणी बसविले. त्यानंतर सर्व व्यवस्थित झाले पण त्या ठिकाणी आत शिरणेच एवढे अवघड होते की, मला दहा मिनिटे लागली. आता वयाच्या शाहत्तराव्या वर्षी माझ्या प्रकृतीची जी परिस्थिती आहे त्यामुळे धकाधकीचा मामला मी कधी करीत नाही आणि मला ते सोसत नाही. यादृष्टीने हे टाळणे गरजेचे आहे असे मला वाटते. माझी सभागृहाला विनंती आहे की, या तीव्र भावना मी जरुर शासनाच्या कानावर घातलेल्या आहेत. पण याबाबतीत आपण ठराव करण्याचे टाळावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे त्यामध्ये आपल्या बाबतीत त्या दिवशी जे घडले ते मी स्वत: प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेले आहे. अर्धा तास आधी विधानसभेतील विरोधी पक्ष नेते आणि मी दोघेही एकाच गाडीतून त्या ठिकाणी शपथविधीला येण्यासाठी निघालो. विशेषकरुन त्या दिवशी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी मला आणि श्री. एकनाथराव खडसे यांना फोन करुन विनंती केली की, आपण शपथविधीला आले पाहिजे. त्यामुळे आम्ही अर्धा तास आधी त्या ठिकाणी येण्यासाठी निघालो. अर्धा तास आधी निघाल्यानंतरही आधीचे जे गेट आहे, जो रस्ता समुद्र किनाऱ्यालगत जातो त्या रस्त्यावरुन आम्ही आमची गाडी वळविली आणि दहा फूट पुढे जात नाही तोच संपूर्ण रस्ता ब्लॉक झालेला होता. त्या ठिकाणी आम्हाला असे सांगण्यात आले की, येथून आपल्याला पुढे पायी जावे लागेल. त्या गेटपासून राजभवनपर्यंत पायी जावयाचे म्हणजे तो रस्ता साधारणत: दीड किलोमीटरचा असेल. आम्ही पाच पावले पुढे जात नाही तोच आपल्या देशाचे अवजड उद्योग मंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख हे आमच्या पुढे पाच पावलावर होते. नंतर श्री. विलासराव देशमुख सुध्दा आमच्या बरोबर चालावयास लागले. अनेक अधिकारी त्या रस्त्यावर उभे होते. आपण सांगता त्याप्रमाणे त्या ठिकाणी अनेक अधिकाऱ्यांच्या तसेच पोलिसांच्या गाड्या उभ्या होत्या. पण आपली गाडी त्या ठिकाणी जात नसेल तर आमच्या गाडीतून आपल्याला त्या ठिकाणी सोडून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

देतो अशी कोणत्याही अधिकाऱ्याने तसदी घेतली नाही. म्हणून आम्ही तिघेही त्या ठिकाणाहून पायी चालत निघालो. त्यानंतर आपल्या बाबतीत घडलेला प्रकार बाजूला उभे राहून मी स्वत: डोळ्यांनी बघितलेला आहे. ज्या हॉलमध्ये हा शपथविधी होता त्या हॉलमध्ये शिरत असताना त्या दरवाज्यावर जे पोलीस अधिकारी होते ते कोणालाही आत जाऊ देत नव्हते. मला आणि श्री. एकनाथराव खडसे यांना कदाचित ते अधिकारी आत जाऊ देणार नाहीत म्हणून श्री. विलासरावजी देशमुख यांनी आम्हा दोघांना पुढे केले आणि ते आमच्या मागे राहिले. त्यानंतर आम्हाला त्या ठिकाणी प्रवेश मिळाला. आमच्याजवळ खास निमंत्रण होते. सिट नंबर होते. आमच्यासाठी सिट नंबर राखून ठेवला होता. पण आम्ही त्या ठिकाणी दहा मिनिटे उभे राहिलो. आमच्या खुर्च्या कोठे लावल्या होत्या आणि आम्ही कोणत्या खुर्चीवर बसलो हे आम्हाला दहा मिनिटे कळलेच नाही. नंतर माननीय श्री. पतंगरावजी कदम आणि माननीय श्री. हर्षवर्धनजी पाटील यांच्या दोन खुर्च्या त्यांनी एकमेकांना जोडल्या आणि त्या दोन खुर्च्यांच्या मध्ये मी बसलो. बाजूला श्री. एकनाथराव खडसे यांचीही तशाच प्रकारे व्यवस्था केली गेली.

सभापती महोदय, मला असे वाटते की, हा शपथविधी समारंभ ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने तो होतोच पण त्या ठिकाणी ज्या व्यवस्था असतात त्या तशा पध्दतीच्या असल्या पाहिजेत आणि सर्वांना त्या ठिकाणी प्रोटोकॉल प्रमाणे सन्मान मिळाला पाहिजे. सभापती महोदय, त्या दिवशी आपली स्थिती बघवत नव्हती. त्या दिवशी मलाही खूप धक्का बसला. माननीय सभापती महोदयांची जर अशी स्थिती असेल तर एक क्षण माझ्या मनात असे आले की, तिथून परत निघून जावे पण आम्ही तिघेही सोबत असल्यामुळे आम्ही तिथपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. पण या सभागृहाच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या माननीय सभापती महोदयांच्या बाबतीत असे घडणे ही या सभागृहाच्या दृष्टीने नामुष्कीची बाब आहे. याची दखल कोठे तरी घेतली गेली पाहिजे असे मला या ठिकाणी वाटते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, ही जी घटना घडली त्याबाबतचे वृत्त वृत्तपत्रात देखील आले होते. आपण महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृहाचे सभापती आहात. आपली प्रतिष्ठा ही महाराष्ट्राची प्रतिष्ठा आहे, या सभागृहाची प्रतिष्ठा आहे. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी याबाबतचा ठराव मंजूर करावा अशी विनंती केली होती, परंतु तसा ठराव मंजूर करण्याला आपण नकार दिला. परंतु ही प्रथा होऊ नये. शासनाची ही जबाबदारी होती आणि शासन आपली जबाबदारी निभावून नेण्यामध्ये कमी पडले ही वस्तुस्थिती आहे. आपल्यामार्फत मी शासनाला विनंती करीन की, शासनाने यासंबंधी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. पीठासीन अधिका-यांना त्याठिकाणी योग्य मार्गाने व योग्य पध्दतीने बसविले नाही. आपला स्वभाव फार मवाळ व मधूर आहे, आपल्या मनामध्ये काही नाही. तरी देखील अशा घटना घडणार नाहीत आणि झालेल्या घटनेबाबत शासनाने येथे दिलगिरी व्यक्त करावी असे मी याठिकाणी मनोगत व्यक्त करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, झाल्या प्रकाराचे वर्णन आपल्या मुखामधूनच आलेले आहे. हे सांगत असताना आपले वय आणि ती परिस्थिती कशी सोसली हे देखील आपण सांगितले. ही जबाबदारी कोणाची असते, हा खरा महत्वाचा विषय आहे. राजशिष्टाचार अधिकारी मग तो शासनाचा असो की राज भवनचा. ही त्यांची जबाबदारी आहे. व्हीआयपी म्हटल्यावर हा प्रश्नच येऊ नये. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे तर मला नवलच वाटते. त्यांना राज भवनमध्ये दोन खुर्च्या एकत्र जोडून जागा करुन देण्यात आली आणि त्या जागेवर ते बसले असे त्यांनीच मघाशी सांगितले. तेवढयाशा जागेत बसण्यापेक्षा स्वाभिमान दाखवून त्यांनी सरळ त्या कार्यक्रमातून निघून जावयास पाहिजे होते. त्यामुळे तो निषेध सरकारचा झाला नसता. मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर झाल्यानंतर लगेच तातडीने एक तासाने किंवा दोन तासाने किंवा दुस-या दिवशी शपथविधीचा कार्यक्रम होत नव्हता. मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर झाल्यानंतर बराच कालावधी गेला होता. शपथविधीच्या मंडपावर किती खर्च होत आहे त्याची वर्णने वर्तमानपत्रातून छापून येत होती. कोणत्या अधिका-यांकडे ही व्यवस्था सोपविली होती ? शासनाने दिलगिरी व्यक्त करणे हा एक भाग झाला. शासनाने दिलगिरी व्यक्त केल्यामुळे माननीय पीठासीन अधिका-यांचा तो सन्मान होईल. पण याला जबाबदार असलेल्या अधिका-यांच्या सेवा पुस्तकामध्ये त्याची नोंद होणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारी कोणाला जुमानत नाहीत. आदर्श सोसायटीचे प्रकरण सुध्दा

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.दिवाकर रावते.........

आपल्यासमोर आलेले आहे. प्रत्येक गोष्टीला अधिकारी जबाबदार असतात, बदनाम मात्र मंत्री, मंत्रिमंडळ व सरकारी व्यवस्था होत आहे. या व्यवस्थेत आपण असलो तरी आपणच बदनाम होत आहोत. मी सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी यांच्या मताशी सहमत आहे. हा अवमान केवळ या सदनाचा नाही तर या सर्वोच्च सभागृहातील पीठासीन अधिका-यांचा आहे. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना निरोप देताना आपण सगळयांनी उभे राहून त्यांना सन्मानित केले. हा त्यांचा बहुमान झाला. परंतु पीठासीन अधिका-यांचा अवमान झाल्यामुळे त्याबाबतचा ठराव नाही तर त्याचा उभे राहून निषेध व्यक्त केला पाहिजे. म्हणून मी सगळयांना विनंती करतो की आपण सर्वांनी उभे राहून या घटनेचा निषेध करावा. सन्माननीय सदस्यांकडून निषेध व्यक्त होऊ द्या, नंतर सन्माननीय गृह मंत्र्यांनी खुलासा करावा, एवढीच मी विनंती करतो.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य काही वेळ उभे राहतात. )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सर्वांनी मिळून या घटनेचा एकमताने निषेध व्यक्त केलेला आहे. धन्यवाद

**सभापती** : सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि सन्माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे हे शासनाच्यावतीने विचार मांडू इच्छितात, तेही आपण समजून घेऊ.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना ऐकल्यानंतर आपला राज भवनावरच काय राजशिष्टाचाराप्रमाणे महाराष्ट्रात कोठेही अवमान होता कामा नये. आपला अवमान हा या वरिष्ठ सदनाचा अवमान आहे. जी घटना घडली ती ऐकल्यानंतर मी मोकळेपणाने राज्य सरकारच्या वतीने दिलगिरी व्यक्त करतो. ही बाब सामान्य प्रशासन विभागामार्फत हाताळली जात असली तरी घडलेली घटना गंभीर आहे. त्याठिकाणी नियोजनाचा अभाव असल्याचे जाणवत होते. झालेला अवमान व घटना परत येणार नाही. परंतु घडलेला प्रसंग कोणाच्याही वाटयाला येऊ नये. तो आपल्याही नाही, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या नाही आणि या सदनातील सन्माननीय सदस्यांच्या वाटयाला येऊ नये. या प्रसंगात नेमके काय घडले, त्यामध्ये कोणाचा दोष आहे, कोणाची उदासिनता कारणीभूत ठरली, कोणाचे दुर्लक्ष झाले त्याची मुख्य सचिवांमार्फत चौकशी करण्यात येईल. जो अहवाल येईल तो या सदनामध्ये ठेवण्यात येईल. यापुढील काळात अशा घटना घडू नये म्हणून आवश्यक असलेल्या सर्व दक्षता व खबरदा-या घेतल्या जातील.

यानंतर श्री.शिगम..

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:35

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्या शपथविधीच्या वेळी घडलेल्या घटनेबद्दल औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जी घटना सांगितली ती आपल्याशी संबंधित आहे आणि आपण त्यासंबंधी भाष्यही केलेले आहे. खरे म्हणजे जी घटना घडली त्याची चर्चा या महाराष्ट्राला भूषणावह नाही असे माझे स्वत:चे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी ठराव मांडण्याची इच्छा प्रकट केली आणि त्यावर भाष्य केले. सभापती महोदय, ठराव मांडण्यापूर्वी मला काही म्हणावयाचे आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे या विधानपरिषदेचे सर्वोच पद आपल्याकडे आहे असे नाही तर या राज्यामध्ये आपले एक विशिष्ट स्थान आणि महत्व आहे. एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून आपल्याकडे आम्ही पाहतो. अशा महनीय व्यक्तीच्या बाबतीत मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांच्या शपथ विधीच्या वेळी व्यवस्थेमध्ये अभाव असल्यामुळे जे काही घडले त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही, ती करणे योग्य वाटत नाही. पण या सभागृहातील माननीय विरोधी पक्षनेत्यासह अन्य मान्यवरांनी असे विचार ठेवलेले आहेत की, जी घटना घडली त्याची पुनरावृत्ती होऊ नये. ही घटना का घडली याची चौकशी व्हावी. आपल्या सारख्या व्यक्तीला मध्येच उतरुन चालत जावे लागले आणि त्यानंतर बसण्यासाठीही आसन उपलब्ध झाले नाही. या सर्व गोष्टी पुढे आल्यानंतर व्यवस्थेमधील अभाव शासन म्हणून आम्हाला दिसतोय. मी सदनाला सांगू इच्छितो की, यासंबंधीची सर्व चौकशी केली जाईल. व्यवस्था राखण्यामध्ये जे कमी पडले असतील मग ते राजशिष्टाचार विभागातील अधिकारी असोत अथवा अन्य कोणी असोत त्यांच्यावर नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई होईल. पण भविष्यामध्ये कोणत्याही पदाधिकारा-याच्या माध्यमातून मान्यवरांच्या बाबतीत अशा प्रकारची घटना घडू नये याची काळजी घेतली जाईल.

मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्यासारख्या मान्यवरांच्या बाबतीत जी घटना घडली त्याबाबतची नैतिकता सरकार म्हणून स्वीकारुन आपणासारख्या आणि आपणासहीत अन्य मान्यवरांच्या बाबतीत दिलगिरी व्यक्त करतो. भविष्यात अशी घटना घडणार नाही याची निश्चितच काळजी घेतली जाईल, संबंधितांना तशा सूचना देण्यात येतील. यामध्ये जे दोषी आहेत, व्यवस्था राखण्यामध्ये जे कमी पडले आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. यावर अधिक चर्चा होऊ नये असे मला वाटते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.प्रथम मी बालगृहातील गैरप्रकाराबाबत न्या. आर.पी.सिन्दूरबलदोटा व न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने दखल घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. बाल सुधार कायद्यानुसार राज्यभरात बालगृहांच्या पाहणीसाठी समन्वय समिती, निरीक्षण समिती, जिल्हा बाल सुरक्षा केंद्र सुरु करणे बंधनकारक असताना शासनाने अद्याप अशी समिती नेमलेली नाही.

सभापती महोदय, नुकतेच शहापूर येथील सत्कर्म बालगृहातील नऊ ते बारा वयोगटातील पाच मुलांच्या मृत्यूचे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले. या वृत्ताची दखल घेऊन सू मोटो याचिका दाखल करण्यात आली. विशेष म्हणजे उल्हासनगरमध्ये हलविण्यात आलेल्या मुलापैकी एक मुलगा हरवला असून त्याची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. तसेच दोन मुलींवर अतिप्रसंग झाल्याची शक्यताही वर्तविण्यात आलेली आहे. याबाबत खंडपीठाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. मतिमंद किंवा मनोरुग्ण मुले त्यांच्या अडचणी घेऊन न्यायालयात येऊ शकत नाहीत. त्यसामुळे शासनाने त्यांच्या विकासाबाबत आणि सुरक्षेबाबत सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. त्यामुळे कायद्यानुसार उपरोक्त समन्वय समिती, निरीक्षण समिती, जिल्हा बाल सुरक्षा केंद्रे स्थापन केली असती तर सदरहू प्रकार घडला नसता असे न्यायालयाचे म्हणणे आहे. तेव्हा शासनाने याची गंभीर दखल घेऊन त्वरित समित्या नेमण्याबाबत कार्यवाही करावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

देशाच्या 113 कोटी लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या 10 कोटी झोली आहे. 66 टक्के ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळचे जेवण परवडत नाही. 90 टक्के ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक आरोग्य सुरक्षितता नाही. 90 टक्के ज्येष्ठ नागरिक निरक्षर असून शारीरिक श्रम करुन जगत आहेत आणि 39 टक्के नागरिक दिर्घायुष्याला दोष देत एकाकी जीवन जगत असल्याची हेल्पेज इंडिया या सामाजिक संस्थेने खळबळजनक व अंतर्मूख करणारी माहिती उजेडात आणल्याने तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठीचे राष्ट्रीय धोरण हिंदुस्थान सरकारने 1999 मध्ये जाहीर करुन त्याप्रमाणे राज्य धोरणे जाहीर करावीत असे आदेश दिले असताना 11 वर्षांचा कालावधी लोटला तरी त्याची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे होत नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणाकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टीकोन निरुत्साही, दुर्लक्षित, अव्यवहारी, अनुकंपाहीन, अकार्यक्षम आणि अपमानित वृत्तीचा दिसून येत असल्याने ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या व अपेक्षा याकडे तातडीने लक्ष वेधण्यासाठी राज्यातील वृध्दांसाठी राज्य वृध्द आयोग स्थापन करण्यात यावा, ही बाब मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

**सभापती** : माननीय सामाजिक न्याय मंत्री यांनी या मुद्याची नोंद घ्यावी. हा विभाग आपल्याकडे असेल तर त्यादृष्टीने जरुर लक्ष घालावे.

श्री.शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, होय.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात गाव तेथे ग्रंथालय अशी घोषणा शासनाने करुन राज्यात सद्यस्थितीत 10 हजाराच्या वर अनुदानित शासनमान्य सार्वजनिक वाचनालये असून त्यात 16 हजारावर ग्रंथपाल व सेवक अत्यल्प मानधनावर कार्यरत आहेत. अडीच वर्षापूर्वी डिसेंबर, 2008 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधिमंडळावर निघालेल्या विशाल मोर्चासमोर राज्य ग्रंथालय परिषदेच्या दिनांक 26.9.2009 रोजी झालेल्या सभेत, मुंबईच्या मोर्चासमोर, पुन्हा नागपूरला 2010मध्ये मोर्चासमोर मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या बैठकीत विस्ताराने चर्चा करुन ग्रंथपाल व सेवकांबाबत आश्वासनांचा पुनरुच्चार करुन राज्यातील ग्रंथपालांना दुप्पट अनुदानाची घोषणा करुन कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे ग्रंथपाल व सेवक यांच्यात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात ग्रंथालय धोरण जाहीर करावे म्हणून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छितो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, औचित्याचा मुद्दा मांडताना दोन-तीन परिच्छेद वाचले तर त्या मुद्याला काही अर्थ राहणार नाहीत. एखाद्या मिनिटामध्ये मुद्दा मांडला तर महत्व येईल. अर्ध्या किंवा एका मिनिटात मुद्दा मांडला पाहिजे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महाराष्ट्र शासनाने सन 1999-2000 पासून कोणतेही निकष न लावता शाळांना विनाअनुदानित तर काही शाळांना तर कायम विनाअनुदानित अशा परवानग्या देण्यात येणे, त्यापैकी विनाअनुदानित शाळा 100 टक्के अनुदान घेत असणे, तथापि कायम विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा गत 11 वर्षापासून अशा सर्व क्षेत्रात पवित्र कार्य करीत असून अनुदानित शाळांप्रमाणे सर्व नियम व अटी लागू आहेत. तथापि शासनाचे कोणतेही अनुदान त्यांना न मिळणे, परिणामी कायम अनुदानित शाळांनी 87 आंदोलने करुनही सदर शाळांना अनुदान देण्यात न येणे, परिणामी कायम विनाअनुदानित शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांवर आलेली उपासमारीची पाळी याबाबत सदर शाळांना अनुदान देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेल्या उपाययोजना व कार्यवाही याकडे मी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयामध्ये काळी-पिवळी टॅक्सी चालविण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. काळी-पिवळी टॅक्सीविरुध्द परिवहन अधिकाऱ्यांनी कारवाई केली आहे. अशी कारवाई करीत असताना लोकप्रतिनिधींकडून पत्र घेण्यात येऊन त्या पत्राच्या आधारे टॅक्सी चालकांना पनिशमेंट म्हणून 10 दिवस त्यांची वाहने सस्पेंड करण्याचे ठरविले. मला प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे गोंदिया जिल्हयातील 300 पेक्षा जास्त टॅक्सी पोलीस स्टेशनबाहेर उभ्या करुन ठेवल्या आहेत. तसेच त्यांना 85 दिवसांपासून एक वर्षापर्यंत ठेवले व दंडाची आकारणी केलेली आहे. म्हणून या लोकांच्या रोजीरोटीचा हा प्रश्न असून काहींनी गाडीसाठी कर्ज घेतले आहे तर काही व्याज भरीत आहेत. या माध्यमातून शासनाने विचार करावा व तातडीने या बाबीकडे लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

--------

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी दोन औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपले औचित्याचे मुद्दे मांडावेत.

ॲड. उषा दराडे : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग वरळी, मुंबई-18 यांचेकडे अनुसूचित जातीचा अनुशेष भरण्याबाबत गेल्या 6 महिन्यांपासून वारंवार निवेदने देऊन शासकीय, निमशासकीय कार्यालयात अनुशेष भरण्यात येतो किंवा नाही हे पाहण्यासाठी शासनाने सन 2005 मध्ये आयोगाची निर्मिती करण्यात येऊन आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांनी कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच सन 2007-10 पर्यंत सिडको महामंडळात सरळ सेवेने अनुसूचित जातीचा 152 पदांचा अनुशेष शिल्लक असताना कनिष्ठ लघुलेखक, अंकलिपीक, शिपाई, वाहनचालक या पदावर अनुसूचित जातीच्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येणे, परिणामी सदर उमेदवारात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

---------

दुसरा औचित्याचा मुद्दा म्हणजे बीड जिल्ह्यात शिधा पत्रिकेची मागणी 3 लाख 33 हजार 100 इतकी असताना तहसील कार्यालयाला केवळ 95 हजार शिधा पत्रिकांचे वाटप करण्यात येणे, त्यामुळे मागणीच्या व्यस्त प्रमाणात अत्यल्प शिधा पत्रिकांचा झालेला पुरवठा विचारात घेता शिधा पत्रिका कोणला वाटप करावयाच्या याबाबत झालेली संभ्रमावस्था, याबाबत पुरेशा प्रमाणात शिधापत्रिका पुरविण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

---------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी दोन औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपले औचित्याचे मुद्दे मांडावेत.

श्री. संजय केळकर : महोदय, ठाणे जिल्हयाला दरोडे हा प्रकार नवीन नाही परंतु गेल्या तीन चार महिन्यात दरोडे पडत नव्हते. काल सायंकाळी ग्रामीण भागात विक्रमगड या ठिकाणी दोन गाडयांमधून तीस चाळीस लोक आले आणि मोठ्या प्रमाणात दगडफेक करुन दहशत निर्माण केली आणि दुसऱ्यांदा एका ज्वेलर्सच्या दुकानात दरोडा टाकून 25-30 लाखाचा ऐवज चोरुन नेला. यामध्ये तिघे जण जखमी आणि दोघे अत्यवस्थ आहेत. त्यांना अति दक्षता विभागात ठेवलेले आहे. या प्रकारामुळे या भागातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली आहेत. तसेच ठाणे जिल्ह्यातील विक्रमगड, जव्हार तसेच तलासरी भागात मागील वर्षी दरोडा पडला होता व त्यावेळेस शासनाने सभागृहात घोषणा सुध्दा केली होती परंतु आजही पोलीस विभाग अशा दरोड्यांवर नियंत्रण ठेवू शकला नाही. त्यामुळे लोकांच्या मनात अजुनही भीती आहे. कुठल्याही क्षणी दरोडा पडू शकेल आणि माणसे मरतील अशी भीती सतत असते. म्हणून या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालावे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ही बाब अतिशय गांभीर्याने घेतली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी जाण्याच्या सूचना दिलेल्याआहेत. तसेच योग्य गस्त वाढविण्याच्याही सूचना दिलेल्या आहेत. तसे उत्तर सन्माननीय सदस्यांनाही पाठविले जाईल व आवश्यक असणाऱ्या उपाययोजना सुध्दा शासनामार्फत केल्या जातील.

-------

....3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहे की, राज्यात मुलींसाठी समाजकल्याण विभागामार्फत जी वसतिगृह बांधण्यात आली आहेत त्या वसतिगृहांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षक भिंत नाहीत तसेच वसतिगृहांना स्वत:च्या इमारती नसल्यामुळे भाड्याच्या इमारतीत अशी वसतिगृहे आहेत. त्याचबरोबर अनेक ठिकाणी अधीक्षीकाची पदे सुध्दा भरलेली नाहीत. त्यामुळे अशा वसतिगृहांमध्ये मुलींचे आयुष्य धोक्यात आलेले आहे. म्हणून शासनाला माझी विनंती आहे की, अशा वसतिगृहांच्या बांधकामासाठी विशेष निधी तयार करावा व 12-12 तास सिक्युरिटी गार्ड्सची नेमणूक करावी. कारण त्या ठिकाणी फक्त दोनच सिक्युरिटी असतात. म्हणून अधीक्षीकांची पदे व सुरक्षा रक्षकांची व्यवस्था भविष्यात शासनाकडून करण्यात येईल अशी अपेक्षा मी करते.

-------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : महोदय, राज्यात कोतवालांची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या संघटनेच्या मागणीनुसार त्यांना चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून मान्यता मिळावी म्हणून अनेक वेळा त्यांनी मागणी केली व हा प्रश्न प्रलंबितच राहिला आहे. त्यासाठी शासनाने अनुकूलताही दर्शविली होती. 26 ऑक्टोबर, 2005 रोजी त्यासंबंधीचा प्रस्तावही तयार झाला होता परंतु त्यांना अजुनही मंजुरी मिळाली नाही. कोतवाल हे पद महत्वाचे असून त्यांनी अनेक वेळा यासाठी आंदोलने केली व आजही त्यांचे धरणे आंदोलन चालूच आहे. त्याबाबत शासनाने कटाक्षाने लक्ष द्यावे अशी विनंती या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मी करीत आहे.

-----

नंतरश्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतर दोडामार्ग तालुक्याची निर्मिती 10 वर्षानंतर व वैभववाडी तालुक्याची निर्मिती 20 वर्षानंतर झालेली आहे. या ठिकाणच्या शेतक-यांना आपल्या न्यायालयीन निवाडयासाठी कणकवली आणि सावंतवाडी येथे यावे लागते. दोडामार्ग व वैभववाडी या ठिकाणी न्यायालय सुरु करण्यात यावे यासंदर्भात आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. या ठिकाणी न्यायालय मंजूर झालेले असून त्यासाठी लागणारा निधी व लागणारा कर्मचारी वर्ग सुध्दा मंजूर झालेला आहे. परंतु या ठिकाणी न्यायालय सुरु करण्यासाठीची नस्ती मंत्रालयात पडून आहे. त्यामुळे दोन्ही ठिकाणी तातडीने न्यायालये सुरु करावीत यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

----

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा दुसरा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग किल्ला हा पाण्यातील एकमेव किल्ला आहे. या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आहे. या मंदिरासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा यासंदर्भात मी सातत्याने मागणी केलेली आहे. तत्कालीन वित्तमंत्र्यांनी या मंदिराला सीआरएफ मधून निधी दिला जाईल असे वक्तव्य केले होते. तात्कालीन वित्तमंत्र्यानी या ठिकाणच्या किल्ल्याला भेट सुध्दा दिली होती. या ठिकाणच्या मंदिरासाठी केवळ 5 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे किल्ल्याच्या डागडुजीसाठी व मंदिरासाठी शासनाने तातडीने 1 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावे तसेच सिंधुदुर्ग किल्ल्यातील खाजगी जागेवर पर्यटकांसाठी सुलभ शौचालयाची व्यवस्था करावी यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

**सभापती** : या विषयाच्या बाबतीत मी माननीय अर्थमंत्र्यांना पत्र पाठविणार आहे.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सहाय्यक अभियंता श्री. कामत हे मनमानी पध्दतीचा अवलंब करतात तसेच मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय देखील मान्य करीत नाहीत. तसेच विकासकांना मदत करुन आर्थिक लाभ उठविण्याचे त्यांच्याकडून सातत्याने घडत असलेले प्रकार, लोकप्रतिनिधींचा अवमान करुन त्यांना कस्पटासमान लेखण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. काल आमच्या पीजन होल मध्ये एक परिपत्रक टाकण्यात आले होते व त्या परिपत्रकात आमदार, खासदार व मंत्र्यांचा सन्मान राखावा असा उल्लेख त्यामध्ये होता. अशा प्रकारचे हे पहिलेच परिपत्रक नाही तर हे दुस-यांदा दिलेले परिपत्रक आहे. अधिकारी लोकप्रतिनिधींचे आदेश मानावयास तयार नाहीत. मंत्र्यांनी त्यांना मिटींगसाठी बालावले तरी सुध्दा ते येत नाहीत. त्यामुळे अशा अधिका-यांना समज देण्यात यावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे शहराची सुमारे 50 लाख वाढलेल्या लोकांचा भार ससून रुग्णालयाला आता सहन होत नसल्यामुळे रुग्णालयाच्या विस्तारासाठी सुमारे 40 कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या इमारतीच्या कोनशीला समारंभ कार्यक्रमात मा. पालकमंत्री व मा. वित्त मंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी नवीन इमारतीसाठी 20 कोटी रुपये निधी मंजूर करण्याची घोषणा केली होती. हा कार्यक्रम होऊन बरेच दिवस होऊन गेले परंतु नवीन इमारतीसाठी अजूनपर्यंत निधी मिळालेला नाही. यामुळे ससून रुग्णालयाच्या इमारतीचे काम बंद पडलेले आहे व रुग्णांची संख्या दिवसेंदिवस मोठमोठया संख्येने वाढत आहे. त्यामुळे शासनाने ससून रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी त्वरित निधी उपलब्ध करुन द्यावा यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ: नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो- : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, प्रशासकीय सेवेतील आएएस व आयपीएस अधिका-यांना उत्पन्नाचे वार्षिक विवरण पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

परंतु अनेक आय.ए.एस.आणि आय.पी.एस.अधिकारी यांनी नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन विवरणपत्रे सादर केलेली नाहीत. दैनिक सकाळ या वर्तमानपत्राने यावर एक प्रकाश टाकला आहे. आय.ए.एस. आणि आय.पी.एस.अधिकाऱ्यांनी विवरणपत्र भरले पाहिजे अशाप्रकारचा कायदा करण्याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारला तीन पत्रे पाठविल्याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून मागविलेल्या माहितीच्या अधिकारात माहिती पुढे आली आहे. याबाबत केंद्र सरकारकडे विचारणा केली असता केंद्र सरकारचे अधिकारी श्री.नवनीत मिश्रा, उप सचिव व श्री.दीपक इसरानी, उप सचिव यांनी याबाबत छाननी केली असता राज्य सरकारकडून अशा कोणत्याही प्रकारचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. आपण याठिकाणी अनेक घोटाळ्यांबाबत चर्चा करतो. तेव्हा चांगले नियम अधिकाऱ्यांना सुध्दा लागू असावेत आणि त्याबाबतचे नियम इंटरनेटवर असावेत असे केंद्र सरकारने जाहीर केलेले आहे. तसेच गहाळ झालेल्या पत्रांचा राज्य सरकाराने शोध घ्यावा यासाठी मी या औचित्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधीत आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडण्यापूर्वी मी प्रथम माननीय शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी काल जी घोषणा केली त्याबाबत महाराष्ट्रातील सर्व पालक त्यांचे स्वागत करीत आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने नवीन आर.टी.ए.च्या संदर्भात नवीन नियमावली तयार करताना त्याबाबत काही सूचना मागविल्या होत्या. आता त्याची मुदत देखील संपली आहे. दोन आक्षेपार्ह बाबी आहेत. पहिली बाब अशी की, या महाराष्ट्रामध्ये फक्त सरकारी शाळा नसून खाजगी शिक्षण संस्थानी शाळा उभ्या केल्या आहेत. परंतु जी "शाळा व्यवस्थापन समिती" करणार आहात त्यामध्ये संस्थाचालकांचा समावेश केलेला नाही. त्या समितीमध्ये नगरसेवक अणि इतर जणांचा समावेश केलेला आहे. असे केल्यामुळे दुकान थाटले जाईल, शिक्षकांना वेठीला धरले जाईल आणि एक नवीनच प्रकार सुरु होऊन त्याचा एक राजकीय आखाडा बनेल. तेव्ही ही जाचक अट रद्द करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी की, आपण किती कष्टाने संस्था उभ्या केल्या हे आपणास माहीत आहे. आता त्या संस्थांना त्या इमारतीचा अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करता येणार नाही. खाजगी शिक्षण संस्थांना वेतनेत्तर अनुदान मिळत नाही. असे असताना ते विकास निधी कसा उभा करणार आहेत ? तेव्हा याबाबत देखील विचार व्हावा.

तिसरा मुद्दा असा की, शिक्षणासंबंधी जो नवीन आराखडा तयार केलेला आहे.त्यामध्ये खूप त्रुट्या आहेत. त्याचा तपशील मी आता देत नाही. याठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत महाराष्ट्राला एक मेसेज देणे आवश्यक आहे. मला वाटले होते या विषयावर चर्चा होईल. परंतु वेळे अभावी ते शक्य नाही. तेव्हा या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन करावे. तसेच संस्थाचालक, शिक्षक आणि शिक्षण तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन नियमावली तयार करावी. दुकान थाटले जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच राजकीय हस्तक्षेप होणार नाही असे त्यांनी आश्वासन द्यावे अशी विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जी नवीन नियमावली तयार झालेली आहे त्यामुळे खाजगी शिक्षण संस्थेच्या अधिकारावर व स्वायतत्तेवर गदा आलेली आहे असा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला की,खाजगी संस्था विकास निधी कसा उभा करेल. तिसरा मुद्दा एस.एस.सी.चा अभ्यासक्रम आधुनिक, लवचिक आणि सक्षम असावा तसेच स्पर्धा परीक्षेसाठी तो यशस्वी ठरावा याकडे लक्ष देण्याबाबत सांगितले आहे. त्यांनी अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या प्रश्नांच्या संदर्भात सर्व शिक्षक आमदारांची एक बैठक बोलावून त्यांच्याशी सखोल चर्चा करण्यात येईल.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अकोला महानगरपालिकेमध्ये "अतिक्रमण हटाव" मोहीम जोरात सुरु आहे. अतिक्रमण हटविले पाहिजे याबाबत कोणाचे दुमत नाही. मध्यंतरी अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत माझे कार्यालय जे नियंत्रण नियमावलीमध्ये असताना त्या कार्यालयावर एक फावडा मारुन त्यासंबंधीचे फोटो वर्तमानपत्रात छापून आणून, आम्ही आमदार किंवा महापौर यांचे अनधिकृत बांधकाम तोडू शकतो,आम्ही आमदारांना व महापौरांना जुमानत नाही, वाटल्यास माझी बदली करावी अशी तेथील आयुक्त भाषा वापरीत आहे. याठिकाणी पालकमंत्री श्री.राजेंद्र दर्डा उपस्थित आहेत. अकोला महानगरपालिकेचे आयुक्त निगरगट्ट झाले असून ते अतिक्रमण हटाव मोहिमेचा फायदा घेऊन माझे कार्यालय 100 टक्के नियंत्रण नियमावलीमध्ये असताना त्यावर फावडा मारुन त्याबाबत वर्तमानपत्रात फोटो छापून आणला आहे. या प्रकरणामुळे माझी बदली होईल असे त्यांनी सांगितलेले आहे. माननीय मंत्री महोदय डी.पी.डी.सी.च्या बैठकीस उपस्थित राहतील त्यावेळी त्यांनी या घटनेची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

------

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.शिगम 13.00

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. माननीय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे एका अत्यंत गंभीर बाबीकडे मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो.ज्या पध्दतीने गेल्या वर्षी प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील कायम शब्द काढून टाकण्यात आला होता त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील सुध्दा कायम शब्द काढून टाकण्यात यावा यासाठी राज्यातील आठही विभागाच्या उप संचालकांच्या कार्यालया समोर कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मोठया संख्येने गेल्या पाच तारखेपासून उपोषणासाठी बसलेले असून त्यांच्या पैकी काही शिक्षकांची प्रकृती गंभीर आहे आणि काही शिक्षकांना दवाखान्यात दाखल केलेले आहे. सभापती महोदय , आपल्या माध्यमातून माननीय शिक्षण मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, उपोषण कर्त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करण्याबाबत शिक्षण उपसंचालकांना आपण आदेश द्यावेत आणि जे उपोषणाला बसलेले आहेत त्यांची बैठक आपल्या दालनात बोलावून हा प्रश्न मार्गी् लावण्यासाठी प्रयत्न करावेत.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या निमित्ताने मी उप संचालकाना असे आदेश देतो की त्यांनी ताबडतोब उपोषणकर्त्यांबरोबर चर्चा करावी आणि त्यांचे उपोषण थांबवावे. त्यानंतर मी यासबंधी बैठक आयोजित करीन.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.केशवराव मानकर :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. संरक्षित वनातील काही क्षेत्र भारतीय वन अधिनियम कलम 20 अंतर्गत राखीव वन म्हणून महाराष्ट्र शासनाने घोषित करणे, परंतु घोषित केलेल्या क्षेत्रात महसूल विभागाने सन 1960 ते 78 पर्यंत भूमीहीन लोकांना 5 एकरापर्यंत वाटप केलेले क्षेत्र अजूनही मूळ क्षेत्रातून निर्वणीकरण न करता शासनाने नव्याने अधिसूचना काढलेली नसणे, त्यामुळे शेतक-यांचा परवानगीच्या विलंबामुळे महाराष्ट्र शासनाचे 60 दिवसाचे नियमांतर्गत कापणी केलेला लाखो रुपयांचा लाकूड वन विभागाने जप्त करणे, त्यामुळे भंडारा - गोदिंया जिल्हयातील शेतक-यांमध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता विभाजन केलेल्या जमिनीचे योग्य निर्वणीकरण करुन प्रमाणपत्रधारक शेतक-यांना त्याचा मोबदला देऊन त्याच्यावर झालेला अन्याय दूर करुन महसूल व वन विभागातील दोषी अधिकारी आणि कर्मचा-यांवर तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता लक्षात घेता सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KGS/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.शिगम 13.00

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.कोणत्या विभागात कोणी काम करावे यास काही निर्बध असू शकतात परंतु कल्याण डोबिवली महानगरपालिकेत पशुसंवर्धन विभागाचे डॉ.दीपक कुरळेकर यांना फक्त पशुसंवर्धन विभागाचेच ज्ञान आहे. पंरतु ते आपल्या जवळचे आहेत म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या उपआयुक्त पदावर नेमण्यात आले होते त्यांच्याकडे नागरी सेवेतील कर वसूली,सामान्य प्रशासन,धन कचरा ,विधी अशा प्रकारची कामे देण्यात आली होती.या कामाचा त्यांच्या संपूर्ण आयुष्यामध्ये काहीही संबध नाही.त्यामुळे नागरी प्रशासनामध्ये मोठया प्रमाणावर गोंधळ निर्माण झाला आहे तसेच कामामध्ये शिथिलता आलेली आहे.नांदेंड जिल्हयातील पशुधन खात्यामध्ये मोठया प्रमाणावर पदे रिक्त असल्यामुळे त्या ठिकाणी या अधिका-यांना पाठविण्यात यावे आणि उपआयुक्त सारख्या महत्वाच्या पदावर त्वरित योग्य अधिका-याची नेमणूक करावी अशी मी या औचित्याच्या मुद्दाव्दारे शासनाला सूचना करतो.

**सभापती** : सभागृहात उपस्थित असलेल्या सन्माननीय मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, जे औचित्याचे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत त्याची नोंद घेण्यात यावी आणि त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे याची माहिती पंधरा दिवसात संबंधित सन्माननीय सदस्यांना कळविण्यात यावी तसेच त्याची एक प्रत विधानमंडळ सचिवालयाकडे देखील पाठविण्यात यावी त्याचबरोबर विधानमंडळ सचिवालयातील अधिका-यांना मी असे सांगू इच्छितो की, या ठिकाणी जे औचित्याचे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत त्या सर्व औचित्याच्या मुद्याच्या बाबतीत त्या त्या संबंधित माननीय मंत्र्यांना पत्र पाठवून त्याचा पाठपुरावा करावा.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 1.30 वाजता पुन: भरेल.

( 1.04 ते 1.30 मध्यंतर )

श्री.सरफरे

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, नियम 93 अन्वये सूचनेची निवेदने आम्हाला सर्क्युलेट करण्यात आलेली नाहीत. सदरची निवेदने आज चर्चेकरिता घेण्यात येणार आहेत काय?

**तालिका सभापती** : नाही. आता मी नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचना वाचून दाखवितो.

---

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांनी "कुंभवली, ता. खालापूर, जिल्हा रायगड येथील मेसर्स दुजोदवाला प्रोडक्ट्स लिमिटेड या कंपनीचे हवेतील व पाण्यातील प्रदूषण वाढल्याने त्यास प्रतिबंध करण्याबाबत पर्यावरण मंत्री व उप प्रादेशिक अधिकारी, रायगड यांचेकडे तक्रारी करुनही कंपनीविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील वन, सामाजिक व वन विकास महामंडळातील 11,995 पात्र रोजंदारी वन मजुरांना अद्याप शासनाने कायम न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "आदिवासी भागात आयटीआय मार्फत चालविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण केंद्रातील शिक्षकांना 5000 ऐवजी 15000

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ....

रुपये मानधन देण्याबाबत तत्कालीन राज्यमंत्री यांनी दि.23.7.2010 रोजी दिलेल्या आश्वासनाची अद्याप पूर्तता केली नसल्याने संबंधित कर्मचारी आमरण उपोषणास बसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "मुंबई उपनगरातील अंधेरी-आंबिवली येथील सर्व्हे नं.431 अ हा सुमारे 1500 चौ.मीटरचा भूखंड 30वर्षाच्या कराराने कम्युनिटी हॉल बांधण्याकरिता तत्कालीन जिल्हाधिकारी उपनगर जिल्हा यांनी घातलेल्या 13 अटी व शर्तींचे पालन होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "म्हाडाची बनावट लेटरहेड व शिक्के वापरुन मुख्यमंत्र्यांच्या 10 टक्के कोट्यातील घरांच्या 150 चाव्या व बनावट कागदपत्रे तयार करुन फसवत असलेल्या एका दलालासह चार साथीदारांना खेरवाडी पोलिसांनी पकडून जप्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी यांनी "मौजे पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सर्वे क्र.215,216,243,244,245 दिवा, पनवेल, उरण व बेलापूर पनवेल प्रकल्पासाठी सिडकोने संपादित केलेल्या जमिनीत बेकायदेशीर बांधकाम सुरु असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रणजित पाटील, संजय केळकर, धनंजय मुंडे यांनी "आदिवासी विकास महामंडळाच्या सन 2009-10 मध्ये खरेदी केलेल्या धानापैकी आदिवासी विकास महामंडळ, गोंदिया येथील राईस मिल चालकांना भरडाईसाठी 31 डिसेंबर, 2010 पर्यंत मुदत वाढवून देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ....

सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांनी "बाळापूर (जि.अकोला) येथील मौजे झुरळ खुर्द, टाकळी खोजबोड, उरळ खुर्द तसेच इतर गावातील शेतकऱ्यांना बाळापूर येथील कृषी विभागाने गांडूळ कल्चर युनिट अंतर्गत बांधकामासाठी खर्च केलेल्या 60 हजार रुपयांपैकी 30 हजार रुपये शेतकऱ्यांनी स्वत: खर्च केले असूनही शेतकऱ्यांना अनुदानापोटी द्यावयाच्या 80 लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "सामाजिक न्याय विभागाने राज्यातील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान होण्यासाठी निविदा न मागविता हिंदुस्थान कॉम्प्युटर्स मालेगाव, नाशिक यांचेकडून बीओटी तत्वावर संगणक खरेदी केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबईतील ओशिवरा न्यू लिंक रोड येथील सुमारे 26,365 चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड टीटबीट असल्याचे दाखवून एका बिल्डरला विकल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "महिला व बालविकास विभागांतर्गत शासकीय बालगृह निराश्रित बालकांची निवास व्यवस्था करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहातील कर्मचाऱ्यांना तुटपुंजे मानधन मिळत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "भंडारा जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अभियान समितीला विश्वासात न घेता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत 7.5 कोटी रुपये खर्चाच्या आराखड्याला मंजुरी दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, वसंतराव खोटरे यांनी "झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत शाळांसाठी चार चटई क्षेत्र निर्देशांक मिळावा म्हणून उपनगर शिक्षक संस्था व संघांनी शासनाकडे केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** .....

आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : आष्टी, जि. बीड येथे समाजकल्याण खात्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाची दुरवस्था होणे

**मु. शी.** : आष्टी, जि. बीड येथे समाजकल्याण खात्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाची दुरवस्था होणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी याच बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

"राज्यात गोरगरीब मुलींची परगावी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शासनाच्या समाजकल्याण खात्यामार्फत शासकीय वगतिगृह चालविण्यात येणे, अशाच प्रकारे बीड जिल्ह्यातील आष्टी पंचायत समितीसमोर एका जुन्या इमारतीत वसतिगृह चालविण्यात येणे, सदर वसतिगृहाची प्रभारी अधीक्षक आष्टी येथे न राहणे, वसतिगृहाला कायमस्वरुपी पहारेकरी नसल्याने शिपायालाच पहारेकऱ्याचे काम करावे लागणे, वसतिगृहाच्या इमारतीची दुरवस्था, निकृष्ट प्रतीचा आहार, अशा अवस्थेत वसतिगृहातील मुलींना हालअपेष्टेत काढावे लागत असलेले दिवस, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

----

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील वैश्य-वाणी समाज शासनाच्या सवलतींपासून वंचित राहणे.

**मु. शी.** : कोकणातील वैश्य-वाणी समाज शासनाच्या सवलतींपासून वंचित राहणे. याबाबत श्री. राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. राजन तेली यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"कोकण विभागात वैश्य-वाणी हा समाज मोठ्या प्रमाणात असून कोकणात तो वेगवेगळ्या नावाने ओळखला जात असणे, वैश्य म्हणजेच वाणी व वाणी म्हणजेच वैश्य हे दोन्हीही एकच असतानाही ते रद्दबातल ठरवून त्यामध्ये योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे समाज शासनाच्या सुविधांपासून वंचित राहात आहे. यामुळे या समाजात तीव्र असंतोष व संतापाची भावना, वैश्य वाणी या समाजाला न्याय मिळण्याबाबत मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

सभापती महोदय, कोकण विभागात वैश्य वाणी समाज फार मोठ्या प्रमाणावर आहे. तो समाज मंडल आयोगाच्या मूळ यादीत तसेच महाराष्ट्र शासनाच्या मूळ यादीत आहे. मात्र कोकणामध्ये वेगवेगळ्या नावाने हा ओळखला जातो. उदा. वाणी किंवा वैश्य वाणी इत्यादी हे सर्व समाज गट मूळ मंडलच्या यादीत व महाराष्ट्र शासनाच्या ओबीसी यादीत असलेले समाज गट एकच आहेत. वैश्य म्हणजेच वाणी व वाणी म्हणजेच वैश्य हे दोन्ही एकच असल्यामुळे त्याची खात्री करुन वैश्य वाणी या विषयाचे शुध्दिपत्रक काढावे. माननीय हायकोर्टाने मुंबई महानगरपालिकेचे शिवसेनेचे नगरसेवक श्री. विश्वनाथ महाडेश्वर व कॉंग्रेसचे श्री. ठाकूर यांच्या निवडणुकीनंतर जात पडताळणीवर निर्णय देताना श्री. महाडेश्वर यांचे नगरसेवक पद रद्द केले व वैश्य समाजाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

महाराष्ट्र सरकारने शुध्दिपत्रक काढून वैश्य म्हणजेच वाणी व वाणी म्हणजेच वैश्य हे रद्दबातल ठरवून त्यामध्ये योग्य ते प्रोसीजर फॉलो केलेले नाही. ते शासनाने करावे व तोपर्यंत ते शुध्दिपत्रक रद्दबातल ठरवले तरी योग्य ते प्रोसीजर फॉलो करुन पुन्हा अहवाल मागवून तो माननीय हायकोर्टात सादर करुन समाजाला योग्य तो न्याय द्यावा, ही विनंती.

सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात सोमवारी बैठक लावलेली असल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: एचएमटी या गैरबासमती तांदुळावर केंद्र शासनाने निर्यातबंदी आणणे

**मु.शी.**: एचएमटी या गैरबासमती तांदुळावर केंद्र शासनाने निर्यातबंदी आणणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सचूना

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नुकतेच महाराष्ट्र शासनाने 'एचएमटी' चा जनक म्हणून श्री.दादाजी खोब्रागडे यांचा सत्कार करुन त्यांना पाच एकर शेती बक्षीस म्हणून भेट देणे, सदर 'एचएमटी' तांदुळाचा दर सर्वसाधारण तांदुळाच्या तुलनेत कमी असून त्याची चव बासमती तांदुळासारखी असणे, परंतु राज्यात सन 2007 पासून गैरबासमती तांदुळावर केंद्र शासनाने निर्यातबंदी आणणे, त्या गैरबासमती तांदुळात या 'एचएमटी' तांदुळाला शासनाने परदेशात निर्यात करण्याची परवानगी दिल्यास या तांदुळाचे राज्यभरात उत्पादन वाढून त्यांचे योग्य दरही शेतक-यांना मिळतील, एकीकडे 'एचएमटी' तांदुळाचे जनक यांचा शासन सत्कार करीत असताना त्यांनीच निर्माण केलेल्या 'एचएमटी' तांदुळाला सावत्रपणाची वागणूक मिळणे, तरी शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करुन बासमती तांदुळाप्रमाणेच 'एमएचटी' तांदुळाला परदेशात निर्यात करण्याची परवानगी देण्याबाबत योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता."

-----

NTK/ D/ ST/

**पृ.शी.**: महाराष्ट्रामध्ये 8000 मराठी शाळांचे प्रस्ताव धूळ खात पडणे

**मु.शी.**: महाराष्ट्रामध्ये 8000 मराठी शाळांचे प्रस्ताव धूळ खात पडणे याबाबत श्री.दिवाकर रावते,, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सचूना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रामध्ये 8000 मराठी शाळांना नाकारण्यात आलेली मान्यता, त्यामुळे सर्व प्रस्ताव धूळ खात पडून असून न्यायालयीन आदेशानुसार गेले चार वर्षे कृती आराखडा करण्यात न आल्यामुळे ग्रामीण भागापासून शहरापर्यंत मराठी विद्यार्थ्यांची झालेली उपेक्षा लक्षात घेता माननीय मंत्री महोदयांनी डिसेंबर महिन्यामध्ये कृती आराखडा पूर्ण करण्याचे दिलेले आश्वासन लक्षात घेता या अधिवेशनात कृती आराखडयासहित शाळाच्या मान्यता संदर्भात धोरण जाहीर करावे."

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी यासंबंधी तातडीने निर्णय घेण्यात येईल असे घोषित केले होते. ती घोषणा लक्षात घेता हे अधिवेशन संपण्यापूर्वी या मराठी शाळांसंबंधीचा कृती आराखडा पूर्ण झाला असेल तर तो जाहीर करावा, झाला नसल्यास याबाबत निर्णय केव्हा घेण्यात येईल आणि या शाळांना कधी मान्यता देण्यात येईल, याबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. मंत्री महोदयांनी याच अधिवेशनात याबाबतची घोषणा करावी आणि मराठी शाळांची मागील अधिवेशनापासून गळचेपी सुरु आहे ती या अधिवेशनात मोकळी करावी.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सेलूबाजार, ता.मंगळूरपीर येथील हॉटेलला दारु परवाना न देण्याची मागणी

**मु.शी.**: सेलूबाजार, ता.मंगळूरपीर येथील हॉटेलला दारु परवाना न देण्याची मागणी याबाबत श्री.दिवाकर रावते,, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सेलूबाजार, ता.मंगळूरपीर, जिल्हा वाशिम येथे पुरुषोत्तम रामलाल जैस्वाल यांच्या हॉटलला वाईन, दारु परवाना देऊ नये असा मंगळूरपीर पोलीस स्टेशन निरीक्षक यांनी डिसेंबर, 2009 मध्ये अहवाल सादर केला. त्यावर हॉटेल मालकाने तक्रार केली. हॉटेल मालकाने पोलिसांना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे पोलीस निरीक्षकांनी सदर हॉटेलला दारुचा परवाना द्यावा असा अहवाल मे, 2010 मध्ये पोलिसांना शिफारस करुन पाठविला. त्यानंतर स्थानिक जनतेने यासंदर्भात आंदोलने केली. म्हणून पहिली केलेली शिफारस रद्द करुन संबंधित पोलीस निरीक्षकाने त्या हॉटेलला दारु परवाना देऊ नये, अशी पुन्हा शिफारस केली. पुन्हा तिस-यांदा आपल्या वरिष्ठांना अहवाल सादर केला. एकाच विषयावर उलटसुलट एका पोलीस अधिका-याने उपविभागीय पोलीस अधिका-यांकडे पाठविलेले सदर अहवाल व ग्राम सचिवांनी सुध्दा तीन वेळा वेगवेगळे अहवाल वरिष्ठांना सादर केले. यासंदर्भात संबंधित पोलीस निरीक्षकाची, ग्रामसचिवाची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करावी व अशाप्रकारचा दारु परवाना सेलूबाजार, ता.मंगळूरपीर यांना देण्यात येऊ नये असे आवाहन मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला करीत आहे.

-----

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कायम विना अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा कायम विना अनुदानित हा शब्द काढून देखील या शाळांच्या मूल्यांकनाबाबत शासनाने निर्णय न घेणे

**मु.शी.**: कायम विना अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा कायम विना अनुदानित हा शब्द काढून देखील या शाळांच्या मूल्यांकनाबाबत शासनाने निर्णय न घेणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील कायम विना अनुदानित शाळांचा 'कायम' शब्द काढून टाकण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्याने 1678 प्राथमिक शाळा, 1834 माध्यमिक शाळा विना अनुदानित ठरल्याने मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र ठरल्या आहेत. 'कायम' शब्द काढून टाकण्याचा लाभ प्राथमिक व माध्यमिक शाळांना होणार आहे. आजही अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये कायम विना अनुदान तत्वावरील वाढीव तुकडयांना शासनाने मान्यता दिलेली आहे. या शाळांमधील कायम विना अनुदानित तुकडयांचा 'कायम' शब्द न काढल्याने या तुकडया अनुदानापासून वंचित आहेत. कायम विना अनुदानित तुकडयांचा तसेच उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढून टाकण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती करतो."

सभापती महोदय, कायम विना अनुदानित शाळांचा कायम शब्द काढण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असूनही प्राथमिक व माध्यमिक शाळांचा कायम हा शब्द काढून टाकला जाणार आहे. परंतु याबाबतच्या जी.आर.मध्ये पुन्हा उच्च माध्यमिक शाळांना वगळले आहे. उच्च माध्यमिक शाळांचा कायम हा शब्द काढून टाकणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.शिगम

अग्रेषित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

श्री. रामनाथ मोते...

यासाठी राज्यभर सर्व शिक्षण उप संचालकांच्या कार्यालयासमोर गेल्या पाच-सहा दिवसापासून कार्यकर्त्यांचे उपोषण सुरु असताना अनेक उपोषण करणा-या कार्यकर्त्यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. शासनाने अद्याप या आंदोलनाची दखल घेतलेली नसून कायम विनाअनुदानित तुकड्यांचा तसेच उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढून टाकण्याबाबत शासनाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो."

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माथेरान येथील जंगलाची होत असलेली तोड

**मु. शी.** : माथेरान येथील जंगलाची होत असलेली तोड याबाबत श्री. संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"निसर्गाचे लेणे लाभलेले माथेरान (जिल्हा रायगड) हे राज्यातील महत्वाचे थंड हवेचे ठिकाणी/हिलस्टेशन असून पूर्वी सुमारे 498 चौ.कि.मी.चा परिसर घनदाट जंगलाने व्यापलेला होता. पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून शासनाने तेथपर्यन्त वाहने नेण्यास बंदी घातलेली आहे. त्यास पूरक म्हणून नेरळ ते माथेरान अशी मिनी ट्रेनही सुरु केलेली आहे. त्यामुळे माथ्ेरानला पर्यटकांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परंतु दरम्यानच्या काळात अतिक्रमण व बेसुमार जंगलतोड यामुळे या हिलस्टेशन परिसरात नावापुरतेच जंगल उरले असून त्या परिसराचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यावरणाच्या हानीमुळे पर्यटकांचा ओघ कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माथेरानची जगाला असलेली ओळख पुसली जाऊ नये म्हणून माथेरान परिसरात जंगल/वन संवर्धनासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करावी यासाठी सदर बाब मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडत आहे."

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

**पृ. शी.** : मोखाडा (जि.ठाणे) तालुक्यात विकास कामे न करता काढलेली बोगस बिले

**मु. शी.** : मोखाडा (जि.ठाणे) तालुक्यात विकास कामे न करता काढलेली बोगस बिले याबाबत श्री. संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"मोखाडा तालुक्यात ब-याच प्रकारची विकास कामे न करता बोगस बिले खर्ची टाकण्यात आलेली आहेत. जी काही कामे झालेली आहेत ती निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. तसेच डी.जी.एम.टी. रस्त्यावर 100/104 मध्ये अपघात स्थळ सुधारणा करणे व कि.मी. 103 ते 200मध्ये पुलाची दुरुस्ती करणे ही दोन्ही कामे न करताच बोगस बिले काढून भ्रष्टाचार केलेला आहे. सदरची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर सुमारे 1 वर्षानंतर यंत्रसामग्री वापरुन दिनांक 5 डिसेंबर 2010 व 6 डिसेंबर 2010 रोजी सदरची कामे चालू करण्यात आली आहेत. तत्कालीन भ्रष्ट अधिकारी तालुक्याचा विकास करण्या ऐवजी ऐषआरामात कुठल्याही कामाची निविदा न काढता कामे करतात, स्थानिक ठेकेदारांना डावलून जिल्ह्याच्या बाहेरील ठेकेदारांना परस्पर निविदा न काढता कामे देतात. सदरच्या कामांची विभागीय चौकशी तात्काळ करण्यासाठी ही बाब मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडत आहे."

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याच्या पध्दतीमध्ये केलेला आमूलाग्र

बदल

**मु. शी.** : विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याच्या पध्दतीमध्ये केलेला आमूलाग्र बदल याबाबत श्री. नागो गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 20 ऑगस्ट 2010 च्या शासन निर्णयाने या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याच्या पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल केला आहे, असे करताना शिक्षक आमदारसह संघटनांच्या पदाधिका-यांनाही विश्वासात घेतले नाही, यामध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, वर्तन परिवर्तनाधिष्ठित मूल्यमापन, आकस्मिक मूल्यमापन, श्रेणीदेय पध्दतीने मूल्यमापन या व इतर महत्वपूर्ण बदलांची योग्य आणि प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तेवढी पूर्वतयारी केली जात आहे. त्यामुळे सर्वांच्या मनामध्ये गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अपरिमित नुकसान होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर प्रश्नी शासनाने ठोस उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असून तशी उपायोजना तातडीने करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-5

MSS/ D/ ST/ 13:45

**पृ. शी.** : मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. LXXXII OF 2010**

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 )

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 82, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.स.वि.क्रमांक 82 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांना जात पडताळणी सर्टिफिकेट 4 महिन्याच्या आत सादर केले पाहिजे असे बंधन होते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील............

सभापती महोदय, या राज्यामध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या. डिसेंबर, 2010 अखेर ज्या निवडणुका होतील अशांची संख्या 14000 इतकी आहे. त्यातून जात पडताळणीसाठी अर्ज करणाऱ्या लोकांची संख्या फार मोठया प्रमाणात वाढत आहे. आपल्या राज्यामध्ये जात पडताळणीसाठी विभागीय स्तरावर समित्या आहेत. त्यांच्याकडे वेगवेगळया विषयाबरोबरच निवडणुकीमधून निवडून आलेल्या उमेदवारांच्या जात पडताळणीचे काम एकत्रितपणे आल्यामुळे कामाचा व्याप खूप वाढला आहे. त्यामुळे चार महिन्यांच्या आत जात पडताळणी मिळणे कदाचित शक्य होणार नाही. म्हणून ही मुदत आणखी तीन महिन्यांची वाढविण्यात येत आहे. म्हणजे निवडून आल्यापासून सात महिन्यापर्यंत मुदत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. यापूर्वी विधीमंडळाने मान्यता दिली होती. त्यावेळी सभागृहाने सविस्तर चर्चा केलेली आहे. मला खात्री आहे की, सभागृहाचा अधिक वेळ या विषयावर घेतला जाणार नाही. कारण यापूर्वीच सभागृहाने मान्यता दिलेली आहे. तीन महिन्यांची तात्पुरती मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव असून यापुढच्या निवडणुकांना ही मुदत लागू असणार नाही. 31 डिसेंबर, 2010 पूर्वी ज्या निवडणुका होणार आहेत किंवा झ ाल्या आहेत तेवढ्यासाठीच ही दुरुस्ती करीत आहोत. यापुढे होणाऱ्या निवडणुकांसाठी जात पडताळणीचे प्रमाणपत्र घेऊनच नॉमिनेशन फॉर्म भरावे लागणार आहेत, याची नोंद घ्यावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 82 मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने यापूर्वी दोन-तीन वेळा हे विधेयक उलटसुलट पध्दतीने सभागृहासमोर आणले होते. एकदा जात पडताळणी प्रमाणपत्र असल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत म्हणून विधेयक आणले. नंतर अचानक एका महिन्याने त्यात दुरुस्ती केली आणि तीन महिन्यांची मुदत देणारे विधेयक आणले. कालांतराने चार महिन्यांची मुदत देणारे विधेयक आणले. सत्ताधारी पक्षाला प्रत्येक निवडणुकीच्या वेळी सोयीचे व्हावे म्हणून वटहुकूम काढायला सचिव तयार असतात. ताबडतोब सही करुन मान्यतेसाठी वटहुकूम पाठवितात. माझ्याकडे पुरावे आहेत. ज्या ज्यावेळी नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे उमेदवार अडचणीत आले म्हणून मुदतवाढ दिलेली आहे. साने गुरुजींच्या आणि गांधीजींच्या विचाराने चालणाऱ्या राज्याला हे शोभनीय नाही. माझा या विधेयकाला विरोध नाही. शासन जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रभावी यंत्रणा का उपलब्ध करुन देत नाही. गेली सहा वर्षे हेच चालले आहे. सहा वर्षाच्या काळात राज्य शासन या संदर्भात अपयशी ठरले आहे. जिल्हा स्तरावर जात पडताळणी प्रमाणपत्र देणारी यंत्रणा निर्माण करण्याची आम्ही मागणी केली. सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी देखील ही मागणी केली होती. शासनाने ही मागणी मान्य केली होती. सभापती महोदय, आपण देखील या संदर्भात विचार मांडले होते त्यावेळी आपणही जिल्हा पातळीवर जात पडताळणीची व्यवस्था व्हावी अशी मागणी केली होती. कारण या प्रक्रियेमध्ये खूप भ्रष्टाचार होत आहे. वेळेवर दाखले द्यायचे नाहीत, विलंबाने दाखले द्यायचे यासाठी विरोधी उमेदवारांकडून 3-3 लाख रुपये अधिकाऱ्यांना दिले जातात ही वस्तुस्थिती आहे. दाखला वेळेवर मिळावा म्हणून 5 ते 6 लाख रुपयांचा दर ठरलेला आहे. मी स्वत: कोकण भवन येथे गेलो होतो. माननीय उपसभापतींनी ही वस्तुस्थिती खरी असल्याचे मान्य केले आहे. तेथे शिपायापासून लिफ्टमन, क्लार्क यांनाही पैसे द्यावे लागतात. तेथील अधिकारी म्हणजे मंत्र्यांपेक्षाही आपण मोठे आहोत असे वागतात. मला आदिवासी ठाकूर समाजाचा दाखला मिळावा म्हणून तत्कालीन आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांनी दहा वेळा फोन केला. आमची यंत्रणा वेगळी आहे. शासन आम्हाला आदेश देऊ शकत नाही अशा मग्रुरीने ते अधिकारी वागतात.

नंतर 2इ.1...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.........

आणि एका ठिकाणी बसतात म्हणून या निमित्ताने अशा सर्व परिस्थितीत बदल करुन या अधिकाऱ्यांना जे जादाचे अधिकार दिलेले आहेत ते कमी करावेत. देशात लोकशाहीचे शासन चालते की अधिकाऱ्यांचे हे या निमित्ताने जनतेला एकदा कळू द्यावे अशी मी विनंती करतो. आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री असतानाच्या काळात पोलादपूरला ग्रामपंचायतीच्या सदस्याला 8 किलोमीटर जावे लागते. वास्तविक अलिबागला केवळ सर्टिफिकेट आणायला जाण्याची त्याची आर्थिक कुवत असते काय याचाही विचार करण्याची गरज आहे. माझ्या मतदारसंघात आदिवासींची संख्या जास्त असल्याने आम्ही हे दु:ख भोगत आहे. त्याचबरोबर मंत्री महोदय श्री. जयंत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांकडे ओबीसीचा दाखला आहे तर त्यांच्या मुलांना पुन्हा दाखला का मिळत नाही, त्याला 50 वर्षाच्या वास्तव्याचा पुरावा आणायला का सांगतात हेच मला समजत नाही. माझा दाखला हाच पुरावा होत नाही काय याचाही विचार करण्याची गरज आहे. या विधेयकाला पाठिंबा देत असताना शासनाने जी आश्वासने वेळोवेळी दिलेली आहेत त्यांची पुर्तता व ठराविक कालावधीत हे आश्वासन पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KGS/ ST/ KTG/

श्री. जयंत पाटील : महोदय, सभागृहात शासनाने हे मान्य केलेले आहे की, जिल्हास्तरीय समित्या नेमावयाच्या आणि सुप्रिम कोर्टात यासंबंधीची केसही सुरु आहे. सुप्रिम कोर्टाने सह सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी नेमून विभागीय समित्या नेमल्या पाहिजेत अशा मुद्यावरच सुप्रिम कोर्टात सुनावणी झालेली आहे त्यामुळे जिल्हा स्तरीय समित्या आजपर्यंत करता आल्या नाहीत. अशा जिल्हा स्तरीय समित्या आल्यानंतर मात्र हे टेन्शन दूर होऊन यात अधिक पारदर्शकता येईल, एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, प्रथम मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो आणि मनापासून आनंद व्यक्त करतो की, त्यांनी जाहीर केले आहे की, मी काँग्रेस पक्षात असतो तर मी येथे आलो नसतो. काँग्रेस पक्षात मला कोणाकोणाच्या मागे फिरावे लागले असते हे सुध्दा त्यांनी सांगितले. तसेच माननीय श्री. शरद पवार साहेबांनी त्यांना योग्य कोंदणात बसविलेले आहे याचा मला आनंद वाटत आहे.

श्री. जयंत पाटील : महोदय, प्रश्न असा होता की, काँग्रेस पक्षात असते तर आपले काय झ ाले असते त्यावेळेस मी सांगितले की, तेथे आमचे ज्येष्ठ नेते डॉ. पतंगराव कदम आमच्या जिल्ह्याचेच आहेत व त्यामुळे त्यांचे नेतृत्व मान्य करुन मला काम करावे लागले असते एवढेच.

श्री. दिवाकर रावते : महोदय, एकाच जिल्ह्यात असताना देखील कितीही ताकदवर असला तरी त्यांना आव्हान देण्याचे सामर्थ्य मला मिळाले हेच या निमित्ताने मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

सभापती महोदय, हे मुदतवाढीसंबंधीचे विधेयक असून केवळ आपल्या सदस्यांना राखण्यासाठीच शासनाने सभागृहात मंजुरीसाठी आणलेले आहे. जात पडताळणी समित्या निर्माण केलेल्या आहेत त्यांचा जो बाजारुपणा चालला आहे त्यातून ही परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. मी शासनाला सातत्याने विनंती करुन यासंबंधीच्या कायद्यात बदल करण्यास भाग पाडले. कारण भविष्यात असे होऊ नये तसेच शासनाच्या सोईप्रमाणे चार महिन्यात दाखला मिळू नये असे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी देखील सांगितले ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. म्हणून उच्च न्यायालयाचा जो उल्लेख येथे झाला तेथे सुध्दा असेच मांडले गेले पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

महाराष्ट्रामध्ये जातीचे दाखले कसे मिळतात, दाखले मिळण्यासाठी किती कोंडमारा सहन करावा लागतो, त्यामुळे जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता का आहे, तसेच जातीचा दाखल सुटसुटीतपणे कसा उपलब्ध करुन देता येईल यासाठी आपली भूमिका सर्वोच्च न्यायालयामध्ये योग्य पध्दतीने मांडली जाण्याची आवश्यकता आहे.

या ठिकाणी मा. जयंत पाटील यांनी जो विचार येथे मांडलेला आहे तो मला महत्वाचा वाटतो. बापाजवळ ओबीसीचे प्रमाण पत्र असतांना देखील मुलाला तू ओबीसी आहे काय ? असे जेव्हा विचारले जाते त्यावेळी मोठा प्रश्न निर्माण होत असतो. यासंदर्भात मी आपल्याला उदाहरण देऊ इच्छितो की, एका समाजातील मंडळी आमचा या या जातीमध्ये समावेश करावा अशा प्रकारची मागणी करतात तेव्हा राज्य शासन याबाबत केंद्राचा आधार घेऊन या समाजाला त्या जातीची मान्यता देते. त्या समाजातील व्यक्तीला जिल्हाधिका-याने त्या समाजाचा दाखला दिल्यानंतर तो जातीचा दाखला मान्यतेसाठी पुढे जातो व त्याला 50 वर्षापूर्वीचे प्रमाणपत्र मागितले जाते. त्यामुळे त्या व्यक्तीकडून 50 वर्षापूर्वीचा दाखला मागण्याची खरे म्हणजे गरज नाही. बाप ओबीसी असेल तर बापाच्या ओबीसीचा दाखला चालत नाही परंतु काकाचा ओबीसीचा दाखला चालतो. त्यामुळे आपल्या येथेही उत्तर प्रदेश प्रॉडक्ट सारखे झाले की, काय असे वाटू लागले आहे. खरे म्हणजे ही तार्कीकताच नाही. खरे म्हणजे वडील होण्याचा हा गंभीर अपमान आहे. माझ्या सारख्याला विचारले तर मी पहिल्यांदा त्याच्या कानफटातच मारेन व त्याला विचारेन तुझी जी मुले आहेत त्यांचा तू बाप आहे काय ? हे न पटणारे गणित आहे. बापाचे जातीचे प्रमाणपत्र चालत नाही परंतु काकाचे प्रमाणपत्र चालते याचा अर्थ काय आहे? खरे म्हणजे हा अतिरेक आहे. हा जो नियम केला आहे तो कोणी केला आहे ? कशासाठी केला आहे ? मी उदाहरण सांगितल्याप्रमाणे ज्या लोकांना तुम्ही त्यांच्या आग्रहासाठी दुस-या जातीत घातले त्यांच्याकडून तुम्ही 20-25 वर्षापूर्वीचे दाखले मागितले तर ते लोक कसे काय पुरावे देऊ शकतील ? अशा लोकांकडून तुम्ही प्रतिज्ञापत्र लिहून घेतले व त्यावरुन त्या जातीच्या प्रमाणपत्राचा वापर होऊ शकतो. त्यामुळे आपण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अशा प्रकारच्या तरतूदी निर्माण करणार आहात काय ? या विधेयकाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा उल्लेख मंत्रीमहोदयांनी केलेला आहे. जिल्हा पातळीवर हा विषय जावा असे सरकारचे सुध्दा मत आहे त्यामुळे यासंदर्भात मी शासनाचे स्वागत करतो. या विधेयकामुळे जो काही कोंडमारा झालेला होता तो निघून जाईल असे विचार व्यक्त करुन मी आपली रजा घेतो.

धन्यवाद.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, ग्रामपंचायतीच्या जातपडताळणी संबंधीचे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. हे चांगले बिल असल्यामुळे या बिलाला आम्ही मान्यता देणारच आहोत.

नुकत्याच ज्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या त्या निवडणूकीमध्ये ब-याच लोकांना जात पडताळणीचे प्रॉब्लेम्स आले होते. जात पडताळणी संबंधी 5-6 महिन्यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये असे ठरले होते की, जातपडताळणीचे दाखले देण्याची जी प्रोसिजर आहे ती सुटसुटीत झाली पाहिजे. त्या बैठकीमध्ये जिल्हा लेव्हलचा विषय सुध्दा उपस्थित झाला होता. जात पडताळणीचे काम आपण जर जिल्हास्तरापर्यंत आणले तर ते अधिक सोईचे होईल. जात पडताळणीचा अर्ज केल्यानंतर त्या जातपडताळणीसाठी 8-8,9-9 महिने लागतात. ग्रामीण भागातील माणूस निवडणुका लागल्यानंतरच जातपडताळणीच्या कामास लागत असतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर....

याचे कारण असे की, कोणता वॉर्ड कोणत्या जातीसाठी आरक्षित आहे हे निवडणुका जाहीर झाल्यानंतर घोषित होतो. त्याबाबत अगोदर कोणाला माहिती नसते. निवडणुका जाहीर झाल्यानंतर अमुक एक वॉर्ड अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी राखीव झाला असे जाहीर झाल्यानंतर मग उमेदवारांची जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी धावपळ सुरु होते. ज्यावेळी उमेदवार जातप्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करतो तेव्हा तहसीलदार त्यांचा अर्ज घेण्यासाठी टाळाटाळ करतात. एकदा अर्ज भरण्याची वेळ निघून गेली की तो निवडणुकीचा अर्ज भरु शकत नाही. तेव्हा जात पडताळणीच्या मुदतवाढी बरोबरच जात पडताळणीचा दाखला मिळविण्याबाबचा अर्ज तहसील कार्यालयातील अमूक एका डेस्कवर अर्ज मिळाला पाहिजे याबाबत निर्णय झाला पाहिजे. उमेदवारांना जातप्रमाणपत्र वेळेवर मिळावे म्हणून सात महिन्यांची मुदत दिलेली आहे. परंतु उमेदवाराने जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर त्याला जी पावती मिळते ती पावती अर्जाला जोडली तर तो अर्ज स्वीकृत झाला पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व श्री.जयंत प्र.पाटील यांनी त्यांचे चांगले विचार मांडले. ही गोष्ट खरी आहे की, या जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत आहेत. या सभागृहात कर्वे नावाच्या अधिकाऱ्यावर हक्कभंगाची सूचना आली होती. नंतर त्यांची बदली होऊन त्यांना निलंबित करण्यात आले होते. जातपडताळणी प्रमाणपत्र देण्यास उशीर का लागत आहे, निवडणूक होऊन चार महिने झालेले आहेत. निवडून आलेल्या उमेदवाराने जातपडताळणीसाठी आपल्याकडे अर्ज केलेला आहे. त्या सदस्याला वेळेत दाखला सादर करावयाचा आहे असे लोकप्रतिनिधींनी फोनवरुन जातपडताळणी अधिकाऱ्यांना विचारले असता अधिकारी लोकप्रतिनिधींशी कशाप्रकारे वागतो याचे दाखले या सभागृहात मिळालेले आहेत. याचा अनुभव राज्याचे गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील, विधानपरिषद सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, विधानसभा सदस्या ॲड.यशोमती ठाकूर तसेच मला स्वत:ला आलेला आहे. श्री.कर्वे हे माझ्या विरुध्द हाय कोर्टात गेले आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर....

श्री.कर्वे यांना मी एवढेच विचारले होते की, अमूक एका सदस्याचे प्रमाणपत्र केव्हा मिळेल. त्यावेळी ते अधिकारी माझ्याशी अतिशय उध्दटपणे बोलले. तेव्हा मी त्यांच्या विरुध्द हक्कभंगाची सूचना दिली. त्यानंतर ते प्रकरण हक्कभंग समितीकडे गेले. हक्कभंग समितीसमोर ते हजर झाले होते. सध्या ते सस्पेंड आहेत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना देखील त्यांनी कोर्टात खेचण्याचा प्रयत्न केलेला आहे. ॲड.यशोमती ठाकूर यांच्याशी देखील त्यांनी गैरवर्तणूक केली. तरी देखील त्यांची सहा महिने बदली झाली नाही. त्यानंतर त्यांची नंदूरबार येथे बदली झाली. नंदूरबार येथे बदली झाल्यानंतर ते सस्पेंड झाले.

अमुक एका व्यक्तीच्या प्रमाणपत्रासाठी किती उशीर लागेल असे लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला विचारणा करावी लागते. कारण एखादा उमेदवार निवडून आल्यानंतर त्याला जर लवकर प्रमाणपत्र मिळाले नाही तर त्याचे सभासदस्यत्व रद्द होऊ शकते. सरकार सात महिन्यांचा कालावधी वाढवत आहे ही चांगली बाब आहे. परंतु जात पडताळणी अधिकाऱ्याला देखील अमूक एका कालावधीत त्याच्याकडे अर्ज आल्यानंतर त्याने तो अर्ज तीन-चार महिन्यांच्या कालावधीत निकाला काढला पाहिजे अशी अट घातली पाहिजे तरच न्याय मिळू शकेल. अन्यथा आपण सात महिन्यांची मुदत वाढवून दिली तरी पुन्हा कामाचा रेटा जास्त आहे अशी सबब दाखवून सात महिन्यांच्या पुढे दाखले देण्याचे प्रकार सुरु राहतील. तेव्हा अधिकाऱ्यांसाठी देखील एक निश्चित कालमर्यादा घालून द्यावी. हे विधेयक निश्चितपणे चांगले आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु मी सांगितलेल्या सूचनांचा सरकारने विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----------

यानंतर श्री.गायकवाड..

श्री.राजन तेली ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 82 मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक 2010 या ठिकाणी मांडण्यात आले असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आतापर्यत तिस-यांदा हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. हे चांगले विधेयक असल्यामुळे मी त्याचे स्वागत करतो.जात पडताळणी दाखला मिळवतांना किती त्रास होतो याबाबतीत सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. गेल्या अधिवेशनात ठाकर समाजाच्या संदर्भात मी एक लक्षवेधी सूचना मांडली होती. ही लक्षवेधी सूचना प्रथम शासनाला राखून ठेवावी लागली आणि जेव्हा दुस-या वेळी लक्षवेधी सूचना सभागृहासमोर चर्चेसाठी आली होती त्यावेळी त्यावर बरीच चर्चा झाली होती. आमच्या जिल्हयात ठाकर समाज मोठया प्रमाणावर असून 35 वर्षापूर्वी त्यांना ठाकर जातीचे दाखले सहजपणे मिळत होते परंतु आता या सामाजातील व्यक्तींना जातीचा दाखला मिळवतांना खूपच त्रास साहन करावा लागत आहे. संस्थानिकाच्या काळातील जी काही कागदपत्रे होती त्यामध्ये ठाकर समाज हा आदिवासीमध्ये येतो असा उल्लेख करण्यात आला होता परंतु या सामाजातील व्यक्तीने लंगोटच वापरली पाहिजे असे आमच्याकडील काही अधिका-याचे तसेच माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे.आज 100 टक्के जिल्हा साक्षर आहे.ठाकर समाजातील व्यक्ती खूपच चांगल्या राहतात व त्या दिसावयाला देखील खूप सुंदर आहेत परंतु आदिवासी भागातील लोक मात्र लंगोटी वापरत असतात असे एका ठिकाणी बोलले गेले आहे . ठाकर समाजातील लोकांनी चांगले रहावयाचे नाही काय ? असा माझा प्रश्न असल्यामुळे मी ठाकर समाजाच्या संदर्भातील विषय या ठिकाणी उपस्थित केला होता ठाकर समाजातील व्यक्तीच्या वडिलांना सर्टिफिकेट मिळाले परंतु मुलाला मिळालेले नाही, काकाला सर्टिफिकेट मिळाले पंरतु भावाला मिळालेले नाही अशा प्रकारची जवळजवळ 14 उदाहरणे मी या सभागृहात दिली होती आणि मी जी उदाहरणे रेकॉर्डवर आणली होती ती सर्व मान्य करण्यात आली होती. ज्या ठिकाणाहून जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जाते त्या ठिक्णचा कारभार अंधाधुंदीचा आहे

.सुप्रीम कोर्टाने जिल्हानिहाय सर्टिफिकेट त्वरित देण्यास सांगितले आहे व त्याप्रमाणे सर्टिफिकेट देण्याचा शासनाचा विचार आहे परंतु मागच्या वेळेस माननीय मंत्री महोदयांनी

2..

श्री.राजन तेली ....

असे जाहीर केले होते की, आता ऑन लाईन दाखले देण्यात येईल. हा दाखला मिळविण्यामध्ये कोणालाही वेळ लागणार नाही.माहिती सादर केल्यानंतर ताबडतोब त्या व्यक्तीला दाखला देण्यात येईल अशी व्यवस्था शासनामार्फत होणार आहे असे सांगून देखील तशी व्यवस्था अजूनही झालेली नाही.आता जे विधेयक मांडण्यात आलेले आहे ते विधेयक यापूर्वी दोन तीन  वेळी आणावे लागले आहे.ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोकांना हा दाखला मिळवतांना खूप त्रास होतो. त्याचबरोबर शाळा कॉलेजमध्ये प्रवेश घेत असतांना हे दाखले मिळवतांना विद्यार्थ्यांना त्रास होतो. निवडणुकीच्या वेळी लोकप्रतिनिधींना सुध्दा त्रास होत असतो म्हणून  या बाबतीत शासन  कोणता ठोस निर्णय घेणार आहे, यांसबंधीचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी बोलतांना सागितले की, हे सटिर्फिकेट देतांना वेळेचे बंधन घातले पाहिजे आणि एक महिन्यात वा दोन महिन्यात ते दिले गेले पाहिजे. परंतु सर्टिफिकेट देण्यासाठी निश्चित असा कालावधी ठरवून दिला न गेल्यामुळे तो कालावधी ठरवून दिला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.ठाकर समाजाच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे त्या समाजातील उमेदवारांची मोठया प्रमाणावर अडचण झालेली आहे. सर्टिफिकेट जर सादर करण्यात आले नाही तर सेवेतून कमी करण्यात येईल अशा प्रकारच्या नोटीसेस त्यांना देण्यात आल्या आहेत.अशा प्रकारे सर्टिफिकेट देण्याच्या बाबतीत जी चालढकल सुरु आहे ती थांबविण्यात आली पाहिजे. ठाकर समाजाच्या बाबतीत जी अडचण होती तीच अडचण वैश्य वाणी समाजाची आहे. हा समाज कोकण विभागात मोठया प्रमाणावर असून वैश्यवाणी समाज हा  राज्य सरकारच्या इतर मागासावर्गीय समाजाच्या यादीत अनुक्रमांक 190 वर दाखविण्यात आला आहे. परंतु दुर्दैवाने हायकोर्टात महाडेश्वर विरुध्द यांची एक केस गेली होती. वेश्य म्हणजेच वैश्य वाणी अशा प्रकारे राज्य सरकारच्या वतीने परिपत्रक काढले होते, त्याला ऑब्जेक्शन घेण्यात आले होते व त्या संदर्भातील प्रोसिजर पाळली गेली  नव्हती ती प्रोसिजर पाळण्यात यावी अशी या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे. आज काही जणांना प्रवेश रद्द करावयास लागला. काही व्यक्तीची पदावनती करण्यात आली आहे. या समाजावर मोठया प्रमाणावर अन्याय

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होत आहे. तेव्हा ठाकर आणि वैश्यवाणी समाजाच्या बाबतीत शासनाकडून जी काही चूक झ्ांलेली आहे त्यासबंधी विचार करुन हायकोर्टात सरकारच्या वतीने ॲफिडेव्हीट दाखल करण्यात यावे आणि कालबध्द कार्यक्रम आखून या समाजातील लोकांना न्याय द्यावा अशी मी सूचना करतो आणि या विधेयकाचे स्वागत करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सान 2010 चे वि.स.वि.क्रमांक 82 या ठिकाणी मांडण्यात आले असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नामनिर्देशन पत्र भरते वेळी जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेल्या व्यक्तींनी निवडून आल्याच्या तारखेपासून चार महिन्यात हे प्रमाणपत्र सादर करण्यासबंधीचे विधेयक या पूर्वी आपण मंजूर केले होते त्यावेळी या विधेयकाचे आम्ही स्वागत केले होते आता सुध्दा चार महिन्या ऐवजी सात महिन्यांची मुदत देण्यासबंधीचे जे विधेयक मांडण्यात आले आहे त्याचे मी स्वागत करतो परंतु वारंवार आपल्याला तीच ती सुधारणा करण्यासाठी विधेयक आणावे लागते...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

मी त्यावेळी खेदाची बाब सांगितली होती. हा कालावधी अत्यंत कमी असून त्यासाठी सुचविलेले उपाय अत्यंत चांगले होते. परंतु सुप्रिम कोर्टामध्ये केस गेल्यामुळे त्यामध्ये विलंब झाला. म्हणून मला सांगितले पाहिजे की, जर सुप्रिम कोर्टाचा निर्णय होणार असेल तर ही विभागीय जात पडताळणी समिती प्रत्येक जिल्हयात शिबिर घेऊन हा प्रश्न सोडवू शकते आणि हे काम अगदी सहजपणे होऊ शकते. गोंदिया व भंडारा जिल्हयात जूनमध्ये निवडणुका झाल्या त्यांना येत्या 30 डिसेंबरला सहा महिने होतील. या एक ते दीड महिन्यामध्ये त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळेल काय? हा खरा प्रश्न आहे. चार महिन्यांचा कालावधी संपल्यामुळे अनेक लोकांची मेंबरशिप गेली होती. त्यामध्ये सर्वच पक्षाचे लोक सहभागी असल्यामुळे त्यापैकी कुणीही ग्रामपंचायत सदस्य कोर्टामध्ये गेले नाहीत. नाही तर त्यांची निवडणूक रद्द झाली असती. या विधेयकामुळे त्यांना आता जीवदान मिळाले आहे. परंतु ज्यांचे चार महिने पूर्ण झाले आहेत त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ नये अशी मी शासनाला विनंती करतो. हा सात महिन्यांचा कालावधी फक्त 31 डिसेंबर 2010 पर्यंतच्याच निवडणुकीसाठी आहे आणि पुढे चार महिन्यांचाच कालावधी शिल्लक आहे.

सभापती महोदय, या विधेयकामधील तरतुदींबाबत संशोधन करण्याची गरज आहे असे मला वाटते. कारण निवडणुकीला उभे रहाण्यासाठी अर्ज करावयाचा म्हटले तर निवडणूक जाहीर झाल्यानंतरच ते अर्ज स्वीकारले जातात. त्यापूर्वी कोणताही जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार अर्ज स्वीकारीत नाही. याबाबतीत आम्हाला न्याय कसा मिळणार आहे हा खरा प्रश्न आहे? त्याकरिता आपण कायद्यात असा बदल केला पाहिजे की, निवडणूक होण्यापूर्वी एक वर्ष अगोदर जर त्यांनी अर्ज केला असेल तर तो जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि एस.डी.ओ. यांनी स्वीकारला पाहिजे. आणि त्यांनी जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे तो पाठविला पाहिजे. अशी तरतूद या विधेयकामध्ये होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, जात पडताळणी करणारे अधिकारी व कर्मचारी यांचा आपल्याला अत्यंत वाईट अनुभव येतो.. मागील वेळी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत्या. त्यावेळी आमच्या जिल्हयातील आमदार माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल व मी स्वत: तसेच, माननीय आमदार डॉ. खुशाल बोपचे, माननीय आमदार श्री. बरोले या सर्वांनी निवडणुकीला उभे राहणाऱ्या सर्व पक्षांच्या लोकांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे यासाठी

DGS/ KGS/ KTG/

श्री. केशवराव मानकर....

प्रयत्न केले . माननीय आमदार श्री. बरोले हे तर उपोषणाला सुध्दा बसले होते. तरीसुध्दा त्यावेळी अनेक लोकांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यामुळे या कायद्यातील तरतुदीमुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये उभे राहणाऱ्या सर्व उमेदवारांवर अन्याय झाला आहे. हा कायदा करीत असतांना याबाबत निश्चितपणे विचार केला गेला नाही. याबाबत विचार करुन आणि या कायद्यामध्ये तरतुदी अंतर्भूत करुन सर्वंकष असे विधेयक आणले असते तर आपण अधिक स्वागत केले असते. त्यामुळे कोणत्याही उमेदवारांवर अन्याय झाला नसता. म्हणून जे उमेदवार निवडणूक लढणार होते, त्यांच्यावर अन्याय झाला आहे हे मी याठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, मी आणखी एक बाब आपल्या लक्षात आणून देतो. जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केल्यानंतर तहसीलदार यांच्या कचेरीमधून तो तपासून घेतला जातो. त्यानंतर एस.डी.ओ. यांच्याकडून किंवा जिल्हा कचेरीमधून तपासून घेतला जातो. हे सर्व झ ााल्यानंतर जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे तो अर्ज पाठविला जातो. तो अर्ज गेल्यानंतर सुध्दा त्याची छानणी केली जाते, व त्यामध्ये अमुक कागदपत्रे जोडलेली नाहीत असे सांगून अनेक त्रुटी काढल्या जातात. त्या अर्जासोबत कागदपत्रे जोडण्यात आलेली असतात. परंतु मधल्या काळात ती गहाळ झ ाालेली असतात. अशाप्रकारची वागणूक या जात पडताळणी यंत्रणेकडून दिली जात आहे. त्याचे खरे कारण वेगळे आहे. त्याबाबत याठिकाणी ऊहापोह केला तर ते योग्य होणार नाही असे मला वाटते आणि ते सर्वांना विदित आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी त्याचा उल्लेखही केला आहे. परंतु जात पडताळणीकरिता तहसीलदार यांच्या कार्यालयामधून पाठविण्यात आलेली सर्व कागदपत्रे आपण मान्य केली पाहिजेत. किंवा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जात पडताळणी अधिकाऱ्यांनी 15 दिवसांच्या आत त्या अर्जामध्ये कोणत्या प्रकारच्या त्रुटी आहेत हे आपल्याला कळविले पाहिजे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, आपण तालुक्याच्या ठिकाणी घेऊ शकत नसाल तर जिल्हयाच्या ठिकाणी जात पडताळणी समितीची बैठक बोलावून व शिबिर घेऊन हे प्रश्न सोडविले पाहिजेत.

या जात पडताळणीकरिता गरीब माणसाने किती वेळा नागपूरला फेऱ्या मारायच्या? तसेच, त्या इमारतीमधील तिसऱ्या व चौथ्या माळयापर्यंत किती वेळा पायऱ्या चढून जायचे? हे अवघड

श्री. केशवराव मानकर....

काम आहे. अशा ठिकाणी कार्यालय असणे ही एक शोकांतिका आहे. त्याठिकाणी एवढी गर्दी होते की, कुणीही ऐकण्यास तयार नसते. म्हणून हे निवडणुकीचे काम घेत असतांना त्याठिकाणी नीट यंत्रणा उभी केली पाहिजे आणि अर्ज तपासणीच्या संदर्भात निश्चित असे धोरण आखले पाहिजे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

जर हे आपण करु शकलो नाही तर सहा महिन्यांची, सात महिन्यांची मुदत सुध्दा उपयोगी पडणार नाही. या बिलाच्या माध्यमातून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, ज्या जून पासून 31 डिसेंबर पर्यंत जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे अर्ज केला असेल त्यांना जोपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत त्याला कोणत्याही प्रकारच्या पदावरुन काढण्यात येऊ नये अशी माझी आग्रहाची भूमिका मी या ठिकाणी मांडत आहे. कारण याला शासनच जबाबदार आहे. शासनाने सात महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली तर सर्वांना जात वैधता प्रमाणपत्र मिळेल आणि कोणावरही अन्याय होणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी जे बिल आणलले आहे त्याचे मी स्वागत करतो. चार महिन्यांची मुदत आता सात महिन्यांपर्यंत वाढविलेली आहे, ही मुदत चार महिन्यांपेक्षा सात महिनेच असू द्यावी अशी आग्रहाची भूमिका मांडून या बिलाचे समर्थन करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, यापूर्वी झालेल्या ज्या निवडणुका आहेत तेवढ्यांसाठीच ही व्यवस्था आहे. यापुढे निवडणुका होतानाच जात पडताळणी प्रमाणपत्र जोडावे लागेल असा त्याचा अर्थ आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, वेळोवेळी आपल्याला या सुधारणा कराव्या लागल्या. लोकांचे जसे प्रश्न येतात तशा आपण सुधारणा करतो. आपल्या कायद्यातील सुधारणा या विधेयकाच्या माध्यमातून सभागृहापुढे आणलेल्या आहेत. त्यामुळे सरकार किती लोकाभिमूख आहे याची नोंद सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी घ्यावी.

सभापती महोदय, हे खरे आहे की, ज्या ठिकाणी मागणाऱ्यांची संख्या जास्त असते आणि गर्दी होते त्या ठिकाणी बसलेले आमचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नैतिक मूल्यांचे जास्त अध:पतन झालेले अनेक वेळा आपण पाहतो. एखाद्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर मागणी आली की मग त्या कार्यालयातील यंत्रणाही तोकडी पडते आणि त्यामुळे सगळ्याच प्रश्नात विलंब होतो आणि विलंबाचे फायदे अनेकजण कार्यालयात आणि कार्यालयाच्या बाहेर घेत असतात. याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केला. या व्यवस्थेत कोठे तरी पारदर्शकता असली पाहिजे. मी जर पोलादपूरपासून 10 किलामीटरवर वसलेल्या गावातून अर्ज केलेला असेल तर मला त्याचे उत्तरही माझ्या गावातच पोहोचले पाहिजे असे मला वाटते. निवडणूक लढविण्यासाठी मी माझा अर्ज केला आणि मी जर माझी सर्व कागदपत्रे जोडून पाठविलेली असतील तर तालुक्याच्या ठिकाणी सुध्दा हेलपाटे घालावे लागू नये असे आपले आयडियल प्रशासन असले पाहिजे. जात पडताळणीची आवश्यकता असणाऱ्या असंख्य जातीतील, समाजातील माणसे ही आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. त्यांना किती वेळा शासकीय कार्यालयात हेलपाटे घालावयास लावावयाचे यालाही काही मर्यादा असणे आवश्यक आहे. म्हणून या सगळ्याच जात पडताळणीच्या कार्यालयातील व्यवस्था संगणकाच्या पध्दतीने ऑन-लाईन कराव्यात असे सामाजिक न्याय विभागाचे माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांनी यापूर्वीच सांगितलेले आहे. आज आपले हे सगळेच प्रकरण सुप्रीम कोर्टामध्ये हिअरींग असल्यामुळे थांबलेले आहे. सरकारची ही मानसिकता आहे की, जर आपण हे जिल्हा स्तरावर दिले आणि जिल्हा स्तरावर ही यंत्रणा राबविली तर जात पडताळणीची कामे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. जयंत पाटील .....

अधिक वेगाने होतील आणि विभागात येणारा लोड पूर्णपणाने डिस्पर्स झाला तर उशिरा मिळणारे सर्टिफिकेट्स, त्यातून निर्माण होणाऱ्या त्रुटी, त्या भागातील भौगोलिक परिस्थितीचा अंदाज विभागातील प्रमुखाला नसणे असे जे काही अनेक प्रश्न निर्माण होतात ते प्रश्न निर्माण होणार नाहीत अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने आपण ग्रामपंचायत कायद्यामध्ये थोडासा बदल करुन डिसेंबर अखेरपर्यंत झालेल्या निवडणुकांना ही सवलत लागू करीत आहोत. पण भविष्य काळात या सगळ्या यंत्रणेत सुधारणा होईल आणि ग्रामपंचायतीमध्ये उभे राहणाऱ्या सामान्य माणसाला घरात बसून त्याचे दाखले मिळाले पाहिजेत असे जे आपले अंतिम स्वप्न आहे ते आज कदाचित पूर्ण होणार नसले तरी किमान त्याला हेलपाटे घालावे लागू नये आणि ठराविक काळात त्याला त्याने केलेल्या अर्जाचे 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर आले पाहिजे अशी यंत्रणा सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून करण्याची गरज आहे याची मला जाणीव आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे साहेब यांच्याशी कालही मी या विषयावर चर्चा केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

त्या पध्दतीने ते प्रयत्न करीत आहेत. आज त्या विभागात सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरु आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी यापूर्वी या सभागृहात सूचना केलेल्या आहेत. या सूचनांचा सुधारणा करीत असताना विचार होईल अशी मला खात्री आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्यांची मी नोंद घेतलेली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितीतील हा विषय आहे. या विभागाच्या माननीय मंत्री महोदयांच्या कानावर या सूचना घातल्या जातील आणि त्या विभागाची कार्यपध्दती अधिक पारदर्शकपणे होईल असा विश्वास व्यक्त करतो, ग्रामपंचायतीचे हे विधेयक सभागृहाने संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 82 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 82 संमत झाले आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXXVII OF 2010

( A BILL FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 77 मोटार वाहन अधिनियम, 1988 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 77 मोटार वाहन अधिनियम, 1988 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन चालविणे व वाहनाची धडक देऊन भरधावपणे निघून जाणे अशा कारणास्तव या अधिनियमामध्ये दंडाची तरतूद केलेली आहे. या अधिनियमामध्ये 1988 पासून सुधारणा केलेली नव्हती. या प्रकाराला आळा घालण्यासाठी नागरिकांकडून वारंवार सूचना येत होत्या. या कायद्यात सुधारणा करुन अशा लोकांना कठोर शिक्षा व्हावी, अशी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी वि.स.वि.क्रमांक 77 सभागृहासमोर मांडले आहे. या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये विधेयक सादर केले जाते त्याच वेळी कायद्यात बदल होत असतो हे मी नेहमीच म्हणत असतो. सरकारला वेळोवेळी कायद्यात सुधारणा कराव्या लागतात. परंतु त्या सुधारणांचे समाजावर कोणते परिणाम होणार आहेत, जनतेला कोणते लाभ होणार आहेत हे मंत्री महोदयांनी सांगणे आवश्यक असते आणि या विधेयकामुळे जनतेला कोणते लाभ होणार नाहीत हे विरोधी पक्षाचे सदस्य सांगत असतात. तथापि, या विधेयकाचे स्वागत करणे आवश्यक आहे. कारण दारु पिऊन गाडी चालविणा-यावर कर लावला जावा ही जी संकल्पना ज्यांनी मांडली आहे त्यांचा खरे तर सत्कार केला पाहिजे. मुंबईमध्ये अनेक भयानक अपघात होत आहेत. त्यातील काही प्रकरणांचा गवगवा होतो, काहींचा होत नाही.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ज्या दिवसापासून दारु पिऊन वाहन चालविणा-यावर बंधन आले त्या दिवसापासून मुंबईतील 99 टक्के अपघात कमी झालेले आहेत. लोक आता दारु पिऊन वाहन चालविण्यास घाबरतात. ही चांगली गोष्ट झालेली आहे. या तरतुदीमुळे मी पोलिसांचे कौतुक करतो. ज्या अधिका-याच्या डोक्यातून ही कल्पना आली त्या अधिका-याचे मी कौतुक करतो. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे वाहन अपघातांच्या संख्येमध्ये गेल्या कित्येक वर्षापासून फरक पडलेला नव्हता. म्हणून आपण त्याबाबतीत दंडाच्या रकमेमध्ये हजार, दीड हजार, अडीच हजार अशी वाढ केलेली आहे. केवळ दारु पिऊन वाहन चालविण्याच्या बाबतीतच दंडाच्या रकमेमध्ये वाढ केलेली नाही तर विविध गुन्ह्याच्या संदर्भातील दंडाच्या रकमेमध्ये वाढ केलेली आहे. दारु पिण्याच्या संदर्भात हजार दीड हजार रुपये दंड आकारलेला आहे. खरे तर त्याही पेक्षा जास्त दंड आकारला पाहिजे. 5 रुपयाची दारु प्यायची असेल तर 5000 रु. खिशात ठेवायला पाहिजे अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल त्याच वेळी लोक दारु पिण्याचे सोडून देतील.

सभापती महोदय, मद्य पिऊन वाहन चालवू नये अशा प्रकारचे फलक वाहतूक नियंत्रण विभागातर्फे लावण्यात येतात. त्या फलकावर पूर्वी मराठी शब्द नव्हते. मी वरळीच्या कार्यालयात गेलो. ते कार्यालय गृह विभागाच्या अखत्यारित येते. त्यांना मी फलक इंग्रजी ऐवजी मराठीतून लावण्यास सांगितले. त्यानंतर "मद्य पिऊन वाहन चालविणे हा गुन्हा आहे" अशा प्रकारचे फलक लावण्यात आले. मी त्याबाबतीत विभागाला सांगितले की, "मद्य" या शब्दा ऐवजी "दारु" हा शब्द वापरावा. त्यामुळे "दारु पिऊन वाहन चालविणे हा गुन्हा आहे" हा फलक लोकांना लगेच समजेल. तेव्हा "मद्य" या शब्दा ऐवजी "दारु" हा शब्द वापरण्याची सूचना मी केलेली आहे त्याची अंमलबजावणी अद्याप केलेली नाही. तेव्हा ती सुधारणा करण्याच्या बाबतीत गृह खात्यामार्फत संबंधित अधिका-यांना सूचना द्याव्यात अशी मी विनंती करतो. वाहनांच्या संदर्भातील विविध गुन्ह्यांबद्दलच्या दंडाच्या रकमेमध्ये वाढ करण्यासंबंधीचे हे विधेयक आणलेले आहे त्याचे मी मनापासून स्वागत करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 77, मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्या तरतुदी सुचविलेल्या आहेत त्यानुषंगिक प्रश्नाच्या संदर्भात या विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली होती. माननीय मंत्री महोदयांच्या दालनामध्ये देखील काही मुद्यांच्या संदर्भात चर्चा झाली होती. प्रदूषण होत असल्यामुळे वाहन निकाली काढण्याच्या संदर्भात, त्या करपात्र करण्याच्या संदर्भात या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. जर न्यायालयाने याची दखल घेतली नसती आणि काही जागरुक नागरिकांनी केन्द्र सरकारकडे आणि सर्वोच्च न्यायालयात जाऊन सांगितले नसते आणि या जुन्या आणि मोडकळीस आलेल्या वाहनाबद्दल मोठया प्रमाणात कायद्याचा दट्टया दिला गेला नसता तर सरकार हा कायदा करण्यास किती प्रवृत्त झाले असते हा देखील प्रश्न होता. ख-या अर्थाने आपली एक व्यवस्था म्हणून किती जागृती आहे ? पर्यावरण विषयक प्रश्नासंबंधी, प्रदूषण करणा-या वाहनांसंबंधीच्या चर्चेच्या वेळी मी काही मुद्दे उपस्थित केले होते. वाहनापासून होणा-या प्रदूषणाचा प्रश्न मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. केवळ मुंबईतच नाही तर महाराष्ट्रामध्ये जेथे जेथे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे अशा नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील प्रवासी हे मोठ्या प्रमाणावर तीन चाकी रिक्षावर अवलंबून आहेत. या रिक्षामुळे किती प्रदूषण होते, रिक्षामध्ये कशा प्रकारचे इंधन वापरले जाते, रिक्षामध्ये अपघातप्रवणता किती आहे, शाळेत जाणा-या मुलांना रिक्षातून नेताना झालेले अपघात, रस्त्यावरुन जाणा-या नागरिकाची सुरक्षितता या सगळया गोष्टींचा विचार केला तर आपण काळजीपूर्वक पावले उचलेली आहेत असे म्हणता येणार नाही. म्हणून या कायद्याच्या माध्यमातून कार्यकक्षा मजबूत कशी करता येईल हे पाहिले पाहिजे.

प्रदूषणाचा विचार करीत असताना वाहन विषयक जागृती फार महत्वाची आहे. पुणे शहरामध्ये चामल परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट अनेक वर्षापासून काम करीत आहे. त्यांच्या स्वत:च्या मुलीचा मृत्यू रस्त्यावरच्या अपघातात झाल्या पासून सातत्याने ते पर्यावरणातील प्रदूषण, अपघातविरहीत वाहतूक यासाठी काम करीत आहेत.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. भोगले...

डॉ.नीलम गोऱ्हे.........

या विधेयकामध्ये जी जादा कलमे दाखल केलेली आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला सक्षम बनविणे आणि तपासणी केंद्रे जी ठिकठिकाणी आहेत ती देखील जागरुक करणे हा उद्देश आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे दारु पिऊन वाहन चालविणे हा खरा मुद्दा आहे. दुर्दैवाने पुरुष वर्गाबरोबर महिला सुध्दा या चुकीच्या गोष्टीकडे पावले टाकीत आहेत. मुंबई शहरामध्ये दारुच्या अंमलाखाली काही लोकांचे मृत्यू झाले. 12 ते 13 व्यक्तींना चिरडले गेले. अशा घटना वारंवार घडत आहेत. मुंबई किंवा पुणे शहरात मोहीम राबविली जाते, त्यावेळी दंड वसूल होतो. परंतु लोकांमध्ये जागरुकता वाढावी असा हेतू असला पाहिजे. दारुच्या प्रभावाखाली जाऊ नये. पर्यावरणाचे प्रदूषण करु नये असे म्हटले आहे. छोटा मुद्दा असला तरी महत्वाचा आहे. रस्त्यावर ट्रक चालविणारे लोक, खाजगी वाहनामधील लोक चौकामध्ये वाहन थांबल्यानंतर दिसेल त्याठिकाणी त्यांच्या तोंडातील पानाच्या रसाची पिचकारी मारतात. दुचाकीवर जाणारी महिला असेल, पुरुष असतील ते याला बळी पडतात. ट्रकमधून थुंकताना देखील ज्यांच्या वाहनांची ऊंची कमी आहे ते जणूकाही वेगळया जगातील लोक आहेत असे समजण्यात येते. रस्त्यावर थुंकायचे नाही का?असा उलट सवाल केला जातो. ओव्हरटेक करताना, दुसरीकडे वळण घेताना कट मारला जातो अशा वेळी प्रचंड असंतोष निर्माण होतो. अशा घटनांमुळे गोळीबार केला गेला. मारहाणीच्या घटना घडल्या आहेत. काही राजकारणातील प्रभावी व्यक्तींनी रस्त्यावर वादविवाद केल्याचे निदर्शनास आले आहे. पर्यावरणाच्या प्रदूषणाचे अनेक प्रकार आहेत. नागपूरसारख्या शहरामध्ये अधिवेशनानिमित्त आल्यानंतर असे लक्षात येते की, दरवर्षी नागपूरच्या हवेमध्ये अधिकाधिक प्रदूषण होत आहे की काय? महाराष्ट्रात प्रदूषण वाढत आहे. प्रदूषणाच्या प्रमाणात पुणे शहराचा पहिला किंवा दुसरा क्रमांक लागतो. अनेक चौकाच्या ठिकाणी वेगाने वाहने निघून जातात. त्याठिकाणी प्रदूषणाची पातळी वाढते. यामध्ये कसा बदल करायचा याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे असे मला वाटते. कोणतेही विधेयक किंवा कायदा करतो त्यावेळी त्याची अंमलबजावणी कशी करायची हे महत्वाचे असते. अंमलबजावणी करीत असताना जो अधिकारी वर्ग आहे त्यांनी प्रथम कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. वाहतूक आणि वाहतूकदार वाहनांवर प्रदूषण कर बसविणे इष्ट आहे. परंतु अंमलबजावणी नीट होत नसल्यामुळे त्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. उदात्तीकरण मोठया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

प्रमाणात चाललेले दिसते. तपासणी मोहीम राबवित असताना लोकांना जबाबदारीची जाणीव कशी करुन देता येईल हे महत्वाचे आहे. ज्यामध्ये अल्कोहोल कमी आहे असे म्हटले जाते अशा वाईन मोठया प्रमाणात सर्वत्र उपलब्ध होतात. रात्री 12 किंवा 1 नंतर अल्कोहोल फ्री म्हटले जाते. रात्रीच मोठया प्रमाणात अल्कोहोल पेय उपलब्ध होत असल्याचे चित्र दिसते. कायदा चिरडला तरी चालतो हा संदेश समाजासमोर जात आहे. काही दिवसापूर्वी वाहतूक पोलिसाला चिरडून वाहन चालविणारे पुढे निघून गेले. मुंबई शहरामध्ये अशा घटना घडलेल्या आहेत. मी काही दूषित भावनेने बोलत नाही. परंतु दिल्ली किंवा आग्रा येथील वा उत्तरेकडील वाहतूक व्यवस्था बघा...

नंतर 2एन.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ........

आणि मुंबईतील किंवा राज्यातील वाहतूक तरी त्या तुलनेत बरी दिसते. परप्रांतातील लोक ज्या पध्दतीने गाड्या चालवितात त्यांना वाटते की, हीच चांगली पध्दत आहे. काही वेळा तर हे ड्रायव्हर गाडी चालवित असताना हात बाहेर काढून लोकांच्या डोक्यात टपली मारण्याचे काम सुध्दा करतात, याचाही विचार झाला पाहिजे. काही ड्रायव्हरांचे मत तर असे असते की, महिला गाडी चालवित असेल तर त्यांना गाडीच चालविता येत नाही परंतु माझ्या मते स्त्रीया सुध्दा चांगल्या प्रकारे गाडी चालवू शकतात आणि त्यांच्यावरच महिला अधिकारी या नात्याने वाहतुकीचे नियमन करण्याची जबाबदारी परिवहन विभागाने द्यावी, अशी विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

--------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, विधानसभा विधेयक क्र. 77 संबंधी मी बोलणार आहे. या विधेयकाची उद्देश व कारणे अतिशय चांगली दिलेली आहेत आणि या चांगल्या उद्देशांचे मी स्वागत करतो. परंतु 19 वे जे कलम यात आहे त्याचा विचार करतो तेव्हा दंडाची व कराची आकारणी जी केली आहे ती मोठ्या प्रमाणात केली आहे असे मला वाटते. त्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात सेटलमेंट होऊन शासनाकडे महसूल जाणार नाही अशी भीती वाटते. कारण आरटीओ कडे काय चालते हे आपणा सर्वांनाच विदित आहे. खऱ्या अर्थाने अशी मोठी रक्कम कररुपाने घेत असताना शासनाला त्यातून किती महसूल मिळेल याचाही विचार करणे आवश्यक आहे, पण तो या विधेयकात केलेला दिसत नाही. कारण परिवहन विभागाने आरटीओ यांना जे अधिकार दिलेले आहेत त्यांचा दुरुपयोगच होताना दिसतो. सांगायचे झाले तर राज्याच्या टोकाला असलेले देवरी हे तालुक्याचे ठिकाण असून तेथे एक चेक पोस्ट आहे. त्या चेक पोस्टाला महिन्याला 96 लाखाचे टार्गेट दिलेले आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ही 96 लाखाची रक्कम आरटीओ अधिकारी केवळ 9 दिवसातच पूर्ण करतात आणि उरलेले 21 दिवस जो महसूल मिळतो तो भ्रष्टाचारात जातो म्हणून याची दखल घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर या चेक पोस्टमधून जवळपास महिन्याला 3 कोटीचे उत्पन्न आणि वार्षिक 36 कोटी रुपये शासनाला मिळू शकतात. शासनाने जर या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी केली तर दिसून येईल की, त्यांना मिळणारा पगार आणि त्यांनी जमविलेली संपत्ती किती आहे. मी एक लोकप्रतिनिधी असून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सकाळी देखील यासंदर्भातील विषय उपस्थित केला होता. परिवहन विभागात अशा प्रकारे गोंधळ आमच्या जिल्ह्यात सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल व श्री. खुशाल बोपचे यांचे पत्र घेऊन एका टॅक्सी संघटनेचा पदाधिकारी माझ्याकडे आला होता. त्यांनी मला सांगितले की, तीन आमदारांची पत्रे दिली तर आरटीओ आम्हाला दिलेल्या शिक्षेत रिलॅक्सेशन करतील, असे ते म्हणाले. मी आरटीओना फोन करुन विचारणा केली की आपण तीन आमदारांच्या पत्राची मागणी केली आहे काय ? तेव्हा ते मला म्हणाले की, आपण त्यांनापत्र द्यावे जेणेकरुन मला त्यांना न्याय देता येईल. कारण कुठल्याही टॅक्सी चालकाला आपल्या डोक्यावरील कर्जाची परतफेड करण्यासाठी दररोज उत्पन्नाचे साधन आवश्यक असते तसेच यापोटी दंडाची रक्कम फार मोठी आहे म्हणून हे लोक माझ्याकडे

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ........

आले होते. त्यांच्या वाहनाला दर महिन्याला दहा दिवसांचे सस्पेंशन अशी शिक्षा केली होती. परंतु त्या आरटीओने तिन्ही आमदारांची पत्रे घेतली व त्या टॅक्सी चालकांना न्याय दिला नाही. खरे तर त्या अधिकाऱ्याविरुध्द विशेष हक्कभंग आणला पाहिजे, एवढा गंभीर गुन्हा त्याने केला आहे. जर नैसर्गिक न्याय म्हणून एखाद्या वाहन चालकाना मदत करण्याचे ठरविले तर त्यात काय वावगे आहे. तसेच दुराडी या ठिकाणी एका टॅक्सीमुळे अपघात होऊन दोन लोकांचा मृत्यू झाला. परंतु या विभागातील आरटीओचे अधिकारी एखादा अपघात झाल्यानंतर त्या टॅक्सीचा परवाना सस्पेंड करण्याचीच कारवाई करतात अशा प्रकारे सुडाची भावना ठेवून काम करीत असतील तर ते योग्य नाही. तसेच या भागातील सर्व टॅक्सी चालकांना नोटिसेस सुध्दा पाठविल्या व सर्वांच्या टॅक्सीज पोलीस स्टेशनमध्ये जमा केल्या आहेत.

यानंतरश्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ....

ही अत्यंत खेदाची बाब आहे. या टॅक्सीचालककांकडून दंडही आकारण्यात आलेला आहे. या टॅक्सीचालकाचे वाहन 10-10 दिवसांसाठी तसेच एक-एक वर्षापर्यंत सस्पेंड केलेले आहे. या ठिकाणी टॅक्सी चालकांना वेगवेगळी शिक्षा दिलेली आहे. त्यामुळे शिक्षा देतांना एकच नियम असण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी जे काही होत आहे ते सूड भावनेने होत आहे. त्यामुळे टॅक्सी संघटनेमध्ये व टॅक्सी चालकांमध्ये यासंदर्भात संभ्रमता निर्माण झालेली आहे. या ठिकाणी वाहतूकीची कोंडी झालेली आहे. सरकारला टॅक्सी पासूनही उत्पन्न मिळत असते. त्यामुळे या ठिकाणच्या टॅक्सी चालकांना न्याय देण्यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे. टॅक्सी चालक हा गरीब माणूस आहे. बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी आपण त्यांना टॅक्सीचे परवाने दिलेले आहेत. असे असतांना आपण या परवाने धारकांवर मोठया प्रमाणात अन्याय केलेला आहे हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. या विधेयकाचे मी स्वागत केलेले आहे.

वाहन चालवितांना वाहन दारु पिऊन चालवू नये, निष्काळजीपणाने वाहन चालवू नये अशी तरतूद वाहन कायद्यात आहे. सभापती महोदय, मला आपल्याला सांगावयाचे आहे की, रोडवर वाहन खराब झाले किंवा अपघात झाला की, वाहन रस्त्यात उभे केले जाते व त्याच्या बाजूने मोठे दगड लावले जातात. परंतु हे वाहन जेव्हा दुरुस्त होते तेव्हा त्या ठिकाणी जे दगड लावलेले असतात ते मात्र कधीही उचलून बाजूला टाकले जात नाही. या सोमवारी मी अधिवेशनाला येत असतांना असीच एक ट्रक रस्त्यात उभी होते परंतु त्याचे लाईट सुरु नसल्यामुळे माझ्या ड्रायव्हरला ते वाहन दिसले नाही व अपघात झाला. यामध्ये माझ्या गाडीचे 10-12 हजार रुपयांचे नुकसान झ ालेले आहे. ट्रक चालक निष्काळजीपणे वाहन चालवित असतात त्यामुळे यासाठी कायदा करण्याची गरज आहे. फिरते पथक निर्माण करुन रस्त्यावरील मेलेले प्राणी, दगड, अपघात झालेल्या गाडया हटविण्याचे काम परिवहन विभागाने केले पाहिजे. त्यामुळे या विधेयकाच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, अशी व्यवस्था फोर लाईनवर होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी हे जे बिल आणलेले आहे ते उत्पन्न वाढविण्यासाठी आणलेले आहे. या बिलामुळे शासनाचे राजस्व वाढणार आहे. राजस्व वाढविण्यासाठी ज्या मोठया रकमा आहेत त्याच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ....

वसूलीसाठी धोरण आखण्याची आवश्यकता आहे नाही तर "अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही" असेच होईल. यामधून अर्धे पैसे आरटीओच्या खिशात जातील व अर्धेही पैसे शासनाला मिळणार नाही. त्यामुळे या विधेयकामध्ये कडक निर्बंध घालण्यात यावे अशी सूचना करतो व बिलाला समर्थन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद,जय महाराष्ट्र...

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 77-मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2010

हे बिल वाचल्यानंतर त्यामध्ये अनेक कलमांना सुधारणा सुचवलेली आहे असे दिसून येईल. कलम 177, 179, 180, 181, 182 आणि अशा अनेक कलमांमध्ये सुघारणा सुचविलेली आहे. या सदनामध्ये टॅक्सी, रिक्शा आणि वाहनांची स्थ्याची स्थिती व पर्यावरणाच्या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. 182 (अ) हे जे कलम आहे त्यामध्ये वाहनांची बांधणी आणि देखभाल (अपराध्यांसाठी ) शिक्षा. एखादे वाहन शोरुममधून रस्त्यावर येते त्यावेळेस त्याचे नियमित पासींग व चेकींग होत असते. ट्रकचे सुध्दा पासिंग होत असते. वाहन सुस्थितीत आहे की, नाही हे पाहण्याची जबाबदारी आरटीओची नाही काय ? खरे म्हणजे वाहन सुस्थित नसेल तर ते वाहन रस्त्यावर येता कामा नये. आपण वाहन कायदा हा वाहन मालकांसाठी केलेला आहे. वाहन मालक वाहन आणतो परंतु वाहनाची तपासणी करणारा जो अधिकारी असतो तो वाहनाचे चेकींग न करता पैसे घेऊन वाहन पास करतो. त्यामुळे यासंदर्भात आपण काय करणार आहात ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

आपण आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात हे देखील माननीय मंत्रीमहोदयांनी येथे स्पष्ट करावे. लोकांना माहीत आहे की, अमुक एका वाहनासाठी इतके इतके पैसे दिले तर ते वाहन मंजूर करण्यात येते. आपण टॅक्सीत बसल्यावर टॅक्सीच्या चारही बाजूंनी आपणास आवाज येत असतो. असे असताना ती टॅक्सी रस्त्यावर धावते, याचा अर्थ ती कोणत्या तरी आर.टी.ओ.ऑफीसमधून पास झालेली असते. तसेच ट्रकच्या मागील बाजूचे दिवे बंद असतात. पोलीस हवालदाराने एखादा ट्रक चौकशीसाठी थांबविल्यास वाहनचालकाचा परवाना पाहिला जातो. परंतु ट्रक मागील दिवे सुस्थितीत आहे किंवा कसे हे पाहिले जात नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी विशेष करुन हाय-वे वर अपघात होण्याची शक्यता फार असते. परंतु कोणत्याही वाहनांची काटेकोरपणे तपासणी न करता ती वाहने रस्त्यावर धावण्यासाठी मंजूर केली जातात. यामध्ये आर.टी.ओ.अधिकाऱ्यांचे एक मोठे रॅकेट आहे असा माझा आरोप आहे.

सभापती महोदय, या विधेयकात "धोकादायक रितीने वाहन चालविणे"असा उल्लेख केलेला आहे. वरळी सी-लिंकवर अपघात झाल्यानंतर मी नियम 93 अन्वये तो विषय मांडून सी-लिंकवर दोन-तीन स्पीड गन ठेवण्याची सूचना केली होती. मी रोजच सी-लिंक वरुन प्रवास करतो. परंतु मला त्याठिकाणी एकही अधिकारी हातात स्पीड गन घेतलेला दिसून आला नाही. फक्त कधी तरी आर.टी.ओ.चे अधिकारी उपस्थित दिसतात. त्याचप्रमाणे जे.जे.उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात अपघात होऊ लागल्यामुळे आणि जे.जे.रुग्णालयातील दोन डॉक्टर्सचा तेथे मृत्यू झाल्यानंतर जे.जे.उड्डाण पुलावर मोटार सायकल स्वारांना बंदी घालण्यात आली.

सभापती महोदय, कोणत्या रस्त्यावर किती वेगाने वाहने चालवावीत याबाबत काही नियम आहेत काय याची माहिती मंत्रीमहोदयांनी द्यावी. आपल्याकडे वाहनांचा स्पीड मोजण्यासाठी किती स्पीड गन मशीन्स आहेत ? त्याचा वापर करण्यात येतो काय ? कारण एखाद्या रस्त्यावर आर.टी.ओ.चे अधिकारी उभे राहतात आणि त्यांना वाटले की, या गाडीचा स्पीड जास्त आहे, तर त्या गाडीचा स्पीड जास्त आहे असे समजावे. अशावेळी आमच्या सारख्या आमदारांनी "आपण बाहेर उभे राहून स्पीड कसा मोजता" असे अधिकाऱ्यांना विचारले तर अशावेळी ते काय उत्तर देणार आहेत ? तेव्हा बेसिक गोष्टींचा विचार झाला पाहिजे.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, या विधेयकात "धोकादायक वाहने चालविणे" असा उल्लेख करण्यात आला आहे. मला याचा अर्थ नीट समजला नाही. धोकादायक वाहने चालविणे म्हणजे फुटपाथवरुन वाहन चालविणे की रस्त्याच्या मधोमध जो दुभाजक असतो त्यावरुन वाहन चालविणे. मी कायद्याची खिल्ली उडवित नाही. कायदा लोकांसमोर आणताना त्याचा सर्वंकष अभ्यास झाला पाहिजे.

सभापती महोदय, झेब्रा क्रॉसिंगच्या ठराविक अंतरापर्यंत वाहन उभे केले पाहिजे असा नियम आहे. आपल्याकडे काही ठिकाणी डिजीटल सिग्नल्स आहेत तर काही ठिकाणी नाहीत. ज्याठिकाणी डिजीटल सिग्नल्स नाहीत त्याठिकाणी सिग्नल सुरु असताना वाहने वेगात धावत असतात आणि अचानक पिवळा सिग्नल लागल्यानंतर वाहनचालक जोरात ब्रेक दाबून वाहन थांबवितो. परंतु दरम्यान वाहनाने झेब्रा क्रॉसिंगची ठराविक लाईन ओलांडलेली असते. मग तो वाहन मागे घेतो. तेव्हा सर्वच ठिकाणी डिजीटल सिग्नलची व्यवस्था केल्यास किती वेळ सिग्नल सुरु आहे याची माहिती मिळते आणि त्याप्रमाणे गाडीचा वेग कमी करता येतो.

सभापती महोदय, दारु पिऊन वाहन चालविणे. मरीन ड्राईव्ह येथे अपघात झाल्यानंतर ही बाब पुढे आली आहे. आपल्याकडे वाहनचालकाने मद्याचे सेवन केले आहे किंवा कसे हे समजण्यासाठी पुरेशी यंत्रे आहेत काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 14.55

डॉ.दीपक सावंत...

ही यंत्रे पुरेशी आहेत काय ? जर ती यंत्रे पुरेशी नसतील तर त्याचा पुरवठा आपण किती दिवसात करणार आहात? मद्य सेवन करुन गाडी चालविणा-यांचे मी समर्थन करीत नाही. परंतु हेरॉईन सारखे अंमली पदार्थाचे सेवन करुन वाहने चालविणा-याची तपासणी करण्यासाठी त्यांना लॅबरोटरीमध्ये घेऊन जावे लागते. त्याचा रिपोर्ट पंधरा दिवसानंतर येतो. दरम्यानच्या काळात त्याला पोलीस कस्टडी दिली जाते परंतु तो बेलवर सुटतो.म्हणजे असे प्रकार घडू नयेत आणि संबंधितावर जरब बसेल या दृष्टीने कडक नियम करणे आवश्यक आहेत. मध्यंतरी अंमली पदार्थाचे सेवन करुन एका मुलीने तीन जणांना डॅश केले होते आणि तीन महिन्यानंतर तिची सुटका झाली होती. अशा प्रकरणामध्ये पुरावे व्यवस्थित गोळा केले जात नाहीत त्यामुळेच त्या व्यक्तीची सुटका होऊ शकते.जर व्यवस्थित पुरावा असेल आणि व्यवस्थित इक्वीपमेन्टस असतील तर त्याला कोर्टात चॅलेंज होणार नाही. तेव्हा अपराध्यांना शासन करण्यासाठी याबाबतीत पुरेशी दक्षता घेतली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, वाहन चालविण्यास मानसिक दृष्टया किंवा शारीरिक दृष्टया लायक नसतांना वाहन चालविणे असे एक वाक्य या विधेयकात आहे त्या वाक्यालाच माझी हरकत आहे.मानसिक दृष्टया तो लायक नाही हे आपण कशावरुन ठरविणार आहात ? त्याचबरोबर एखादी व्यक्त अपंग आहे हे आपण कशावरुन ठरविणार आहात ? अपंगासाठी खास वाहने तयार केली जातात व त्यांच्यासाठी गिअर सिस्टीम वेगळी असते ,त्या वाहनांचे ब्रेकसुध्दा हातामध्ये असतात.अशा प्रकारच्या वाहनांचे उत्पादन आपण बंद करणार आहात काय असा प्रश्न निर्माण होतो. आपण यासंबंधीचा कायदा करीत आहोत मग अंपग व्यक्तींनी वाहने चालवायाची नाहीत काय आपण अपंगाच्या शर्यती कशासाठी लावत आहोत ? त्यांचे मनोबल वाढविण्यासाठीच आपण शर्यती लावत असतो अशा वेळी या ठिकाणी जे वाक्य घालण्यात आले आहे त्यामुळे आपण त्यांना अपंगत्वाची जाणीव करुन देणार आहात काय असे मला शासनाला विचारावयाचे आहे. अपंगासाठीची वाहने ज्या कंपन्यांकडून आपण तयार करुन घेत आहोत त्यावर बंदी घालण्यात येणार आहे काय, यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे. जर या वाहनांवर बंदी घालण्यात येणार नसेल तर मग हा नियम कशासाठी करण्यात आला आहे ? कलम 186 मध्ये असेही म्हटलेले आहे की, " आपण वाहन चालविल्यामुळे लोकांना धोका निर्माण होण्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

शक्यता आहे अशा कोणत्याही रोगाने किंवा व्याधीने आपण ग्रस्त असल्याचे माहीत असतांना जो कोणी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाहन चालवील त्याला पहिल्या अपराधाबद्दल 200 रुपये दंडाची शिक्षा असू शकेल ".त्याचबरोबर "शारीरिक दृष्टया लायक नसतांना "असे शब्द या ठिकाणी घालण्यात आलेले आहेत माझ्या दृष्टीने शारीरिक दृष्टया लायक नसणे म्हणजेच अपंगत्व असणे अशी त्याची व्याख्या होते तेव्हा या विधेयकामध्ये परंतुक जोडणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय,अपघाताच्या बाबतीत दहा दहा वर्षे कोर्टात केसेस सुरु असतात त्यामुळे अपघात प्रकरणांचा निवाडा लवकर लागण्यासाठी व संबंधित व्यक्तीला लवकर मोबदला मिळण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्यात आली पाहिजे.

सभापती महोदय,मुंबई आणि पुण्या सारख्या मोठया शहरामध्ये मोटार बाईकच्या शर्यती धनाढय मुलांकडून लावल्या जातात आणि बेटींग घेतले जातात. रात्री दहा वाजल्यानंतर जर आपाण मरिन लाईन्सवर गेलो तर त्या ठिकाणी या रेसेस सुरु असल्याचे आपल्याला पहावयास मिळेल.या रेसेसला प्रतिबंध कसा करण्यात येणार आहे. या बाबतीत केवळ कायदा करुन चालणार नाही तर या प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे..

सभापती महोदय, असुरक्षित असलेली वाहने चालविली जातात आणि नंबर प्लेट नसतांनाही वाहने चालविली जातात तसेच टेल लाईट नसतांनाही काही वाहने चालविली जातात परंतु त्याकडे अधिकारी लक्ष देत नाहीत.याबाबतीत मी मघाशी सांगितले होते. काही वाहना चालक विमा न उतरविता वाहन चालवत असतात. विम्याची मुदत त्या दिवशी रात्री 12.00 वाजेपर्यत असते एखादी गाडी अडविल्यानंतर फक्त वाहन चालकाचे लायसन्स तपासून पाहिले जाते परंतु त्या वाहनाचा विमा उतरविला आहे किंवा नाही हे पाहिले जात नाही.काही वाहन चालक मूळ पेपर गाडीमध्ये न ठेवता डुप्लीकेट पेपर्स ठेवत असतात. विम्याचे मूळ कागदपत्र न ठेवल्याबद्दल काही आरटीओ अधिकारी ऑब्जेक्शन घेत असतात. तेव्हा कोणते मूळ पेपर्स ठेवले पाहिजेत आणि कोणते डुप्लीकेट वा सर्टिफाईड पेपर्स ठेवले पाहिजेत याबाबतीत ..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

नियम असणे आवश्यक असल्यामुळे या विधेयकाचे मी स्वागत करतो. त्यादृष्टीने आवश्यक असलेल्या गोष्टी मंत्री महोदयांनी कराव्यात एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई मोटर वाहन अधिनियम 1988 महाराष्ट्र राज्यास लागू असतांना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले त्याचे मी निश्चितपणे स्वागत करीत आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयाची मांडणी केली आहे. अशाप्रकारची अनेक विधेयके या सभागृहामध्ये मांडण्यात येत असतात. परंतु ती संमत झाल्यानंतर त्यांच्या अंमलबजावणीचा प्रश्न उपस्थित होतो. काल मी माननीय मंत्री महोदयांकडे गेलो होतो. त्यांनी सन 2005 मध्ये एक अध्यादेश काढला होता की, "एमएमआरडीएच्या क्षेत्रामध्ये रिक्शा आणि टॅक्सींला मुक्त प्रवास" परंतु त्याची अंमलबजावणी आजच्या तारखेपर्यंत झालेली नाही. ही बाब माननीय राज्यमंत्र्यांनी मनावर घेतली असून त्यांनी सांगितले आहे की, याची अंमलबजावणी कठोरपणे करण्यात येईल. आपण अध्यादेश काढतो, जी.आर.काढतो परंतु त्याची अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे ती होत नाही. त्यामुळे अध्यादेश किंवा विधेयक संमत होऊन देखील त्याचा काहीही उपयोग होत नाही. म्हणून माझी प्रामुख्याने विनंती आहे की,त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. एमएमआरडीएच्या भागामध्ये टॅक्सी आणि रिक्शांचा मुक्त प्रवास झाल्यामुळे मुंबई व ठाण्याची हद्द म्हणजे हिंदुस्थान-पाकिस्तानची हद्द असल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. परंतु त्यांची अंमलबजावणी पाच वर्षे आपण करु शकलो नाही. त्याची अंमलबजावणी कठोरपणे झाली पाहिजे. आणि हे विधेयक आणण्यापूर्वी त्याची अंमलबजावणी कशापध्दतीने करता येईल याचा विचार झाला पाहिजे. मी या संदर्भात निश्चितपणे सांगू इच्छितो की, यामध्ये जे निरनिराळे विषय दिले आहे ते स्वागतार्ह आहेत. परंतु त्यामध्ये जी कलमे दिलेली आहेत त्यावरुन हा कायदा करीत असतांना त्यामध्ये पळवाट ठेवली आहे की काय? त्यामध्ये एखाद्या गुन्हयासाठी कोणते कलम लावायचे हा प्रश्न असतो? त्यामध्ये निश्चितपणे तो गुन्हेगार त्या लावण्यात आलेल्या कलमाचा गैरफायदा घेऊ शकतो म्हणून त्यामध्ये ठराविक पध्दतीच्या दंडाचे कलम लावले असते तर त्याचा निश्चितपणे उपयोग झाला असता. आणि म्हणून याबाबत मी तीनच विषय सांगणार आहे.

आजकाल शहरामधील रिक्शा व टॅक्सी चालकांच्या बेमुर्वतखोर पणाच्या वागणुकीमुळे शहरातील लोक अतिशय अस्वस्थ झालेले आहेत. त्यामध्ये अपवाद म्हणून काही रिक्शा व टॅक्सीचालक चांगल्या स्वभावाचे असतात. ते प्रवाश्यांना योग्य पध्दतीची सेवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

पुरवितात. परंतु काही चालक नियमांचे उल्लंघन करतात, गणवेशामध्ये नसतात म्हणून मोठया प्रमाणात लोकांचा संताप व्यक्त होत असतो. त्यामध्ये हे चालक प्रवाशांची सुविधा पहाण्यापेक्षा स्वत:ची सुविधा पहात असतात. त्यामधून अनेक प्रकारे प्रवाशांचा छळ होत असतो.. अशाप्रकारच्या निरनिराळया तक्रारी येतात. तेव्हा या विधेयकाच्या निरनिराळया कलमांमध्ये त्यांना पेनल्टी बसून त्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे. हे मी याठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदय, हे जे महामार्ग आहेत त्यावरुन प्रवास करीत असतांना असे लक्षात येते की, वहातूक थांबविण्यात आली आहे. कुठेतरी अपघात झाला असेल, काहीतरी गडबड झाली असेल, झाड पडले की काय असे वाटते.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

विशेषकरुन रात्रीच्या वेळेला ज्या लांबच्या लांब रांगा लागलेल्या असतात त्या ठिकाणी त्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अनेक वेळा मोठे ट्राफिक थांबवले जाते आणि अशा पध्दतीने ड्रायव्हर त्यांना पैसे देत असतात आणि लाखो रुपये जमा करण्याचे काम त्या ठिकाणी चालले असते. त्या ठिकाणी दोन दोन तास वाहतुकीचा खोळंबा होत असतो. त्यावर देखील योग्य उपाययोजना केली पाहिजे. ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी अधिकारी नसतो आणि ज्या ठिकाणी गरज नाही त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक अडलेली असते आणि किती पैसे कोणाला, कोणत्या नाक्यावर द्यावयाचे असतात याची ड्रायव्हरला सवय झालेली असते. लाखो रुपयांचा मलिदा त्या ठिकाणी जमा होत असतो. त्याचा परिणाम वाहतुकीवर आणि सामान्य प्रवाशांवर होतो. याबाबतीत अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार, याबाबतीत काय निरीक्षण करणार ? याची अंमलबजावणी करीत असताना कायद्यामध्ये पकडावयाचे आणि वेगळ्या पध्दतीने त्याचा उपयोग करुन घ्यावयाचा याकडे वेगळे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शहरी भागामध्ये हेल्मेटचा वापर करण्याचे बंधन आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्रभर अनेक शहरांमध्ये हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. काही शहरांमध्ये सक्ती आहे तर काही शहरांमध्ये हेल्मेट वापरले नाही तरी चालते. अनेक शहरामध्ये टार्गेट दिले जाते. म्हणजे याची अंमलबजावणी करतात. जे अधिकारी आणि निरीक्षक असतात ते स्पष्टपणे सांगतात की, आम्हाला टार्गेट दिलेले आहे. त्यामुळे शेकडो दुचाकी वाहने थांबविली जातात. सामान्य माणसांना त्या ठिकाणी थांबविले जाते. पुण्यामध्ये यासंदर्भात नेहमी आंदोलन होत असते. त्या ठिकाणी कठोरपणे याच्या पावत्या फाडल्या जातात. त्यामुळे अंमलबजावणी करीत असताना याचे तारतम्य देखील पाळले जावे हे देखील मी या निमित्ताने निश्चितपणे मांडतो. या विधेयकाचे स्वागत करीत असताना मी पुन्हा एकदा आवर्जून सांगेन की, याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने झाली पाहिजे आणि जे आर.टी.ओ. चे अधिकारी असतील, ट्राफीकचे अधिकारी असतील त्यांच्यावर सुध्दा अंमलबजावणीचे बंधन असले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना मी या ठिकाणी फक्त दोन सूचना करणार आहे. काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचावयास मिळाली आणि त्यामुळे लोकांसमोर सरकारचा चेहरा मलीन झाला. ती बातमी अशी होती की, ठाणे आणि नवी मुबईमध्ये ट्राफीक ऑफीसर म्हणून जर जावयाचे असेल तर दीड कोटी पासून ते 10 कोटी रुपयांपर्यंतची ऑफर दिली जाते. याबाबतीत खात्याकडून कोणताही खुलासा झालेला नाही. मलई कमविण्याचे हे एक क्षेत्र आहे की काय अशी जी छबी निर्माण झालेली आहे ती स्वच्छ करण्याचा प्रयत्न या खात्याने फार गांभीर्याने करण्याची गरज आहे. कारण सर्वसामान्य माणसाला हे आवडत नाही. माझी दुसरी एक महत्वाची सूचना आहे. आपली पुरुषप्रधान संस्कृती आहे. अपघात झाल्यानंतर घरातील कर्ता पुरुष वारला की, त्याची बायको आणि घरातील मुले रस्त्यावर येतात. या कायद्यान्वये न्यायालयामध्ये जी प्रकरणे जातात त्यामध्ये नो फॉल्ट लायबिलिटीखाली काही पैसे दिले जातात. त्यामध्ये कमीतकमी रक्कम तीन लाख रुपयांपर्यंत असावी अशा प्रकारची दुरुस्ती या कायद्यामध्ये करावी अशा प्रकारच्या दोन सूचना करुन मी माझे भाषण संपविते.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी मोटार वाहन अधिनियम, 1988 महाराष्ट्र राज्यास लागू असताना यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक अत्यंत चांगले आहे. मी माननीय मंत्री महोदयांचे आणि शासनाने मनापासून आभार व्यक्त करतो, धन्यवाद देतो. अत्यंत चांगल्या प्रकारचे बिल या सभागृहामध्ये आलेले आहे. माझी या निमित्ताने एकच सूचना आहे. सर्वसामान्य जनतेला दिलासा देणारे आणि जे कायद्याचे उल्लंघन करतात त्यांना दंड ठोठावणाऱ्या अशा प्रकारच्या या विधेयकातील तरतुदी आहेत. जो कायद्याचे उल्लंघन करतो, नियमाची पायमल्ली करतो त्याला काही शिक्षा देणारे, काही आर्थिक दंड आकारणारे आणि त्या दंडामध्ये वाढ करणारे हे विधेयक आहे. यापूर्वी जी दंडाची रक्कम होती त्यामध्ये काही सुधारणा करणारी आणि दंडामध्ये वाढ करणारी कलमे या विधेयकामध्ये आणलेली आहेत.

सभापती महोदय, नियमाचे उल्लंघन केल्यानंतर संबंधित वाहन चालकाला दंड आकारण्याचे या ठिकाणी शासनाने सूचित केले आहे. दंडाची रक्कम वाढविलेली आहे. संबंधित वाहन चालकाने काही नियमांचे उल्लंघन केले आणि त्याला पोलीस खात्याच्या अधिकाऱ्यांनी पकडले आणि म्हणून त्याला काही दंडाची शिक्षा झाली तरी हा दंड किंवा शिक्षा त्याला आर्थिक स्वरुपामध्ये होणार आहे. तो दंड भरुन मोकळा होईल. तो वाहन चालक जर सातत्याने अशा प्रकारचा गुन्हा करीत असेल, त्याला पैशाची किंमत नसते. तो 1000 रुपये, 1500 रुपये किंवा 2000 रुपये जी काही दंडाची रक्कम असेल ती भरेल आणि पुन्हा केव्हा तरी तो मद्य प्राशन करुन किंवा दारु पिऊन असा गुन्हा करील त्याही वेळेस तो पुन्हा एकदा नेहमीच्या पध्दतीने दंड भरील. त्याची सवय जाणार नाही. पुन्हा एकदा केव्हा तरी गुन्हा करील आणि पुन्हा दंड भरील. अशा पध्दतीने जे सराईत मद्य प्राशन करणारे किंवा दारु पिणारे आहेत त्यांची सवय कधीही जाणार नाही. तेव्हा असे गुन्हे त्यांच्याकडून घडणार आहेत. या निमित्ताने बाबतील शासनाला माझी विनंती आहे की, जसे आपण एखाद्या कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला त्याच्या त्रुटीबद्दल ताकीद दिली असेल किंवा अन्य काही गोष्टी केल्या असतील, त्याला काही किरकोळ शिक्षा झाली असेल तर त्याच्या सेवा पुस्तकामध्ये त्याची आपण नोंद करीत असतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

असे वाहन चालक सातत्याने गुन्हा करीत असतील तर त्याची नोंद परवान्यामध्ये करणार आहे काय, एकदा, दुस-यांदा, तिस-यांदा कायद्याचे उल्लंघन करीत असेल तर त्याचा परवाना जप्त केला जाईल काय किंवा त्याला पुन्हा परवाना द्यावयाचाच नाही अशाप्रकारची दुरुस्ती केली जाईल काय, किंबहूना, अशी दुरुस्ती केली जावी अशी मी अपेक्षा करतो, शासनाला आग्रहाची विनंती करतो. मला बोलण्याची अनुमती दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे आणि सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी या विधेयकावर बोलताना अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत आणि या विधेयकाचे स्वागतही केले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा-या वाहन चालकांना जबर शिक्षा करावी आणि अपघातांची संख्या कमी करावी असा उल्लेख करण्यात आला आहे. त्याबाबत शासन तरतूद करणार आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन झाले पाहिजे. त्यांना मी सांगू इच्छितो की, वाहतुकीच्या नियमांचा विषय गृह विभागाकडे आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन गृह विभागाला लक्ष घालण्यासंबंधी सूचना दिल्या जातील. या विधेयकात वाहनांच्या माध्यमातून प्रदूषण कमी कसे होईल यासाठी तरतूद केलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे म्हणून सांगतो की, प्रदूषण करणा-या वाहनांना कर लावण्यासंबंधीची दुरुस्ती पुढील वेळी केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी कठोर शिक्षेची तरतूद करावी असे सूचित केले. देवरी चेक पोस्ट येथे 10 दिवसात 96 लाख रुपये जमा होतात, उर्वरित 21 दिवसात जमा झालेला पैसा कोठे जातो असे त्यांनी विचारले. देवरी नाक्याचे कराचे वार्षिक लक्ष्य 7.50 कोटीचे आहे. आतापर्यंत 4 कोटी 93 लाख रुपये इतक्या कराची वसुली झालेली आहे. त्या नाक्याला जे लक्ष्य दिलेले आहे त्यापैकी 90 टक्क्यापेक्षा जास्त वसुली केली जात आहे. तरी सुध्दा यामध्ये विशेष लक्ष देण्याची सूचना केली असल्यामुळे त्या नाक्याकडे विशेष लक्ष दिले जाईल. गेल्या वर्षी वाहतुकीच्या नियमांचे भंग करणा-या 23 लाख 77 हजार वाहन चालकांना पकडून 219 कोटी दंड वसूल केला, बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्या 31,800 चालकांवर कारवाई करुन 27 कोटी 27 हजार 600 रुपयांचा दंड वसूल केलेला आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ट्राफिक सिग्नलचे योग्य नियमन झाले पाहिजे, दारु पिऊन वाहन चालविले जाते ते तपासण्यासाठी विभागाकडे पुरेशी यंत्रे आहेत काय असा चांगला प्रश्न विचारला आहे. याबाबत मी त्यांना सांगेन की, अद्याप आर.टी.ओ.कडे अशी व्यवस्था उपलब्ध नाही.

यानंतर श्री.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे... 15:15

श्री. गुलाबराव देवकर...

परवा मी आयुक्तांबरोबर चर्चा केली आणि अशा प्रकारची वाहने आपल्या विभागाकडे असण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. त्या संदर्भातील प्रस्ताव आम्ही लवकरात लवकर तयार करीत आहोत. धोकादायक पध्दतीने गाडी चालविणे म्हणजे काय ? वाहनचालकाने वेगमर्यादेचे पालन न करणे, अन्य व्यक्तींना किंवा वाहनांना धोका निर्माण करणे, डाव्याबाजू ऐवजी वेगळया बाजूने वाहन चालविणे, वाहन भरधाव वेगाने चालविणे, समोरुन येणा-या ट्राफिकचा विचार न करणे, अशा अनेक प्रकारच्या बाबी धोकादायक पध्दतीने वाहन चालविण्यामध्ये अंतर्भूत आहेत. अशा प्रकारच्या गुन्ह्यासाठी कडक धोरण स्वीकारण्याचा विचार आम्ही करीत आहोत. अपंगासाठी तयार केलेल्या हॅण्डीकॅप व्हेईकलवर बंधन आणले जाईल का, असा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आला. ही बाब केन्द्र शासनाच्या विचाराधीन आहे. आपण या संदर्भात सध्या सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहोत. त्यामुळे आपल्या राज्यामध्ये सध्या तरी ही वाहने चालू आहेत. याबाबतीत देखील आपल्याला धोरण ठरवावे लागेल.

सन्माननीय सदस्यांनी धोकादायक पध्दतीने वाहन चालविण्याचा मुद्दा मांडत असताना जे जे हॉस्पिटल येथील पूलाचा आणि सिलिंक पूलाचा उल्लेख केला. या दोन्ही पुलाच्या ठिकाणी आर.टी.ओ.चे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे अपघात होतात असे त्यांनी सांगितले. वाहतुकीचे नियम करण्याचे काम पोलीस विभागाकडे असले तरी कारवाई करण्याच्या संदर्भात आपण वारंवार रिपोर्टींग करत असतो, सूचना देत असतो. या दोन्ही स्पॉटच्या बाबतीत विशेष लक्ष घालावे लागेल. त्या ठिकाणी अपघात कसे कमी होतील किंवा होणारच नाहीत याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. दारु पिऊन वाहन चालविणा-या चालकाची तपासणी करण्यासाठी पोलिसांना अल्कोटेस्ट यंत्र दिलेले आहे. या अल्कोटेस्ट यंत्रांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. एखादा वाहनचालक दारु प्यायला आहे किंवा नाही आणि असेल तर ती किती प्रमाणात प्यायला आहे हे अल्कोटेस्ट यंत्राच्या माध्यमातून तपासता येते. ही यंत्रणा आर.टी.ओ.मध्ये देखील करण्याचा शासन विचार करीत आहे. वाहनांची आर.टी.ओ.कडून तपासणी होते. तपासणी करुन "पास" केलेली वाहने सुस्थितीत आहेत की नाहीत याची पडताळणी आर.टी.ओ. विभागाने केली पाहिजे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, ज्या खराब झालेल्या टॅक्सी आहेत त्यांच्यावर कडक

..2..

श्री. गुलाबराव देवकर....

कारवाई करण्याचे आपले धोरण आहे. वाहनाची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी वाहन मालकाची असते.

डॉ. दीपक सावंत : "पासिंग" झाल्याशिवाय वाहन रस्त्यावर येत नाही. काही वर्षानंतर वाहनाचे "पासिंग" करावेच लागते. जर आर.टी.ओ.च्या अधिका-यांनी वाहन स्क्रॅप करण्यास सांगितले तर ते स्क्रॅप होऊ शकेल.

श्री. गुलाबराव देवकर : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. वाहन सुस्थितीत आणि चांगल्या परिस्थितीमध्ये असेल तर त्या वाहनाचे आपण "पासिंग" करतो. देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी वाहन मालकाची असते. वाहन मालकाने त्याचे वाहन सुस्थितीत ठेवले नाही तर तपासणी मोहिमेमध्ये त्याबाबतीत कारवाई केली जाते. आतापर्यन्त आपण 700 ते 800 वाहने जप्त केलेली आहेत. तसेच 465 टॅक्सी स्क्रॅप केलेल्या आहेत. या कामामध्ये वेग घेण्याची आवश्यकता असून तशा पध्दतीचे काम निश्चितपणे केले जाईल. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी आर.टी.ओ.ने केलेल्या चुकांचा तसेच टॅक्सी ड्रायव्हरला मदत म्हणून देण्यात आलेल्या पत्राचा उल्लेख केला. पोलीस स्टेशनला टॅक्सी जमा केल्यानंतर सर्वांना सारखाच दंड केला पाहिजे, सूड भावनाने कुणावर कारवाई होता कामा नये असेही त्यांनी सांगितले.

श्री. दिवाकर रावते : वाहन स्क्रॅप करण्याचा विषय फार गंभीर आहे. वाहन स्क्रॅप करण्याची जबाबदारी परिवहन विभागाची नसून ती वाहन मालकाची आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 15:20

श्री.दिवाकर रावते..........

ते वाहन घेऊन जातात. परंतु ते वाहन रस्त्यावर चालविले जाते. प्रश्न असा आहे की, एवढ्या लाखो वाहनांमध्ये हे वाहन शोधायचे कसे? परिवहन विभागाची अधिकृत मोहीम ध्यावी. बांधकाम विभागाची असतात, महानगरपालिकेची असतात. इलेक्ट्रॉनिक्स होर्डिंग्ज लावली आहेत त्यावर अमुक क्रमांकाचे वाहन रद्दबातल झालेले आहे, कोणाला आढळल्यास ताबडतोब अमुक क्रमांकावर संपर्क साधावा असे डिस्प्ले करता येईल. म्हणजे जे स्क्रॅप केलेले वाहन पुन्हा वापरणारे आहेत त्यांच्यावर नियंत्रण येईल. ज्याप्रमाणे हा कायदा आणला त्याच धर्तीवर नवीन कायदा आणावा लागेल. त्यांच्या बाबतीत किती दंड करता येईल या संदर्भात नवीन कायदा करावा लागेल. तरच या गोष्टीवर नियंत्रण येईल.

श्री.गुलाबराव देवकर : माननीय सदस्यांनी स्क्रॅप केलेल्या वाहनांबाबत उल्लेख केला आहे. बरीचशी वाहने आरटीओ समोर स्क्रॅप केली जातात. काल देखील या संदर्भात सभागृहात बोलले गेले होते. जी वाहने स्क्रॅप केली गेली पाहिजेत, विनापरवाना वाहने चालविली जात असतील, बोगस पध्दतीने चालवित असतील, मुदत संपल्यानंतर देखील वाहने चालविली जात असतील तर त्याबाबत कडक धोरण राबविण्याची आपली सूचना आहे. याबाबत निश्चितपणे या वाहनांची ओळख कशी होईल, ॲट अ ग्लान्स वाहन समोर आले पाहिजे. ज्या वाहनांची मुदत संपली आहे, परवाना संपला आहे तरी देखील वाहन चालविले जाते हे योग्य नाही. याबाबत नेमके काय करता येईल याबाबत बैठक घेऊन, चर्चा करुन वेळ पडल्यास आपणही त्यामध्ये सहभागी व्हाल आणि निश्चितपणे त्याठिकाणी धोरण ठरवू या. जेणेकरुन अशी वाहने रस्त्यावरुन कमी होतील आणि जनतेची गैरसोय होणार नाही. गोंदिया जिल्हयाबाबतचा विषय होता. पोलीस विभागाकडून 45 प्रकरणे बूक करुन हाताळली गेली आहेत. काही वाहने तेथे उभी करुन ठेवली आहेत असे सांगण्यात आले. आरटीओशी मी निश्चितपणे चर्चा करतो.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, एकदा पनिशमेंट दिल्यानंतर पुन्हा ती रद्द करुन दुसरी पनिशमेंट देता येते का? तीन लोकप्रतिनिधींची पत्रे घेऊन दर महिन्याला 10-10 दिवसांसाठी वाहन सस्पेंड केले आहे. आता त्या सस्पेन्शनमध्ये वाढ केली, त्याला स्थगिती द्यावी अशी विनंती आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : निश्चितपणे तपासून मार्ग काढण्यात येईल. माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी बदल्यांमध्ये व्यवहार होतात असे सांगितले. अशाप्रकारचे व्यवहार होत नाहीत. तीन वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या नियमाप्रमाणे बदल्या केल्या जातात. बदल्यांच्या नियमांचे पालन केले जाते. याबाबत लक्ष घातले जाते. वर्ग 1 व 2 च्या बदल्या शासन स्तरावरुन होतात. वर्ग 3 व 4 च्या बदल्या विभाग प्रमुखांकडून होतात. या संदर्भात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी लक्ष घालण्यात येईल. माननीय सदस्यांनी नो फॉल्ट लायबिलिटीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. यासंदर्भात काय धोरण राबविता येईल, जेणेकरुन अशा व्यक्तीच्या कुटुंबाला जास्तीत जास्त रक्कम मिळेल. अशा पध्दतीच्या धोरणासाठी सुध्दा विचार करु. अपघात दिवाणी दाव्यामध्ये दिरंगाई होते, त्यासाठी व्यवस्था सुधारण्याच्या संदर्भात सूचना केली आहे. हा विषय केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. मोटार वाहन कायद्याच्या कलम 9 मध्ये तरतुदी आहेत. त्या बघता येतील. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सूचना केली की, वाहनांचे योग्य ते नियमन झाले पाहिजे. हे काम पोलीस विभागाकडे आहे. माननीय सदस्यांच्या भावनांबाबत आरटीओ विभागाकडून जे निदेश दिले पाहिजेत ते निश्चितपणे दिले जातील.

नंतर 2डब्ल्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ..........

काही उदाहरणे देऊन सुध्दा सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केला. ट्रक चालक रस्त्यावर थुंकतात किंवा लहान वाहनांना त्यांचा त्रास होता, याबाबतीत सुध्दा कायद्यात दंडाशी शिक्षा काय करता येईल यादृष्टीने देखील प्रयत्न करण्यात येतील. तसेच परताव्यावरील विधेयक हे वेगळ्या प्रकारचे विधेयक असून याबाबतही लक्ष घातले जाईल. अशा अनेक सूचनासन्माननीय सदस्यांनी केल्या त्यांचेही निश्चितपणे स्वागत करतो आणि हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 19 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र.77 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.स.वि.क्र. 77 संमत झाले आहे.

--------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. XIII OF 2010 ( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960 ) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 13-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

महोदय, सहकारी संस्था अधिनियम, 1960 च्या कलम 71 (1)(ब) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाने तिच्या कालावधीत घेतलेले निर्णय तसेच संस्थेच्या हितास बाधा पोहचणार अशा सर्व निर्णयांसाठी समितीचे सदस्य संयुक्तपणे जबाबदार असतील असे बंध पत्र व्यवस्थापन समितीने पदग्रहण केल्यापासून 15 दिवसांच्या आत संस्थेला देण्याचे बंधन या कायद्यात आहे. या संस्थेच्या सदस्यांना जर 15 दिवसात असे बंध पत्र सादर न केल्यास निबंधकाकडून व्यवस्थापन समिती बरखास्त करुन त्याऐवजी प्रशासक मंडळ नेमता येते. सहकारी गृहनिर्माण संस्था देखील या तरतुदीमध्ये येतात आणि आज आपण पाहिले तर राज्यातील ग्रामीण भागात 9000 संस्था व नागरी भागात 70 हजार सहकारी संस्था आहेत. गृह निर्माण संस्थेचे स्वरुप व्यापारी नसून सेवाभावी प्रकारचे असते. कारण लोक आपली नोकरी सांभाळून, कर्तव्य भावनेतून करीत असतात. म्हणून गृह निर्माण संस्थेच्या वतीने त्यांच्या कामकाजाचे स्वरुप लक्षात घेता 15 दिवसांची मुदत ही अत्यंत कमी असून ती वाढवावी अशी विनंती शासनाकडे वारंवार येत होती...

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ..

त्यामुळे या विनंतीचा विचार करुन हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आले आहे. सदरचा कालावधी सहा महिन्याचा करावा अशी सहकार खात्याची भावना होती परंतु विधी व न्याय खात्याने कालावधी मोठा होईल त्यामुळे कालावधी कमी करावा असा आक्षेप घेतल्यामुळे पंचेचाळीस दिवसांची मुदत ठेवण्याचा निर्णय घेवून या ठिकाणी हे विधेयक आणण्यात आले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. कृपया त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, खरे म्हणजे मा.मंत्रीमहोदयांनी या विधेयकाच्या माध्यमातून अशा प्रकारचे बंधन का आणले ते त्यांनी सांगावयास पाहिजे होते. बंधन आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने 15 दिवसाची मुदत का घातली हे सांगावयास पाहिजे होते व नंतर हे विधेयक का आणले गेले ते सांगावयास पाहिजे होते.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र सहकार महर्षीनी धुऊन खाल्ले आहे. साखर कारखाने, सुत गिरण्या, बँका, नागरी बँका जेवढया ज्या काही सहकारी संस्था आहेत त्यांची मोठया प्रमाणात लूट केली गेली आहे. सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील मंत्री होण्याच्या अगोदर मा. पतंगराव कदम हे सहकार मंत्री होते. परंतु हे शासन या राज्यात आल्या पासून या शासनाने सहकार क्षेत्राची सर्वात मोठी लूट केलेली आहे. सहकार क्षेत्राची लूट झालेल्या बँकाची जेवढी नावे घ्यावी तेवढी थोडीच आहेत. सहकार क्षेत्राची शेकडो करोडो रुपयांची लूट झालेली आहे. मग ती नांदेडची बँक, वर्ध्याची बँक, अकोल्याची बँक किंवा नागपूरची बँक असो अशा लूट केलेल्या बँकाची आपल्याला किती तरी नावे घेता येतील. सहकारी बँकामध्ये ठेवीदारांनी 1 लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे अशी माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. त्यामुळे आपण ठेवीदारांची चिंता करीत आहात की, बँकाची लूट करणा-यांची चिंता करीत आहात ? आपली सत्ता आल्यापासून ज्यांनी बँक लुटली त्यांच्यापैकी एकावरही कारवाई झालेली नाही. ज्यांनी बँकालूटून खाल्ल्या त्यापैकी एकही माणूस तुरुंगात गेला नाही किंवा त्यांच्या पैकी एकावरही एफआयआर दाखल झ ालेला नाही. मा. मंत्रीमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांना तर खरे म्हणजे पद्मश्री पुरस्कारच द्यावयास पाहिजे. त्यांनी एकावरही कारवाई केली नाही. त्यांचे ज्याच्याशी भांडण आहे त्या सातारा बँकेच्याच मागे ते लागले होते . परंतु आता त्यांची पंचाईत झाली आहे. कारण तेथील नेते आता उपमुख्यमंत्री झालेले आहेत. राजकीय वैमनस्यासाठी पदाचा आणि विभागाचा वापर करावयाचा हे काही योग्य नाही. यावर खूप काही बोलता येईल परंतु मी त्यावर अता काही बोलत नाही. या ठिकाणी मी सहकार विभागाचा भ्रष्टाचार काढण्यासाठी उभा राहिलेलो नाही, निर्बंध आणण्याच्या संदर्भातील सर्व माहिती तुम्हाला विधी व न्याय खात्याने द्यावयास पाहिजे होती. बँकेच्या खटल्यातून हा खटला जेव्हा सर्वोच्च न्यायालयात गेला त्यावेळी सहकारी बँका उद्ध्वस्त होत आहेत असे त्यांना दिसून आले. एक लाखाचा निधी त्यांना दिला जातो.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मी मा. मंत्रीमहोदयांना माहिती विचारली होती. परंतु ती माहिती माननीय मंत्रीमहोदयांना देता येत नाही हे पाहून अधिका-यांनीच त्यांना ती माहिती तातडीने द्यावयास पाहिजे होती. मंत्र्यांची कुचंबना करणारे अधिकारी आपल्याकडे असतील तर त्यांना ताबडतोब घरी पाठवले गेले पाहिजे व चांगले अधिकारी घेतले पाहिजेत. डिपॉझीट इन्श्यूरन्स अँड क्रेडीट गँरटी कॉर्पोरेशन हा जो फूल फॉर्म आहे तो मी मंत्रीमहोदयांना विचारला होता परंतु तो त्यांना सांगता आला नाही. आपण सर्वज्ञ असतो अशातला भाग नाही परंतु सदस्य जेव्हा विचारतात तेव्हा ती सर्व माहिती अधिका-यांनी मा. मंत्रीमहोदयांना देणे आवश्यक असते. माननीय मंत्रीमहोदयांना माहिती देता न आल्यामुळे मला फार वाईट वाटले.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, लुटणारे मोकळे सुटतात आणि संस्था उद्‌ध्वस्त होतात अशी परिस्थिती आहे. तेव्हा लुटणाऱ्यांवर निर्बंध यावेत याकरिता निवडणूक लढविणाऱ्या सदस्याने प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे की, मी संस्थेत काम करीत असताना जी काही अनियमितता वा गैरव्यवहार होईल त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर असेल आणि वेळ आली तर माझ्याकडून पूर्ण रक्कम वसूल करण्याचा अधिकार राहील. परंतु शासनाने अशाप्रकारचा कायदा केला नाही कारण त्यांना संरक्षण द्यावयाचे होते. आर्थिक सहकारी संस्थांच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय दुर्दैवाने सहकारी गृहनिर्माण संस्थांना देखील लागू झाला. या संदर्भात मी सहकार विभागाच्या सचिवांना कित्येक वेळा भेटून याबाबत कल्पना दिली. त्यांना सांगितले की, सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये फक्त महिन्याचा मेन्टेनन्स जमा करुन सोसायटीला आलेले बिल भरायचे असते. त्यामध्ये देखील दोन-चार सदस्य मेन्टेनन्स देत नाहीत आणि त्यांचा भार अन्य सदस्यांना सोसावा लागतो. शिवाय त्यांना सहकार कायद्याचे चांगले ज्ञान नसते. कित्येक सहकारी संस्थांना सोसायटीचे काम करण्यासाठी एखादा कर्मचारी नेमणे देखील परवडत नाही. मग त्या सोसायटीच्या सदस्यांनाच सर्व कामे करावी लागतात. सर्व संस्था सिस्टीममध्ये चालू शकत नाही. मुंबईतील काही सोसायटयांकडे एफ.एस.आय.शिल्लक आहे. तेथे आवर्जून निवडणूक होते,सदस्यत्व मिळविण्यासाठी संघर्ष होतो. तेव्हा सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील करुन सांगावे की, आपण जो निर्णय दिला तो, जे लोक सहकारी संस्था लुटून खातात त्यांच्याकरिता होता. महाराष्ट्रात गृहनिर्माण संस्था जास्त आहेत त्यांना यातून बाहेर काढावे अशी विनंती मी सहकार विभागाच्या सचिवांना केली होती.

सभापती महोदय, या संदर्भात शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. मंत्रालयातील विधी व न्याय विभागात विद्वान अधिकारी आहेत. त्यांनी महाराष्ट्राचे वाटोळे केले आहे. मी एक परप्रांतियांच्या संदर्भात एक घटनात्मक विधेयक दिलेले आहे. मला काय वाटते म्हणून दिले नाही. त्यावर ॲडव्होकेट जनरल यांनी मत दिले. मग मी त्यावर एका ज्येष्ठ तज्ज्ञाचे

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

मत घेतले. त्यांनी ॲडव्होकेट जनरलनी दिलेल्या प्रत्येक मुद्यावर इतके कठोरपणे मत दिले आहे की, ॲडव्होकेट जनरलला स्वाभिमान असेल तर ते ॲडव्होकेट जनरलशीप सोडून देतील. इतके त्या वकिलाने लिहिले आहे. या देशामध्ये घटनेने प्रत्येकाला आपल्या पध्दतीने जगण्याचा हक्क दिलेला आहे. त्या हक्काच्या अंतर्गत मी ते विधेयक दिले होते. मंत्रालयात जे विधीज्ञ आहेत त्यांनी सर्वसामान्यांकरिता सरकार चालविण्याबाबत सल्ला दिला तर महाराष्ट्राचे भले होईल. पण तसे होत नाही. हा दोष मी सरकारला देणार नाही.

सभापती महोदय, सहकारी गृहनिर्माण संस्था चालविणारा सर्वसामान्य नोकरदार वर्ग आहे. हा वर्ग वेळात वेळ काढून संस्था चालवित आहे. या विधेयकामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समिती सदस्यांना बंधपत्र देण्याचा कालावधी पंधरा दिवसांवरुन पंचेचाळीस दिवस केलेला आहे. सरकारला हा कालावधी जास्त वाटतो काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

या कालावधीमध्ये काही घोटाळा होईल असे आपल्याला वाटते काय ? या ठिकाणी हे विधेयक आणून आपण ही मुदत 45 दिवसांची केलेली आहे. परंतु 15 दिवस मुदत असली काय, 50 दिवस मुदत असली काय किंवा 60 दिवसांची मुदत असली काय या बाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला असल्यामुळे त्या मुदतीमध्ये आपल्याला ते द्यावेच लागणार आहे.या विधेयकाच्या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना अशी विनंती करतो की, सुप्रीम कोर्टातील प्रकरणांच्या संदर्भात दिल्लीमध्ये सल्ला देण्यासाठी ज्या व्यक्ती नेमण्यात आलेल्या आहेत त्यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात जावे .सहकारी गृह निर्माण संस्था या नफा मिळविणा-या संस्था नाहीत. अशा प्रकारे शासनाने जी भूमिका घेतली आहे ती अत्यंत स्वागतार्ह आहे. या संस्था सामान्य आणि मध्यम उत्पन्न गटातील लोकांनी स्थापन केलेल्या आहेत. अशा सहकारी गृह निर्माण संस्थेचे समिती सदस्य स्वत:ची उपजीविका सांभाळून सर्वसाधारणपणे समाजाच्या प्रती आपले कर्तव्य म्हणून व्यवस्थापनाशी संबंधित कामे करीत असतात अशा प्रकारे या विधेयकात म्हटलेले आहे तेव्हा याबाबतीत शासनाची जी प्रामाणिक भूमिका आहे ती भूमिका त्या ठिकाणी मांडली पाहिजे.

ग्रामीण भागात आपण या संस्था अधिक प्रमाणात रुजवत आहोत जवळजवळ 9 हजार संस्था ग्रामीण भागातील आहेत आणि या संस्थांचे लोण अधिक विस्तृत प्रमाणात वाढले पाहिजे आणि गृह निर्माण संस्था निर्माण झाल्या पाहिजेत त्याकरता आपण हा सामुदायिक निर्बध आणला आहे परंतु अशा प्रकारचा निर्बध सहकारी गृह निर्माण संस्थांना असता कामा नये अशा प्रकारची विनंती सर्वोच्च न्यायालयात करण्यात यावी. त्या ठिकाणी चांगले वकील नेमावे. गृह निर्माण संस्था जर घोळ करीत असेल तर त्या बाबतीत आपला सहकारी कायदा सक्षम आहे.आपण जरी हा कायदा करीत असला तरी गृह निर्माण संस्थांना यातून वगळण्यात यावे ही विनंती करण्यासाठी मी माझे विचार मांडलेले आहेत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, वि.स.वि. क्रमांक 13 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना बंधपत्र सादर करण्याची मुदत 15 दिवसा ऐवजी 45 दिवसांची करण्यात येत असून ही चांगली गोष्ट आहे. कमी दिवसामध्ये बंधनपत्र सादर करणे शक्य नसते म्हणून ही मुदत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे या विधेयकाचे मी स्वागत करतो. या विधेयकाच्या परिशिष्टमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सभासदाने जे मासिक सभेमध्ये आपले मत व्यक्त केलेले आहे ते प्रोसिडींगवर येणारच आहे. परंतु जे मत व्यक्त केलेले आहे ते मत उपनिबंधकाला सात दिवसाच्या आत कळवावयाचे आहे. एखादा सभासद जर लांब राहत असेल तर त्याला सात दिवसाच्या आत उप निबंधकाकडे लेखी मत देता येणार नाही. हा कालावधी अत्यंत कमी आहे. त्याला मला विरोध करावयाचा आहे.....

श्री.प्रकाश सोळंके : ज्याला विरोध करावयाचा असतो त्याने संस्थेच्या बैठकीमध्ये विरोध करावयाचा असून त्याची अधिक काळजी घेण्यासाठी लेखी स्वरुपात उप निबंधकाकडे देखील कळवावयाचे असते.

श्री.केशवराव मानकर :सात दिवसाचे बंधन का घातले आहे ? प्रोसिडीगमध्ये तर मत नोंदवलेले आहे.

श्री.प्रकाश सोळंके : त्याने लेखी कळविले नाही तरी त्यामुळे फरक पडत नाही. मिटींगमध्ये विरोध करुन प्रोसिडींग बुकमध्ये त्याचा विरोध नोंदविणे मात्र आवश्यक आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, अशा या चांगल्या विधेयकाचे मी स्वागत करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, केशवराव मानकर यांनी विचार मांडले आहेत. त्या संदर्भात निश्चितपणे सुप्रिम कोर्टाचा संदर्भ वारंवार दिला आहे. त्याबाबतीत निश्चितपणे माहिती घेतली जाईल. याठिकाणी सांगितले की, गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत बंधपत्र घेण्याची तरतूद वगळण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे आणि शासनाचे निश्चितपणे तसेच मत आहे. परंतु त्याबाबत सुप्रिम कोर्टाचे काय आदेश आहेत याबाबत अधिक माहिती घेऊन शासनामार्फत पाठपुरावा करुन गृहनिर्माण संस्थांच्या नियमातून बंधपत्राची तरतूद वगळण्यासाठी शासन निश्चितपणे कारवाई करील.

सभापती महोदय, या संस्थांचे लेखा परिक्षण अहवाल होतात त्यामध्ये काही दोष आढळून येतात. त्याबाबत आपणास माहीत आहे की, कलम 78, 83, 88 या अन्वये सहकार विभागाच्या माध्यमातून कारवाई केली जाते. पतसंस्थांच्या बाबतीत विशेषत: काही प्रमाणात नागरी सहकारी बँकांसारख्या अनेक संस्था अडचणीत आणण्याचे काम तेथील संचालकांनी व अधिकाऱ्यांनी संगनमताने केले आहे. म्हणून निश्चितपणे अशा संस्थांवर सुध्दा फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचे सहकार विभागाचे धोरण आहे. त्याचप्रमाणे 144 पत संस्थांच्या बाबतीत फौजदारी गुन्हा नोंदवून त्यामध्ये 2,112 व्यक्तींवर कारवाई केली आहे. त्यामुळे याठिकाणी सहकारी पतसंस्था असतील किंवा नागरी बँका असतील त्यामध्ये सर्वसामान्य माणसांच्या ठेवी मोठया प्रमाणात गुंतल्या आहेत. या संस्था अडचणीत आल्यामुळे ज्या ठेवी गुंतविल्या आहेत त्या धोक्यात येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे आयुष्य उद्ध्वस्त होणार आहे. अशाप्रकारची अनेक उदाहरणे सहकारी संस्थांच्या माध्यमातून अव्याहतपणे आपणास पहावयास मिळाली आहेत. त्याकरिता अत्यंत कडक कायदा करणे आवश्यक आहे. कारण अटक झाल्यानंतर सुध्दा कोर्टामधून त्यांची तात्काळ सुटका होत असते. जे गुन्हेगार संचालक असतात ते पुन्हा उजळ माथ्याने समाजात वावरतात असतात. त्याकरिता निश्चितपणे कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. तरच या सहकारी संस्था भविष्यात टिकतील. म्हणून त्यासाठी कडक कायदा करण्याचा शासनाचा विचार आहे. त्याबाबत लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल अशी मी आपणास ग्वाही देतो. या विधेयकाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले आहे त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व हे विधेयक संमत करावे अशी विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

-----

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज - विधेयक**

**पृ. शी.** : मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. I OF 2010**

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PRIMARY EDUCATION ACT, 1947 AND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS ( CONDITIONS OF SERVICE ) REGULATION ACT, 1977. )

श्री. कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सन 2007 मध्ये याच सभागृहामध्ये ज्यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गदारोळ सुरु होता ती संधी साधून विरोधकांचा एकही शब्द नोंदवून न घेता शिक्षण सेवक या योजनेला कायद्याचे स्वरुप देण्यात आले आणि कायदा पास करुन घेण्यात आला. सभागृहात कोणतीही चर्चा होऊ न देता अशा पध्दतीने विधेयक पास करुन घेण्याचा तो प्रसंग विरळाच असेल. परंतु मी हे अशासकीय विधेयक आज यासाठी मांडत आहे की, शासनाने 13 ऑक्टोबर, 2000 पासून शिक्षण सेवक योजना सुरु केली. ती योजनाच मुळात शिक्षण व्यवस्थेला आणि घटनेतील समतेच्या मूल्यांना, न्यायाच्या संकल्पनेला काळिमा फासणारी होती. पण त्याही पुढे जाऊन आपण त्याला कायद्याचे स्वरुप दिले. हे शासन महात्मा फुले, शाहूंचे नाव घेते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेते म्हणून मला आश्चर्य वाटत आलेले आहे. ही योजना किंवा हे अपत्य तुमचे नाही. शिक्षण सेवक नावाची ही योजना केंद्र शासनाच्या सूचनेनंतर विविध राज्यांमध्ये राबविली गेली. हा प्रयोग पहिल्यांदा गुजरात, राजस्थान आणि मध्यप्रदेशमध्ये केला गेला. त्यावेळी भा.ज.प. प्रणित एन.डी.ए. चे सरकार होते. त्या सरकारने जी सूचना केली ती

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. कपिल पाटील ....

आपण स्वीकारली. म्हणजे त्यांचे अपत्य तुम्ही दत्तक घेतले आणि ते या महाराष्ट्रावर लादले. तुमच्या मूल्यांच्या, तुमच्या धारणेच्या विरोधातील भूमिकेशी तुम्ही सूत जमवले आणि या राज्यामध्ये शिक्षण सेवकांच्या बाबतीत अवहेलनेची व्यवस्था आणून ठेवली. शिक्षण मित्र, विद्या सहाय्यक या नावाने पहिल्यांदा ही योजना आली. महाराष्ट्रात येता येता त्या योजनेचे नाव शिक्षण सेवक असे केले. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सेवक या शब्दाचा अर्थ काय आहे हे मी सांगण्याची गरज नाही. इतके अतिशूद्राचे स्थान त्या शिक्षण सेवकाला आपण आणून ठेवलेले आहे. जे शिक्षक पद अतिशय सन्मानाचे होते, प्रतिष्ठेचे पद होते, ज्याला गावामध्ये, समाजामध्ये मान होता त्याला तुम्ही सेवकाच्या पदावर आणून ठेवलेले आहे.

शिक्षण सेवकाला किती पगार दिला जातो ?त्याला तीन हजार रुपये, चार हजार रुपये, पाच हजार रुपये असा पगार दिला जातो. प्राथमिक शिक्षण सेवकाला तीन हजार रुपये पगार दिला जातो. या देशाचा मिनिमम वेजेस ॲक्ट आहे. त्याला न्यूनतम मजदुरी ॲक्ट म्हणतात. त्या कायद्यान्वये मजुराला किती पैसे दिले पाहिजेत याबाबत भारत सरकारचे आताचे जे शेड्युल आहे त्याप्रमाणे कुशल कामगाराला दररोज 273 रुपये दिले पाहिजेत. अर्धकुशल कामगाराला 248 रुपये दिले पाहिजेत आणि अकुशल कामगार ज्यांच्याकडे कोणतेही कौशल्य प्राप्त नाही त्याला दररोज 230 रुपये दिले पाहिजेत असे हा कायदा सांगतो. आपण शिक्षण सेवकाचा जो कायदा केला त्या कायद्यान्वये आपण त्या शिक्षण सेवकाला, त्या सन्माननीय शिक्षकाला किती पगार देता ? अकुशल कामगारापेक्षाही निम्म्याने कमी पैसे आज त्याला मिळत आहेत. आपल्या हिशेबात सांगावयाचे झाले तर रोज 133 रुपयांपेक्षा जास्त मिळत नाहीत. रोजगार हमी योजनेवरील मजूर आज यापेक्षा जास्त पैसे कमावतो आणि आपण शिक्षकाकडून ही अपेक्षा करता. ही अवस्था आपण कशासाठी आणली ?

सभापती महोदय, या राज्यामध्ये या शासनाला दोन प्रकारची शिक्षण व्यवस्था आणावयाची आहे. थायलंडला जी जेमेटिक परिषद झाली त्या परिषदेने या पुढच्या काळात शिक्षणाची सबसिडी ठेवता कामा नये अशी भूमिका घेतली. सर्वांसाठी शिक्षण द्या असा हाकारा देत ती परिषद झाली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

त्या परिषदेमध्ये भारत सरकार सामील झाले होते. त्या परिषदेतील निर्णयाचा हवाला घेत शिक्षणाची सबसिडी कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याचा परिणाम म्हणून राज्यामध्ये विना अनुदान, कायम विना अनुदान पध्दत सुरु केली. आता तर शिक्षकांना शिक्षण सेवक पदावर आणून ठेवले आहे. त्यांचे वेतन कमी असल्यामुळे या क्षेत्राकडे चांगले उमेदवार येण्याचे टाळतात. ज्यांच्याकडे मेरिट आहे, ज्यांना खरोखर शिकविण्याची इच्छा आहे, ज्यांना अध्यापनाची आवड आहे, असे चांगले उमेदवार या शिक्षण क्षेत्राकडे पाठ फिरवत आहेत. शासनाने बहुजनांचे शिक्षण हे अतिशय निम्न स्तरावर आणून ठेवलेले आहे. या देशामध्ये 4 प्रकारची व्यवस्था निर्माण केली. पूर्वी चातुर्वर्ण होता, आता शिक्षण क्षेत्रामध्ये शासनाने चातुर्वर्ण निर्माण केला आहे. श्रीमंतांच्या मुलासाठी वेगळया शाळा असतात. त्याच्या खाली अनुदानित शाळा काढलेल्या आहेत. त्याच्या खाली शिक्षण सेवक नावाची योजना आणून या शुद्र समाजासाठी व्यवस्था केली. त्याच्याही खाली दऱ्या, डोंगरातील मुलांसाठी वस्ती शाळा काढल्या. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या नावाने या शाळा सुरु केल्या. वस्ती शाळेतील शिक्षकांना केवळ 1200 रुपये दिले जातात. 1200 रुपयामध्ये ते कसे जगणार ? बारावी झाल्यानंतर त्यांनी डी.एड.केलेले असते. काहींचे पदवीपर्यंत शिक्षण झालेले असते. त्यांना शासन 1200 रुपये देऊन मुलांना शिकविण्यास सांगते. इतके प्रचंड शोषण सरकारी पातळीवर सुरु असून जगाच्या पाठीवर कोठेही नसेल. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेणारे महाराष्ट्र सरकार हे शोषण करीत आहे. यापेक्षा दुसरी शरमेची गोष्ट नाही.

केंद्र सरकारने दिनांक 21.7.1999 रोजी मूळ सूचना केली होती. त्यात असे म्हटले की, ज्याठिकाणी टिचर व टिचर्स उपलब्ध नाहीत, यामध्ये जी गॅप आहे ती भरुन काढण्यासाठी राज्य सरकारला काही सूचना केल्या होत्या. जेथे शिक्षक पोहोचू शकत नाही. तेथे जो माणूस उपलब्ध आहे त्याला ठराविक वेतन देऊन तात्पुरती व्यवस्था केली जावी. ही व्यवस्था करण्यासाठी ती सूचना होती.परंतु शासनाने त्या सूचनेचे सार्वत्रिकरण केले आणि सगळयांना ही योजना लागू केली आणि सरसकट शिक्षण सेवक म्हणून 3 वर्षांसाठी प्राथमिक शाळेपासून,वस्ती शाळा, उच्च माध्यमिक शाळांच्या शिक्षकांपर्यंत ही व्यवस्था आणून ठेवली. ज्या दिवशी या सभागृहात हा कायदा पास

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KGS/ ST/ KTG/

श्री.कपिल पाटील.....

झाला त्याच्या दुसऱ्या दिवशी मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यात असे म्हटले होते की, या सभागृहाला विश्वासात न घेता, या सभागृहातील एकाही सभासदाचे मत नोंदवून न घेता कायदा पास केला आहे. इतका बेमुर्वतखोरपणा, बेलगामपणा दाखविला होता त्याच्या निषेधाची मी भूमिका घेतली होती. तेव्हापासून आजपर्यंत शासन कोणतीही भूमिका घेत नाही. मानधन वाढीची शासनाने पत्रके काढली, निर्णय झाला आहे असे सांगण्यात आले. परंतु एका रुपयाने सुध्दा मानधन वाढलेले नाही. मी मानधन वाढविण्याची मागणी करीत नाही. शिक्षण सेवक हे शब्दच मी इतिहास जमा करु इच्छितो, संपुष्टात आणू इच्छितो. त्यांना मानधन नव्हे तर रितसर वेतन दिले गेले पाहिजे अशी माझी मागणी आहे. शिक्षण सेवकांचा 3 वर्षांचा परिवीक्षा कालावधी ठेवला आहे. या अशासकीय विधेयकातील तरतूद शासनाने स्वीकारली तर हा कालावधी एक वर्षावर येईल. शिक्षकाला एक वर्षात आपले मेरिट सिध्द करता येईल. शासनाने एक वर्षानंतर त्यांना जज्ज करावे आणि कायम करावे अशी सूचना या विधेयकात आहे. या तीन गोष्टींचा स्वीकार शासनाने करावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

शिक्षण क्षेत्रातील हे शोषण, शिक्षण क्षेत्रातील ही अवहेलना सरकार कशासाठी करीत आहे ? भारतीय जनता पार्टीच्या एनडीए सरकारने त्यांच्या 3 राज्यांमध्ये ही योजना आणली ते मी समजू शकतो. त्यांचे केंद्रात सरकार होते त्यावेळी त्यांनी राज्य सरकारला सूचना केली होती हे मी समजू शकतो. कारण ती त्यांची वैचारिक भूमिका आहे. या देशातील बहुजनांना दुय्यम दर्जाचे शिक्षण दिले पाहिजे, अशी व्यवस्था निर्माण होत आहे. त्यांच्या विरोधातील हा कार्यक्रम आहे. हे शासन एनडीए शासनाच्या कार्यक्रमाप्रमाणे काम करीत आहे. आर्थिक कार्यक्रमामध्ये व शैक्षणिक कार्यक्रमामध्ये युपीए व एनडीए या दोन्ही आघाडीच्या सरकारमध्ये काडीमात्र फरक राहिलेला नाही. प्राथमिक शिक्षण कायद्यात शिक्षण सेवक अशी दुरुस्ती करुन हे सिध्द केलेले आहे. या देशातील बहुजनांना, गरिबांना निम्न स्तराचे शिक्षण मिळावे, दुय्यम दर्जाचे शिक्षण मिळावे, त्यांनी पुढे शिकू नये हीच या शासनाची भूमिका आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:00

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण टी.व्ही.वरील अभिषेक बच्चनची जाहिरात पाहिली असेल. अभिषेक बच्चनच्या अनेक जाहिराती चांगल्या आहेत. त्याची एक "व्हॉट ॲन आयडिया" अशी जाहिरात आहे. त्यामध्ये तो मुलांना असे सांगतो की, आता तुम्हाला मोबाईलवरुन शिकता येईल. शिक्षकाची गरज राहाणार नाही. त्याला रिटायर करा. ही अतिशय धोकादायक जाहिरात आहे. म्हणजे शिक्षकाला रिटायर करुन तंत्रज्ञानाच्या आधारे तुम्हाला शिकायला सांगितले तर डोंगर द-यातील मुले अशा पध्दतीने शिकू शकत नाहीत. पण या सरकारचे सगळे धोरण खाजगीकरणाच्या दिशेने ज्या वेगाने जात आहे ते लक्षात घेतले तर अभिषेक बच्चन जी जाहिरात दाखवतो तिचा शब्दश: अंमल सरकार करत आहे हे मला जाणीवपूर्वक आपल्या लक्षात आणून द्यायचे आहे. 6 वर्षापूर्वी दोन मोठ्या उद्योगपतींनी टाईम्स ऑफ इंडियामध्ये लेख लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, या देशातील प्राथमिक शिक्षणाची अवस्था अतिशय वाईट आहे. म्हणून शासनाने कायदा केला पाहिजे. पुढे भारत सरकारने तो कायदा केला. मुकेश अंबानी आणि अझीम प्रेमजी या दोन उद्योगपतींचा लेख वाचल्यानंतर हा यशोदेचा पान्हा आहे असे मला वाटले होते.पण पूर्ण लेख वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले की, हा यशोदेचा पान्हा नसून पुतनामावशीचा पान्हा आहे. त्या लेखाच्या शेवटी त्यांनी असे म्हटले होते की, प्राथमिक शिक्षणाचा कायदा करा. पण प्राथमिक शिक्षणानंतरच्या शिक्षणाची जबाबदारी समाजावर टाका. या दोघांनी केलेली सूचना जशीच्या तशी स्वीकारुन भारत सरकारच्या शिक्षण हक्काच्या कायद्याचा ड्राफ्ट तयार करण्यात आला. हा कायदा महाराष्ट्र सरकारने स्वीकारला. या कायद्यामध्ये फक्त 8वी पर्यन्तच्या शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. 8वी नंतरच्या शिक्षणाची कोणतीही व्यवस्था भारत सरकारच्या कायद्यामध्ये नाही आणि महाराष्ट्र सरकारच्या कायद्यामध्ये देखील नाही.

महाराष्ट्र सरकारने यापूर्वी फार मोठे पुरोगामी निर्णय घेतले. आपण 12वी पर्यन्तच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची जबाबदारी उचचली. त्यासाठी अनुदान दिले. पण गेल्या 10-15 वर्षामध्ये आपण थायलंडच्या परिषदेचा अनुनय करत, मुकेश अंबानी आणि अझीज प्रेमजी यांनी केलेल्या सूचनांचा अंमल करत आणि मनमोहन सिंग सरकारने केलेल्या कायद्याचा अंमल करत, त्याआधीच्या वाजपेयी सरकारच्या भूमिकेचा अंमल करत या देशातील आणि राज्यातील माध्यमिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

आणि उच्च माध्यमिक शिक्षणाला नख लावण्याचे काम करीत आहात. "कायम" शब्द काढण्यासाठी मागे डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये याच सभागृहामध्ये आम्ही प्रचंड आग्रह धरला होता. तुम्ही "कायम"शब्द काढला. परंतु अनुदानाचा अजून पत्ता नाही आणि 12वी पर्यन्तच्या शिक्षणासाठी कोणतेही अनुदान देण्याची तुमची तयारी नाही. ही तयारी का नाही ? दोन्ही काँग्रेस गांधीजींच्या नावाने राज्य करतात. महात्मा गांधीनी "नयी तालिम"मध्ये सांगितले होते की, पूर्वविद्यापीठीय शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे. गांधीजींच्या "नयी तालिम" मधील पूर्वविद्यापीठीय शिक्षणाचा अर्थ म्हणजे आताच्या काळातील 12वी पर्यन्तचे शिक्षण असा आहे. ते असे का म्हणाले होते ? या देशातील लोकसंख्या जीवंत ठेवायची असेल, संवर्धित करायची असेल, टिकवायची असेल तर या देशातील नागरिक सजग झाला पाहिजे आणि त्याला किमान पूर्वविद्यापीठीय शिक्षण उपलब्ध असले पाहिजे. समान संधीची उपलब्धता असली पाहिजे. ज्याने 12वी पार केलेले आहे तो पोरगा हातात दगड उचलत नाही. तुम्ही दंगेधोप्यात असलेली मुले पहा, चो-यामा-या करणारी मुले पहा, नाक्यावर उभे राहाणारे भाई लोक पहा. हे कोण असतात ? ज्यांनी 8वी - 9वीला शिक्षण सोडलेले आहे अशी ती माणसे असतात. पण ज्याने 12वी पार केले आहे, एक विशिष्ट शिक्षण पार केले आहे तो अशा वाईट मार्गाला जाताना विचार करतो. म्हणून ज्या शिक्षणाचा आग्रह गांधीजी धरत होते त्या शिक्षणाची आज गरज आहे. ज्याचा आग्रह महात्मा फुलेंनी 1882 साली हंटर कमिशन पुढे धरला होता.

पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी या देशाला कायदा समर्पित करताना नामदार गोपालकृष्ण गोखलेंची आठवण काढली. 1918मध्ये नामदार गोखलेंनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आग्रह धरला आणि तसे प्रायव्हेट बिल सभागृहामध्ये मांडले होते. या ठिकाणी माननीय शिक्षणमंत्री बसलेले आहेत. त्यांची माझ्या विधेयकाबद्दलची भूमिका काय आहे हे मला माहीत नाही. त्यावेळच्या ब्रिटीश सरकारने नामदार गोपाळकृष्ण गोखलेंचे बिल पास केले नाही. ते नापास केले. कारण ब्रिटीश परकीय होते. त्यांना या देशाचे शोषण करायचे होते. हे शासन आमचे परके नाही असे मी या घडीला मानत आहे. तरीही मंत्री महोदयांची या विधेयकाच्या संदर्भातील भूमिका काय आहे हे मला माहीत नाही. माननीय पंतप्रधान नामदार गोखलेंचा उल्लेख करत होते. ते महात्मा फुलेंना विसरले. पण त्यांच्या कायद्याची आणि तुमच्या कायद्याची प्रेरणा महात्मा फुले नाहीत, नामदार

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री कपिल पाटील...

गोखले नाहीत. तुमच्या दोघांच्या कायद्याची प्रेरणा ही थायलंडची परिषद आहे. तुमच्या दोघांच्या कायद्याची प्रेरणा ही अझीज प्रेमजी आणि मुकेश अंबानी आहेत. तुम्हाला आणि त्या दोघांनाही या देशातील गरिबांना शिक्षण द्यायचे नाही. या लोकांनी असे ठरवून टाकलेले आहे की, बहुजनांनी शिकायची गरज काय ? ते शिकून तरी काय करणार ? या देशातील 25 कोटी लोक असे आहेत की ते शिक्षण विकत घेऊ शकतात आणि या सर्व भांडवलशहांचे असे म्हणणे आहे की, जे विकत घेऊ शकतात त्यांनाच शिक्षण द्यावे. उरलेली 83 कोटी जनता रोज 20 रु.पेक्षा जास्त खर्च करु शकत नाही.

काल आपण या ठिकाणी कुपोषणाच्या संदर्भात चर्चा केली. राज्यात हा कुपोषणाचा आकडा 70 टक्क्या पर्यंत गेलेला आहे. 83 कोटी लोक हे आपले शिक्षण खरेदी करु शकत नाहीत, विकत घेऊ शकत नाहीत अशी स्थिती आहे. त्यांच्या रोजच्या पोटाची मारामारी आहे.ते आपल्या मुलांसाठी काय करणार हा प्रश्न आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 16:05

श्री.कपिल पाटील...........

त्या 83 टक्के जनतेचा कोणता प्रतिकार नाही. स्टोव्ह दुरुस्त करा. मध्येच व्यावसायिक शिक्षणाचे खूळ येते. व्यावसायिक शिक्षण देऊ असे जाहीर केले. शासन म्हणते की, सगळयांना शिक्षणाची गरज नाही. मोबाईल दुरुस्त करा. आमच्या गरिबांच्या मुलांनी मोबाईल दुरुस्त करायचे आणि तुमच्या मुलांनी मात्र कॉन्व्हेंट, इंग्रजी, अंबानींच्या शाळांमध्ये शिकायचे. ही विषमता तुम्ही जाणीवपूर्वक निर्माण केली. जाणीवपूर्वक खाजगीकरण वाढवित आहात. दुसऱ्या बाजूला सार्वत्रिकीकरण संकुचित करीत आहात. गरिबांना शिक्षणाबाहेर काढीत आहात. आठवीपर्यंत शिका म्हणता. त्याच्यापुढे जाऊ नका म्हणता. ती व्यवस्था करायला नकार देता. शिक्षण सेवक हा त्याचाच परिपाक आहे. शिक्षक पूर्वी संघर्ष करायचे, प्रेरणा द्यायचे. आजचे शिक्षक संघर्ष करु शकत नाहीत, प्रेरणा देऊ शकत नाहीत. लाचार झाले आहेत. मंत्रीमहोदयांच्या घरी काम करणाऱ्या नोकरांचा, शिपायांचा, झाडू मारणाऱ्याचा पगार शिक्षण सेवकांपेक्षा चारपट आहे. मंत्रीमहोदय, आपल्या बंगल्यावर शिपाई आहे तो चतुर्थश्रेणीचा कर्मचारी आहे. त्याचा पगार शिक्षकापेक्षा चार पटीने जास्त आहे. एवढी तरी लाज राखणार की नाही? तुमच्याकडे असलेल्या शिक्षणाचे एवढे मोठे काम करणाऱ्या, अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांना किमान सन्मानाचे वेतन देणार की नाही? शिक्षकांचे पगार सन्मानजनक असले पाहिजेत. महात्मा फुले यांनी 1882 साली मागणी केली होती की, गॅझेटेडपेक्षा 1 रुपया तरी जास्त पगार असला पाहिजे. हंटर कमिशनपुढे त्यांनी तीन मागण्या केल्या होत्या. मोफत शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. बहुजनांमधून शिक्षक निर्माण करावेत आणि त्या शिक्षकांना सन्मानपूर्वक गॅझेटेडपेक्षा एक रुपया जास्त पगार दिला पाहिजे. या त्यांच्या तीन मागण्या होत्या. त्या मागण्यांचा विचार केला आणि शासनाला मान्य असेल तर शिक्षकांचे पगार आज 1.25 ते 1.5 लाख रुपये झाला असता. वस्तीशाळांवर बारावीपर्यंत शिक्षणाची सोय करा. अनौपचारिक शिक्षण सुरु करा. आमच्यासाठी शिक्षण नाही का? शिक्षणाच्या हक्काचा कायदा केल्यानंतर शिक्षणाचा हक्क जेथपर्यंत हवा आहे, 18 वर्षापर्यंत तो हक्क दिला पाहिजे. महाराष्ट्र सरकारने त्यादृष्टीने पावले उचलली पाहिजेत. तुम्ही हे नाकारीत आहात. शिकू नका म्हणता. शिकलो नाही तर कोणती संधी मिळणार? रोजगाराच्या संदर्भात जो संघर्ष उभा राहतो आहे हा त्याचाच परिपाक आहे. अशा प्रकारच्या निर्णयातून हे संघर्ष उभे राहतील. हे संघर्ष जाणीवपूर्वक का जोपासता. तुम्ही राज्यकर्ते मूठभरांसाठी, ठराविक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

उच्चवर्ग, मध्यमवर्गीय, जो बाजारातून कोणतीही वस्तू खरेदी करु शकतो अशांसाठी व्यवस्था करीत आहात. गरिबांची तुम्हाला चिंता नाही. दुष्काळात भरडणारा शेतकरी असो, बांधावर राबणारा मजूर असो, बांधकामासाठी वीटा भाजणारा मजूर, सफाई कामगार अशा वर्गाच्या मुलांसाठी व्यवस्था करण्यासाठी तुमची कोणतीही तयारी नाही. माझा आग्रह आहे, मी जे अशासकीय विधेयक मांडले आहे ते शासनाने स्वीकारावे, मंजूर करावे. त्यातून काय होणार आहे? शिक्षण सेवक नावाचा अवमानकारक उल्लेख आहे तो कायमस्वरुपी मिटेल. शिक्षणसेवक हे नाव संपुष्टात येईल. त्याला मानधन नव्हे तर पगार दिला पाहिजे. वेतनश्रेणीनुसार पगार दिला पाहिजे. ही तरतूद या अशासकीय विधेयकात आहे. प्रोबेशनचा कालावधी 3 वर्षावरुन 1 वर्षावर आणला पाहिजे. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्ही कालपासून चांगल्या घोषणा करीत आहात. म्हणून आमच्या मोठ्या अपेक्षा आहेत. नवीन मुख्यमंत्री या राज्याला लाभले आहेत. शिक्षण हक्काच्या संदर्भात निर्णय होत असताना ते केंद्रात होते. तुमच्याकडून आमची हीच अपेक्षा आहे की, किमान काही चांगले निर्णय व्हावेत असा या विधेयकाच्या निमित्ताने माझा आग्रह आहे. या सभागृहाने हे अशासकीय विधेयक मंजूर करावे आणि शिक्षण सेवकांची अवहेलना, गुलामगिरी, वेठबिगारी पूर्णपणे संपुष्टात आणावी आणि शिक्षकांना पुन्हा एकदा सन्मान प्राप्त करुन द्यावा. शिक्षकांची वेदना मी याठिकाणी सांगू इच्छितो.

सेवक नाही शिक्षक आम्ही
न सहणार अपमान
अन्यायाचे भेदक आम्ही
पुन्हा मिळवू सन्मान.

हे शिक्षण सेवक नागपूरच्या अधिवेशनावर चालून आले आहेत. त्यांच्या पदरात काय देणार? चांगला सन्मान असणार की पूर्वीचेच मानधन देणार एवढाच माझा सवाल आहे. धन्यवाद.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----------

नंतर 3एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती व विनियमन, अधिनियम 1977 यामध्ये सुधारणा करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे अशासकीय विधेयक सभागृहात विचारार्थ मांडलेले आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या निमित्ताने जे विचार व्यक्त केले, या विधेयकाच्या निमित्ताने शिक्षण क्षेत्रात शिक्षण सेवक योजनेच्या माध्यमातून शिक्षकांचे होणारे शोषण, शिक्षकांच्या यातना व त्यांची आर्थिक परिस्थिती यासंबंधी अत्यंत चांगले विचार सन्माननीय सदस्यांनी मांडले, त्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. महोदय, हे खरे आहे की, राज्य शासनाने राज्यात सन 2000 पासून शिक्षण सेवक योजना लागू केली. मुळात आमचा शिक्षण सेवक योजनेलाच विरोध होता आणि आजही आहे. शिक्षण सेवक योजनेसाठी पहिला जी.आर. निघाल्यानंतर त्यात अनेक त्रुटी राहिल्या होत्या, त्यांना विरोध करण्यासाठी तसेच या संपूर्ण योजनेलाच विरोधी करण्यासाठी राज्यातील सर्व शिक्षक संघटना आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. असा विरोध झाल्यानंतर काही संघटनांनी मुंबई उच्च न्यायालय तसेच नागपूर व औरंगाबाद या दोन्ही खंडपीठांमध्ये वेगवेगळ्या याचिका दाखल केल्या. या सर्व याचिका क्लब करुन त्यावर मुंबई उच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी झाली. ही सुनावणी झाली तेव्हा शासनाने आपली भूमिका मांडताना असे प्रतिपादन केले की, राज्यात एकाच वेळी 20 हजार शिक्षकांची भरती करावयाची असल्याने राज्याच्या तिजोरीवर फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक बोजा पडणार आहे म्हणून थोडीसी बचत करण्यासाठी तसेच शासनाची आर्थिक क्षमता नसल्यामुळे शिक्षण सेवक तसेच कंत्राटी पध्दतीने शिक्षण क्षेत्रात भरती करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे.

न्यायालयाने निर्णय देताना सुरुवातीला एकाच वाक्यात या योजनेला विरोध केला होता. तो असा की यासाठी न्यायालय परवानगी देते याचा अर्थ शिक्षण सेवक योजना न्यायालयाला मान्य आहे असे अजिबात नाही परंतु शासनाने जे प्रतिपादन केले की, मोठ्या प्रमाणात शिक्षकांची भरती करावयाची म्हणून अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात शिक्षण सेवक योजना लागू करण्यास परवानगी देण्यात येत आहे. अशा प्रकारे त्यात मॉडिफिकेशन स्वीकारले. याचिकाकर्त्यांच्या अधिवक्त्यांचे आणि शासनाचे असिस्टंट गव्हर्नमेंट प्लीडर यांच्यामध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार कन्सेंट टर्म्स

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ........

म्हणून स्वीकारण्यात आल्या व त्या अनुषंगाने ही योजना राज्यात सुरु झाली. त्यासंबंधीचा पहिला जी.आर. 13 ऑक्टोबर, 2000 रोजी निघाला. शासनाने राज्यात सन 2007 पर्यंत केवळ जी.आर. च्या आधारेच ही योजना सुरु ठेवली होती. या योजनेला सन 2007 पर्यंत कायद्याचे स्वरुप देण्यात आलेले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर पुन्हा एकदा अनेक याचिका न्यायालयात दाखल झ ााल्या की शासनाची एखादी योजना शिक्षण क्षेत्रात केवळ जी.आर. अथवा परिपत्रकाच्या आधारे चालू शकत नाही. It cannot override the provisions of the Act and the Rules. कारण आमच्या शाळांसाठी सन 1977 चा कायदा आणि 1981 ची नियमावली आहे. त्यात कुठल्याही प्रकारे शिक्षण सेवक योजनेची तरतूद नाही. तरी देखील गेल्या सात वर्षापासून ही योजना राज्यात कशी सुरु राहू शकते यासाठी अशा याचिका न्यायालयात दाखल झाल्या. त्या याचिकांच्या माध्यमातून शेवटी न्यायालयाने शासनाला तंबी दिली की अशा प्रकारे केवळ जी.आर. च्या आधारे योजना चालविता येणार नाही तर त्याला कायद्याच्या चौकटीत बसवावे अथवा ही योजना रद्द करावी. परंतु शासनाने ही योजना जर रद्द केली असती तर न्यायालयाने निकाल दिल्यापासून............

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/ 16:15

श्री. रामनाथ मोते ...

शासनाला हजारो कोटी रुपयाचा भुर्दंड सोसावा लागला असता. शासनाला हजारो कोटी रुपये शिक्षण सेवकांच्या पगारापोटी आणि सन 2000 पासूनच्या थकबाकीसाठी हजारो कोटी रुपये शासनाला द्यावे लागले असते. विधानसभेत सुध्दा शिक्षण सेवक योजनेला सर्वांचा विरोध होता. शिक्षण सेवकाला कायद्याच्या चौकटीत आणू नका, आमचा याला विरोध आहे असे आमचे म्हणणे होते, या विषयावर आपण सविस्तर बोलू परंतु असे आम्ही त्यावेळेस सांगत होतो परंतु तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री. विलासराव देशमुख यांनी विधानसभेत शिक्षण सेवकांच्या बिलाचा आग्रह धरल्यामुळे त्या दिवशी कोणतीही चर्चा न होता हे विधेयक मंजूर करण्यात आले. ज्यावेळेस विधानपरिषदेत हे विधेयक आले त्या दिवशी या सभागृहात प्रचंड गदारोळ सुरु होता. दोन्ही बाजू कडील सदस्य घोषणा करीत असताना, गदारोळ सुरु असतांना शासनाने डाव साधला व गदारोळात हे विधेयक मंजूर करुन घेतले. बहुमत राज्यकर्त्यांकडे असल्यामुळे आम्ही कितीही विरोध केला असता तरी हे विधेयक मंजूर झालेच असते. परंतु शिक्षण सेवक योजनेचे काय विपरीत परिणाम होऊ शकतील याबाबत आमचे विचार मांडण्याची आम्हाला संधी त्यावेळेस मिळाली नाही व गदारोळात विधेयक मंजूर झाले. शिक्षण सेवक योजनेला कायद्याचे स्वरुप दिले गेले आहे. कायद्याच्या चौकटीत शिक्षण सेवकाला आणून शिक्षण सेवक योजना आपण सुरु ठेवली आहे. मुळत: आमचा शिक्षण सेवक योजनेला विरोध आहे. कारण शिक्षण सेवकाला मिळणारे मानधन, एकूण शिक्षण सेवकाची होणारी अवहेलना, शिक्षकांचा समाजात होणार अपमान व अवमान या सर्व गोष्टी विचारात घेता या शिक्षकाला इक्वल पे फॉर इक्वल वर्क हे आपल्या घटनेने मान्य केलेले आहे त्या प्रमाणे ते दिले पाहिजे. समानतेचे तत्व आपण मान्य केले आहे. शिक्षकाइतकेचे शिक्षण सेवक काम करीत असतो. त्यामुळे शिक्षण सेवकाला वेतनश्रेणी न देणे, शिक्षण सेवक म्हणणे, मानधनावर त्याला काम करावयास लावणे हे या राज्याला शोभणारे नाही. शिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसून ती एक प्रकारची इनव्हेस्टमेंट आहे. संरक्षणावर व शिक्षणावर होणारा खर्च ही ख-या अर्थाने गुंतवणूक असते. त्यामुळे शासनाने हा खर्च न समजता ती गुंतवणूक समजावी. मानधनावर शिक्षण सेवकांचे शोषण न करता, त्यांना राबवून न घेता इतर शिक्षकांप्रमाणेच वेतनश्रेणी देण्याची आवश्यकता आहे. या विधेयकाच्या निमित्ताने शिक्षण सेवक योजना रद्द करावी. शिक्षण सेवकाला आपण कायद्याच्या चौकटीत आणल्यामुळे आमच्यापुढे दुसरा कोणताच पर्याय राहिलेला नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे विधेयक आणलेले आहे त्याची किमान



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

मानहानी व अवहेलना शासनाने करु नये असे मला सूचवावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी शिक्षण सेवकाचा कालावधी 3 वर्षाचा न ठेवता तो कालावधी एक वर्षाचा करावा अशी सूचना केलेली आहे. 1977 च्या कायद्यात हा कालावधी दोन वर्षाचा असेल अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. हा कालावधी आपण एक वर्षाचा केला नाही तरी किमान आहे तो तरी ठेवावा अशी माझी विनंती आहे.

शिक्षण सेवकांच्या मानधनाच्या संदर्भात, पदनामाच्या संदर्भात, पगाराच्या संदर्भात वेतनश्रेणीच्या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. मी आपल्याला विनंती करतो की, आजही न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित आहे. न्यायालयात हा वाद पुन्हा एकदा सुरु झालेला आहे. जरी शासनाने कायदा केला असला, शासनाने शिक्षण सेवकांना कायद्याच्या चौकटीत आणले असले, 1977 च्या कायद्यात बदल केला असला, प्राथमिक शिक्षकांसाठी 1947 च्या कायद्यात बदल केला असला तरी सुध्दा अशा प्रकारचा बदल शिक्षण सेवकांच्या बाबतीत करणे, भेदभाव निर्माण करणे हे योग्य नाही. शासनाने हे जे काही केलेले आहे त्यामुळे घटनात्मक वाद आता निर्माण झालेला आहे. त्यामुळे न्यायालयात हा वाद सुरु आहे. शिक्षण सेवक योजनेच्या संदर्भात न्यायालयाने काही निर्णय देण्याऐवजी, न्यायालयाने निर्देश देण्याऐवजी शासनाने पुढाकार घ्यावा शिक्षण सेवकाला न्याय द्यावा अशी विनंती करतो. शिक्षण सेवक योजनेला आम्ही वेठबिगारी समजतो, शिक्षण क्षेत्रातली वेठबिगारी समजतो त्यामुळे शिक्षण सेवकांची वेठबिगारी रद्द करावी. आता शिक्षण क्षेत्रात दर्जेदार व गुणवंत शिक्षक येत आहेत. मेरीटमधील विद्यार्थी या क्षेत्रात येत आहे त्यामुळे त्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका शासनाने स्वीकारावी अशा विनंती करतो. शिक्षण सेवक योजना रद्द करावी, शिक्षण सेवकांचा परिवीक्षा कालावधी कमी करावा अशा प्रकारचे हे अशासकीय विधेयक असले तरी आपण हे विधेयक मान्य करणार नाही याची मला कल्पना आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना आपले हे अशासकीय विधेयक मागे घेण्याची विनंती करुन हे विधेयक मागे घ्यावयास लावाल परंतु किमान या अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने आम्हाला आपल्याकडून अपेक्षा आहे की, भविष्यामध्ये तरी या अशासकीय विधेयकाचा विचार करु, शिक्षण सेवक योजना रद्द करु, अशा प्रकारची हमी शासनाने द्यावी अशी विनंती करतो व माझे विचार येथेच थांबवतो.

धन्यवाद.

यानंतर श्री. अजित...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जे अशासकीय विधेयक आणलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, याठिकाणी जी अशासकीय विधेयके चर्चेसाठी येतात त्याकडे मी नेहमीच एक तात्विक विचार म्हणून पाहते. सर्वांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला पाहिजे यासाठी फार मोठी चळवळ उभी राहिली आहे. शिक्षणासाठी जास्तीत जास्त तरतूद करीत आहे असा दावा सरकार करीत आहे. आपण गुरुला पवित्र स्थानी मानतो. गुरुंचा आदर करणे ही आपली संस्कृती आहे. परंतु प्रत्यक्षात गुरुंना न्याय देण्याची वेळ येते त्यावेळी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. आपल्याकडे पूर्वी चातुर्वर्ण पध्दत अस्तित्वात होती, ती पध्दत आपण टाकून दिलेली आहे. जे काम सर्वांना नको आहे ते काम एका विशिष्ट वर्गाला द्यायचे अशी त्यामध्ये एक पध्दत होती. त्याप्रमाणे शासनाने स्वत: शिक्षण सेवक प्रकार निर्माण केलेला आहे. आपण एका बाजूला सांगतो की, शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे तर दुसरीकडे शिक्षण सेवका सारखा प्रकार शासन करीत आहे. आपल्या घरातील मुले आय.टी.सेक्टरमध्ये कामाला जातात तेव्हा आपणाला त्याचा अभिमान वाटतो. कारण त्याठिकाणी प्रतिष्ठा, सन्मान, कामाचे समाधान आणि पैसा आहे. सरकारने एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपण अशातऱ्हेचा एक वर्ग तयार करीत आहोत की, ज्याला ना सन्मान आहे, ना प्रतिष्ठा आहे, ना चांगले मानधन आहे. शिक्षण सेवकांनी मानधनावर काम केले पाहिजे त्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन मिळणार नाही असे सरकार म्हणत असेल तर कळत न कळत विषमतेच्या भूमिकेचे समर्थन करीत आहोत का असा प्रश्न सरकारने स्वत:ला विचारला पाहिजे.

आपण सर्वजण वाचन करतो. परंतु केंद्र सरकार सातत्याने मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्सबाबत सांगत आहे. म्हणजे जी अविकसित देश आहेत त्यांच्या ध्येयपूर्तीची उद्दिष्टये कशी पूर्ण होणार आहेत. एका बाजूला सरकार सांगत आहे की, आम्ही शिक्षणावरील खर्च वाढवित आहोत तर दुसरीकडे शिक्षकांच्या मागण्यांबद्दल शिक्षकांचे समाधान का होताना दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, मराठी शाळांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. इंग्रजी शाळांकडे लोकांचा कल वाढत आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण देण्यासाठी शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यात आली, परंतु त्यांना अत्यंत कमी मानधन दिले जाते. त्या मानधनावर तो कसा काम करु शकेल हा देखील एक प्रश्न आहे. अंगणवाडीत शिकविणाऱ्या शिक्षिकांना अंगणवाडी शिक्षिका असे नाव दिले. सरकारला वाटते की, अशाप्रकारे नामाभिधान केल्यामुळे त्यांना नावाप्रमाणे दर्जा प्राप्त होईल. परंतु तसे समाजामध्ये होत नाही.

सभापती महोदय, आपण येथे शिक्षकांच्या प्रश्नांबाबत बोलत आहोत. मला आणि आपणाला असे राजकारणी माहीत आहेत की, त्यांच्या निवडणुकीमध्ये त्यांच्याशी संबंधित शिक्षण संस्थांमधील शिक्षक पूर्ण वेळ प्रचारक म्हणून काम करीत असतात. मला कोणावर व्यक्तीगत टीका करावयाची नाही. परंतु शिक्षकांचा सन्मान ठेवला गेला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उल्लेख केला की, इतर राज्यांच्या धर्तीवर ही योजना झाली. परंतु मला असे वाटते की, जेथे समाज विकासाचा प्रश्न येतो तेथे जास्तीत जास्त टंचाई करायची आणि जेथे मेगा प्रोजेक्टस असतील त्याठिकाणी जास्तीत जास्त तरतूद करायची असा सरकारचा दृष्टीकोन आहे. कमी मानधन आणि शिक्षण सेवक यामुळे शिक्षकी पेशाचे आकर्षण कमी झालेले आहे. आज शिक्षण सेवक असलेल्या मुलाचे लग्न करावयाचे असेल तर त्यास कोणी आनंदाने मुलगी देईल असे वाटत नाही. मी हे विनोदाने बोलत नाही. नवरा मुलगा डॉक्टर, इंजिनिअर आहे असे आनंदाने सांगितले जाते. परंतु नवरा मुलगा शिक्षण सेवक आहे असे आनंदाने सांगितले जात नाही. आज शिक्षकाला काहीच मान राहिलेला नाही.... (अडथळा ).... शिक्षक आणि शेतकरी यामध्ये फरक आहे. काही शेतकऱ्यांनी दोन-तीन लग्न केल्याचे मला माहीत आहे. ..

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..

त्या ठिकाणी सधन शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना दोन किंवा तीन पत्नी आहेत.अशी उदाहरणे पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पहावयास मिळतील. मी त्या खोलात जाऊ इच्छित नाही.सर्वच शेतक-यांना हे उदाहरण लागू होणार नाही परंतु जे प्रगत आहेत त्यांना हे उदाहरण लागू पडू शकते.काही शेतकरी खूपच प्रगत आहेत परंतु प्रबोधनाच्या बाबतीत मात्र प्रगत नाहीत.शिक्षकांच्या एकूण सामाजिक दर्जामध्ये जर शासनाला काही सुधारणा करावयाची असेल तर त्यासाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे.

माननीय शिक्षण राज्य मंत्री प्रा.फौजिया खान यांच्याकडे अनेक विभाग देण्यात आलेले आहेत. त्या सर्वच विभागासाठी शासनाने आर्थिक तरतूद करावी या मागणीसाठी एक दिवसाचे वेगळे अधिवेशन ठेवावे की काय असा मला प्रश्न पडतो. मनोरुग्णालय ,पुरातत्व विभाग, मराठी शाळा,मराठी भाषा सांस्कृतिक विभाग आणि मराठी भाषा संचालनालय, प्रसार माध्यमे असे अनेक विभाग प्रा. फौजिया खान यांच्याकडे देण्यात आलेले आहेत.समाजामध्ये ज्याप्रमाणे अंगणवाडी सेविकांना असे सांगण्यात येते की, अमुक इतकी डाळ आणि अमुक इतके तांदूळ घेऊन चांगली खिचडी बनवली पाहिजे अशाच प्रकारची स्थिती प्रा. फौजिया खान यांची सरकारने केलेली आहे. अर्थ विभागाची ताकद जोपर्यंत त्यांच्या मागे उभी राहत नाही तोपर्यंत त्यांना आपण सर्वांनी तोफेच्या तोंडी देणे बरोबर होणार नाही.सामूहिक इच्छा शक्ती असेल आणि या विभागाच्या मागे सामूहिक इच्छा शक्ती उभी राहिली तर अशा प्रकाराचे विधेयक आणण्याची वेळ देखील येणार नाही एवढेच सांगून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ना.गो.गाणार (नागपूर विभाग शिक्षक): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी या ठिकाणी जे अशासकीय विधेयक मांडले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

. सभापती महोदय, शिक्षण सेवकासंबंधीचा जी.आर. प्रथम एप्रिल 2000 मध्ये काढण्यात आला होता. त्याविरुध्द उच्च न्यायालयामध्ये पिटीशन्स दाखल करण्यात आली होती.त्यावेळी शासनाच्या वतीने जे शपथपत्र सादर करण्यात आले होते त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की,आर्थिक तरतूद नसल्यामुळे, आर्थिक दृष्टया राज्य चांगल्या स्थितीत नसल्यामुळे आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षण सेवक योजना आम्ही आणत आहोत. एकूण 20 हजार शिक्षकांची नियुती करण्यासाठी आवश्यक असलेला निधी शासनाकडे नाही म्हणून शिक्षण सेवक योजना ही तात्पुरच्या स्वरुपाची आणली जात आहे. अशा प्रकारचे धोरण शासनाने जाहीर केले होते .परंतु फेब्रुवारी 2007 मध्ये शिक्षण सेवक योजनेच्या जी.आर.ला कायदेशीर स्वरुप देऊन शिक्षण सेवकाच्या विरोधातील आपल्या मनातील भूमिका शासनाने घोषित केली होती त्याचा मी निषेध करतो.

सभापती महोदय, शिक्षकांना सेवा संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधनियम करण्यात आला होता. स्टॅबिलीटी,सिक्युरिटी आणि डिसीप्लीन या तीन तत्वांच्या अंमलबजावणीसाठी हा कायदा शासनाने केला होता त्या कायद्याची अंमलबजावणी 16 जुलै 1981 पासून सुरु झाली होती. या कायद्याच्या प्रिएम्बलमध्ये शासनाने समाजाला आणि शिक्षक समुदायाला स्टॅबिलीटी, सिक्युरिटी आणि डिसीप्लीन देण्याबाबत मान्य केले होते त्यानंतर शिक्षक सेवक योजना आणून शासनाने या तीनही तत्वांचा भंग केला आहे. इतकेच नव्हे तर उच्च न्यायालयामध्ये दिलेल्या शपथपत्राचा देखील भंग केलेला आहे.त्याचप्रमाणे दोन शिक्षकामध्येही भेद केलेला आहे.इंग्रजी माध्यमाच्या नो ग्रॅन्ट बेसिसवरील शाळेत ही योजना लागू करण्यात आलेली नाही परंतु मातृ भाषेत शिक्षण देणा-या अनुदानित शाळांना ही योजना लागू आहे. गोरगरीबांचे मुले ज्या शाळेत शिकतात तेथे शिक्षण सेवक योजना लागू करण्यात आली आहे परंतु पैसे वाल्यांची मुले ज्या कॉनव्हेंट स्कूलमध्ये शिकतात त्या ठिकाणी ही योजना लागू


VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 16.25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आली नाही. अशा प्रकारे दोन शिक्षकांमध्ये भेदभाव करण्यात आला आहे.समान कामासाठी समान वेतन हे तत्व येथे लागू नाही म्हणून ही योजना रद्द करण्यात यावी असे मी मत व्यक्त करतो आणि जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्याचे समर्थन करुन माझे भाषण संपवितो.

------

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एका अतिशय चांगल्या विषयासंबंधीचे अशासकीय विधेयक सभागृहामध्ये मांडले आहे. एका चांगल्या विषयाला त्यांनी हात घातल्याबद्दल मी प्रथमत: त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, याठिकाणी एक मुद्दा चर्चिला गेला की, "समान काम व समान वेतन." खरे म्हणजे घटनेतील सर्व तरतुदींचा आपण आदर करतो, घटनेची पायमल्ली होणार नाही याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. आज आपण शिक्षणावर जास्त खर्च केला पाहिजे, आरोग्यावर खर्च केला पाहिजे. त्यासाठी अर्थसंकल्पामधील तरतूद वाढविली पाहिजे. एकीकडे आपण हायटेकच्या गप्पा मारतो. एक पदरी रस्ता असेल तर दोन पदरी करतो, दोन पदरी रस्ता असेल तर चार पदरी करतो आणि चार पदरी रस्ता असेल तर सहा पदरी करतो, उड्डाण पूल तयार करतो. एकीकडे महानगरपालिकांमध्ये अशाप्रकारची अवस्था आहे. आज शहरातील कारखान्यांमध्ये करोडो रुपयांच्या गुंतवणुकी होत आहेत. एकीकडे शहरात श्रीमंती कॉन्सेंट्रेट होत आहे तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागामध्ये, झोपडपट्टयांमध्ये विकासाची कामे करण्यासाठी आपल्याकडे तेवढा निधी उपलब्ध असला पाहिजे. राज्यातील प्रत्येक नागरिकांची क्रयशक्ती समान असली पाहिजे. प्रत्येक नागरिकांचे दरडोई उत्पन्न समान असले पाहिजे. परंतु तसे घडत नाही.

शाळेतील कोणताही शिक्षक हा स्वाभिमानाने उभा राहील, कोणत्याही कौटुंबिक विवंचनेशिवाय उभा राहील याकडे आपण पाहिले पाहिजे. आणि मुलांना शिकविण्यासाठी त्यांची बौध्दिक क्षमता टिकली पाहिजे,त्याची मानसिकता टिकली पाहिजे. त्या मुलांना योग्य प्रकारचे शिक्षण देता आले पाहिजे, व या देशाचे नागरीक घडविता आले पाहिजेत. शिक्षणाच्या धोरणामध्ये आपल्याला अजून काही अमूलाग्र बदल करावे लागतील. आज आपण मराठी शाळांना मान्यता न देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु राज्यात अजूनही अशा वाडया, तांडे व गावे आहेत की त्याठिकाणी मुलांच्या आई-वडिलांची अशी मानसिकता असते की, तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्हा परिषदेच्या सर्कलचे मोठे गाव असेल त्याठिकाणी किंवा जिल्हयाच्या ठिकाणी आपल्या मुलांना शिकविण्यास पाठविले पाहिजे. परतु जर 3 कि.मी. किंवा 5 कि.मी. च्या आतमध्ये शाळा नसेल तर मुलींना शिकविण्यास पाठविले जात नाही.त्यामुळे ज्या गावामध्ये चौथीपर्यंत शाळा असेल तर त्या गावातील मुलगी चौथीपर्यंतच शिक्षण घेते, ज्या गावामध्ये इयत्ता सातवी पर्यंत किंवा दहावीपर्यंत शाळा असेल तर मुलगी तेवढेच शिक्षण घेते. ज्या गावांमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

ॲड. उषा दराडे....

अकरावी-बारावीपर्यंत शाळा असेल तर त्या गावातील मुलगी त्याच्या पलिकडील शिक्षण घेत नाही. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर याचा फार मोठा दूरगामी परिणाम होतो. विकासाच्या दृष्टीने वाईट परिणाम होतो.

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते म्हणाले की, शिक्षणावरील खर्च हा खर्च नसून ती गुंतवणूक आहे. त्यांचा विचार हा अत्यंत सुरेख आहे. उद्याचा देश कोण घडविणार आहे, स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये स्वत:ला झोकून देऊन तन-मन-धनाने या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले पाहिजे या जाणिवा त्या काळातील स्वातंत्र्याच्या चळवळीमधून निर्माण झाल्या आहेत. तो देशाभिमान आणि देशाच्या विचारांची पावले कोण टाकणार आहे? म्हणजेच उद्या मूठभर श्रीमंतांचीच लेकरे उच्च शिक्षण घेणार आहेत. उद्या एल.एल.बी. फायनल परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वकिलीचा व्यवसाय करण्याच्या दृष्टीने प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्यांना पुन्हा प्रवेश परीक्षा द्यावी लागणार आहे. त्या निर्णयाला स्थगिती दिल्याचे मला समजले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, अशा परीक्षांमध्ये आमची गरिबांची मुले उत्तीर्ण होणार आहेत काय? ग्रामीण भागात कॉलेजमध्ये न जाता एल.एल.बी. ची परीक्षा देणारा मुलगा पोटगीच्या केसेस, जमीन संपादनाच्या केसेस, मोटार अपघाताच्या केसेस चालवू शकतो. त्याला रेव्हेन्यूमधील किंवा सिव्हिल प्रोसिजर कोडमधील काही समजणार नाही. परंतु तो हा व्यवसाय करु शकतो. त्याची बौध्दिक कुवत वाढविणे आणि ही विषमता संपुष्टात आणणे ही शासनाची व समाजाची जबाबदारी आहे. म्हणून सर्वांना शिक्षण देणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही तर हा संपूर्ण समाजाचा विषय झालेला आहे. या क्षेत्रामध्ये सामाजिक परिवर्तनाबरोबर समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने मराठी शाळांना मान्यता न देण्याचा घेतलेला निर्णय बदलला पाहिजे.

इंग्रजीच्या शाळांमधून मोठया प्रमाणावर शुल्क वसूल करण्याचे त्यांना अधिकार दिले आहेत. त्यापेक्षा तुम्ही त्या शाळांना अनुदान द्या, त्यांच्या कर्मचाऱ्यांना तुम्ही पगार द्या. ज्याप्रमाणे मराठी शाळा चालतात त्याप्रमाणे इंग्रजी शाळा चालू द्याव्यात. आपण इंग्रजी शाळांचे लाड कशासाठी करीत आहात? आज गरीब माणसे,मजूरी करणारी बाई सुध्दा नर्सरीमध्ये मुलाला  टाकण्यासाठी दहा-दहा हजार रुपये डोनेशन देत आहे. हे इंग्रजी शाळेचे वेड सर्वांना लागले आहे. तरीसुध्दा त्या इंग्रजी शाळेमध्ये आपण शेवटपर्यंत त्या मुलाला शिकवू शकणार आहोत काय? आज तालुका पातळींवर इंग्रजी

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

ॲड. उषा दराडे....

माध्यमांची विद्यालये आहेत काय? समजा त्या मुलाने चौथीपर्यंत किंवा सातवीपर्यंत इंग्रजीमधून शिक्षण घेतल्यानंतर आठवी-दहावी-बारावीला ते काय करणार आहे? या सर्व गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. याठिकाणी करार पध्दतीने तीन वर्षासाठी शिक्षण सेवकाला ठेवतो ही अत्यंत निंद्य आणि मानवतेला काळीमा लावणारी गोष्ट आहे. त्यामधून कसा मार्ग काढता येईल? शिक्षण सेवक ही संकल्पना शासनाने संपुष्टात आणली पाहिजे. याठिकाणी माननीय शिक्षण राज्यमंत्री माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना हे विधेयक मागे घेण्यासाठी विनंती करतील. आणि माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे देखील शासनाला सहकार्य करतील त्याबद्दल मला याठिकाणी किंतु वाटत नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ...

परंतु हे करीत असताना आमच्या राज्यमंत्री महोदया सुध्दा एक शैक्षणिक संस्था चालवितात. त्यांना सुध्दा यातील बरेच प्रश्न माहीत आहेत. त्यांच्याकडे अनेक खाती असली तरी त्या सक्षमपणे चालवू शकतात. खरे म्हणजे आमच्या पक्षाने त्यांचे प्रमोशन का केले नाही असा प्रश्न मला पडतो. परंतु त्या चांगल्या पध्दतीने धडाडीने काम करीत आहेत. मला खात्री आहे की, कोणाच्याही राजकीय दबावाला बळी न पडता शिक्षण सेवकांचा प्रश्न सोडविण्यामध्ये आमच्या राज्यमंत्री यशस्वी होतील असा मी आत्मविश्वास बाळगते आणि माझे भाषण संपविते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी शिक्षण सेवकांच्या संदर्भात जे अशासकीय विधेयक मांडलेले आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मी कमीतकमी शब्दात थेट काही मुद्दे मांडणार आहे. पहिला मुद्दा असा आहे की, शिक्षण सेवकांच्या बाबतीत सुरुवातीला हे तात्पुरते आहेत असे शासनाने म्हटले होते. पण असे म्हणत असताना महाराष्ट्रातील सगळ्यांचीच दिशाभूल केली आणि मार्च, 2007 ला ते सेवाशर्तीमध्ये रूपांतरित केले आणि इथेच एका अर्थाने शासनाने शिक्षण क्षेत्रावर पहिला मोठा आघात केला. दुसरा आघात असा केला की, शासनाच्या अनुदावर असलेल्या शाळांमध्ये नेमताना शिक्षण सेवक नेमा पण शासनाच्या अनुदानाशिवाय चाललेल्या ज्या शाळा आहेत, इंग्रजी माध्यमाच्या वगैरे ज्या शाळा आहेत त्या ठिकाणी मात्र नियमित शिक्षक नेमा असे म्हटले जाते. पण ते संस्थाचालक त्यांच्यावर निरंकुश सत्ता चालवितात. त्यांना कागदावर वेतनश्रेणीनुसार पगार दाखविला जातो पण प्रत्यक्षात हजार दोन हजार रुपये सुध्दा पगार दिला जात नाही. महाराष्ट्र राज्य पुरोगामी आहे असे म्हटले जाते पण इथेच शिक्षणाच्या क्षेत्रात प्रचंड मोठे शोषण आणि तेही चांगल्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकाचे सर्रासपणे होते हे उघड सत्य सर्वांना माहीत आहे. शासन आणि आम्ही सगळेच एका अर्थाने असहाय्य भूमिका घेत आहोत. ही बाब अत्यंत संतापजनक आहे. हे अशासकीय विधेयक आहे. एक तांत्रिक मुद्दा म्हणून हे विधेयक मागे घेण्याची विनंती सन्माननीय सदस्यांना आपण करु पण शासनाने सुधारित विधेयक मांडावे हा सभागृहाचा सेंस शासनाने लक्षात घ्यावा आणि त्याप्रमाणे विधेयक मांडत असताना त्यामध्ये याही मुद्याचा उल्लेख करावा आणि अनुदानितसाठी वेगळी योजना आणि कायम विनाअनुदानितसाठी वेगळी योजना असे न ठेवता एकाच स्वरुपाची योजना आली पाहिजे असा मी पहिला मुद्दा या ठिकाणी मांडत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एका वर्षाच्या बाबतीत जो मुद्दा मांडला तो अतिशय चांगला मुद्दा आहे. पण त्या ठिकाणी एक नाही आणि तीन नाही तर दोन वर्षाचा प्रोबेशन कालावधी ठेवावा. जुने जे सूत्र होते त्यानुसार तो चांगला आहे की नाही, गुणवत्ता सिध्द करतो की नाही हे तपासण्याकरिता दोन वर्षाचा तात्पुरता कालावधी ठेवला तरी मी समजू शकतो. तेवढा कालावधी दिला गेला पाहिजे. पण शिक्षण सेवकांचा तीन वर्षाचा कालावधी हा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

निश्चितपणे संतापजनक आहे असा मी जाणीवपूर्वक उल्लेख करतो. एक वर्ष नाही तर निदान दोन वर्षाच्या संदर्भात तरी शासनाने तडजोड करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतरचा माझा मुद्दा मानधनाबाबतचा आहे. मानधन हा शब्द दिसायला गोड आहे पण त्यामध्ये अशी बाब लपली आहे की, आता तुम्ही जे काम करावयाचे आहे ते सेवाभावी पध्दतीने म्हणजे इन द सेन्स ऑफ सर्व्हिस करावे आणि सरकार त्यासाठी त्यांना काही तरी मानधन देते. खरे म्हणजे शिक्षक करीत असतो काम आणि त्याचा त्याला मिळावयास पाहिजे दाम पण आपण त्याला मानधन असे गोंडस नाव ठेवले. त्याला मानधन हा शब्द पूर्णपणे चुकीचा आहे. पगार म्हटले, सॅलरी म्हटले, वेतन म्हटले की मग त्यामध्ये मूळ पगार आला. त्यामध्ये वेतन बंध, महागाई भत्ता वगैरे सगळे येते. हे सगळे होत नसेल तर निदान रेम्युनरेशन किंवा मेहनताना हा शब्द त्या ठिकाणी प्रस्थापित करण्याची आवश्यकता आहे. मेहनताना असा शब्द आल्यामुळे काम आणि त्याच्याशी निगडित असलेला दाम ही संकल्पना किंवा व्याख्या त्या ठिकाणी प्रस्थापित होईल. म्हणून यामध्ये सुधारणा करीत असताना जाणीवपूर्वक त्या ठिकाणचा मानधन हा शब्द पूर्णपणे काढला जावा आणि त्याऐवजी वेतन किंवा रेम्युनरेशन हा शब्द आणला जावा अशी मी दुसरी सूचना करीत आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात माझा तिसरा मुद्दा असा आहे की, जे लमसम मानधन दिले जात आहे हा प्रकार सुध्दा चुकीचा आहे. खरे म्हणजे त्याला मूळ सॅलरी वगैरे सगळेच मिळावयास पाहिजे. पण एवढे जरी करता येत नसले तरी किमान बेसिक पगाराएवढा तरी मेहनताना त्याला दिला जावा

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...

किमान 2 वर्षासाठी तो सहन करील, त्यांना महागाई भत्ता मिळणार नाही. परंतु त्यांना दरवर्षी वेतनवाढ दिली जावी. या गोष्टी त्यामध्ये असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी एक कमालीचा महत्वाचा मुद्दा सांगणार आहे. 2020 साली जागतिक महासत्ता होण्याचे आपण स्वप्न बघत आहोत. आमची चांगली पिढी घडावी असे स्वप्न बघत आहोत. दुस-या बाजूला 1,350 डीएड कॉलेजेस काढण्यात आली आहेत, सुमारे 650 बीएड कॉलेजेस आहेत. तसेच एम.फिल. किंवा पी.एचडी. झालेली शिक्षकांची संख्या सुध्दा मोठया प्रमाणात आहेत. परंतु या शिक्षकांना शोषण होत असल्याची जाण आली तरी ते नाईलाज म्हणून या क्षेत्राकडे वळत आहेत. यापेक्षा मी क्लासेस चालवू शकेन किंवा मी अन्य ठिकाणी जाईन अशी भावना त्यांच्या निर्माण होते. त्यातून शिक्षण क्षेत्रात एक काळी समांतर व्यवस्था महाराष्ट्रात उभी राहिलेली आहे. मग कोणी टयुटोरियल्स काढतात, कोणी क्लासेस काढतात, कोणी खाजगी कोचिंग क्लासेस काढतात. तेथे सुध्दा या मुलांकडून 17 नंबरचा फॉर्म भरुन एसएससी बोर्डाच्या परीक्षेला बसण्याची व्यवस्था केली जाते. तसेच ओपन युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश देण्याची यंत्रणा असल्यामुळे खाजगी क्लासेस सुध्दा ॲज गुड ॲज रेग्युलर स्कूल्स ॲन्ड कॉलेजेस म्हणून एस्टाब्लीश होत आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा समांतर शिक्षण व्यवस्था सरकार जाणीवपूर्वक विकसित करीत आहे. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून एका वर्गाला बाजूला ढकलत आहे. सरकारचे लपलेले धोरण काय आहे, मला जे जाणवले ते धोरण भयंकर आहे. ते म्हणजे " Total and gradual withdrawal of financial participation and not investing a single paisa for education." शिक्षणावर पैसाच खर्च करावयाचा नाही आणि हळूहळू शिक्षणातील सहभाग काढावयाचा. करा फी गोळा आणि चालवा तुमच्या शाळा, असा संदेश देऊन एक वेगळया शाळा महाराष्ट्रात निर्माण केल्या जात आहेत. हे सर्व कोठे तरी थांबविण्याची नितांत आवश्यकता आहे. म्हणून चांगल्या दर्जाचे व गुणवत्तेचे शिक्षक तुमच्या आमच्या औपचारिक शिक्षण व्यवस्थेमध्ये असणे आवश्यक आहे. ज्या अनुदानित शाळा आहेत, गोरगरीबांच्या शाळा आहेत. तेथे हे शिक्षक यावेत असे वाटत असेल तर त्यांना वेतनश्रेणी दिली पाहिजे. शिक्षण सेवकांचा कालावधी कमी केला पाहिजे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.भगवान साळुंखे.....

सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या जागा त्यात एससी, एनटीच्या जागा भरण्यासाठी जाहिरात दिली जाते. परंतु हे सर्व खुले सत्य असते. एखादा उमेदवार 5 लाख रुपये देऊन नोकरी मिळवितो. हे सर्व ठरलेले असते. आता तर सर्वांच्या संवेदनाच बोथट झालेल्या आहेत नव्हे, त्या संपलेल्या आहेत. मग अशा परिस्थितीत तेथे चांगल्या दर्जाचे वा गुणवत्तेचे शिक्षक निवडले जाण्याची शक्यताच संपलेली आहे. म्हणून मी शासनाला या विधेयकाच्या निमित्ताने सुधारणा सुचवित आहे. विद्यापीठात जशी निवड समिती असते, याठिकाणी सुध्दा निवड समिती गठित करावी. त्यातून चांगले शिक्षक कसे मिळतील अशाप्रकारची यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, शिक्षण सेवक हा खाजगी मॅनेजमेंटचा शिक्षक आहे असा शिक्का मारला जातो आणि तो असहाय होतो, त्यांचा तो बटिक बनतो. कारण त्याला सातत्याने असे ऐकविले जाते की, तू आमचा नोकर आहेस, तो विद्वान असताना सुध्दा बटिक बनतो. हे चित्र बदलून त्याला चांगला शिक्षक म्हणून ठेवावयाचे असेल तर महामंडळ निर्माण करुन त्याद्वारे त्याची निवड केली पाहिजे. सहकारी सोसायटीत सचिव त्या कॅडरचे असतात ते शासकीय असतात. संस्थेमध्ये मात्र कोणत्या तरी गावचे स्थानिक रहिवासी चेअरमन असतात. संचालक मंडळ असते. सचिव या सोसायटीतून त्या सोसायटीत जाऊ शकतात, त्याप्रमाणे शिक्षकांना सुध्दा जाता आले पाहिजे अशी व्यवस्था पाहिजे. तो त्याच संस्थेचा शिक्षक असे न होता महामंडळाचे शिक्षक असतील आणि ते कोणत्याही संस्थेत जाऊ शकतील. अशाप्रकारची यंत्रणा निर्माण केली तर त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहील. तसेच ते शिक्षणाला चांगला न्याय देऊ शकतील. यासाठी कसे व काय करता येईल यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी सूचना करुन मी येथेच थांबतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शिक्षक मतदार संघामध्ये भविष्यात आपले प्रतिनिधीत्व बलवान व्हावे, आपला मतदार राखला जावा हा एक उद्देश असू शकतो. परंतु शिक्षण सेवक हा अवमानकारक शब्द वापरला असल्याच्या भावना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या विधेयकावर बोलताना व्यक्त केल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

श्री. दिवाकर रावते...

"शिक्षण सेवक" या शब्दा ऐवजी "परिविक्षीत शिक्षक" असा शब्दप्रयोग करावा असे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितलेले आहे. शिक्षण सेवक या ऐवजी "परिविक्षीत शिक्षक" असे म्हणण्याला माझा कोणताही आक्षेप नाही. त्याला "परिविक्षीत शिक्षक" म्हटले तरी चालेल. शिक्षण सेवक ही संज्ञा येण्यापूर्वी या राज्यामध्ये शिक्षकांच्या मोठया प्रमाणावर जागा रिक्त होत्या. त्यावेळी शिक्षकच नव्हते. 5 वर्गांसाठी एक शिक्षक अशी महाराष्ट्रामध्ये निश्चितच परिस्थिती होती. आपण त्यावेळची शिक्षक आमदारांची भाषणे वाचलीत तर महाराष्ट्रातील शाळांमधून शिक्षक कधी भरणार असाच आग्रह त्यांनी धरलेला असल्याचे दिसून येईल. म्हणजे 100 शिक्षकांची आवश्यकता असेल तेथे 50 ते 55 शिक्षक असायचे. शिक्षक उपलब्ध नव्हते. शिक्षणाची प्रचंड कुचंबणा होत होती. त्यावेळी आपल्या पक्षाच्या पुढा-यांना खूष करण्याकरिता, त्यांना जिवंत ठेवण्याकरिता बी.एड, डी.एडची कॉलेजेस निर्माण करण्यात आली. त्यामुळे शिक्षक निर्मिती प्रक्रिया एवढया मोठया प्रमाणावर झाली की त्यामुळे बेकार शिक्षकांची संख्या वाढली. एक वेळ अशी होती की शिक्षण क्षेत्रात शिक्षक उपलब्ध होत नव्हते आणि त्यानंतर शिक्षक बेकार होण्या इतकी शिक्षकांची संख्या वाढली. त्यावेळी विधानपरिषदेतील शिक्षक आमदारांनी प्रचंड रेटा लावला होता. सन्माननीय सदस्य कपिल पाटील हे त्यावेळी नव्हते. शिक्षणाची जी आबाळ निर्माण झाली होती ती शिक्षकांनी इतकी लावून धरली की शेवटी शासनाला त्याबाबतीत विचार करावा लागला. शिक्षणावर अर्थसंकल्पामध्ये एवढया मोठया प्रमाणावर तरतूद होत असताना शिक्षणाच्या संदर्भात केन्द्र सरकारने कायदा केल्यामुळे सर्व राज्यांना शिक्षणावर अधिक तरतूद करणे भाग पडले.

सभापती महोदय, मी देखील ग्रामीण भागातील कार्यकर्ता आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी ग्रामीण भागामध्ये रात्रंदिवस फिरत होतो, बैठका घेत होतो. कारण मला ते जाणवत होते. "शिक्षण सेवक" या शब्दाची निर्मिती झाल्यानंतर त्यामधील एक गोष्ट मला आवडली ती म्हणजे त्याने 3 वर्षे शिक्षण सेवक म्हणून काम केल्यानंतर तो पूर्णवेळ शिक्षक म्हणून असेल. तीन वर्षानंतर तो शिक्षकाच्या प्रवाहात येईल. त्यावेळी पदवीधर झालेले युवक पुढा-याच्या बॅगा घेऊन फिरत होते. पत्रे वगैरे लिहिण्याचे काम बेकार तरुण करीत होते. ते पुढा-यांच्या बॅगा उचलीत होते. ते त्यांचे दुर्दैव होते. शिक्षण सेवक हा शब्द अवमानकारक वाटत असेल तर तो बदलावा. त्याबद्दल माझा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

आक्षेप नाही. परंतु तीन वर्षाकरिता शिक्षण सेवक म्हणून काम केल्यानंतर त्याला नोकरीची हमी मिळते हा त्यावेळचा विषय होता. त्यावेळी तो शब्द मला स्वागतार्ह वाटला.

सभापती महोदय, शिक्षण सेवक हा शाळेमध्ये अर्धा धडा शिकवितो आणि शिक्षक पूर्ण धडा शिकवितो अशातला भाग नाही. "शिक्षण सेवक" या शब्दामुळे शिक्षण सेवकांची अवहेलना होत आहे असे मला वाटत नाही. शिक्षण सेवक हा शब्द चांगला आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

एकवेळ ते चालेल सुध्दा. परंतु सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर शिक्षकांचे पगार 20 ते 25 हजार रुपये झाले. वरिष्ठ शिक्षकांचा पगार 40 हजार रुपये झाला. एकाच कुटुंबातील पती पत्नी शिक्षक असतील तर त्यांच्या घरात पगाराच्या माध्यमातून महिन्याला 75 ते 80 हजार रुपये जातात. शिक्षण सेवकाला मात्र महिन्याला 3 हजार रुपये दिले जातात. ही खरी अवहेलना आहे. त्यांनी पण आंदोलने करावीत का? पहिल्या अधिवेशनावर सतत हीच आंदोलने. अमुक तमुक राखून ठेवतो. राखीव जागा घेतो. परंतु जागा भरल्या जात नाहीत. अधिकारी फार हुशार आहेत. स्वत:ला जागा मिळवितात. फ्लॅट मिळवून घेतात. परंतु आपल्याच सहकाऱ्यांची मागणी कशी रोखून ठेवायची याबाबतीत ते हुशार आहेत. शासनाच्या जी.आर.प्रमाणे राखीव जागांमध्ये अमुक जातीला 3 टक्के, अमुक जातीला 2 टक्के, अमुक जातीला 4 टक्के जागा राखून ठेवल्या आहेत. 100 टक्के जागा भरल्या तर राखीव जागा पूर्णत: भरल्या जातील. परंतु एकच जागा भरायची, दोनच जागा भरायच्या. हळूहळू रतीब सुरु ठेवायचा आणि यांना वंचित ठेवायचे. वंचित ठेवायची प्रवृत्ती खात्यामध्ये अधिक असल्याचे दिसून येते. शिक्षण सेवक ही कन्सेप्ट चांगली आहे. राज्याच्या तिजोरीवर अधिक भार पडत नाही आणि शिक्षकांची आबाळ होत नाही. सुरुवातीला 3 हजार रुपये महिना मानधन अशा अवमानकारक परिस्थितीत त्यांना नोकरी करावी लागते. माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांच्या भाषणातून आणखी एक गोष्ट पुढे आली आहे. त्यांच्या भाषणातून असे कळले की, संस्थाचालक शासनाला दाखविण्याकरिता त्यांच्या पटावर पूर्ण पगार दाखवितात आणि प्रत्यक्ष शिक्षण सेवकाला महिन्याला फक्त 1 हजार रुपये देतात. परंतु तुमच्या चांगल्या शिक्षकांनी स्वाभिमान गुंडाळून 1 हजार रुपये घेऊन 15 हजाराच्या रकमेवर सही का करतो? शिक्षण सेवकाला निदान 3 हजार रुपये तरी पगार मिळतो. हा विपरीत विषय पुढे आला. या संदर्भातील विधेयक सभागृहापुढे चर्चेला येईल त्यावेळी मी महाराष्ट्रातील शिक्षण पध्दतीवर बोलणार आहे. मी एक सूचना केली होती की, कर्मचाऱ्यांचे पगार ज्याप्रमाणे त्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग केले जातात त्याच धर्तीवर शिक्षकांचे पगार त्यांच्या बँक खात्यामार्फत दिले जावेत. असे केले तर शिक्षकांचे भले होईल. संस्था चालकांकडून होणारी लुबाडणूक थांबेल. शिक्षण सेवक वाईट शब्द आहे असे मी म्हणणार नाही. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना तो कमीपणाचा वाटत असेल. त्यांनी शिक्षण सेवक ऐवजी शिक्षक परिविक्षीत असा बदल सुचविला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

आहे. याबद्दल आमचा आक्षेप असण्याचे कारण नाही. शिक्षकी पेशातील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखला पाहिजे. शिक्षकांना समाजात सन्मान असला पाहिजे. शिक्षकांना फार मोठा मान असल्याचे आपला इतिहास सांगतो. ती आपली परंपरा आहे. शिक्षकाला गुरुचे स्थान दिले जाते. समाजामध्ये गुरुला मोठा मान असतो. तो मान कसा राहणार? तुमच्या शब्दामुळे राहणार का मला माहिती नाही. त्यांनी शिकविल्यामुळेच विद्यार्थ्यांना आदर वाटतो. गुरुंनी आपल्या कर्तृत्वाने मान मिळवायचा असतो. शिक्षकाला कोणत्या नवीन उपाधीची गरज नाही. सहाव्या वेतन आयोगामुळे फार मोठा पगार घेणाऱ्या शिक्षकांबद्दल आमची तक्रार नाही. परंतु त्याच्या जवळपास नको, किमान 40 ते 50 टक्क्यापर्यंत मानधन देण्याचा विचार केला पाहिजे. तो त्याच्या घरात गेल्यानंतर शेजारचा शिक्षक 20 हजार रुपये पगार घेत असताना शिक्षण सेवकाची पत्नी म्हणते, तुम्ही 3 हजार रुपयात काम करता? अशी त्या शिक्षण सेवकाची अवहेलना होत आहे. तेव्हा मानधनाबाबत विचार झाला पाहिजे ही आग्रहाची भूमिका मांडतो. भविष्यात 3 वर्षे सेवा झाल्यानंतर संस्थेच्या मर्जीवर नाही तर पूर्णवेळ शिक्षकाचा दर्जा मिळाला पाहिजे. दोन वर्षानंतर तो कन्फर्म होईल. मग पुढील तीन वर्षे त्याने शासनाला सहकार्य करुन स्वत:च्या कर्तृत्वाने झीज सोसून काम केले असेल तर पूर्णवेळ शिक्षक म्हणून त्याची नेमणूक झाली पाहिजे एवढी आग्रहाची भूमिका मांडून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

---------

नंतर 3ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्र.1-मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती विनियमन, अधिनियम 1977 यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक 2010 सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडले आणि या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. ना.गो. गाणार, श्री. भगवानराव साळुंखे व श्रीमती उषा दराडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

महोदय, या अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून अत्यंत चांगली चर्चा या ठिकाणी घडवून आणली आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, चर्चेदरम्यान विशेष करुन सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी जी भूमिका मांडली ती संतुलित स्वरुपाची म्हणता येईल. विधेयकाच्या निमित्ताने सांगायचे झाले तर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी प्रामुख्याने तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यातील पहिला मुद्दा म्हणजे शिक्षण सेवक या नावाऐवजी शिक्षण परिविक्षीत असे समजावे. दुसरा मुद्दा म्हणजे परिविक्षाधीन कालावधी हा तीन वर्षाऐवजी एक वर्षाचा ठेवावा आणि मानधनाऐवजी वेतन अशा तीन सूचना त्यांनी केलेल्या आहेत. त्यातील पहिल्या मुद्यावर सन्माननीय सदस्यांनी जास्त भर दिला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शिक्षण सेवकांच्या नावामुळे शिक्षकांचा अवमान होतो ही भावना व्यक्त केली आहे. मला मनापासून वाटते की, प्रतिष्ठा हा विषय खरे तर परसेप्शनशी निगडीत आहे. आपण कशाला सन्मान आणि अवमान मानतो हा विषय परसेप्शनचा आहे. शिक्षण सेवक आपल्या कल्पनेनुसार कमी दर्जाचा आहे, परंतु आपण ज्यावेळी डिग्नीटी ऑफ वर्क म्हणतो, शिक्षकांना सन्मान जास्त असावा हे मानताना इतर मुल्यांचे स्थान कमी हे मला योग्य वाटत नाही, असेही मला सांगितले पाहिजे. हा नामोक्लेचरचा भाग योग्य नाही, ते परसेप्शन असू शकते की सेवक हा कमी दर्जाचा शब्द आहे त्याबद्दल विचार होऊ शकतो पण ज्यावेळी ही योजना राज्यात आली तेव्हा देशातील अन्य राज्यांमध्ये सुध्दा अशीच योजना अमलात आणली गेली. त्यात वेगवेगळ्या प्रकारे नामोक्लेचर देण्यात आले आहेत. गुजरातमध्ये मानधन पध्दतीवरच ही योजना सुरु करण्यात आली व त्यातील शिक्षकांना "विद्या सहाय्यक" असे नामाभिधान दिले, राजस्थानमध्ये "शिक्षणकर्मी" तर मध्य प्रदेशात "शिक्षण हमी योजना" अशी वेगवेगळी नामाभिधाने दिली गेली. परिस्थिती अशी निर्माण झाली की



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.........

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे तातपुरत्या मानधनावर ही योजना सुरु करणे तेव्हा शासनाला अनिवार्य होते. आपला मुद्दा हा सन्मानाशी निगडीत आहे परंतु शब्दात सन्मान आहे की नाही हे मात्र आपल्याला तपासता येणार नाही कारण तो परसेप्शनचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

त्याबद्दल जास्त चर्चा न केलेली बरी असे मला वाटते. आपला मुळ मुद्दा हा त्याच्याशी निगडीत नाही. गोरगरीब, दीन, दलित, शोषितांना शिक्षण मिळावे या करिता महापुरुषांनी वेचलेल्या आयुष्याचा इतिहास आपण जेव्हा वाचतो तेव्हा "सेवाभाव" या एकमेव शब्दावर तो केंद्रीत झाला असल्याचे आपल्याला ठळकपणे दिसून येते. शिक्षण महर्षी कै. भाऊराव पाटील यांनी गोरगरीबांना शिक्षण देण्यासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन केली होती व आज या शिक्षण संस्थेचा वटवृक्ष झाल्याचे आपल्याला दिसून येते. परंतु गोरगरीब, चिल्ल्या पिल्यांची खळगी भरण्यासाठी सुरु केलेली मूठभर धान्य योजना असो किंवा प्रसंगी आपल्या पत्नीचे विकावयास लागलेले मंगळसूत्र असो या बाबी सेवाभावी विचारांच्या सर्वोच्च मापदंड आहेत असे मी मानते. सेवाभावाशिवाय आपल्याला शिक्षणाची कल्पना सुध्दा करता येणार नाही. शिक्षकांना काहीच पैसे देऊ नये, त्यांनी केवळ सेवाच करावी अशी माझी भूमिका नाही परंतु ज्यांना 25-25,50-50 हजार रुपये पगार मिळतो त्यांचे जे काम आहे, जी सेवा आहे त्याच्या तुलनेत ते पैसे पुरेसे आहेत काय? याचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे. आपण जो पैसा देतो ते शेवटी मानधनच असते. कारण श्रम व मेहनत ही वेगवेगळी आहे. या ठिकाणी मेहनताना असा शब्द वापरलेला आहे परंतु मी सांगू इच्छिते की, मेहनताना म्हणजे फिजिकल लेबर व फिजिकल लेबरसाठी आपण पैशाची तुलना करु शकतो. परंतु शिक्षण देण्याचे काम हे शिक्षण दान आहे व शिक्षणदानामध्ये आपण मानधन देत आहोत. मानधन हा अपमानास्पद शब्द आहे असे जे म्हणणे आहे ते मला मान्य नाही. सरस्वतीची सेवा करणे हे काही अयोग्य आहे असे मला वाटत नाही. सरस्वतीचे सेवक राहिलो म्हणजे आपण इश्वराचे सेवक राहिलो तर त्यामध्ये अयोग्य काय आहे ? असे म्हणणे अयोग्य आहे असे मला स्वत:ला तरी वाटत नाही. शेवटी प्रत्येकाने काय विचार करावयाचा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मला शिक्षण क्षेत्राबद्दल उल्लेख करावयाचा आहे. शिक्षणाबद्दल आपण जेव्हा चर्चा करतो तेव्हा त्यामध्ये शिक्षक हा त्यातील एक घटक होऊ शकत नाही. सेवाभावाबद्दल मी उल्लेख केलेला आहे. शिक्षकाला आयसोलेशनमध्ये धरणे हे संपूर्ण शिक्षण प्रक्रियेमध्ये योग्य नाही. शासन असो, लोकप्रतिनिधी असो, शिक्षक असो, अधिकारी असो, ब्युरोक्रॅसी असो, समाज



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

असो या ठिकाणी सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी सांगितल्या प्रमाणे ही जबाबदारी केवळ शासनाचीच आहे असे नसून ती संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. जबाबदारी बद्दल आपण बोलतो तेव्हा या निमित्ताने मला एक सांगावयाचे आहे की, आपले व्हीजन क्लिअर आणि अनॲम्बीशिअस असणे आवश्यक असते. येथे शिक्षण सेवकाच्या मानधनाच्या बाबतीत ब-याच सन्ममाननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. परंतु जेव्हा शिक्षणाची चर्चा होते तेव्हा आपण आपला फोकस लूज करतो असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आपले व्हीजन काय आहे, कशासाठी आपण शिक्षण देत आहोत याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. मला या सभागृहात वारंवार अनुभव आला आहे की, शिक्षणावर जेव्हा जेव्हा या ठिकाणी चर्चा होते तेव्हा तेव्हा फोकस सोडून काही वेळेस बोलले जाते. शिक्षणाबद्दल बोलावयाचे झाले तर आपल्याला असे म्हणता येईल की, Unless there is a vision, there can be no direction. No vision, No direction. No direction, No mission. No mission, No dedication. No dedication, No action. No action, No tension. No tension, No evaluation. No evaluation, No education. If there is no education then, there is no question of building the Nation

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

अशी परिस्थिती शाळांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. आज शिक्षणा संबंधी वेगवेगळा अभ्यास व सर्व्हे होत आहे. आज काही भागांमध्ये दहावीच्या विद्यार्थ्याला लिहिता, वाचता येत काय असा प्रश्न आपल्यासमोर उभा आहे. त्यामुळे एखादी पॉलिसी फ्रेम करताना काही बाबी डोळ्यासमोर ठेवून त्याप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक असते. त्याप्रमाणे आम्ही निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, शिक्षकांसाठी काहीच तरतूद करावयाची नाही. शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण करावयाचे. परंतु अशी परिस्थिती नाही. आज सरकार शिक्षणावर जवळपास 25 हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. त्याशिवाय शिक्षणासाठी हितकारक निर्णय घेत आहे. अशाप्रकारचा सरकारने शिक्षण सेवकाचा निर्णय घेतला. यापूर्वी शिक्षकाला 5 वर्षे शिक्षणसेवक म्हणून काम करावे लागत होते. परंतु त्यामध्ये बदल करुन आपण ही मर्यादा 3 वर्षांवर आणली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपण शिक्षकांना ॲश्युअर्ड सर्व्हीस देत आहोत. कारण बारावी झाल्यानंतर डी.एड.करता येते आणि साधारणत: वयाच्या 19-20 वर्षात तो डी.एड.होता. त्यानंतर तो शिक्षण सेवकाच्या सीईटी परीक्षेत उत्तीर्ण होऊन शिक्षण सेवक होऊ शकतो. म्हणजे त्यास वयाच्या 21 व्या वर्षी ॲश्युअर्ड सर्व्हीस मिळते. तेव्हा आपण ही सकारात्मक बाजू देखील पाहिली पाहिजे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, तीन वर्षे शिक्षण सेवक म्हणून काम केल्यानंतर "शिक्षक" म्हणून नियुक्ती होण्या संदर्भातील कागदपत्रे आणखी दोन-तीन वर्षे फिरत राहतात. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शिक्षण सेवक म्हणून तीन वर्षे पूर्ण केल्यानंतर he will be deemed to be permanent. या संदर्भातील कागदपत्रांची पूर्तता होत राहील परंतु त्याने तीन वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यास परमनंट होण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही. परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याचा विचार केला तर लिगली आणि फायनान्शिअली शासनाला फिजीबल होणार नाही असे मला वाटते.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

सभापती महोदय, सरकार समोर अनेक आव्हाने आहेत. काही नियमित, काही अनियमित आहेत. शिवाय रस्ते, वीज,पाणी इत्यार्दींबाबत अनेक प्रश्न आहेत. काही मानव निर्मित आव्हाने आहेत. तेव्हा फायनान्शिअल रिसोर्सेसचा विचार करता आपणास प्रत्येक क्षेत्राबाबत प्रायॉरिटी ठरविणे गरजेचे आहे. या प्रश्ना संदर्भात सन्माननीय सदस्यांची जशी तळमळ आहे तशीच तळमळ राज्य सरकारची देखील आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

परंतु त्यासाठी 274 कोटी रुपयांचा बोजा शासनावर पडणार असल्यामुळे ते स्वीकारण्याची ही वेळ नाही. अर्थात या संदर्भात शासन सहानुभूतीपर्वक विचार करत नाही असे नाही. काल मंत्रिमंडळाची बैठक झाली होती व त्या बैठकीमध्ये शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा आपल्याला विचार करावाच लागेल असे माननीय शिक्षण मंत्र्यांनी सागितले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत.positive inclination दाखवले. आमच्या विभागाकडून पॉझिटीव्ह प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव प्रलंबित असून मंत्रिमंडळामध्ये यासंबंधीचा निर्णय घेण्यात येणार आहे असे मला आपल्याला सांगावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : त्या प्रस्तावाला वित्त विभागाची मान्यता आहे काय ?

प्रा.फौजिया खान : आमच्या विभागाकडून प्रस्ताव पाठविण्यात आला आहे मंत्रिमंडळामध्ये positive attitude ने पाहिले जाणार आहे असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : या करता खात्याने किती रक्कम प्रस्तावित केली आहे. ?

प्रा.फौजिया खान : ते मला सांगता येणार आहे. परंतु चांगल्या प्रकाराची वाढ मिळावी यासाठी पॉझिटीव्ह प्रस्ताव विभागाने पाठविला आहे.सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी सुरुवातीलाच असे सांगितले होते की, हे विधेयक मागे घेण्यासाठी मला विनंती करण्यात येणार आहे त्याप्रमाणे त्यांना माझी विनंती आहे की त्यांनी हे विधेयक मागे घ्यावे. त्याच प्रमाणे मी केलेल्या विनंतीचा ते मान राखणार आहे हेसुध्दा मला माहीत आहे. ही विनंती करीत असतांना मी आपल्याला एक म्हण सांगते. ती म्हण अशी आहे की,

"The comfort of the shade we enjoy comes with the sacrifice of the tree bearing the heat."

म्हणजे जोपर्यत वृक्ष ऊन सहन करणार नाही तोपर्यत तो दुस-याला सावली देऊ शकत नाही म्हणून काही दिवस आपल्याला ऊन सहन करावे लागणार आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, अजून ऊन सहन करा आणि उन्हात उभे रहा असे माननीय शिक्षण राज्य मंत्र्यांनी शेवटी सांगितले आहे. किती दिवस त्यांनी उन्हात उभे रहावयाचे आहे ? या अशासकीय विधेयकावर बोलत असतांना माननीय राज्य मंत्र्यांनी परस्पेक्शन आणि प्राधान्य असे दोन मुद्दे सांगितले आहेत.सभापती महोदय,त्यांचा काही तरी गोंधळ झाला असावा असे मला सुरुवातीला वाटले होते परंतु त्यांचा काहीही गोंधळ झाला नाही. मला जे काही म्हणावयाचे आहे ते त्यांना चांगले कळले आहे.त्या स्वत: प्राध्यापिका आहेत. मला असे वाटले की. परस्पेकशनच्या बाबतीत प्रा.फौजिया खान उत्तर देत आहेत परंतु शेवटी अभिजन वर्गाच्या सदस्या म्हणूनच त्यांनी उत्तर दिले असून त्याचे मला दु:ख वाटत आहेत.

सावित्रीबाई फुले यांच्या बरोबर फातिमा शेख हया लोकांनी अंगावर टाकलेला चिखल सहन करीत होत्या तसेच शिव्या खात होत्या परंतु त्यांनी कधीही सावित्रीबाईची साथ सोडली नाही.सगळा समाज विरोध करीत असतांना जानेवारी 1948 पासून जी शाळा सुरु करण्यात आली होती त्या शाळेत फातिमा शेख जात होत्या. तुम्ही देखील त्यांच्या रस्त्याने जाणार आहात आणि तुमचे सुध्दा असेच परस्पेक्शन असेल असे मला वाटत होते. परंतु तुमचा दृष्टीकोन वेगळा आहे. या देशात गेली तीन हजार वर्षे भारतीय समाज व्यवस्थेला विभागून सेवक नावाचा एक वेगळा वर्ग तयार करण्यात आला व त्याला अतिशूद्राचे स्थान देण्यात आले होते त्याची तरफदारी तुमच्या तोंडून ऐकावयास मिळाली यासारखे माझ्या दृष्टीने दुसरे दु:ख नाही. माओच्या परस्पेक्शनचा हाच मुद्दा आहे. हा सुध्दा दृष्टीकोनाचा एक भाग आहे . सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा दृष्टीकोन आणि तुमचा दृष्टीकोन यामध्ये जे महद् अंतर आहे त्याच्याशीच आमचे भांडण आहे. भाषणाच्या शेवटी तुम्ही उन्हात उभे रहावयास सांगितले आहे. या देशातील गरीब व्यक्तीला उन्हातच उभे रहावयास सांगितले जाते. "तू उन्हात उभा रहा आणि त्याग कर" असेच नेहमी सांगितले जाते. देशाला प्रगतीच्या शिखरावर न्यावयाचे आहे. देशाच्या प्रगतीचा वेग साडे सात टक्के गाठला आहे परंतु अजूनही देशाला प्रगती करावयाची असे स्वप्न दाखविले जात असल्यामुळे काहीनी कष्ट करावयाचे आणि विकासामध्ये त्याने कधीही भागीदार व्हावयाचे नाही हेच तुम्ही सांगत आहात. शिक्षणासाठी होणा-या खर्चाच्या बाबतीत गुंतवणूक म्हटले जाते परंतु त्यासाठी एक रुपयासुध्दा देण्यास शासान तयार होत नाही मधाशी 11 हजार कोटी रुपयांचा उल्लेख करण्यात आला आहे परंतु जीडीपीच्या किती टक्के रक्कम आपण देत आहात..

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. कपिल पाटील..

महाराष्ट्र शासन 2.38 देते. जर माझे चुकीचे असेल तर आपण दुरुस्त करावे. हा आकडा गेल्या पाच वर्षात जास्त वाढला नाही. तो दीड ते दोन टक्क्यांनी वाढला असता तरी आपण 274 कोटी रुपये शिक्षणासाठी देत आहात. मघाशी कंत्राटी शिक्षकांचा जाणीवपूर्वक उल्लेख केला. तत्कालीन इंडिया सरकारने दिलेला कार्यक्रम तुम्ही जशाच्या तसा स्वीकारला. त्यांच्या आणि तुमच्या परसेप्शनमध्ये काहिही फरक नाही. त्यांच्या आणि तुमच्या प्राधान्यांमध्ये तुम्ही ज्याचा उल्लेख केला त्यामध्ये फरक नाही. शिक्षण हे शेवटच्या अजेंडयावर आहे. तुमच्या अजेंडयावर नाही. तुमचे शिक्षण प्राधान्याच्या अजेंडयावर नाही. म्हणून 274 कोटी रुपये तुम्हाला महाग होतात. बुडालेले कारखाने वाचविण्यासाठी, बुडालेल्या बँका वाचविण्यासाठी तुम्ही कोटीच्या कोटी रुपये फुंकून टाकता. आदिवासींच्या आणि समाज कल्याण विभागाचा निधी हसत हसत देऊन टाकता. कारण तुम्हाला त्याची कोणतीही पर्वा नसते. दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांना, वस्ती शाळांना छदाम देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत. हा परसेप्शनचा मुद्दा आहे.

कंत्राटी शिक्षणाच्या संदर्भात तुम्ही अन्य राज्यांचा उल्लेख केला.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

तुम्ही बिहारचा उल्लेख केला. तुम्ही तीन राज्यांची उदाहरणे दिली ती कुणाची होती हे तुम्हाला माहीत आहे. परंतु ज्यांना आता जनतेने निवडून दिले त्या नितीशकुमार यांच्याकडे दोन वर्षापूर्वी कंत्राटी शिक्षणाची योजना सुरु करण्यात आली. ही योजना सुरु करतांना त्यांनी त्याठिकाणी शिक्षण सेवक, विद्या सहाय्यक असे म्हटले नाही, त्यांनी शिक्षकच म्हटले. कंत्राटावर असलेल्या शिक्षकांना त्यांनी किती पगार दिला? साडे सात, साडे नऊ आणि साडे अकरा हजार दिला आहे. जोपर्यंत त्यांचा कंत्राटी कालावधी पूर्ण होत नाही तोपर्यंत आणि जोपर्यंत राज्याची स्थिती चांगली होत नाही तोपर्यंत त्यामध्ये दरवर्षी दहा ते वीस टक्के वाढ होत राहील. तुमचे राज्य त्यांच्यापेक्षा कितीतरी प्रगत आहे असे तुम्ही म्हणता. त्यांच्याएवढी सुध्दा हमी तुम्ही घेऊ शकत नाही. तुम्ही हा 20 हजार शिक्षकांचा प्रश्न म्हणता त्याची काळजी माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना वाटली याचे मला दु:ख वाटते. परभणीची माया शेवटी तुमच्या मदतीला आली. बिहारमध्ये नितीशकुमार यांनी एका वर्षात अडीच लाख शिक्षक भरले. नितीशकुमार उगाच निवडून आले नाहीत. सार्वत्रिक शिक्षण झाले पाहिजे, गरीबांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे. तुमच्या दारापर्यंत, खेडयापर्यंत शिक्षण आणले असा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. कपिल पाटील....

त्यांनी संदेश पोहोचविला. परंतु तुम्ही द्यायला तयार नाही. तुमच्या लेखी 1200 रुपये उल्लेख नाही. माननीय सदस्य श्री. रावते सरांनी प्रश्न विचारला की तुम्ही किती देणार? त्याची माहितीसुध्दा तुमच्याकडे नाही. कोणते मंत्रिमंडळ विचार करीत आहे? कसले एम्प्लॉयझेशन आहे? तुमचा प्रस्ताव वित्त आयोगाकडे गेला नाही आणि वित्त आयोगाकडून तो मंजूरही झाला नाही. मग तुम्ही प्रस्ताव मांडणार कधी आणि देणार कधी? किती दिवस वाट पहावयाची? परिविक्षीत शिक्षक म्हणजे टिचर ऑन प्रोबेशन याचा मी जाणीवपूर्वक उल्लेख करतो. शिक्षण सेवक हा उल्लेख मी कदापि सहन करणार नाही. तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांचा सेवक असा उल्लेख करता काय? त्यांना मंत्रालय सेवक म्हणता काय? आयएएस सेवक म्हणता काय?. जर तुमच्याकडे पैसा नाहीतर कशासाठी भार उचलता? जर राज्यावर आर्थिक संकट आहे तर या राज्यातील 10 लाख सरकारी कर्मचाऱ्यांना सेवक म्हणा आणि त्यांचा 2 टक्के पगार कपात करा.

दिवंगत माजी मुख्यमंत्री माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांनी या राज्यामध्ये शून्याधारीत अर्थसंकल्प आणला होता. त्यांच्याप्रमाणे दहा टक्के पगार कपात करण्याची तुमची हिंमत आहे काय? तुम्ही दोन टक्के कपात केली तर शिक्षणाचे सर्व प्रश्न सुटतील. परंतु तुमची हिंमत नाही. तुमच्या अवती भवती असलेल्या सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना तुम्ही दुखविणार नाही. मंत्रालय सेवक व जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना जिल्हापरिषद सेवक कां म्हणत नाही? तुम्ही तसे केले तर ते तुमच्या अंगावर येतील, तुम्हाला राज्य करु देणार नाहीत. त्यांची मोठी संख्या ही त्यांची ताकद आहे. ते जर स्वाभिमानासाठी लढले तर त्यांच्या ताकदीचा मी समर्थक आहे. परंतु शिक्षक आंदोलन करु शकत नाहीत, उन्हात उभे राहू शकत नाहीत म्हणून तुम्ही त्यांना उन्हात उभे रहाण्यास सांगत आहात. त्यांना आज इतके लाचारीला आणून ठेवले आहे की, त्यांचा साधा मोर्चा निघत नाही. वस्ती शाळांचे शिक्षक सोडलेतर इतर कोणत्याही शिक्षकांचा मोर्चा निघत नाही. कारण एका बाजूला संस्था चालक असतात आणि दुसऱ्या बाजूला सरकार असते. आपले हातात असलेले सुध्दा जाईल म्हणून दोघेही पहात असतात. इतकी वाईट अवस्था निर्माण केली आहे. माननीय सदस्या ॲड. श्रीमती उषाताई दराडे मघाशी म्हणाल्या. त्या मागे बसल्या आहेत म्हणून परसेप्शनमध्ये थोडा फरक होईल असे मला वाटते.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

पण जरा सुध्दा फरक नाही. आपण जर शासनाच्या प्रवक्त्या म्हणून बोलत असाल आणि हे परसेप्शन म्हणत असाल तर स्पष्टपणे सांगा. एखादा व्यक्तिगत घोटाळा असेल तर ते मी मान्य करतो. मी समजूतीने घेऊ शकेन. पण आपण या ठिकाणी शासनाच्या मंत्री म्हणून उत्तर देत आहात आणि आपण जर परसेप्शनचा उल्लेख करीत असाल तर आपण कोणाच्या बाजूने उभ्या आहात ? या देशातील गरिबाला शिक्षण नाकारणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात आपण उभ्या आहात की त्याच्या बाजूने उभ्या आहात हा खरा प्रश्न आहे. त्या गरिबाला काहीही द्यावयाचे नाही असे आपण ठरविलेले आहे. येथील समाज व्यवस्थेने, येथील शासन व्यवस्थेने, येथील भांडवलशाही व्यवस्थेने ठरविले आहे, त्याचे आपण समर्थक आहात. म्हणून मी जाणीवपूर्वक उल्लेख केला की, इंडिया आणि यु.के. यांचा आर्थिक कार्यक्रम एक आहे आणि ते मला आपल्या भाषणातून रेकॉर्डवर प्रतीत झाले. जे कालपर्यंत झाले नव्हते ते आज आपण पहिल्यांदा प्रतीत केले. त्याचा आपण उल्लेख केला ही दु:खाची बाब आहे. याचा विचार आपल्या सहकाऱ्यांनी केला पाहिजे. तो मुद्दा वेगळा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जी विनंती केली ती मी कशी काय मान्य करणार ? या ठिकाणी मानधन वाढविण्याच्या संदर्भात उल्लेख केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्री. नागो गाणार, श्री. भगवान साळुंके आणि सन्माननीय सदस्य ॲड. उषाताई दराडे यांचे आभार मानतो. त्यांनी या वेदनेला धार दिली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे किमान मानधन तरी वाढविण्याची घोषणा करतील, प्रोबेशनवर राहतील असे तरी सांगतील. प्रोबेशन पिरियड कमी तरी करतील असे वाटले होते. पण त्यांनी एक इंग्रजी अवतरण ऐकवून सांगितले की, अजून उन्हात उभे राहा. किती काळ उन्हात उभे राहणार ? पूर्वी छडीची पध्दत होती ती नवीन शिक्षण कायद्यामध्ये आपण सोडली. मुले रागावली, चिडली, मस्ती करावयास लागली की शिक्षक त्यांना उन्हात बाकावर उभे करावयाचे. शिक्षकांनी त्यांना शाळेच्या बाहेर काढण्याची व्यवस्था होती. आता आपल्याला शिक्षकांनाच बाहेर काढावयाचे आहे. कारण आपल्याला वर्गच बंद पाडावयाचे आहेत. आपल्याला शिक्षक नकोच आहेत. कारण शिक्षक हा आपल्यासाठी फार त्रासदायक प्राणी व्हावयास लागला आहे. एकदा स्पष्टपणे सांगा की, आम्हाला शिकवावयाचे नाही. जे श्रीमंत आहेत तेच पुढे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

शिकतील. आम्ही आठवीपर्यंत शिकवू त्याच्या पुढे शिकविणार नाही असे एकदा स्वच्छपणे सांगू टाका आणि ते जर सांगावयाचे नसेल तर मुकाट बोलाने आमचा जो हक्क आहे तो द्या. हा मी शिक्षकांचा हक्क मागत नाही.

सभापती महोदय, आपण माननीय मंत्री महोदयांना हे सांगावे की, मी शिक्षकांचा हक्क मागत नाही. मी या राज्यातील, या देशातील गरीब जनतेचा हक्क मागत आहे. आपण जर त्यांना कायद्याने आणि घटनेने शिक्षणाचा हक्क दिला असेल तर ते शिक्षण देण्यासाठी आम्हाला पूर्णवेळ शिक्षक द्या. आम्हाला सन्मानपूर्वक शिक्षक द्या. आम्हाला सेवक नको. आम्ही दुय्यम शिक्षण व्यवस्था नाकारत आहोत. त्या गरीब जनतेच्या वतीचा हक्क मी मागत आहे मी शिक्षकांचा हक्क मागत नाही. मी फक्त शिक्षकांचा सन्मान मागतो आणि तो सन्मान सुध्दा देण्यास आपण तयार नसाल तर हे विधेयक मी का मागे घ्यावयाचे ? या सभागृहाचा कौल कोणाच्या बाजूने आहे हे जगाला कळू द्या. या सभागृहाचा कौल गरिबांच्या बाजूने आहे की, श्रीमंतांच्या बाजूने आहे हे कळू द्या. भांडवली व्यवस्थेच्या बाजूने आहे की, गरिबांना शिक्षण देण्याच्या बाजूने आहे हे कळू द्या. समान न्यायाच्या बाजूने आहे की, वंचनेच्या बाजूने, शोषणाच्या बाजूने आहे हे एकदा कळू द्या. याबाबत काय करावयाचे याचा निर्णय सभागृहाने घ्यावा. मी हे विधेयक मागे घेणार नाही. पराभव झाला तरी चालेल. माझ्या विधेयकाचा पराभव झाल्याने या देशातील गरिबाची लढाई हरणार नाही. आम्ही रस्त्यावरची लढाई हरणार नाही. तो गरीब एक दिवस तुमच्या घरात शिरेल. श्रीमंतांच्या आणि नवश्रीमंतांच्या ज्या मोठमोठ्या संस्था आणि कॉलेजेस निघालेली आहेत, जी पैशाची, कमाईची नवीन साधने बनलेली आहेत, त्यामध्ये ते घुसतील आणि ओरबाडून काढतील आणि त्या दिवशी कळेल. कोटीच्या कोटी उड्डाणे सुरु आहेत. मेडिकलला जावयाचे असेल तर 28 लाख रुपये, इंजिनिअरींगला जावयाचे असेल तर 25 लाख रुपये, एमबीएला जावयाचे असेल तर 20 लाख रुपये घेतले जातात. लोक एवढे पैसे कोठून आणणार ? गरीब माणसांनी उच्च शिक्षणाचे स्वप्न सोडून दिलेले आहे. आपण म्हणता की, स्वप्नासाठी अजून उन्हात उभे राहा. कशासाठी उभे राहावयाचे ? मी माननीय मंत्री महोदयांच्या विनंतीला नम्रपणे नकार देतो. सभापती महोदय, हे सभागृह कोणाच्या बाजूने आहे याबाबत या सभागृहाने निर्णय करावा अशी मी विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला असे वाटते की, दोन गोष्टींच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांचा गैरसमज झालेला आहे. त्यांचा स्पष्टपणे गैरसमज झालेला दिसतो. त्यामुळे त्यांचा असा राग व्यक्त होताना दिसतो. पहिली बाब अशी की, मी जी म्हण सांगितली ती उन्हामध्ये उभे राहण्यासाठी नाही. त्या म्हणीचा अर्थ असा आहे की, समाजाला सावली देण्यासाठी आपल्याला काही कष्ट करावे लागले तर थोडे दिवस ते सहन करा. मी आपल्याला उन्हात उभे राहावे असे सांगितलेले नाही. दुसरी बाब अशी की, शासन गोरगरिबांच्या बाजूचे नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी परसेप्शनची जी गोष्ट या ठिकाणी सांगितले त्याबाबत मी सांगू इच्छिते की, मी सेवकांच्या बाजूने बोलले आहे. माझा मुद्दा सेवकांच्या डिग्निटीबद्दलचा आहे. हा गोरगरीब सेवकांचा मुद्दा आहे. मी त्यांच्या डिग्निटीबद्दल बोलले. परसेप्शनची गोष्ट मी शिक्षकांबद्दल सांगितलेली नाही. जेव्हा आपण तुलना करतो तेव्हा दुसरे जे घटक आहेत त्यांचा अवमान तर होत नाही ना याची आपल्याला काळजी करण्याची गरज आहे, असा माझा मुद्दा होता. कदाचित आपला त्याबाबतीत गैरसमज झालेला आहे. त्यामुळे मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करते की, हे विधेयक आपण मागे घ्यावे. शासन याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहे आणि योग्य वेळी शासन यावर बरोबर सहानुभूतीपूर्वकच निर्णय घेईल. जी परिस्थिती आहे ती मी या ठिकाणी मांडलेली आहे. आजच्या परिस्थितीत आपण आर्थिक भार स्वीकार करु शकत नाही. त्यामुळे माझ्या विनंतीचा स्वीकार करावा अशी मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांना विनंती करते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, फितूर होणे हा माझा धंदा नाही त्यामुळे मी फितूर होणार नाही. या सभागृहात ज्यावेळी नामांतराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. ग. प्र. प्रधान यांनी विधेयक मांडले होते त्यावेळी सर्व सभागृहाने त्यांना विनंती केली होती की, विधेयक मागे घ्यावे. त्यांनी ते विधेयक मागे घेतले नाही. त्यानंतर शासनाला मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे लागले. त्यामुळे या ठिकाणी एखाद्या अशासकीय ठरावाचा किंवा अशासकीय विधेयकाचा पराभव झाल्याने काही नुकसान होत नाही तर लढण्यासाठी अधिक बळ मिळते. मला सन्माननीय सदस्य ॲड. उषाताई दराडे यांचा आग्रह कळतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

माझ्यासमोर त्यावेळची परिस्थिती आहे. कारण मी वार्ताहर गॅलरीतून ते पहात होतो. अनेक सन्माननीय सदस्य आणि श्री.रा.सु.गवई त्यांच्यासमोर जाऊन बसले होते. त्यावेळी श्री.ग.प्र.प्रधान हे विरोधी पक्ष नेते होते. त्यांना सर्वजण सांगत होते की, तुम्ही तुमचा ठराव मागे घ्यावा. परंतु त्यांनी तो ठराव मागे घेतला नाही. ठराव फेटाळला गेला म्हणून नामांतर रोखले गेले नाही. उलट दुसरे आंदोलन उभे राहिले. म्हणून मी शासनाच्या तरतुदीला फितूर होऊ शकत नाही. मला माफ करण्यात यावे. एवढेच सांगतो, धन्यवाद.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांना हे विधेयक मागे घ्यावयाचे आहे का ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नाही.

तालिका सभापती : ठीक आहे. मग मी मूळ प्रश्न सभागृहाच्या मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून असंमत झाला.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहात 'नाही' चे बहुमत आहे. सदस्यांची मोजणी करण्यात यावी, अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

तालिका सभापती : आता पुढील अशासकीय ठराव चर्चेसाठी घेण्यात यावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपल्याला अशा प्रकारे आवाजी मतदानाने हे विधेयक फेटाळता येणार नाही. आपण पोल घ्यावा. माझा हा हक्क आहे आणि मी तो मागत आहे, आपल्याला तो मध्येच सोडता येणार नाही. आपण सचिवांना सांगावे, आपल्याला सभागृहाचे नियम तुडवून कामकाज पुढे नेता येणार नाही. कृपा करुन सभागृहाचे कामकाज तरी तुडवू नये. हे माझ्या लक्षात आहे, केवळ आवाजाने बिल फेटाळता येणार नाही.

**तालिका सभापती** : आपण योग्य वेळी पोल मागितला नाही.

श्री.कपिल पाटील : मी वेळेवरच पोल मागितला होता.

**तालिका सभापती** : 'नाही' चे बहुमत असल्याचे मी जाहीर केले आहे. मी तसे जाहीर करण्यापूर्वी आपण पोल मागितला नव्हता.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.कपिल पाटील : मी पोल मागितला होता. आपण बोलल्यानंतर पोल मागितला जातो. मला कामकाजाची माहिती आहे. अशाप्रकारे आपाल्याला कामकाज करता येणार नाही, आपण सचिवांचा सल्ला घ्यावा. मी गेली 4 वर्षे या सभागृहाचा सदस्य आहे आणि त्यापूर्वी 15 वर्षे सभागृहाचे कामकाज पहात आहे. मी विभाजन मागतो. आपण विभाजनासाठी घंटा सुरु करण्यास सांगावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

( विभाजनाची घंटा सुरु करण्यात येते. )

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विभाजनाची घंटा सुरु असते....)

...3W-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : 5.37 वाजेपर्यंत बेल वाजविण्यात येईल.

(5.37 वाजल्यानंतर)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, बेल वाजविण्यासाठी आपण जी वेळ निश्चित केली होती ती पूर्ण झालेली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : अशासकीय कामकाजासाठी कॅबिनेट मंत्र्यांची उपस्थिती अनिवार्य नाही.

**सभापती** : बेल थांबविण्यात यावी.

(बेल थांबविल्यानंतर)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे दरवाजे बंद करण्यात यावेत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : सभागृहाचे दरवाजे बंद करण्यात यावेत. मी या अनुषंगाने माझा निर्णय देत आहे. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे जे अशासकीय विधेयक सभागृहामध्ये चर्चेला आले ते विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रस्ताव त्यावेळच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आवाजी मतदानाने असंमत झाला. यासंदर्भात पध्दत अशी आहे की, पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला असे म्हटल्यानंतर लगेचच "पोल"ची मागणी करावयाची असते.

नंतर 3एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .........

पण मी दालनातून सभागृहाचे जे कामकाज ऐकले त्यानुसार पीठासीन अधिकाऱ्यांनी हा निर्णय दिल्यानंतर जवळजवळ एक मिनिटाने यावर चर्चा झाली व त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील उभे राहून "पोल" असे बोलले. म्हणून नियम 41 (1) अन्वये मत विभागणी विनाकारण मागितल्यास अशी मत विभागणी सभापती म्हणून मी नाकारु शकतो. त्यामुळे मत विभागणी देण्यात येत नसून विधेयक नामंजूर झाले असे मी घोषित करतो.

श्री. कपिल पाटील : महोदय, या सभागृहाचे कामकाज आजपर्यंत मी पाहिले आहे परंतु अशा प्रकारे धुडकावून लावण्याचे कामकाज पहिल्यांदाच पाहत आहे.

**सभापती** : मी यासंबंधीचा निर्णय दिलेला आहे. आता अशासकीय ठरावांना सुरुवात होईल.

श्री. भास्कर जाधव : महोदय, आपल्या निर्णयानंतर अशा प्रकारचे भाष्य करणे उचित नाही म्हणून सन्माननीय सदस्यांनी केलेले आताचे वक्तव्य कामकाजातून काढण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आता अशासकीय कामकाज-ठराव हे अशासकीय कामकाज मी पुकारलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापतींनी मला बोलण्याची परवानगी दिलेली असताना देखील अशासकीय ठराव पुकारणे योग्य नाही. माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयाबद्दल मला काहीच बोलावयाचे नाही पण या प्रोसिजरमध्ये आपण जे सांगत आहात त्यानुसार बेलची जी दहा मिनिटे झाली ती कामकाजातून कशी वजा करणार, पटलावरुन कशी काढणार. तसेच दरवाजे बंद करण्याचे आदेश सुध्दा माननीय सभापतींनी दिले होते. आपण माननीय सभापतींवर कारण नसताना अशा प्रकारचा दबाव आणणे योग्य होणार नाही तसेच ज्या पध्दतीने माननीय राज्यमंत्री बोलले ते देखील योग्य नाही. ही परिस्थिती मला सभागृहासमोर मांडणे आवश्यक होते, म्हणून मी ती मांडली आहे.

**सभापती** : दोन्ही बाजूकडून माझ्यावर कोणताही दबाव नव्हता व नाही. फक्त या अनुषंगाने जी वस्तुस्थिती होती ती मी सभागृहाला सांगितली आहे. मतदान घेतले गेले त्यावेळेस माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी "नाहीचे" बहुमत, "नाहीचे" बहुमत असा निर्णय दिला व त्यानंतर

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ........

लगेच माननीय सदस्यांनी पोल मागितला असता तर ते ठीक होते. तसेच माननीय सभापतींना वाटले तरच पोल दिला जातो पण तसे माननीय सदस्यांकडून म्हटले गेले नाही तर ताबडतोब त्यांनी मिनिटानंतर उठून पोल मागितला. मी माझ्या दालनातून हे सर्व कामकाज ऐकलेले आहे. मी, माझा उपरोक्त निर्णय दिलेला आहे. आता या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अशासकीय ठराव मांडावा.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी खास कार्यक्रम घेणे

**मु.शी.**: राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी खास कार्यक्रम घेणे या विषयावरील श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

महोदय, पाण्याच्या प्रस्तावासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी एक पत्र देऊन मला आश्वासित केलेले आहे. मनुष्य आणि प्राणीमात्र या दोघांनाही जीवनात पाण्यावर अवलंबून रहावे लागते. एकविसाव्या शतकात पाण्याची उपलब्धता व विकासाची अत्यंत दुर्लभ भौगोलिक साधनसंपत्ती म्हणजे पाणी आहे. ऊर्जेप्रमाणे आर्थिकदृष्ट्या या राज्याचा औद्योगिक व आर्थिक विकास करावयाचा असेल तर पाण्यासारख्या नागरी सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

सभापती महोदय, राज्यातील भीषण पाणी टंचाई ही अस्वस्थ करणारी बाब आहे. महाराष्ट्रात माहे फेबुवारी ते जून-जुलैपर्यंत सुमारे 148 तालुक्यांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असतो. आपल्याकडे साधारणत: ऑगस्ट पासून पावसाला सुरुवात होत असते. जुलै ऑगस्टपर्यंत आपल्याला काही तालुक्यांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असतो. कोटयावधी रुपये टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी आपल्याला खर्च करावे लागत असतात. सुवर्ण महोत्सवी वर्षात टँकरने पाणीपुरवठा करणे ही बाब आपल्या राज्याला भूषणावह नाही. 1983 मध्ये सुब्रमन्यम समितीने निर्धारित केलेल्या 148 दुष्काळी तालुक्यांना वर्षानुवर्षे आपल्याला आजही टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी बरेच सन्माननीय सदस्य धावत पळत, धापा टाकत आलेले आहे. सभागृहात उपस्थित राहणे ही ट्रेझरी बेंचची जबाबदारी असते हे आपण त्यांना समजावून सांगावे. प्रत्येक वेळेला तुमच्या मदतीला सर्वोच्च स्थान धावून येणार नाही. त्यामुळे आता जे सन्माननीय सदस्य धावत-पळत आले त्यांनी सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत जाऊ नये असे त्यांना सांगावे.

श्री. सुभाष चव्हाण : आपल्या राज्यातील 148 तालुक्यांमध्ये आपल्याला कायमस्वरुपी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असतो. सन 2003 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब होते त्यावेळेस राज्यामध्ये भीषण दुष्काळ पडला होता. जनावरांना खाण्यासाठी चारा सुध्दा मिळत नव्हता. त्यामुळे राज्य शासनाने जनावरांच्या छावण्या उभारल्या होत्या. एका छावणीत 300 जनावरे ठेवली जात होती. त्यावेळेला केंद्रात युती सरकार होते त्यांच्याकडे पैशाची मागणी केली होती परंतु युती शासनाने आपल्या राज्याला एक दमडीही दिली नाही. भूजलातील पुनर्रभरण वाढवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना शासनाने करावी, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी पावसाळयात पडणा-या पाण्याची साठवणूक करण्यासाठी भरीव असा कार्यक्रम आखावा.

सभापती महोदय, कोकणामध्ये फार मोठया प्रमाणात पाऊस पडत असतो. कोकणाला

श्री. सुभाष चव्हाण ....

750 कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. कोकणात मोठया प्रमाणात पाऊस पडत असतो परंतु पावसाचे सर्व पाणी समुद्रात वाहून जाते. त्यामुळे कोकणातील पावसाचे पाणी अडविण्यासाठी तलाव व सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडत असतांना सुध्दा त्या ठिकाणी आपल्याला टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असतो. राज्य शासनाने 23 जुलै, 1975 मध्ये एक श्वेतपत्रिका प्रकाशित केली होती. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने गाव तेथे पाणी असे धोरण श्वेतपत्रिकेमध्ये जाहीर केले होते. श्वेतपत्रिकेमध्ये सुमारे 1248 कोटी रुपयांच्या पाण्याची स्वतंत्र योजना प्रस्तावित केली होती. अनेक ठिकाणी पाणी पुरवठयाच्या योजना बंद आहेत. कागदावर भरपूर योजना आहेत. भारत सरकारकडून पाण्यासाठी भरपूर पैसे मिळत असतात. काही काही गावांना पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नाही अशी अवस्था आहे. शासनाने गावांमध्ये पाणी साठवण योजना सुरु करणे आवश्यक आहे. आपल्याकडे बरेच शिवकालीन साठवण तलाव आहेत. कोकणातही 4-5 शिवकालीन तलाव आहेत. शिवकालीन कालवे आहेत. ते कालवे आज बुजले गेले आहेत. त्यामुळे शिवकालीन कालवे पुनर्जीवित केले तर शेतक-यांना त्या कालव्यांद्वारे पाणी पुरवठा होऊ शकतो. त्यामुळे शासनाने यासंदर्भात एक कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा व त्यासाठी अभ्यास गटाची स्थापना करावी अशी नम्र सूचना आहे.

मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो की, हया सभागृहाने महाराष्ट्रातील 10-11 कोटी जनतेसाठी एक नळपाणी योजना जाहीर करण्याची व त्यासाठी स्वतंत्र अभ्यास गटाची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. पाण्याचा प्रश्न युध्द पातळीवर सोडवावा अशी विनंती आहे. मला माननीय मंत्रीमहोदयांचे पत्र आलेले आहे त्यांनी सांगितले की, "महत्वाच्या कामासाठी मला सोलापूरला जावे लागत आहे. या विषयाबाबत दोन्ही सभागृहातील निवडक सदस्यांची बैठक आयोजित करुन पाण्यासंबंधी युध्द पातळीवर कार्यक्रम जाहीर करण्यात येईल" असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र...

( प्रस्ताव प्रस्तुत झाला.)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची असलेली टंचाई या विषयासंबंधी जो अशासकीय ठराव आणलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणत होणारी पाणी टंचाई आणि त्यामुळे बंद पडलेल्या अनेक नळ पाणी पुरवठा योजना याबाबतची कारणे शोधण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी 100 टक्के अनुदानावर नळ पाणी पुरवठा योजना दिलेल्या आहेत. यातील काही नळ योजनांचे आयुष्य 15 वर्षे असताना देखील त्या आणखी 18-20 वर्षे सुरु आहेत. परंतु या नळ योजनांच्या दुरुस्तीसाठी मिळणारा निधी आता शासनाने बंद केलेला आहे. तेव्हा शासनाने पुन: निधी देऊन सर्व नळ योजना दुरुस्ती करण्याचा ठोस कार्यक्रम घेण्याची गरज आहे. आता विजेचे भरमसाठ बिल येत असल्यामुळे ग्रामपंचायतींना नळ पाणी पुरवठा योजना चालविणे कठीण झाले आहे. पूर्वी पर एच.पी.वर वीज देयक आकारण्यात येत होते. परंतु आता ते पर युनिटवर आकारण्यात येते. आज अनेक नळ योजना विजेची बिले न भरण्यामुळे आणि वेळेवर दुरुस्ती न झाल्यामुळे बंद आहेत. यापूर्वी नळ योजनांचे वीज देयक भरण्यासाठी शासनाने 50 टक्के अनुदान द्यावयाचे आणि 50 टक्के रक्कम ग्रामपंचायतींनी द्यावयाची अशी योजना होती. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, पूर्वी प्रमाणे योजना राबवून सर्व नळ योजना पूर्ववत चालू करण्यासाठी शासनाने ठोस अशी उपाययोजना करावी अशी मी या ठरावाद्वारे विनंती करीत आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी राज्यातील बहुसंख्य गावात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली टंचाई या विषयावर जो अशासकीय ठराव मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठ्याच्या संदर्भात ग्रामीण भाग आणि शहरी भाग यामध्ये फार मोठी तफावत आहे. ग्रामीण भागातील अनेक वाड्यांवर अजूनही पिण्याच्या पाण्याची सोय झालेली नाही. त्याठिकाणी मुली-बायका अजूनही डोक्यावर हंडा आणि कळशी घेऊन पाणी भरताना पाहावयास मिळतात. मोठ्या प्रमाणावर पाऊस पडून सुध्दा पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. बोअरवेलला 400-500 फूटापर्यंत पाणी लागत नाही आणि लागले तर ते उन्हाळ्यापर्यंत राहत नाही अशी अवस्था आहे. ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात आलेले बोअरवेलच्या दुरुस्तीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीने पगार देणे बंद केलेले आहे. ग्रामपंचायतीने गावातून वसुली करावी व त्यातून पगार दिला जावा अशाप्रकारचे धोरण आपण ठरविले आहे. ग्रामपंचायतीची वसुली कशी सुरु आहे हे आपणास माहीत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पगार मिळत नाही आणि त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना, भारत निर्माण योजना, जल स्वराज्य योजना किंवा महाजल योजना अशा अनेक योजना राबविल्या. परंतु फारपूर्वी एमजेपीने पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना केलेल्या आहेत. काही ठिकाणी दुरून पाणी आणले किंवा 10-20 गावांसाठी संयुक्त पाणी पुरवठा योजना घेतली. परंतु त्या योजना दुरुस्ती अभावी बंद आहेत. काही ठिकाणी टाकीचे काम पूर्ण आहे, पाईप लाईनचे काम पूर्ण आहे, मोटार बसविली आहे, परंतु तेथे पाणी नाही अशी अवस्था अनेक गावांमध्ये आहे.

सभापती महोदय, माझ्या मतदारसंघात 18 गावांची आसार्डा पाणी पुरवठा योजना आहे. वीज देयक भरले जात नाही म्हणून अनेकवेळा या योजनाचा पाणी पुरवठा तोडण्यात येतो. तसेच केजमधील धनेगाव येथे पाणी पुरवठा योजना आहे. त्याठिकाणी सुध्दा वीज बिल भरले नाही म्हणून पाणी पुरवठा तोडला जात आहे. अशाप्रकारे पाणी पुरवठा खंडीत करण्याचे प्रकार सुरु आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड उषा दराडे.........

आता शहरांचे विस्तारीकरण व्हावयास लागले आहे. त्यामुळे मूळ पाणी पुरवठा योजना कमी पडावयास लागल्या आहेत. हा प्रश्न मुंबई आणि उपनगरामध्ये देखील आहे. जे नवीन विकसित इ ाालेले भाग आहेत त्याठिकाणी पिण्याचे पाणी पुरवठ्याचा प्रश्न आहे.

आपण अनेक ठिकाणी "हगणदारी मुक्त गाव" योजना राबविली. तत्कालीन ग्रामविकास मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी यासाठी खूप मेहनत घेतली. यामध्ये आपण अल्प प्रमाणात यशस्वी झालो. अगदीच यशस्वी झालो नाही असे मला म्हणावयाचे नाही. परंतु आज अशी परिस्थिती आहे की,पावसाळ्यामध्ये गावातील सर्व मलमूत्र नदी-नाले आणि ओढ्यामध्ये वाहून जाते.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे......

त्यामुळे पाणी दूषित होते आणि हे दूषित पाणी त्या ठिकाणच्या ग्रामस्थांना प्यावे लागते.बीड जिल्हयात परळी तालुक्यात टेकोडे नावाचे एक गाव असून त्या गावातील पाणी पिण्यालायक नाही असा अहवाल आल्यानंतर सुध्दा अजूनही त्या गावाला शुध्द पाणी देऊ शकलो नाही. डोंगराळ भागात जी गावे आहेत त्या गावांना पाणी पुरविण्याच्या बाबतीत थोडेसे दुर्लक्ष होत असते. त्या ठिकाणी शासन योजना करीतच नाही असे मला म्हणावयाचे नाही. काही ठिकाणी योजना केल्या आहेत परंतु कोणत्या ना कोणत्या कारणामुळे त्या बंद पडलेल्या आहेत. गावातील अंतर्गत वादामुळे जलस्वराज्य आणि भारत निर्माण योजनेमधील कामे काही गावात सुरु झालेली नाहीत.ज्या ठिकाणी ही कामे सुरु झालेली आहेत त्या ठिकाणी भ्रष्टाचार देखील मोठया प्रमाणावर झालेला आहे.या सगळया गोष्टींवर मात करुन स्वच्छ आणि शुध्द पिण्याचे पाणी पुरविणे् ही प्राथमिक गरज आहे या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी भावना व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव मांडला त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे त्यांनी एका चांगल्या विषयासबंधीचा हा ठराव मांडला असून पिण्याच्या पाण्याच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, आधुनिकीकरण आणि वाढत्या नागारिकीकरणाच्या विस्ताराच्या नावाखाली चांगले पाण्याचे स्त्रोत बुजवले जात आहेत, बंद पाडले जात आहेत त्याचे जतनीकरण करण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थावर कोणत्याही प्रकरचे निर्बंध घातलेले नाहीत. स्त्रोत नष्ट करण्यासाठी त्यांना पूर्णपणे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे.जुने व चांगले पाण्याचे स्त्रोत बुजवून टाकले जात आहेत आणि त्या ऐवजी नवीन पाण्याच्या योजना आणल्या जात आहेत. त्याचबरोबर या योजना आणत असतांना लॉग टर्म ऑफ प्लॅनिंग आणि परफेक्ट प्लॅनिग या बाबीकडे लक्ष दिले जात नाही. ज्या योजना आणल्या जातात त्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत असतो. त्या योजना एक दोन वर्षातच बंद पडल्या पाहिजेत आणि त्या दुरुस्त होऊ शकणार नाहीत अशाच प्रकारच्या योजना केल्या जातात. प्रशासनाने आणि शासनाने त्याकडे उदासीनतेने पहावयाचे आणि पुन्हा नवीन योजना आणावयाच्या या घातकी चक्रामध्ये राज्यातील पाणीपुरवठा योजना सातत्याने अडखळत आणि डगमगत आहेत. या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने मला माननीय मंत्र्यांच्या एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे मघाशी या अशासकीय ठरावावर बोलत असतांना अभ्यासगटाचा उल्लेख करण्यात आला होता. या अभ्यासगटामध्ये मूळ स्त्रोत जतन करण्यासाठी त्याचबरोबर सध्या जे स्त्रोत उपलब्ध आहेत ते अधिक प्रभावी कसे करता येतील आणि आज ज्या काही योजना बंद पडलेल्या आहेत त्या चांगल्याप्रकारे कशा सुरु करता येतील हे देखील पाहिले पाहिजे ज्या काही योजना सुरु करण्यात येणार आहेत त्या ठराविक कालमर्यादेमध्ये पूर्ण झाल्या पाहिजेत तसेच त्याची गुणवत्ता चांगली असली पाहिजे याकरता एक कालबध्द कार्यक्रम शासनाने आखला तर अशासकीय ठराव आणण्याचा हेतू साध्य होईल असे मला वाटते. आपण पाणी मिळविण्यासाठी पाण्या सारखा पैसा खर्च करीत असतो परंतु अजूनही लोकांना पाणी पाणी म्हणत जीव सोडावा लागतो अशी दूरवस्था राज्यात तुम्हा आम्हाला पहावयास मिळते. आम्ही प्रगत भागातील आहोत असे मानले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जाते परंतु त्या भागातसुध्दा सांगली, सातारा, या सारख्या जिल्हयामधील शेकडो गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे इतकेच नव्हे तर को-ल्हापूर जिल्हा हा पाण्याच्या बाबतीत समृध्द आहे असे म्हटले जाते परंतु त्या जिल्हयामध्ये सुध्दा काही गावामध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. तेव्हा या निमित्ताने शासनाने याकडे विशेष लक्ष  दिले तर हा ठराव आणण्या मागचा हेतू साध्य होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या:):सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.या पूर्वी मार्च महिन्यातील अधिवेशनामध्ये या विषयावर सन्माननीय मंत्री श्री रणजित कांबळे यांनीच उत्तर दिले होते. आतासुध्दा तेच उत्तर देणार आहेत तेव्हा मागच्या वेळेचाच ठराव आणि मागच्या वेळचेच उत्तर असे होता कामा नये असे मला वाटते.

सभापती महोदय, पुणे शहराला वरसगाव धरणातून पाणी पुरविले जाते. वरसगाव धरणातून लवासा लेक सिटीकरिता पाणी देण्यात आलेले आहे .मुळशी भागातील दासवे,मुगाव यासारख्या 8 ग्रामपंचायतीमध्ये लेक सिटी उभारली जात आहे .जे लोक या लेक सिटीमध्ये राहतात किंवा ज्यांच्या जमिनी वेगवेगळया प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या आहेत परंतु त्यांची गावठाणे त्याच ठिकाणी असल्यामुळे सध्या ते लोक तेथेच राहत आहेत अशा लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जो स्त्रोत होता तो लेक सिटी ॲथॉरिटीने ताब्यात घेतला आहे.वरसगाव धरणातील पाणी लेकसिटीला दिले जाते आणि या गावक-यांना टॅकरने पाणी पुरविण्यात येते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

वरसगाव धरणातील पाणी लेकसिटीला दिले जाते, आणि गावकऱ्यांना टँकरने पाणी दिले जाते. दासवे गावातील पिण्याच्या पाण्याची योजना लवासाने सुरु केली आहे. बाकीच्या सर्व गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यामध्ये आणखी एक हिलसिटी तयार होत आहे. त्यासाठी लोणावळयाजवळ थोडी थोडकी नाही तर सहा हजार हेक्टर जमीन विकत घेऊन तिसरे हिल स्टेशन तयार केले जात आहे. पहिली सहाराची लेकसिटी झाली, दुसरी लवासाची लेकसिटी झाली, आणि आता सहा हजार हेक्टर जमीन विकत घेऊन ही तिसरी हिलसिटी कोण करीत आहे? हे कुणालाही माहीत नाही. परंतु त्याठिकाणी मुळशी तालुक्यातील सलतूर, माजगाव, बरपे, भामर्डे, एकले, गुडके आणि आदगाव इत्यादी गावामधील 90 टक्के जमीन विकली गेली आहे. त्या गावातील पाण्यांचे स्त्रोत हिल स्टेशनसाठी वापरले जाणार आहेत. म्हणून माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, वरसगावमधील पाणी पुणे शहराला मिळत होते, रस्त्यालगत असणाऱ्या गावातील लोक वेगवेगळया पध्दतीने ते पाणी वापरीत होते. ते आज लवासाचे लोक वापरणार आहेत. कारण आपण त्यांना स्वायत्ततेचा दर्जा दिला आहे. तर मग या गावामधील ग्रामपंचायतींनी स्वत:च्या पाण्याच्या योजना केल्या होत्या त्यांचे पुढे काय होणार आहे? त्यांना कसा निधी मिळणार आहे? 5 ते 6 हेक्टरमधील लोकांना तुम्ही स्वायत्ततेचा दर्जा देणार आणि सोयी-सुविधा पुरविणार तर मग ज्यांची पूर्वीपासून गावठाणे आहेत त्या लोकांनी पाण्याचे काय करायचे? म्हणून माझा प्रश्न असा की, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी घेत असतांना ज्यांची गावठाणे शिल्लक आहेत, त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे रक्षण ग्रामविकास विभाग करणार आहे की नाही?

आज लवासाच्या लोकांनी कोर्टामध्ये जाण्याची तयारी चालविली आहे. ते म्हणतात की, आमचीच उद्या ग्रामपंचायत होणार आहे आम्ही सर्व सोयी-सुविधा पुरविणार आहोत. मग तेथील सामान्य लोकांसाठी असलेली बस सेवा, वीज पुरवठा किंवा प्रॉपर्टी टॅक्सच्या प्रश्नाच्या बाबतीत ग्रामविकास विभाग कोणता तोडगा काढणार आहे? म्हणून मला असे वाटते की, आपण याठिकाणी पिण्याच्या पाण्याची चर्चा करीत असतांना ज्या बांधलेल्या वरसगावच्या धरणामध्ये भर घालून सुंदरी नावाचा प्रकल्प लवासा उभा करीत आहे. तर मग पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाची तुम्ही कशी सोय करणार आहात असा माझा तुम्हाला प्रश्न आहे? आज या प्रश्नाच्या बाबतीत जिल्हा परिषद काहीही बोलण्याच्या स्थितीत नसल्यामुळे तुम्ही या प्रश्नामध्ये हस्तक्षेप केला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KTG/ D/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे....

पाहिजे अशी माझी मागणी आहे. ग्रामपंचायतींनी वेळोवेळी ग्रामसभेचे ठराव करुन दिले आहेत की, आम्हाला पिण्याच्या पाण्याची सोय झाली पाहिजे. तेव्हा लवासा आणि नवीन होऊ घातलेल्या हिलसिटीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शासनाने स्वत: पहाणी करावी. त्यांच्या पाण्याच्या स्त्रोताबाबत आणि पुणे महानगरपालिका लवासासाठी वरसगाव धरणामधील देत असलेल्या पाण्याबाबत कठोर कारवाई करुन जनतेच्या पिण्याच्या पाण्याचे संरक्षण करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

----

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KTG/ D/ KGS/

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण ंयांनी याठिकाण्ी एक महत्वाचा ठराव मांडला आहे. त्या ठरावाला पाठिंबा देत असतांना अनेक माननीय सदस्यांनी आपली मते याठिक्ाणी व्यक्त केली आहेत.

सभापती महोदय, मी सुरुवातीला एक गोष्ट सांगू इच्छितो की, पाणी हे दोन गोष्टींव्दारे उपलब्ध होत असते. त्यापैकी एक म्हणजे आकाशातून पडणाऱ्या पावसामुळे दुसरे म्हणजे भूमिगत असलेल्या पाण्याच्या स्त्रोताव्दारे. या दोन माध्यमांमधून आपल्याला पाणी पुरवठा होत असतो. या पाण्याच्या बाबतीत शासन अनेक वर्षापासून नियोजन करीत आहे. महाराष्ट्रामध्ये जवळपास 95 हजार असलेल्या गाव, वाडया व वस्त्यासाठी आपल्याला कुठून ना कुठून तरी पाण्याची सोय करणे आवश्यक असते. आतापर्यंत त्यांच्याकरिता पाण्याच्या वेगवेगळया योजनांव्दारे 16 हजार कोटी रुपये खर्च केले आहेत. त्याचप्रमाणे अडीच लाख बोअर पाडण्यात आले आहेत, 95 हजार विहिरी आणि 14 हजार लघु पाणी पुरवठा योजना केल्या आहेत. त्याचप्रमाणे वैयक्तिक पाणीपुरवठा योजना 18 हजार आहेत आणि 89 हजार प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तयार केल्या आहेत. परंतु हे सर्व करीत असतांना आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, पावसाचे कमी असलेले प्रमाण व वाढती लोकसंख्या, आणि जमिनीच्या माध्यमातून होणारा पाण्याचा विसर्ग यामुळे पाण्याची तीव्र टंचाई भासण्याची ही तीन प्रमुख कारणे आहेत.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

काही वर्षे आपल्याकडे दुष्काळी परिस्थिती असते. काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळी भौगोलिक परिस्थिती आहे. काही ठिकाणी कायम स्वरुपी डीपीएपी एरिया आहे. महाराष्ट्रामध्ये 85 टक्के बेसॉल्ट रॉक आहे आणि कितीही पाऊस पडला तरी त्याचा सिपेज 4 टक्केच असते. आज आपण जो उपसा करीत आहोत त्यामध्ये औद्योगिक वापरासाठी 200 ते 300 मीटरपर्यंत खाली गेलेले आहेत. जळगाव सारख्या ठिकाणी 700 फुटापर्यंत खाली गेलेले आहेत. शेवटी आपण किती खोल जाणार याबाबतीत मर्यादा आहेत. तसे पाहिले तर आपल्याला ज्या ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्या राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर केलेल्या आहेत. शेवटी आपले जे स्त्रोत असतात ते सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याकडे शिवकालीन योजना आहे. आपण हायड्रो फ्रॅक्चरींग करतो, ब्लांस्टींग करतो पण या सगळ्या ज्या योजना आहेत त्या सस्टेनेबिलिटीच्या आहेत. राष्ट्रीय पेय जल योजनेमध्ये आपण ती कामे घेतो. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या वर्षी जवळपास 179 कोटी रुपये शिवकालीनमधील स्त्रोत बळकटीकरणासाठी ठेवलेले आहेत. आतापर्यंत आपण वेगवेगळ्या पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून जवळपास 14 हजार असे स्ट्रक्चर्स बांधलेले आहेत. त्यामध्ये आपण स्त्रोत बळकटीकरण करतो. यासाठी आपण आतापर्यंत जवळजवळ 170 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. यापुढे आम्ही असे नवीन धोरण घेतलेले आहे की, यापुढे ज्या काही नवीन योजना बांधण्यात येतील त्यामध्ये स्त्रोत बळकटीकरण हा त्या योजनेचा भाग राहणार. आतापर्यंत त्यामध्ये फक्त विहीर, वितरणाची लाईन आणि पंपिंगचा समावेश असावयाचा. त्याशिवाय स्त्रोत बळकटीकरणाचा भाग योजनेमध्येच असणार आहे. शिवकालीन किंवा ज्या वेगवेगळ्या उपाययोजना आहेत त्यासंदर्भात जीएसडीएचे मार्गदर्शन घेऊन, भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन आपण ते बंधनकारक केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मंत्री महोदय तेच भाषण देणार.

ही बाब खरी आहे की, एक बिल आणण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. ते बिल बहुतेक पुढच्या अधिवेशनामध्ये येईल. ग्राऊंड वॉटर डेव्हलपमेंट मॅजेनमेंट बिल म्हणून ते आणलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, जोपर्यंत आपण जलसंधारणाचे काम करणार नाही, स्त्रोत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. रणजित कांबळे ....

बळकट करणार नाही आणि आपल्या राज्यामध्ये जे जे ॲक्वाफोर आहेत त्याला जोपर्यंत रिचार्ज करणार नाही तोपर्यंत काही होणार नाही. शेवटी आपला जो पाण्याचा उपसा होतो तो ॲक्वाफोर मधूनच होतो आणि ते रिचार्ज करणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी आपण बोअर किती खोलीपर्यंत घेऊन जाणार यावर सुध्दा बंधने आणणार आहोत. आज आपल्या राज्यामध्ये असे धोरण आहे की, पिण्याच्या पाण्यासाठी 60 मीटर पर्यंत बोअर घेऊ शकतो. पण सिंचन किंवा औद्योगिक कारणासाठी काही बंधन नाही. हे बिल आल्यानंतर पुढे औद्योगिक कारणासाठी असो किंवा सिंचनासाठी असो त्यांच्यासाठी 60 मीटरची मर्यादा राहणार आहे. मात्र पिण्याच्या पाण्यासाठी जेवढी गरज असेल तेवढे खोल जाणार. त्याच्या व्यतिरिक्त दुस-या कोणत्याही बोअरचा किंवा कोणत्याही पाण्याच्या सोर्सचा आपल्या पिण्याच्या पाण्याच्या सोर्सवर काही परिणाम झाला तर तो स्त्रोत सुध्दा बंद करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहणार आहे. ते बिल फार सविस्तर आहे. ज्यावेळी ते बिल येईल त्यावेळी आपण सगळे त्यावर चर्चा करणार आहोत. ते बिल आल्यानंतरच त्या बिलाबाबत मी आपल्याला सविस्तर माहिती देईन.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण फार मोठ्या प्रमाणावर योजना करतो परंतु ऑपरेशन आणि मेन्टेनन्सची किंवा दहा पंधरा वर्षे झाल्यानंतर नुतनीकरणाची किंवा नवीन पाईपलाईनची जी गरज असते त्यासाठी काही तरतूद नाही. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, जी राष्ट्रीय पेय जल योजना आहे त्यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाचा जो हिस्सा आहे त्यातील 15 टक्के रक्कम आपण मेन्टेनन्स आणि ऑपरेशनसाठी ठेवतो. हे जे पैसे असतात ते आपण वेगवेगळ्या जिल्हा परिषदांना देतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 18:10

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.रणजित कांबळे.....

शासन वेगवेगळया जिल्हा परिषदांना पैसे देते. त्यासाठी काही अटी व शर्ती आहेत. परंतु जोपर्यंत ग्रामपंचायती 100 टक्के पाणीपट्टी भरणार नाहीत तोपर्यंत हा पैसा दिला जाणार नाही असे शासनाने ठरविले आहे. कोणतीही शासकीय योजना यशस्वीपणे चालवावयाची असेल तर त्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी असे सांगितले की, वीज मंडळामुळे हया योजना बंद होत्या. ग्रामीण भागामध्ये या योजनांवरील वीज बिलासाठी दरमहा 100 रुपये खर्च होतो. काही ठिकाणी तर दर महिन्याचा 30 ते 100 रुपये इतकाच खर्च आहे. ते सुध्दा भरले जात नाहीत. हे दर एका कुटुंबासाठी किंवा एका कनेक्शनसाठी आहेत. एका कुटुंबात 5 माणसे असतील तर प्रत्येकी 20 रुपये खर्च होतो. काही ठिकाणी तर 6 रुपये एका माणसावर खर्च होतो. हे पैसे सुध्दा भरले जात नाहीत. या सभागृहात वारंवार अशी चर्चा केली जाते की, पाणी पुरवठा योजनांसाठी वीज मंडळ कमर्शिअल दराप्रमाणे आकारणी करते, युनिटप्रमाणे दर आकारणी केली जाते. वीज नियामक आयोगाने स्पष्टपणे सांगितले आहे की, या योजनांना सबसिडाईज्ड केले जाणार नाही. पाणी पुरवठा योजनांचा प्रत्येक युनिटचा दर 4.80 पैसे इतका असतो. हे दर कमर्शिअल युनिटपेक्षा खूप कमी आहेत, बीपीएल लोकांसाठी जे दर आहेत त्यापेक्षा थोडेसे जास्त आहेत. वीज बिलांमुळे या योजना बंद आहेत हे एकमेव कारण नाही. बहुतांश योजना ग्रामपंचायती पैसे भरत नसल्याच्या कारणामुळे बंद आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासन त्यांना काय देते ते आम्हाला माहीत आहे. तुमची आणि आमची अगतिकता एकच आहे की, लोक पैसे भरत नसल्यामुळे योजना चालत नाहीत. पाणी आहे, वीज आहे, परंतु ते देखभाल दुरुस्तीचा 15 टक्के खर्च देऊ शकत नाही. त्याला काही अटी आहेत. आता शासनाला नवीन कायदा आणावा लागेल. ज्या ग्रामपंचायतींकडून पैसे वसूल होत नसतील ती ग्रामपंचायत बरखास्त केली जाईल. जोपर्यंत शासन निवडून आलेल्या सदस्यांसमोर पेच निर्माण करणार नाही तोपर्यंत वसुली होणार नाही. अशाप्रकारचा कायदा शासन आणणार आहे काय ? तसेच ज्या महानगरपालिका लोकांकडून पाणीपट्टीचे पैसे घेत आहेत, परंतु ते पैसे शासनाकडे न देता इतर ठिकाणी वापरत आहेत. त्यामुळे 100-100 कोटी रुपये वीज मंडळाचे थकलेले आहेत. ही जबाबदारी तेथील नगरसेवकांची नाही, ही जबाबदारी आयुक्तांची

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.दिवाकर रावते......

आहे. तेथील लेखा प्रमुखाची आहे. ते हा पैसा इतर कारणासाठी वापरण्याची परवानगी कशी देतात ? लोकांना पाणी पुरविणे हे शासनाचे उत्तरदायित्व आहे. ते अशाप्रकारे खंडित होत आहे. ही सेवा अत्यंत आवश्यक अशी आहे, त्याशिवाय लोक जगू शकत नाहीत, एक वेळ एखादा रस्ता नाही झाला तरी चालेल, दिवाबत्ती कमी झाली तरी चालेल. परंतु पाण्याची आवश्यकता असताना त्याचे पैसे इतरत्र वापरण्याची परवानगी कोण देतो ? ही परवानगी प्रशासक म्हणून आयुक्त देतात. ग्रामपंचायती व नगरपालिकांसाठी जर कायदे केले तरच हया योजना चालणार आहेत. अन्यथा, आम्ही येथे बोलतो, त्यानंतर मंत्री महोदय उत्तर देतात, त्यानंतर तो विषय संपतो. पुन्हा ये रे माझ्या मागल्या, असे चालूच आहे. पुढील अधिवेशनामध्ये आपण पुन्हा तेच सांगणार. सरकार म्हणून तुमचा निर्धार काय आहे तो या प्रस्तावाच्या निमित्ताने उत्तरातून सांगावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, अनेक ग्रामपंचायती त्यांचे बिल भरु शकत नाही. त्यांच्यासाठी जीवन संजीवनी योजना या वर्षाच्या ऑक्टोबरपर्यंत चालविली होती. ग्रामपंचायतींकडे जी रक्कम थकित होती त्यामध्ये व्याजाचे प्रमाण जास्त आहे. मुद्दलाची रक्कम कमी आहे, पण व्याज, चक्रवाढ व्याजाची रक्कम अधिक आहे. ज्या ग्रामपंचायतींना या योजनेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी 50 टक्के मुद्दल भरावयाचे होते. तसेच एक वर्षासाठी 6 हप्त्यात भरावयाचे होते आणि वीज मंडळ 25 टक्के व्याज माफ करणार होते. ज्या ग्रामपंचायतींना योजना चालू ठेवावयाची होती अशा 4169 ग्रामपंचायतींनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 18:15

श्री. रणजित कांबळे...

काही ठिकाणे अशी आहेत की तेथे अजिबात पाणी नाही. सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी बीड जिल्हयातील वाड्या वस्त्यांचा उल्लेख केला. तेथील रनिंग कॉस्ट हाय आहे. अन्सस्टेनेबल रिजनल वॉटर स्कीम 59 आहेत. ज्या ठिकाणी अजिबात पाणी उपलब्ध होत नाही तेथे विशेष निधी देऊन 59 योजना चालू करण्यात येणार आहेत. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अभ्यास गट नेमण्याची सूचना केली. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांसमवेत चर्चा झालेली आहे. तसा अभ्यासगट तयार करण्याचा विचार आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी ज्या 15-20 वर्षाच्या जुन्या योजनांचे नूतनीकरण करण्याची सूचना केली. ग्रामपंचायतींनी तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविला तर ते काम करता येईल. सन 2009-2010मध्ये 4500, सन 2010-2011मध्ये 9745, सन 2011-2012मध्ये 12907 ग्रामपंचायती पूर्ण केलेल्या आहेत. देशामध्ये ही सर्वात जास्त संख्या आहे.

डॉ. नीलम गो-हे : लवासा सिटी येथील धरणातील पाण्यासंबंधीचा उल्लेख मी केला होता. त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. रणजित कांबळे : राज्यातील कोणतेही धरण हे राज्य शासनाच्या मालकीचे असते. धरणातील पाणी हे राज्यातील जनतेसाठी असते. सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला त्याच्या आजूबाजूच्या परिसरातील जमीन त्या संस्थेने खरेदी केली असली तरी तेथील धरण हे त्या संस्थेच्या ताब्यात जाणार नाही. त्या धरणातील पाणी कोणत्याही ग्रामपंचायतीला घेण्याचा अधिकार आहे. त्या ग्रामपंचायती पर्यन्त पाणी पोहोचविण्याची जबाबदारी शासनाची राहील.

श्री. सुभाष चव्हाण : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी माझ्या ठरावाला समाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे मी माझा ठराव क्रमांक 14 मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रकल्पासाठी संपादित केलेल्या घर व शेतघरांसाठी देण्यात येणा-या नुकसान भरपाईच्या रकमेवर आयकराची आकरणी न करणे

**मु.शी.**: प्रकल्पासाठी संपादित केलेल्या घर व शेतघरांसाठी देण्यात येणा-या नुकसान भरपाईच्या रकमेवर आयकराची आकरणी न करणे या विषयावर श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांचा ठराव

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"शेतीपासून व शेतजमिनीपासून मिळणा-या उत्पन्नावर शेतक-यांना आयकर (इन्कम टॅक्स) लागू होत नाही. परंतु राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रासाठी घर व शेतघरांचे संपादन केल्यावर संबंधित शेतक-यांना देण्यात येणा-या नुकसान भरपाईच्या रकमेवर आयकर (इन्कम टॅक्स) आकारण्यात येत असल्यामुळे शेतक-यांवर अन्याय होत आहे. म्हणून पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी संपादित केलेल्या घर व शेतघरांच्या नुकसान भरपाईच्या रकमेवर आयकर आकारण्यात येऊ नये म्हणून आयकर अधिनियमात आवश्यक ती दुरुस्ती करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, ज्या धरणामध्ये शेतक-यांची जमीन, घरे-दारे जातात त्यांचे मूल्यांकन केले जाते आणि त्या मूल्यांकनानुसार घरा-दाराचा मोबदला त्याच्या मालकाला दिला जातो. शेती पासून मिळणा-या उत्पन्नावर शेतक-याला आयकर भरावा लागत नाही.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर............

मात्र याठिकाणी अशाप्रकारे मिळणाऱ्या मोबदल्याच्या रक्कमेतून 10 टक्के टीडीएस कापण्याचा प्रकार घडलेला आहे. कणकवली तालुक्यातील वारगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कोर्ले सांतडी धरणाच्या बुडित क्षेत्रात घर गेले त्या शेतकऱ्यांची मोबदल्यातील 10 टक्के रक्कम टीडीएस म्हणून कापण्यात आली आहे. त्या शेतकऱ्याला इन्कम टॅक्स रिटर्न भरावा, त्यानंतर 10 टक्के रक्कमेचा परतावा मिळेल असे आयकर अधिकाऱ्यांकडून सांगितले जाते. आज आयकर कायदा, 1961 मधील कलम 10(1) अन्वये शेतकऱ्यांचे उत्पन्न आयकरातून पूर्णपणे वगळलेले आहे. त्याचप्रमाणे आयकर कायद्याच्या सेक्शन 2(14) मध्ये जी व्याख्या दिलेली आहे त्या व्याख्येमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, जे नॉन ॲग्रीकल्चर घर म्हणतो त्याबाबत नगरपालिकेच्या हद्दीपासून 8 कि.मी.अंतरावर असलेले गाव किंवा ज्या गावाची लोकसंख्या 10 हजार आहे अशा लोकसंख्येच्या गावांना कर लागू करावा असे म्हटलेले असताना संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयात कोल्हापूर येथील आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कर भरण्यासंबंधी पत्र पाठविण्यात येत आहे. 2007-2008 पासून किंवा त्यापूर्वी ज्यांना मोबदल्याची रक्कम मिळाली आहे त्यांच्याकडून वसुली करण्यासंबंधी पत्रे पाठविण्यात येत आहेत. तुम्ही इन्कम टॅक्स रिटर्न भरा असे शेतकऱ्यांना सांगितले जाते. शेतकऱ्यांना रिटर्न भरण्याची माहिती नाही. आयकरातून पूर्णपणे वगळले असताना शेतकऱ्यांनी सी.ए.ला गाठून रिटर्न फाईल करायचे आणि एकदा आयकर नंबर पडल्यानंतर सातत्याने दरवर्षी रिटर्न भरणे शेतकऱ्यांना अनिवार्य ठरणार आहे. त्यामुळे अशा घरांसाठी जो मोबदला दिला जातो तो शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा भाग नसतो. ती रक्कम म्हणजे कॅपिटल गेन नाही. त्यामुळे उत्पन्नातून त्यांना वगळण्यात यावे. मी जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात लेखी पत्र दिलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तेथील आयकर आयुक्तांना तसे पत्र पाठविले आहे. आयकर कायद्याच्या नियमातील व्याख्येमध्ये ही कृती बसत नसल्यामुळे टीडीएस कापण्याची गरज नाही असे जिल्हाधिकाऱ्यांनी कळविले आहे. अद्याप त्यांच्या पत्राला आयकर विभागाकडून उत्तर पाठविण्यात आलेले नाही. राज्य शासनामार्फत आयकर विभागाला पत्र पाठवून ज्या शेतकऱ्यांना आयकरातून पूर्णपणे वगळले आहे, केंद्र व राज्य सरकारने वगळले आहे अशा शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी मिळणारी रक्कम आहे त्या रक्कमेचे व्हॅल्यूएशन करुन त्यामध्ये अधिक पैसा घालून तो शेतकरी स्वत:चे पुनर्वसन करणार आहे. त्याला यापासून उत्पन्न मिळणार नाही. त्याचे योग्यरित्या पुनर्वसन व्हावे म्हणून तो मोबदला मिळतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर............

त्याबाबत आयकर विभाग आणि केंद्र शासनाशी राज्य शासनाने पत्रव्यवहार करण्याची भूमिका स्वीकारावी आणि अशा मोबदला मिळणाऱ्या शेतकऱ्यांना आयकरातून पूर्णपणे वगळावे यासाठी मी हा अशासकीय ठराव मांडला आहे. शासनाने याबाबत योग्य ती कारवाई करावी अशी मी विनंती करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, याठिकाणी शेतकऱ्यांच्या हिताचा अशासकीय ठराव मांडण्यात आला आहे. विकास कामे करावयाची असतील तर जमिनी संपादित कराव्याच लागतात. जमीन संपादन करतो त्यावेळी शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय हा एकमेव शेती असतो. काही शेतकरी अल्प-भूधारक असतात, काही बागायती असतात, काहींची फळबागांची शेती असते. एकदा उत्पन्नाचे साधन गेले तर दुसरीकडे कुठेतरी पुनर्वसन करुन उत्पन्न घेण्याइतका पैसा मिळणे त्यातून अपेक्षित असते. लँड ॲक्वीझेशन ॲक्ट हा आपल्या देशातील एकमेव असा कायदा आहे, जो शेतकऱ्यांचे हित जोपासणारा आहे.

नंतर 4जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ........

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी आतापर्यंत अनेक निर्णय शेतकऱ्याच्या बाजूनेच दिलेले आहेत. परंतु ज्यावेळेस विशेष भू-संपादन अधिकारी प्रत्यक्षात भू-संपादन कायद्याची अंमलबजावणी करीत असतात त्यावेळी त्यात अनेक त्रुटी आपण पाहतो. कारण ज्यावेळी जमिनीचा ताबा घेतला जातो ती अनेक प्रकरणे पहायला मिळतील की सेक्शन-4 ची अधिसूचना झालेली नसतानाही शेतकऱ्यांकडून जमिनीचा ताबा घेतला जातो. काही प्रकरणे अशी आहेत की, सेक्शन-4 ची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर विहित कालावधीत अवॉर्ड जाहीर न झाल्यामुळे ती संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया व्यपगत होते. परंतु तरीही जमिनीचे पझेशन शासनाकडेच असते, अशा प्रकारे या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होतांना दिसते. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या जमिनीची किंमत ठरवित असताना त्याच्या इच्छेनुसार ठरविली पाहिजे परंतु शेतकऱ्याच्या इच्छेचा कोणीही विचार करीत नाही, त्यामध्ये असा खेळखंडोबा होतो की, रजिस्ट्रार ऑफिसमध्ये नोंदणी झालेला सर्वात कमी किंमतीचा खरेदी-विक्रीचा दर भूसंपादनासाठी ग्राह्य धरला जातो. त्यासाठी फक्त तलाठ्याकडून खरेदी-विक्रीचा चार्ट मागितला जातो आणि तलाठ्याकडील चार्ट हा एव्हिडन्स ॲक्टनुसार ॲडमिसीबल नसतो. त्याची प्रत भूसंपादन अधिकाऱ्यासमोर आली पाहिजे, साक्षीदारांची साक्ष, ॲफिडेव्हीट्स भूसंपादन अधिकाऱ्यांनी नोंदवून घेतले पाहिजेत, अशा प्रकारचे मार्केट व्हॅल्यूनुसार ॲसेसमेंट करीत असताना या बाबींचा विचार केला जात नाही आणि संपादित जमिनीची किंमत ठरविली जाते.

सभापती महोदय, या अशासकीय ठरावाचा गाभा म्हणजे संपादन केलेल्या जमिनीचे मूल्य ठरविताना मोबदल्याच्या रकमेतून वजा करण्यात येणारा आयकर हा आहे. कारण जमिनीचे संपादन झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याला मिळणाऱ्या मोबदल्याच्या रकमेतून आयकराची रक्कम वजा केली जाते. आपल्या देशात शेतीच्या उत्पन्नावर कोणताही कर नाही तरी देखील शेतीसाठी दिलेल्या मोबदल्याच्या रकमेतून आयकराची रक्कम कपात केली जाते. तसेच सेक्शन-4 च्या अधिसूचनेपासून ॲवॉर्डच्या तारखेपर्यंत ॲक्वायरिंग बॉडीने शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचे भूईभाडे देणे बंधनकारक असताना असे भाडे 15 टक्क्याने द्यावयाचे असते पण केवळ दोन ते तीन टक्के एवढेच मिळत असते. अन्य ठिकाणी तर असे भुईभाडे सुध्दा वेळेवर देत नाही, अशी राज्यातील

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .........

एकंदर परिस्थिती आहे. जमिनीचा मोबदला देताना बागायती किंवा जिराईत जमिनीला वेगवेगळा दर आकारुन मोबदला दिला जातो. समजा शेतकऱ्याच्या शेतात विहिर असेल तर फक्त विहिरीचेच पैसे दिले जातात आणि जमिनीचे मूल्य मात्र ती जमीन जिराईत समजून ठरविले जाते. भूमिका भूसंपादन अधिकारी घेतात. म्हणून शासनाने यासंदर्भात विशिष्ट अशा प्रकारचे परिपत्रक काढण्याची गरज आहे. कारण यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या गाईडलाईन्स आहेत की संपादित करावयाच्या शेतात विहिर असेल तर अशी जमीन कुठल्याही परिस्थितीत बागायती जमीन समजून मोबदला दिला पाहिजे. त्याचप्रमाणे शेतात झाडे असतील तर झाडे आणि जमीन अशा प्रकारे मोबदला दिला पाहिजे. शेतात फळबाग असेल तर त्याचा विचार करुन योग्य मोबदला मिळाला पाहिजे. परंतु भूसंपादन अधिकारी शेतकऱ्यांना म्हणतात की, फक्त विहिरीचाच मोबदला घ्या आणि जमिनीचा मोबदला मात्र जिराईत म्हणूनच घ्या, फळबाग असेल तर फक्त झाडांचेच पैसे घ्या आणि जमिनीचा जिराईत म्हणूनच घ्या, अशा प्रकारच्या अडचणी निर्माण करतात. तसेच यामध्ये एवढा भ्रष्टाचार बोकाळलेला आहे की, विहिरीच्या संदर्भात व शेतातील झाडांच्या बाबतीत शासनाचे ज्युनियर इंजिनियर्स प्रत्यक्ष येऊन स्थळ पाहणी करतात व पंचनामे करतात, परंतु शेतकऱ्यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना देत नाहीत. मग शेतकऱ्याच्या शेतात 300-400 झाडे असतील तर तेवढी दाखविली जात नाहीत, फक्त 30-40 झाडे दाखवितात आणि जे शेतकरी त्यांना भेटतात त्यांच्या शेतात 3-4 झाडे असली तरी 300-400 झाडे दाखविली जातात. तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतात फळ बाग असेल आणि ते पंचनामे करणाऱ्या अधिकाऱ्यांना भेटले नाही तर त्यांच्या शेतात फक्त रोपेच दाखवितात व त्यांचा मोबदला केवळ प्रत्येक रोपामागे 2 रुपये, 5 रुपये, आणि 10 रुपये असा दिला जातो परंतु जे भेटतात त्यांच्या शेतात फक्त रोपे असली तरी त्यांना फळे असलेली बाग म्हणून मोबदला दिला जातो. त्याचप्रमाणे त्या शेतातील फळझाडांची उंची किती, त्यातील मातीची प्रत कोणती आहे अशा प्रकारची कोणतीही तपासणी केली जात नाही. नाईलाजाने जेव्हा भूसंपादन अधिनियमातील कलम 18 खाली वाढीव मोबदला मिळावा म्हणून न्यायालयात दावा चालविला जातो तेव्हा शेतकऱ्यांना खाजगी पध्दतीने इंजिनिअर्स, हॉर्टीकल्चरर्स यांना आणावे लागते. अशा प्रकारे शासनाच्याच कायद्यात या त्रुटी असल्याने असंख्य उणीवा

...3...



PFK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. भोगले..... 18:25

ॲड. उषा दराडे ..........

राहतात.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जाहीर झालेल्या ॲवॉर्डमध्ये काय कन्टेन्ट्स आहेत ते शेतकऱ्यांना समजावून सांगितले जात नाहीत. एक तर शेतकरी अशा कायद्याच्या बाबतीत अनभिज्ञ असतो म्हणून ॲवॉर्ड मराठीतून जाहीर झाला पाहिजे परंतु असे ॲवॉर्ड इंग्रजीतूनच असतात. कलम 12 ची नोटीस जेव्हा शेतकऱ्यांना दिली जाते त्या नोटिशीमध्ये कोणते कन्टेन्ट्स आहेत याची माहिती देखील देणे आवश्यक असते परंतु तशी माहिती दिली जात नाही. या अनुषंगाने परिपत्रक काढणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

खरे म्हणजे नोटिशीच्या संदर्भातच सर्क्यूलर काढणे गरजेचे आहे. नोटीस अशी दिली जाते की, तुमचा सर्व्हे नंबर अमुक अमुक, एवढी एवढी जमीन संपादित केलेली आहे त्यामुळे तुम्ही अमुक अमुक तारखेला अमुक अमुक ठिकाणावरुन पैसे घेऊन जावे. त्यामध्ये जमिनीची व्हॅल्यूएशन किती, भूभाडे किती, 15 टक्के कितीह 30 टक्के सोलशियम किती ताबा तारखेपासून ॲवार्ड तारखेपर्यंत व्याज दिले आहे काय? दरसाल दरशेकडा 15 टक्के व्याजाने पैसे दिलेले आहेत काय? हे सर्व कन्टेन्टस् नोटीस मध्ये येणे गरजेचे असते परंतु अशा प्रकारचे कोणतेही कन्टेन्टस् नोटीस मध्ये नसते. ॲवार्डची सर्टीफाईड कॉपी शेतक-याला स्वतःच्या खर्चाने शासनाने देणे गरजेचे असते परंतु ती दिली जात नाही. एलएओकडे रेफरन्स दाखल केल्यानंतर ते रेफरन्स वर्षानुवर्षे धूळ खात पडतात. बहुतेक वेळेस रेफरन्सेस सापडत नाहीत. मी स्वतः पोत्यामध्ये बांधलेल्या कच-याच्या कागदामधून लॅंड ॲक्वीझीशनच्या शेतक-यांचे रेफरन्सेस शोधून काढलेले आहेत. कोर्टाकडे वेळेच्या आत रेफर होणे व कोर्टाने सुध्दा वेळेच्या आत जजमेंट देणे ह गरजेचे आहे. हे सर्व झ ाल्यानंतर जज्मेंट येते, डिक्री दाखल होते. शासनाने पैसे दिल्यानंतर कोर्टात पेमेंट करतांना त्या ठिकाणी पुन्हा इन्कमटॅक्स कापून घेतला जातो. टॅक्स मिळवण्यासाठी पुन्हा शेतक-याला प्रयत्न करावे लागतातात. अपिलाच्या बाबतीत शेतकरी भेटला नाही तर सरकारी अधिका-यांकडून लवकर अपील केले जात नाही. अपील झाले नाही तर शासन पैसे देत नाही. कारण **ॲक्वीसहाय्यक** अपील असते व त्यावर त्यांना निर्णय घ्यावयाचा असतो. जमीन संपादन होण्यास कोणाचाही विरोध नाही. जमीन संपादन झालीच पाहिजे कारण विकासासाठीच आपण जमीन संपादन करीत असतो. हा कायदा फार चांगला आहे. या कायद्याची अंमलबजावणी करण्याची सामाजिक मानसिकता कर्मचा-यांची व्हावी यादृष्टीने काही गाईडलाईन करणे व महाराष्ट्र शासनाने त्या दृष्टीने स्वतः पाऊल उचलणे तसेच इन्कम टॅक्सच्या बाबतीत ताबडतोबीने निर्णय घेणे गरजेचे आहे अशी भावना व्यक्त करुन मी माझे विचार येथेच थांबवते.

धन्यवाद..

यानंतर हिंदी भाषण श्री. शर्मा यांच्याकडे

. . . 4H 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. उपरकर ने जो अशासकीय प्रस्ताव लाया है, उस पर मैं अपने विचार आपके सामने रखना चाहता हूँ.

सभापति महोदय, मेरी जानकारी के मुताबिक माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे ने अपने क्षेत्र की बात की है. वहां पर इन्कम टॅक्स अधिकारी अपनी लिमिट से ज्यादा काम कर रहे हैं, क्योंकि इनकम टॅक्स एक्ट में शेती के उत्पादनों पर टॅक्स में छूट है. जहां तक 1894 के लॅन्ड एक्वीजीशन एक्ट का जिक्र माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे ने किया है, उसमें लॅन्ड एक्वायर होने के बाद उसका कम्पेनसेसन दिया जाता है. अगर किसान के मकान या पेड़-पौधों का एक्वीजीशन किया जाता है, उसका जो पेमेन्ट होता है, वह कम्पेनसेसन है. इसलिए उसके ऊपर इन्कम टॅक्स लगने का सवाल नहीं है. मैं वकील नहीं हूँ, लेकिन मुझे जानकारी है, इसलिए कह रहा हूँ. अगर सरकारी अधिकारी किसान को पेमेन्ट करने के पहले टॅक्स काट लेते हैं तो यह बात महाराष्ट्र शासन के दायरे में आती है. हमने गोसीखुर्द प्रकल्प के बारे में डील की है, लेकिन मुझे नहीं लगता कि सरकारी अधिकारी जब पेमेन्ट करते हैं तो टी.डी.एस. काट लेते हैं. अगर सरकारी अधिकारी टॅक्स काट लेते हैं तो राज्य सरकार को इस पर रोक लगानी चाहिए, क्योंकि इनकम टॅक्क्स एक्ट में ऐसा प्रोवीजन नहीं है. इसलिए मुझे ऐसा नहीं लगता है कि राज्य सरकार को इस बारे में केन्द्र सरकार को लिखने की जरुरत है. इस बारे में इन्कम टॅक्स का कानून स्पष्ट है.

माननीय सदस्या श्रीमती उषा ताई दराडे ने कहा कि लॅन्ड एक्वीजीशन में समस्या यह है कि यह 1894 का अंग्रेजों के जमाने का कानून है. इसमें पुनर्वसन का कोई कम्पोनेंट नहीं है. सेक्शन 4, सेक्शन 7, सेक्शन 9 के द्वारा लॅन्ड एक्वायर करना, लॅन्ड का अवार्ड होना और उसके द्वारा कम्पेनसेसन देना है. लेकिन किसान को जो कम्पेनसेसन मिलता है, उसको खोलने का अधिकार कोर्ट के इन्टरवेंशन के सिवाय किसी को नहीं है. लॅन्ड एक्वीजीशन एक्ट में भारत सरकार अभी व्यापक रुप में संशोधन कर रही है. इसमें 31 अक्टूबर 2007 को भारत सरकार ने जो रिवाइज आर एन्ड आर पॉलिसी लाया है, उसके अन्तर्गत एक्ट में संशोधन करने की तैयारी हो रही है. सन् 1894 के लॅन्ड एक्वीजीशन एक्ट, सन् 1919 के पुनर्वसन एक्ट तथा टी.डी.एस. की समस्या को ध्यान में रखते हुए जल्द से जल्द महाराष्ट्र शासन को इस

. . . 4H 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

समस्या के बारे में केन्द्र शासन को लिखना चाहिए. इनकम टॅक्स एक्ट में पार्लियामेंट में जो संशोधन हो रहा है, उसका प्रस्ताव बन गया है, वह शायद इस अधिवेशन में आ सकता है. लेकिन पार्लमेंट को विरोधी पक्ष के लोग चलने नहीं दे रहे हैं. पार्लमेंट को ये लोग चलने देंगे तो इस अधिवेशन में यह विधेयक आएगा नहीं तो यह विधेयक अगले अधिवेशन में आएगा. महाराष्ट्र शासन को इसमें व्यापक नोट भेजकर उस संशोधन में सारी बातों का समावेश करके यह देखना चाहिए कि यह किसानों की आमदनी नहीं है. किसान अपनी मर्जी से खेत नहीं बेच रहा है, इसलिए उसको मिलने वाले कम्पेनसेसन पर टॅक्स नहीं लगना चाहिए, इसकी पूरी केयर महाराष्ट्र सरकार को करनी चाहिए.

. . . . . .

भाषण पूर्ण, नंतर अजित शिगम.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक अतिशय महत्वाचा अशासकीय ठराव या ठिकाणी आणला आहे. त्या ठरावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 15-20 वर्षापूर्वी शेतीवर आयकर लावावा अशा हालचाली सुरु होत्या. परंतु त्यास यश आले नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न कितीही लाखात असले किंवा कोट्यावधी रुपयांमध्ये असले तरी त्यावर आयकर लागत नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रासाठी घर व शेत घरांचे संपादन केल्यावर मिळणाऱ्या नुकसान भरपाईवर आयकर लागू नये या दृष्टीकोनातून हा ठराव आणलेला आहे. या ठरावावर सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी अतिशय चांगले मुद्दे मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी देखील सांगितले की, शेतकरी जमीन विक्री करीत नाही. खरेदी विक्रीचा व्यवहार असेल तर त्यामध्ये कॅपिटल गेन हा मुद्दा येऊ शकतो. प्रकल्पासाठी ज्यांची जमीन बाधित होते त्यापोटी त्यांना नुकसान भरपाई मिळते. यामध्ये खरेदी-विक्री नाही. तेव्हा नुकसान भरपाईपोटी मिळणाऱ्या रकमेवर आयकरात एक्झम्शन मिळावे यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला विनंती करावी.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाई संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. आपण रेडीरेकनर प्रमाणे नुकसान भरपाई देतो. या विषयावर दोन्ही सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी असे विचार मांडण्यात आले होते की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना पुढील तीन वर्षात जमिनीचे काय भाव असतील, मागील तीन वर्षात किती टक्के दर वाढले याचा विचार करुन नुकसान भरपाई दिली पाहिजे. आता तर शेतीचे दर पाच-दहा पट वाढले आहेत. लहान गावांमध्ये एक एकराचा भाव 15-20 लाख रुपये आहे. मोक्याची जागा असेल तर 1 कोटी रुपये इतका भाव आहे. तेव्हा असे भाव वाढत असतील तर मागील रेडीरेकनरचे भाव लक्षात न घेता पुढील तीन वर्षात काय भाव असतील याची सरासरी काढून त्याप्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. माझ्या दोनच मागण्या आहेत. पहिली मागणी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईमध्ये वाढ केली पाहिजे आणि दुसरी मागणी म्हणजे त्यांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईवर आयकर आकारण्यात येऊ नये, यासाठी केंद्र सरकारला पत्र लिहावे, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी अतिशय महत्वाचा अशासकीय ठराव मांडताना शेतकऱ्यांना भूसंपादनापोटी मिळालेल्या नुकसान भरपाईच्या रकमेतून जो आयकर आकारण्यात येतो त्याकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. या ठरावावर सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री एस.क्यू.जमा तसेच सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी विचार मांडले. भूसंपादन करताना कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात याबाबत सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी सविस्तर मुद्दे मांडले. त्यामध्ये मूल्यांकन करण्याची पध्दत असेल किंवा वेळेवर अवॉर्ड न होणे, लॅप्स होणे, यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी जो कालावधी लागतो त्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके ...

सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने शासनाच्या वतीने मी एवढेच सांगू इच्छितो की, केन्द्र सरकारच्या आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 एलए नुसार आयकर कापला जातो. त्याचबरोबर जे अधिकारी मोबदला देतात त्याच्या दृष्टीकोनातून टॅक्स डिडक्शन ॲट सोर्स करणे हे सक्तीचे करण्यात आलेले आहे. एखाद्या भूसंपादन अधिका-याने टॅक्स डिडक्शन ॲट सोर्स न करता सबंधित शेतक-याला जर रक्कम दिली तर त्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई होऊ शकते. या विधेयकाच्या निमित्ताने जी मागणी करण्यात आलेली आहे त्या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने केन्द्र सरकारशी म्हणजेच केन्द्रीय वित्त विभागाकडे शेतक-यांची बाजू घेऊन हा विषय त्यांच्यापुढे नेण्यात येईल आणि विकास कामासाठी, प्रकल्पासाठी वा इतर कामासाठी ज्या शेतक-यांची घरे वा जमिनी संपादित केल्या जातात या शेतक-यांच्या जमिनी वा घरे सक्तीने संपादित केल्या जातात त्या शेतक-याला कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही त्याला फक्त जमिनीचा मोबदलाच दिला जातो म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने केन्द्र सरकारच्या वित्त विभागाशी यासंबंधी शेतक-याच्या बाजूचा निर्णय व्हावा म्हणून शासन आग्रह धरील व त्याबाबतीत पाठपुरावा करील. सन्माननीय सदस्यांची हा ठराव मांडण्या मागची भूमिका आहे ती विचारात घेऊन लवकरात लवकर याबाबतीत केन्द्र सरकारकडे राज्य सरकार पाठपुरावा करील.

श्री.दिवाकर रावते : शेतक-यांच्या जीवन मरणाचा हा प्रश्न आहे तेव्हा लवकरात लवकर म्हणजे किती दिवसात पाठपुरावा करणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की याबाबतीत महसूल विभागाने एक प्रस्ताव तयार केला आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांची त्याला मान्यता देखील घेतलेली आहे . पुढील आठ ते पंधरा दिवसात हे पत्र केन्द्र सरकारला पाठविण्यात येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : तोपर्यत ज्या शेतक-यांना नोटीसेस पाठविल्या जात आहेत त्याची प्रक्रिया थांबविण्यात येणार आहे काय त्याचबरोबर दहा लाख रुपयातील 1 लाख रुपये कापून घेण्यात आलेले आहेत. त्याने मार्च महिन्यात जर रिटर्न फाईल केले नाहीतर त्याचे पॅसे लॅप्स होणार आहेत तेव्हा हे पैसे लॅप्स होऊ नयेत यासाठी कोणती उपाययोजना करणार येणार

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

आहे.टीडीएसचे पैसे मिळावेत यासाठी रिटर्न फाईल केल्यानंतर दीड वर्षानंतर पैसे मिळणार आहेत. एखाद्या शेतक-याने घर बांधावयास सुरुवात केलेली आहे त्यामुळे त्याला तातडीने पैसे मिळावेत याकरता कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : आयकर अधिनियम 1961 मधील कलम 197तील तरतुदीनुसार एक्झम्शन सर्टिफिकेट जर त्या शेतक-याने अगोदर घेतले तर हा आयकर कापला जात नाही. हे सर्टिफि केट शेतक-याने घ्यावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते :मघाशी सन्माननीय सदस्यांनी अगदी बरोबर उल्लेख केला होता शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या जातात म्हणजे ही खरेदी किंवा विक्री होऊ शकत नाही. त्या शेतक-याची इच्छा नसतांसुध्दा प्रकल्पासाठी त्याची जमीन घेतली जात असल्यामुळे सरकारने हे एक्झम्शन सर्टिफिकेट मागावे. त्या शेतक-याच्या इनकम टॅक्ससाठी टीडीएसकरता एक्झम्शन मिळावे याकरता सरकारने जर लमसम सर्टिफिकेट घेतले तर बरे होईल.प्रत्येक शेतक-याने हे सर्टिफिकेट घ्यावे असे शासनाचे मत असेल तर त्यामुळे प्रत्येक सीएचा धंदा वाढणार आहे.

श्री.प्रकाश सोळंके :सीएचा धंदा वाढविण्याचा हा प्रश्न नाही. राज्य सरकारला हे एक्झम्शन घेता येणार नाही ते शेतक-याने घेणे अपेक्षित आहे.

श्री दिवाकर रावत : आपणास त्यांच्या जमिनी घेता येतात काय ?

श्री प्रकाश सोळंके : जमिनी घेता येतात. परंतु एक्झम्शन सर्टिफिकेट मात्र शेतक-यानेच घेतले पाहिजे राज्य सरकारला ते घेता येत नाही यासबंधीची कायदेशीर तरतूद मी आपल्याला सांगितली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी सूचना केली आहे तिचा देखील विचार केला जाईल सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून अशी मागणी केलेली आहे की राज्य सरकारने केन्द सरकारकडे पाठपुरावा करावा तेव्हा निश्चितपणे हा पाठपुरावा करण्यात येईल अशी मी त्यांना ग्वाही देतो आणि हा अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.परशुराम उपरकर: 15 दिवसात यासबंधीची कार्यवाही करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सागितलेले असल्यामुळे हा अशासकीय ठराव मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे धेण्यात आला.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आजच्या अशासकीय कामकाजामध्ये तिसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेला माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा अशासकीय ठराव पुढील अधिवेशनामध्ये मांडण्यात यावा अशी मी माननीय सदस्यांना विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ठीक आहे.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यत विशेष बैठक होईल. यामध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 1.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक 6 वाजून 46 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 13.12.2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

*****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही